म. ग्रं. सं. ठाणे
विषय
सं. क्र. २०८

REFBK-0000859

महात्मा–गौतम

भारत-गौरव-ग्रंथमाला-पुष्प सहावें.

चारित्र 300. सं.च.४०

# महात्मा-गौतम.



REFBK-0000859

नहि ज्ञानेन सदृशं पवित्रमिह विद्यते ।

भगवान् श्रीकृष्ण.

लेखकः

प्रभाकर.

१९१३.

किंमत दहा आणे.

Publisher:

**P. S. BHASE.**

MANAGER,

BHARAT GOURAV GRANTHA MALA,

GIRGAON, BOMBAY.

Printed by

G. N. Kulkarni at his Karnatak Press,
No. 7, Girgaum Back Road,
BOMBAY.

# प्रकाशकाचे दोन शब्द.

सर्वशक्तिमान् परमेश्वराच्याकृपेनें आणि आमच्या आश्रयदात्यांच्या मदतीनें भारत-गौरव-ग्रंथमालेचें हें सहावें पुस्तक नियमाप्रमाणें तीन महिन्याच्या आंतच आश्रय-दात्यांच्या हातीं पडत आहे, याबद्दल आमच्या हितचिंतकांना आनंद वाटल्या-वांचून राहणार नाहीं, अशी आमची समजूत आहे. तीन तीन महिन्यांनीं एकेक पुस्तक प्रसिद्ध करावयाचा ग्रंथमालेचा नियम असूनहि केवळ वर्गणीदारांच्या अपूरत्या संख्येमुळें आजवर चार किंवा पांच महिन्यांवांचून पुस्तक प्रसिद्धच करितां आलें नाहीं; पण आतां नियमितपणें पुस्तकें प्रसिद्ध करण्याइतकी आश्रयदात्यांची संख्या वाढली आहे, हें कळविण्यास आह्मास मोठा संतोष वाटतो; तथापि एवढ्यानें ग्रंथमालेचें कार्य पूर्ण सुयंत्रित चालणार आहे, असें मात्र नाहीं. ग्रंथमालेस व्यवस्थित स्वरूप येण्यास अद्यापहि पुष्कळ आश्रयदात्यांची आवश्यकता आहे.

कोणता तरी व्यवसाय करावयाचा या उद्देशानें हा ग्रंथप्रकाशनाचा व्यवसाय आह्मी करीत नसून खरोखरच महाराष्ट्रसाहित्याची एकनिष्ठपणें सेवा करावी, ग्रंथ-प्रकाशनाच्या व्यवसायास अगदींच निराळें, पण उपयुक्त वळण लावावें आणि महाराष्ट्रसमाजाला आपल्या कर्तव्याची ओळख करून द्यावी एवढ्याच पवित्र उद्देशानें हा व्यवसाय हातीं घेतला आहे. ग्रंथप्रकाशनाची जबाबदारी न ओळखणाऱ्या कित्येकांना हा व्यवसाय कदाचित् फार सोपा वाटेल; पण खरोखर जर एखादा बिकट व्यवसाय असेल, तर तो ग्रंथप्रकाशन हाच होय. स्माइलच्या ड्यूटी नांवाच्या पुस्तकांत या जबाबदारीची कल्पना फार चांगल्या रीतीनें दिलेली आहे. एकदां एका ग्रंथकारानें एका गृहस्थास एका स्त्रीचा खून करितांना पाहिलें. पुढें दोघांच्याहि मृत्यूनंतर ख्रिस्ताच्या कल्पनेप्रमाणें जगाच्या शेवटच्या दिवशीं सगळ्यांना थडग्यांतून काढून पाप-पुण्याचा निवाडा चालला असतां ग्रंथकार व खुनी या दोघांची चवकशी एकाच वेळीं सुरूं झाली. त्यांत दोघांच्या पापपुण्याचा हिशोब होऊन खुनी गृहस्थास थोडी शिक्षा झाली आणि ग्रंथकारास नरकांत लोटण्यांत आलें. हा प्रकार पाहून ग्रंथकारास पराकाष्ठेचा उद्वेग वाटला व तो देवाला ह्मणाला, 'देवा, ज्यानें खून केला त्याला थोडी शिक्षा आणि ज्यांनीं ग्रंथलेखन केलें त्याला नरकवास; हाच काय तुझ्या घरचा चोख न्याय?' देवानें उत्तर दिलें, 'अरे, त्यानें त्या स्त्रीचा

भारत–गौरव–ग्रंथमालेला जे आश्रय देतील, तेच कायते महाराष्ट्रसाहित्याचे खरे भोक्ते, असें कांहीं आह्मी ह्मणत नाहीं; पण जे आपणास साहित्याचे खरे भोक्ते समजतात, त्यांनीं या ग्रंथमालेला कां आश्रय देऊं नये असा आमचा त्यांनां प्रश्न आहे. लक्ष्मीचें आणि सरस्वतीचें साधारणत: सरळ नसतें, ही कोटी तर त्यांनां केव्हांच लढवितां येणार नाहीं; कारण ग्रंथमालेच्या प्रत्येक पुस्तकाची व्ही. पी. सह आठ आणे किंमत असते आणि प्रत्येक पुस्तक तीन महिन्यानें प्रसिद्ध होतें; या दृष्टीनें जर ते अशा उत्कृष्ट पुस्तकांच्या संग्रहासाठीं महिन्यांत तीन आणेहि खर्च करण्यास तयार नसतील तर महाराष्ट्रसाहित्याच्या उन्नतीसाठीं ते थोडादेखील स्वार्थत्याग करण्यास तयार नाहींत, हें नाहीं का स्पष्ट होत ? 'ग्रंथमालेचा प्रयत्न आह्मास पसंत नसल्यामुळें आह्मीं आश्रय देत नाहीं,' असें जर ते ह्मणत असतील, तर ते एंजिनमधील यंत्रें आणि वाफ हीं निरनिराळीं ठेवून गाडीनें भरधांव पळावें अशीच चमत्कारिक इच्छा ते बाळगतात असें नव्हे काय ? वृक्षाला मनाजोगतीं फळें येत नाहींत ह्मणून शहाणा माळी तें तोडून न टाकतां त्यास खत पाणी घालण्याची जशी व्यवस्था करतो, त्याप्रमाणें या साहित्यभक्तांनीं ग्रंथमालेला आश्रय देऊन तिला आपल्या हुकमतींत आणून ठेवणें हाच खरा मुत्सद्दीपणा नव्हे काय ? पण साहित्योन्नतिपेक्षां जेथें कीर्तिविवशताच अधिक आहे, तेथें ही सरळ न्यायबुद्धीची गोष्ट तरी कितीशी पटणार ?

हें विवेचन बऱ्या विद्वानांचें मन दुखविण्यासाठीं केलें नसून आमच्या हल्लींच्या आश्रयदात्यांना संस्थेची करुणा यावी, या उद्देशानें केलें आहे. त्यांच्या हातीं हें जें **माहात्मा–गौतम** पुस्तक आहे, त्याचा त्यांनीं कोणत्याहि दृष्टीनें विचार केला, तरी हें पुस्तक सहा आण्यांत देण्यांत संस्थेनें पुष्कळच स्वार्थत्याग केला आहे, असें त्यांना कबूल करणें भागच पडेल. पुस्तकासाठीं वापरलेला कागद नेहमींपेक्षां दुप्पट महाग असून मुखपृष्ठाचा कागदहि फार महाग आहे. शिवाय अवश्य तितकीं चित्रेंहि दिलीं आहेत. एवढें सर्व केल्यामुळें ग्रंथमाला पुष्कळ खर्चांत पडली आहे. तिला त्यांतून निर्विघ्नपणें पार पाडण्यासाठीं प्रत्येक आश्रयदात्यानें निदान एक तरी नवीन आश्रयदाता मिळवून द्यावा अशी त्यांनां आमची नम्रपणें अत्यंत कळकळीची विनंति आहे. निदान पांच हजार तरी आश्रयदाते मिळाल्यावांचून संस्थेचें कार्य सुरळीत चालणार नाहीं. हल्लीं सुमारें तीन हजार वर्गणीदार आहेतच तेव्हां प्रत्येकानें एक वर्गणीदार मिळून

देण्याचा प्रयत्न केल्यास महाराष्ट्र साहित्याच्या उन्नतीचें एक मोठें साधन निर्माण केल्याचें श्रेय आमच्या आश्रयदात्यांना साहजिकच मिळणार आहे. या सोबत मुद्दाम एक कार्ड पाठविलें आहे, तें प्रत्येक आश्रयदात्यांनीं भरून पाठविल्यास आमच्यावरच नव्हे, तर महाराष्ट्र साहित्य व समाज यांवरहि उपकार होणार आहेत.

## जाईचा मंडप.

ही ऐतिहासिक कादंबरी असून येत्या मे महिन्याच्या पहिल्या आठवड्यांत खात्रीनें प्रसिद्ध होईल. उज्वल कर्तव्यनिष्ठा, पवित्र प्रेम, सात्विक स्वाभिमान या ईश्वरी सद्गुणांपुढें आसुरी सामर्थ्याचा अखेर कसा नाश होतो, याचें परिणामकारक कथानक या कादंबरींत रेखाटलें आहे. अकबराच्या कारकीर्दीत एका संस्थानिकानें आपलें स्वातंत्र्य राखण्यासाठीं केलेल्या प्रयत्नाचें हींत फारच बहारीचें वर्णन आहे. शरच्चंद्र व कुमुदनाथ यांच्या निःसीम स्नेहानें श्रीरामचंद्र व भरत यांच्या प्रेमाची आठवण होते. शरच्चंद्र व सरला यांच्या निःस्वार्थ प्रीतीनें अंतःकरण गहिंवरून जातें. शरदाचें असामान्य धैर्य, कर्तव्यावद्दलची जागरूकता, मातृभूमीवरील अढळभक्ति, इत्यादि सद्गुण पाहून त्याच्याविषयीं धन्य धन्य असे उद्गार बाहेर पडतात. जन्मभूमीच्या कल्याणासाठीं महातेजस्वी धैर्यधर यांचें उदात्त व्रत पाहून रघुकुलांतील नृपतींची आठवण होते. उलटपक्षीं तुंगवीर्याची अखंड अधोगामी प्रवृत्ति, अमर्याद नीचतेनें गुरुफटलेलें त्याचें मन, त्याचा स्वजनद्रोह, त्याची कुटिलता वगैरेमुळें त्याच्या आसुरी हृदयाची सहज ओळख पटते. राणी नलिनीची राज्यतृष्णा, तिच्या पतित हृदयानें सुवर्णपुराला लागलेली परसत्तेची कालिमा पाहून मन उद्विग्न होतें. विमलेचें विमल प्रेम, तिची वीरवृत्ति, कमलाकांत व विपिन यांची स्वामिभक्ति, मदनिका व वत्सला यांचा स्वार्थत्याग, अफजुल्ला व मोहबतखा यांची चढाओढ वगैरे सर्वच प्रकार चित्ताकर्षक व बोधप्रद आहेत. कादंबरीची भाषा काव्यसूत्राप्रमाणें मनोहर व प्रतिभायुक्त असून निसर्गाचीं वर्णनें फारच बहारीचीं आहेत. ज्यांचीं हृदयें नानाप्रकारच्या उपाधींनीं तप्त झालीं असतील, निराश बनलीं असतील, उदासीनतेनें व्यापून गेलीं असतील, त्यांनीं निदान एकवार तरी या जाईच्या मंडपांत प्रवेश करावा, ह्मणजे तीं शांत, कर्तव्यतत्पर व आशेनें प्रफुल्ल होतील.

गिरगांव,
मुंबई, तारीख १ मार्च. १९१३.

सर्वांचा नम्र साहित्यसेवक,
**प्रभाकर श्रीपत भसे.**

ચારિત્ર ૨૦૮



भगवान् गौतमबुद्ध.

# महात्मा गौतम.

## प्रकरण पहिलें.

### उपक्रम.

इयति जगति पूज्यं जन्मगृण्हाति कश्चित् ।
विपुल कुशल सेतुः सत्वसंतारणाय ॥

ऐन मध्यरात्रीचा समय झालेला असल्यामुळें वसुंधरेनें निसर्गतः नितांत स्तब्ध स्वरूप धारण केलें होतें. पारिवारिक श्रमानें थकलीभागलेली जनता निद्रामातेच्या मृदु अंकावर स्वस्थ घोरत पडली होती. पौर्णिमेच्या पूर्णशशि-करांतून निघालेल्या शीतल किरणशलाकांनीं सृष्टि जितकी उज्वल दिसत होती, तितकीच ती शांत भासत होती. मारुताच्या मंद लहरींनीं वृक्ष-लतादि कांहींशा हालत; पण तेवढयानें त्यांचा निद्राभंग होत नसे. अशा या रम्य व शांत वेळीं कपिलवस्तु नांवाच्या नगरावरहि शांतता व निद्रादेवी या दोघींनीं आपली सत्ता प्रस्थापित केली होती; पण नगराधिपति शुद्धोदन अझून जागृतच होता. जागृत होता इतकेंच नव्हे, तर कमरेला तलवार लटकावून शहरांत गस्त घालीत फिरत होता. मोठें आश्चर्य ह्मणावयाचें ! एवढ्या मोठ्या राज्याच्या अधिपतीला राजदूताचें कार्य करतांना पाहून आश्चर्य वाटणें हें साहजिक होय. विलासलोलुप श्रीमानांना, तर राजा वेडा असावा, असा देखील संशय यावयाचा ! पण खरोखर तसें नव्हतें. दूर-दृष्टीनें त्यावेळच्या परिस्थितीकडे नजर फेंकली, ह्मणजे राजा आपलें कर्तव्य बजावीत होता, असें कोणासहि ह्मणावें लागेल. त्यावेळची राजनीतीच

इतकी प्रखर होती कीं, सुखाचें निधान ह्मणून समजलें जाणारें राज्य नीतिमान राजांना असिधाराव्रताप्रमाणें कठिण कर्तव्य वाटत असे. प्रजेच्या कल्याणासाठीं, प्रजेच्या सुखासाठीं आणि संरक्षणासाठीं, राजदूताचेंच काय, पण त्यापेक्षांहि हलकें काम राजांना कर्तव्यजागृतीमुळें करणें भाग पडे. या कर्तव्याची ओळख राजा शुद्धोदन यासहि झालेली असल्यामुळें राजदूत प्रजेचें संरक्षण चांगल्या रीतीनें करीत आहेत कीं नाहींत, हें पाहण्यासाठीं केव्हां केव्हां तो स्वतः राजदूताचा वेष धारण करून आपल्या नगरांत व राज्यांतील अन्य ठिकाणीं देखील फिरत असे. आज रात्रींहि केवळ याच उद्देशानें तो कपिलवस्तु नगरांत फिरत होता.

राजा शुद्धोदन याचें राज्य फार विस्तृत होतें. त्याच्या प्रदेशाच्या पश्चिम दिशेला अयोध्या प्रांत असून उत्तर दिशेला नेपाळचें राज्य होतें. राजधानीचें शहर जें कापिलवस्तु तें अत्यंत विस्तीर्ण असून फार सुंदर होतें. हल्लीं भुयला या नांवानें प्रसिद्ध असलेलें शहर हेंच पूर्वीचें कपिलवस्तु नगर होय. तसेंच या शहराजवळून वाहणाऱ्या कोहाना नांवाच्या पुण्यसरितेला त्यावेळीं रोहिणी असें नांव होतें. शुद्धोदन राजानें आपलें कपिलवस्तु नगर अत्यंत रमणीय असें तयार केलेलें असून शहराच्या संरक्षणासाठीं सभोंवतीं मोठा भक्कम कोट बांधलेला होता. या कोटाला शहरांतून गेलेल्या मार्गानुरोधानें शहराच्या बाहेर पडण्यासाठीं अनेक मोठाले दरवाजे ठेवलेले होते. हे दरवाजे रात्रीं बंद केले म्हणजे शहरांतून बाहेर जाण्यास किंवा बाहेरून शहरांत येण्यास मार्ग उरत नसे. अगोदरच शहर अत्यंत सुंदर होतें. त्यांत रोहिणी नदीच्या प्राकृतिक सौंदर्यामुळें आणखी अवर्णनीय अशी शोभा आली होती. शहराच्या मध्यभागीं राजप्रासाद असून तो फार प्रकांड, सुंदर व अपूर्व होता. राजा शुद्धोदन अत्यंत धर्मनिष्ठ असून फार पराक्रमी व विशेष

न्यायप्रिय होता. आपल्या प्रजेला तो फार प्रेमानें वागवीत असून त्यांच्या सुखदुःखाविषयीं तो अत्यंत काळजी घेत असे. त्याची प्रजाहि त्याच्यावर फार भक्ति करणारी असून ती सुखी व संपन्न होती. त्या राजाला दोन स्त्रिया होत्या. एकीचें नांव मायावती असें असून दुसरीचें नांव प्रजावती अथवा गौतमी असें होतें. दोन्ही स्त्रिया सौंदर्यसंपन्न असून सुशील व सदाचरणी होत्या. एवढें मोठें विस्तृत राज्य, संपन्न व धार्मिक प्रजा आणि सुशील व सुंदर स्त्रिया, अशा अमूल्य सामग्रीमुळें शुद्धोदन राजा फार सुखी असावा, असें कोणासहि वाटण्याचा संभव आहे; परंतु खरी स्थिति तशी नव्हती. एका दैवी कारणामुळें स्वतः राजा, त्याच्या राण्या व त्याची सर्व प्रजा सुखाचीं साधनें असूनहि कांहींशी दुःखी होती. त्या दुःखाचें कारण राजा निपुत्रिक होता हें होय. राजाचें वयमान जसजसें वाढत चाललें होतें, तसतशी सर्वांची वरील चिंताहि वाढत चालली होती. राजा साधारण वृद्ध झाल्यावर त्यानें पुत्रप्राप्तीची बहुतेक आशाच सोडून दिली होती; तथापि पुत्रप्राप्तीसाठीं ईश्वराराधना वगैरे योग्य उपाय कोणी सांगितल्यास तो ते मोठ्या श्रद्धेनें करीत असे.

असो. वर लिहिल्याप्रमाणें त्या रात्रीं राजा शुद्धोदन नगरांत फिरत असतां एका दरवाजाजवळ राजदूत कोणाशीं बोलत आहे, असा राजाला भास झाल्यामुळें तो हळूच जवळ गेला आणि राजदूत काय बोलत आहे, तें ऐकूं लागला. राजदूत गस्त घालीत असतां दरवाजाकडे तोंड करून मोठ्यानें म्हणाला,

"बाबा, तूं ब्राह्मण ऐस कीं, कोणीहि ऐस. दरवाजा उघडून तुला आंत घेण्यास मी यावेळीं अगदीं असमर्थ आहें. जशी राजाज्ञा आहे, तसें मला वागलें पाहिजे."

दरवाजाबाहेर उभा असलेला मनुष्य म्हणाला,

"तसें असेल, तर नको उघडूं. तूं राजाज्ञेचें उल्लंघन कर, असें मी तुला केव्हांहि सांगणार नाहीं. मी सूर्योदय होईपर्यंत दरवाजाबाहेरच पडून राहतों."

वरील संभाषण ऐकून राजाच्या मनांत साहजिक जिज्ञासा उत्पन्न झाली व तो राजदूताजवळ जाऊन म्हणाला,

"काय रे, बाहेर कोण आहे ?"

राजदूत राजाला अभिवादन करून म्हणाला,

"बाहेर कोणी प्रवासी आलेला आहे. आपण ब्राह्मण असून रोहिणीनदीच्या अलीकडील तीरावर असलेल्या शिवमंदिरांत आपणास जाण्यासाठीं दरवाजा उघडा, असें तो म्हणत आहे."

ती हकीकत ऐकून राजाच्या मनांत निराळीच भावना उत्पन्न झाली. त्यानें राजदूताकडून दरवाजा उघडविला व ब्राह्मणास आंत घेतलें. पाहतो तों ब्राह्मण यौगिकबलसंपन्न असून त्याच्या मुखावर पवित्रतेचें तेज झळकत आहे. त्या ब्राह्मणास पाहतांच राजानें त्याला भक्तिपूर्वक प्रणाम केला व तो मोठ्या विनयानें ह्मणाला,

"महाराज, प्रजेचें संरक्षण करणें हें आमचें कर्तव्य असल्यामुळें माझ्या राजदूताला आपणाशीं असें वागावें लागलें, त्याबद्दल क्षमा असावी."

ब्राह्मण राजाला आशीर्वाद देऊन ह्मणाला,

"राजा, यांत क्षमा मागण्याचें कांहींच कारण नाहीं. तुझ्या सेवकांची कर्तव्यतत्परता पाहून मला उलट आनंद मात्र वाटला. मला वाटतें, तुझी प्रजा फार सुखी असावी ?"

"तें मी काय सांगू? आपण माझ्या नगरांत कांहीं दिवस राहण्याची कृपा केल्यास त्याविषयीं आपली खात्री होईलच."

"तूंहि सर्व प्रकारें सुखी आहेसना?"

"होय महाराज, ईश्वराच्या व आपणासारख्यांच्या आशीर्वादानें सुखी आहें; पण माझ्या पश्चात् हें प्रजारंजन करण्यास एखादा वंशतंतु नसल्यामुळें मी अगदीं नाउमेद झालों आहें."

राजाचे ते शब्द ऐकून ब्राह्मण कांहीं वेळ स्तब्ध उभा राहिला. नंतर किंचित् गंभीर स्वरानें ह्मणाला,

"राजा, ज्या गोष्टी ईश्वराधीन आहेत, त्यांबद्दल विषाद मानण्यांत तरी काय अर्थ! त्याची कृपा झाली, म्हणजे तुझा हाहि मनोरथ पूर्ण होईल."

"तें तर खरेंच; पण महाराज, त्या दयाघनाच्या कृपाप्रसादासाठीं मी काय करावें, तें आपण मला सांगाल, तर माझ्यावर मोठे उपकार होतील. ईश्वराराधना, देवांना नवस, यज्ञयागादि, वगैरे अनेक कृत्यें मीं आजवर केलीं; पण परमेश्वराचा अनुग्रह अद्यापहि माझ्यावर झालेला नाहीं."

"राजा, ईश्वराला ओळखून जोंपर्यंत आम्ही कांहीं करीत नाहीं, तोंपर्यंत त्याचा अनुग्रह तरी काय म्हणून व्हावा? देवांना नवस करणें म्हणजे ईश्वराला व्यापारी समजण्यासारखें खुळेपणाचें होय. देवाला अमुक एक वस्तु देण्याची लाह्चच दाखविली म्हणजे तो प्रसन्न होईल, असें केव्हांहि होणें शक्य नाहीं. तसेंच अग्नि सिद्ध करून त्यावर तूप अथवा अन्य पदार्थ ओतून त्यांचा नाश करणें हाहि वेडेपणा योय. 'अग्नीला संतुष्ट करावयाचें,' याचा खरा अर्थ असा आहे कीं, अन्नकष्टामुळें ज्यांचा जठराग्नि प्रदीप्त झालेला आहे, त्यांना अन्नदान करून संतुष्ट करणें, हाच खरा यज्ञ होय. तेव्हां तूं यापुढें यज्ञयागाची खटपट न करितां मनोभावानें ईश्वराची करुणा भाक आणि खरोखर ज्यांना जें दिलें पाहिजे, तें

देऊन त्यांचा आशीर्वाद संपादन कर, म्हणजे तुझी मनोवांछा सहज पूर्ण होईल. तुझ्या राज्यांत व अन्य ठिकाणीं जे विद्वान् सत्वस्थ व शास्त्रज्ञ ब्राह्मण असतील, त्यांना बोलावून आणून त्यांचा योग्य सत्कार कर. साधुसंन्याशांना बोलावून आणून त्यांचा चांगला गौरव कर, आणि अनाथ, अपंग व दीन दरिद्री असतील त्यांचा योग्य परामर्ष घे; म्हणजे ते प्रसन्न होऊन तुला आशीर्वाद देतील आणि त्यांच्या मंगल कामनेमुळें तुला पुत्रप्राप्ति होईल."

इतकें सांगून तो ब्राह्मण शिवमंदिरांत निजण्यासाठीं गेला. राजाहि सर्व शहरांत हिंडून राजवाड्यांत गेला व ब्राह्मणानें सांगितलेल्या गोष्टीचा विचार करीत करीत तो निद्रेच्या स्वाधीन झाला. दुसऱ्या दिवशीं राजानें सूर्योदय होतांच आपल्या राज्यांत सर्वत्र राजदूत पाठवून ब्राह्मणानें सांगितल्याप्रमाणें विद्वान ब्राह्मण, साधुसंन्याशी आणि अनाथ अपंग यांना शोधून आणून त्यांचा सत्कार करण्याचें कार्य सुरू केलें. त्या कार्यासाठीं राजानें एक अत्यंत विस्तृत आणि विशेष सुंदर असा मंडप उभारला होता. जो कोणी त्या मंडपांत येई, त्याचा राजा व त्याच्या दोन्ही राण्या योग्य सत्कार करून त्याची जी गरज असेल ती शक्त्यनुसार दूर करण्याचा प्रयत्न करीत. साधुसंन्याशी वगैरे जे कोणी येत त्यांची राजा आपल्या राण्यांसह निरालसपणें सेवाशुश्रूषा करी. असा एक महिनाभर क्रम चालला होता. त्या एका महिन्यांतच त्याच्या राज्यांतील सर्व साधुसंन्याशी, अनाथ अपंग वगैरे लोकांना राजाच्या दयादाक्षिण्याचा पूर्ण लाभ मिळाला व त्यांनीं राजाला 'पुत्रमान् हो' असा अंतःकरणपूर्वक आशीर्वाद दिला. हा समारंभ ज्या दिवशीं संपला, त्या दिवशीं पौर्णिमा होती. त्या दिवशीं रात्रीं वरील आशीर्वादधैर्यामुळें राजा व राण्या या सर्वांना निश्चित झोंप लागली होती. संतानचिंतेमुळें इतकी

स्वस्थ झोंप त्यांना यापूर्वीं क्वचितच मिळाली होती. तीं सर्व निद्रेंत निमग्न असतां पहांटेच्या सुमाराला राणी मायावाती झोंपेंतून एकदम दचकून उठली. तिच्या चेहऱ्यावर भयचिन्हें उमटलेलीं असून तिचें शरीरहि थरथर कांपत होतें. ती आपल्या निद्रिस्थ पतीला हलवून ह्मणाली,

" नाथ, जागे व्हा; जागे व्हा."

मायावतीचे ते भयाकुल शब्द ऐकून राजा शुद्धोदन एकदम जागा झाला. राणी प्रजावतीहि जागी होऊन उठून बसली. घाबरलेल्या मायावतीला अगदीं आपल्याजवळ घेऊन राजा शुद्धोदन ह्मणाला,

" मायावती, अशी घाबरलीस कां ? तुला काय झालें ?"

राणी प्रजावतीनेंहि तिला तोच प्रश्न केला. राणी मायावती पतीच्या हृदयावर आपलें मस्तक ठेवून ह्मणाली,

"नाथ, मला फार भीति वाटते. मी निद्रेंत असतां एक अगदींच चमत्कारिक स्वप्न माझ्या दृष्टीस पडलें."

मायावतीचे ते शब्द ऐकून दोघांच्याहि अंतःकरणांत विलक्षण जिज्ञासा उत्पन्न झाली. राणी प्रजावती व राजा शुद्धोदन या दोघांनीं तिला एकाच वेळीं प्रश्न केला.

शुद्धोदनानें मायावतीला आपल्या हृदयाशीं धरल्यामुळें व राणी प्रजावतीहि अगदीं तिच्याजवळ बसलेली असल्यामुळें मायावतीची भीति बरीच कमी झाली होती. ती त्या दोघांचा प्रश्न ऐकून आपलें स्वप्न सांगूं लागली. ती म्हणाली,

" मी जशी कांहीं पुत्रचिंतेनें फार त्रस्त झालेली असल्यामुळें मनाला बरें वाटावें ह्मणून आपल्या प्रासादाच्या उंच सौदावर जाऊन एका कोंचावर बसलेली आहें. त्यावेळीं सूर्य अस्ताचलीं जाऊन पृथ्वी-

वर अगदीं काळा कुट्ट अंधःकार पसरला होता. मी अर्थातच त्यावेळीं आकाशमंडपांत चमकणाऱ्या असंख्य तारकांकडे पाहून आपल्या मनाची करमणूक करून घेत होतें. जवळ जवळ मध्यरात्रीपर्यंत मीं त्या नक्षत्रांची मौज पहात होतें. तीं पहात असतां एक अत्यंत देदीप्यमान तारा आकाशमंडलांतून तुटला व तो विलक्षण वेगानें पृथ्वीकडे येऊं लागला. जणूं काय तो तारा आतां माझ्या मस्तकावरच पडतो कीं काय असें वाटून माझ्या मनांत भीति उत्पन्न झाली; परंतु जरी मला भीति वाटत होती, तरी तेथून उठून जाण्यास मी असमर्थ होतें. तेथून उठावें असें मला वाटे; पण शरीर इतकें जड झालें होतें कीं, जणूं काय मला कोणी कोंचाला बांधूनच टाकलें आहे, असें वाटलें. जरी भीति वाटत होती, तरी तो चमत्कार मी तसाच पहात होतें. आणखी थोडा वेळ गेल्यावर पाहतें तों त्या ताऱ्याचें स्वरूप विलक्षण तऱ्हेनें पालटत चाललें आहे, असें मला दिसूं लागलें. पाहतां पाहतां त्या ताऱ्याचा आकार फारच मोठा झाला व त्याला अत्यंत तेजस्वी अशा सहा प्रकांड किरणशलाका उत्पन्न झाल्या. हळूहळू त्या ताऱ्यानें प्रचंड श्वेत हस्तीचें स्वरूप धारण केलें, आणि त्याच्या विशाल शुंडेंत त्या किरणशलाका सहा दांतांप्रमाणें दिसूं लागल्या. त्या ताऱ्याचें तें विलक्षण रूप पालटतांच तो सहा दातांचा शुभ्र हत्ती आपल्या गच्चीवरच उतरला आणि तीक्ष्ण दृष्टीनें माझ्याकडे पाहूं लागला. तशा त्या स्थितींत त्या भयंकर हत्तीला अगदीं माझ्याजवळ पाहून मी अत्यंत भयाकुल झालें आणि कोणाला साहाय्यासाठीं बोलवावें ह्मणून किंकाळी मारण्याच्या बेतांत आलें; पण इतक्यांत त्या हत्तीनें माझी उजवी कुशी आपल्या शुंडेनें विदीर्ण केली आणि तो सूक्ष्म स्वरूप धारण करून माझ्या पोटांत अदृश्य झाला. त्यावेळीं तर मी फारच घाबरलें व तेथून उठून

जाण्याचा प्रयत्न करूं लागलें; पण इतक्यांत मी झोंपेंतून जागी झालें. नाथ, हेंच तें स्वप्न, या स्वप्नामुळें माझ्या अंत:करणांत फार भीति उत्पन्न झाली व म्हणून मी आपणांस झोंपेंतून उठविलें. नाथ, या स्वप्नाचा अर्थ काय? या स्वप्नामुळें मला जरी भीति वाटत आहे, तरी हें स्वप्न अशुभ असावें असें मला वाटत नाहीं."

मायावतीनें सांगितलेला तो स्वप्नवृत्तांत ऐकून राजा शुद्धोदन व राणी प्रजावती या दोघांनाहि मोठें आश्चर्य वाटलें. शुद्धोदनानें त्या स्वप्नाचा पुष्कळ विचार केला, पण तें स्वप्न शुभ अथवा अशुभ याचा निर्णय त्याला करितां येईना. सूर्योदय होईपर्यंत त्या तिघांचीहि स्वप्नाविषयीं चर्चा चालली होती. भगवान् वासरमणीचीं सुवर्णाप्रमाणें सतेज किरणें राजमहालांत येऊन पडल्यावर राजानें आपलें शय्यास्थान सोडलें व तो सूर्यास वंदन करून नित्योद्योगास लागला. राण्याहि रोजच्याप्रमाणें आपापलीं गृहकृत्यें करूं लागल्या. तिघेंहि नेहमींप्रमाणें आपापले व्यवहार पहात होतीं हें खरें, पण त्यांचीं मनें त्या दिवशीं वरील स्वप्नविचारामुळें स्वस्थ नव्हतीं. दुपारीं भोजन करून राजा दरबारांत गेल्यावर त्यानें आपल्या विद्वान् पुरोहितांना तें स्वप्न सांगितलें व त्यांना त्याचें शुभाशुभ फल विचारलें. त्या पुरोहितांत एक वृद्ध ब्राह्मण जोतिषशास्त्रांत अत्यंत निष्णात होता. तो त्या स्वप्नाचा विचार करून म्हणाला, " राजा, हें स्वप्न फार महत्वाचें असून तें शुभ आहे. ज्या रात्रीं राणीला हें स्वप्न पडलें, त्याच रात्रीं ती गर्भवती झाली असून तिला यथासमयीं पुत्र होणार आहे. तो पुत्र ऐहिक सौख्यबंधनानें बद्ध झाल्यास चक्रवर्ती राजा होईल आणि बद्ध न झाल्यास जन्ममृत्यूच्या बंधनापासून मुक्त होण्याचा एक निराळाच सोपानपथ जनतेच्या स्वाधीन करून हजारों लोकांचा उद्धार करील."

स्वप्नाचें तें शुभफल ऐकून राजाला व राण्यांना किती आनंद झाला असेल याची कल्पनाच केली पाहिजे. वरील स्वप्नास तीन चार महिने झाल्यावर राणी मायावती गरोदर आहे, हें आनंददायक वर्तमान शुद्धोदनाच्या सर्व राज्यांत पसरलें. त्याच्या राजभक्त प्रजेला त्या शुभवार्तेनें अत्यंत आनंद झाला व प्रजाजनांनीं राज्यांत सर्वत्र आनंदोत्सव सुरू केले. राणी मायावतीला नऊ महिने पूर्ण झाल्यावर तिनें प्रसूतीसाठीं आपणास आपल्या पितृगृहीं पाठवावें ह्मणून राजाला आपला मनोदय कळविला. शुद्धोदनानें राणीची ती विनंति मान्य केली व तिला रथ, पालख्या, दासदासी वगैरे लव्याजम्यानिशीं मार्गस्थ केलें. राणी मायावती एका प्रतापशाली राजाची राजकन्या होती. प्रसूतीसाठीं ह्मणून पितृगृहीं जातांना तिला जो आनंद झाला होता, तो कल्पनातीत होय; परंतु दैववशात् राणीची ती इच्छा पूर्ण झाली नाहीं. मार्गांत एका अरण्यांतून तिचा रथ चालला असतां, त्या वनप्रदेशाचें प्राकृतिक सौंदर्य पाहून राणी मुग्ध होऊन गेली व तिनें त्या अरण्यांत थोडा वेळ विश्रांति घेण्याची इच्छा सेवकांजवळ दर्शविली. सेवकांनीं राणीची ती आज्ञा मोठ्या संतोषानें मान्य केली व रथाचे घोडे मोकळे सोडून ते सर्व त्या अरण्यांत विश्रांति घेऊं लागले. ते दिवस वसंतऋतूचे असल्यामुळें त्या वनप्रदेशास स्वाभाविक रमणीयता आली होती. वृक्ष नवपल्लवांनीं अलंकृत होऊन व आपले विशाल बाहू पसरून सर्वत्र उभे होते. ते आपलें स्वागतच करीत आहेत, अशी त्या मनोहर वृक्षराजीकडे पाहिल्याबरोबर कोणाहि पथिकाची सहज कल्पना होई. त्यांतच कित्येक वृक्षांवर फळें व फुलें पाहून तीं पथिकांच्या सत्कारासाठीं वृक्ष आपल्या शाखारूपी बाहूंकडून पुढें करीत आहेत, असें वाटे. राणी मायावती त्या निकेतनाची शोभा पहात पहात जवळच असलेल्या घनदाट पलाशवनांत गेली. त्या वेळीं

त्या अरण्यांतलीं तीं पळसाचीं झाडें इतकीं फुललेलीं होतीं कीं, दुरून तो वनप्रदेश रक्तरंगाच्या पर्वताप्रमाणें दिसत होता. झाडावरचीं फुलें जमीनीवर गळून गळून त्यांचा सारखा थर पसरल्यामुळें तांबड्या रंगाचा गालीचाच पसरला आहे कीं काय, असा भास होत होता. राणी जेव्हां त्या फुलांवरून चालूं लागली, तेव्हां तिला ती पुष्पशय्या फारच मृदु वाटूं लागली. कांहीं वृक्षांना हातासरसे फुलांचे घोसच्या घोस असलेले पाहून, ते तोडण्याची राणीला साहजिक इच्छा झाली व त्याप्रमाणें ती ते घोंस तोडण्याचा प्रयत्न करूं लागली. राणी फुलें तोडण्याच्या नादांत इतकी गुंग झाली कीं, ती आपली गरोदरावस्था विसरून गेली व उंच असलेलीं फुलें उड्या मारून तोडूं लागली; परंतु राणीच्या या कृतीमुळें तिचें पोट दुखूं लागून तिला प्रसववेदना होऊं लागल्या. तिनें तावडतोब आपल्या दासींना व परिचारिकांना बोलाविलें; परंतु त्या राणी जवळ येऊन पोहोंचण्याच्या आधींच राणीनें पुष्पशय्येवर शयन करून एका सुंदर पुत्रास जन्म दिला. हाच पुत्र प्रस्तुत चरित्राचा नायक होय.

शुद्धोदनासारख्या प्रबल राजाच्या पट्टराणीला कल्पनाहि नसतां एका अरण्यांत प्रसूत होणाचा प्रसंग यावा, यांत दैवगतीचा कांहींच संबंध नाहीं, असें कोणीहि विचारी मनुष्य ह्मणण्याचें साहस करील, असें आह्मास वाटत नाहीं. जिचा सर्व जन्म मखमलमय मृदुशय्येवर लोळण्यांत गेला होता, तिला—त्या सम्राज्ञीला—प्रसूतिप्रसंगीं पुष्पशय्या उपयोगी पडावी या चमत्कारांत नवशिशूच्या पुढील आयुष्यचित्राची छाया उमटलेली नव्हती, असें कोण ह्मणेल ? मायावतीच्या बापानें ती प्रसूतीसाठीं येणार ह्मणून सर्व तयारी करून ठेवली होती. नवशिशूसाठीं अनेक प्रकारच्या मृदु गाद्यागिरद्या तयार केल्या; पण त्यांचा कांहींहि उपयोग न होतां नवशिशूला जगांत आल्याबरोबर वृक्षछायेखालच्या मृत्तिकेवर आश्रय घ्यावा

लागला ! राज्य, संपत्ति, अथवा कोणतेंहि ऐहिक सुख हें कांहीं खरें सुख नव्हे, हें सुचविण्यासाठींच कीं काय कोण जाणे, नवार्भकानें पहिलें पदार्पण सुवर्णमंचकावरील मृदुशय्येवर न करितां विश्वंभरानें सर्वांसाठीं निर्माण केलेल्या वसुंधरेवर केलें; जगच्चालकावर व त्यानें निर्माण केलेल्या पंचमहाभूतांवर एवढें प्रेम—एवढा विश्वास—असल्यावर तो जगदीश्वर व तीं पंचमहाभूतें त्या राजपुत्राची कां उपेक्षा करतील ? राणी प्रसूत होण्याबरोबर चंचल ह्मणून प्रसिद्ध असलेला वायु स्तब्ध उभा राहिला. जे फुलांचे घोस तोडण्यासाठीं राणी प्रयत्न करीत होती, तीं पुष्पें आतां झाडांवरून त्या अर्भकावर आपोआप पडूं लागलीं आणि निमिषार्धांत तें मूल लाल रंगाच्या शालजोडींत गुंडाळून ठेवल्याप्रमाणें दिसूं लागलें. इतकी तयारी होते न होते तोंच राणीच्या परिचारिका तिच्या जवळ आल्या व त्या अरण्यांत त्यांनीं राणीची व पुत्राची शक्य तितकी व्यवस्था ठेवली. मार्गांतच हा असा प्रकार झाल्यामुळें राणीनें पितृगृहीं जाण्याचें रहित करून परत पतिगृहीं जाण्याचें ठरविलें व तिनें तशी सेवकांना आज्ञाहि केली. लागलीच सेवकांनीं सर्व तयारी केली व ते मोठ्या बंदोबस्तानें मार्गक्रमण करूं लागले. राणी पुत्रमान् होऊन कापिलवस्तु नगरास परत येत आहे, हें वर्तमान राणी शहरांत येण्यापूर्वींच सर्वत्र पसरलें होतें. तें आनंददायक वर्तमान ऐकून प्रजेला साहजिक मोठा आनंद झाला व राज्यांत सगळीकडे आनंदोत्सव सुरू झाले. ज्या दिवशीं राणी शहरांत येणार होती, त्या दिवशीं तर लोकांनीं मोठाच समारंभ केला. ध्वजा, पताका, तोरणें, व वृक्षपल्लवांनीं अलंकृत होऊन कपिलवस्तु नगरांतील प्रासादशिखरें जेव्हां सभोंवतालीं दिसणाऱ्या प्रदेशाकडे पाहूं लागलीं तेव्हां इंद्राचें इंद्रभुवनच मर्त्यलोकीं आलें आहे कीं काय, असा भास होऊं लागला. स्त्रियांनीं रस्त्यावर सडासंमार्जन करून ते रंगवल्लिकांनीं गालिच्याप्रमाणें सुशोभित केले. सायं-

काळची वेळ होतांच प्रत्येक गृहावर सहस्रावधि दीप प्रज्वलित होऊन सर्व शहर अस्ताचलीं जाणाऱ्या सूर्यनारायणाची प्रतिस्पर्धा करूं लागलें. निरनिराळ्या वाद्यांच्या मधुरस्वरांनीं सर्व आकाश दुमदुमून गेलें. इतक्यांत मायावतीचा सुवर्णरथ नगरांत आला व नगरवासियांचा जयघोष सुरू झाला. रथावर पुष्पवृष्टि होऊं लागली. स्त्रिया पंचारति घेऊन ओंवाळूं लागल्या. ' राजपुत्र दीर्घायु होवो ' असा प्रत्येकाच्या मुखांतून आशीर्वाद निघूं लागला. राणीचा रथ राजवाड्यांत जाईपर्यंत हजारों लोक रथामागून चालले होते. परिचारिकांनीं राणीला योग्य अशा गृहांत नेऊन ठेवल्यावर प्रजेनें केलेल्या त्या आनंदोत्सवाबद्दल राजानें त्यांच्याजवळ कृतज्ञता व्यक्त केली व सर्वांना आपापल्या घरीं जाण्याविषयीं प्रेमानें निरोप दिला. दुसऱ्या दिवसापासून राज्यांतील मांडलिक वगैरे मोठमोठे श्रीमान् लोक चांगल्या प्रकारचा नजराणा घेऊन मुद्दाम राजपुत्राच्या दर्शनासाठीं येऊं लागले. त्यांतच एक वृद्ध ब्राह्मणहि एके दिवशीं सकाळीं सूर्योदय झाला नाहीं, तोंच राजप्रासादांत येऊन उभा राहिला. त्याच्या मस्तकावरील जटाभार पांढरा शुभ्र असून हृदयावर रुळणारी दाढीहि तितकीच सफेत होती. तो जरी इतका वृद्ध झाला होता, तरी योगबलानें शक्तिसंपन्न व तपोबलानें तेज:पुंज दिसत होता. त्या ऋषीचें आगमन राजवाड्यांत होतांच राजाच्या अंत:करणांत एकदम श्रद्धा उत्पन्न झाली व तो त्या ऋषीला सामोरा जाऊन मोठ्या सत्कारानें त्याला आंत घेऊन आला. राजा शुद्धोदन ऋषीला वंदन करून नम्रपणें ह्मणाला,

" महाराज, आपल्या आगमनामुळें मी अत्यंत अनुग्रहित झालों आहें. आपली जी कांहीं इच्छा असेल, ती मला सांगावी."

आलेला ऋषि राजाला प्रसन्न वाणीनें ह्मणाला,

" राजा, माझें नांव कालदेवल. तुझ्याकडे कांहीं मागण्याच्या उद्देशानें मी आलों नसून केवळ तुझ्या पुत्राच्या दर्शनासाठीं आलों आहें."

ऋषीचे ते शब्द ऐकून राजाच्या अंतःकरणांत ऋषीविषयीं अधिक *श्रद्धा* उत्पन्न झाली. तो ह्मणाला,

" महाराज, फार उपकार झाले. माझ्या मुलाला आपणांसारख्यांचे आशीर्वाद मिळावेत, हीच माझी इच्छा आहे. आपण माझ्याबरोबर अंतः-पुरांत चला ह्मणजे मी आपल्या चरणांवर माझ्या पुत्रास ठेवतों."

असें ह्मणून राजा शुद्धोदन कालदेवल ऋषीला प्रसूतिगृहांत घेऊन गेला. तेथें त्या ऋषीला पाहून राणी मायावतीच्या अंतःकरणांत विलक्षण पूज्यबुद्धि उत्पन्न झाली. तिनें ऋषिचरणावर मस्तक ठेवून त्याचा आशीर्वाद घेतला व नंतर ती नवशिशूसहि ऋषीच्या पायांवर ठेवूं लागली; परंतु कालदेवलानें राणीला तसें करूं दिलें नाहीं. तो किंचित् मागें सरून साश्चर्य पण गंभीर स्वरानें ह्मणाला,

" मायावती, हें तूं काय करतेस! तूं कोणाला प्रसवली आहेस? ज्याच्या पदप्रांतावर विनत होऊन आह्मी आपणास पावन करून घ्यावें, त्याला माझ्या चरणावर कसें ठेवतेस?"

असें ह्मणून कालदेवल त्या नवार्भकाकडे एकाग्रदृष्टीनें पाहूं लागला. नंतर आपलें मस्तक भूमीला लावून ह्मणाला,

" शिशुस्वरूप भगवन्, दयानिधे, माझें वंदन ग्रहण कर. तूं दुसरा कोणी नाहींस. माझी उपास्यदेवता ती तूंच होय. अरुणप्रभाप्रमाणें तुझ्या पदतलांवर ध्वजवज्रांकुशादि चिन्हें पाहून तुझ्या अवताराबद्दल मला मुळींच शंका राहिली नाहीं. प्रभु, बुद्ध तो तूंच. सर्व जगाच्या कानांवर मुक्तिमंत्र घालून जनतेला निर्वाणपथ दाखविण्यासाठींच तुझा अवतार. तुझ्या दर्शनामुळें मी आज धन्य झालों."

असें ह्मणून कालदेवल प्रसूतिगृहाच्या बाहेर पडला. राजा शुद्धोदन त्याला पोहोंचविण्यासाठीं त्याच्याच बरोबर चालला होता. कालदेवलाचे

ते शब्द ऐकून पुत्राचा सविस्तर वृत्तांत ऐकण्याची राजाला साहजिक इच्छा झाली व त्याप्रमाणें त्यानें ऋषीला प्रश्नहि केला; परंतु कालदेवलानें ती सर्व हकीकत राजाला सांगितली नाहीं. तो ह्मणाला,

" राजा, केवळ तुझ्या सदाचरणवृत्तीमुळेंच या पुत्रानें तुझ्या घरीं जन्म घेतला आहे. पार्थिव वृक्षाला असें सुंदर व सोज्वल पुष्प या सहस्र वर्षांत देखील आलें नव्हतें. या पुष्पाच्या सुमनोहर सुवासानें सर्व जग प्रसन्न होईल. या आनंददायक प्रसंगीं तुह्मां संसारी जनांच्या दृष्टीनें एक गोष्ट मात्र अनुचित होणार आहे. राणी मायावती लवकरच कालवश होणार आहे; पण तिला स्वर्गप्राप्ति होईल. स्वर्गांत देवता तिचा मोठा सत्कार करतील."

राजाला याप्रमाणें सांगून कालदेवल क्षणार्धांत राजवाड्याच्यां बाहेर पडून कोणीकडे निघून गेला. राजानें ऋषिवाक्यांचा पुष्कळ विचार केला; पण त्याला त्या गूढ बोलण्याचा कांहीं अर्थबोध झाला नाहीं. ऋषीचें शेवटचें वाक्य दुसऱ्याच दिवशीं खरें झालें. त्या दिवशीं सूर्योदय झाला नाहीं, तोंच मायावतीला एक प्रकारची सौख्यनिद्रा येऊं लागली. त्या निद्रेच्या स्वरूपावरून ती अक्षयची आहे, असें मायावतीच्या तेव्हांच लक्षांत आलें. तिनें पुत्राचें शेवटचें चुंबन घेऊन त्यास प्रजावतीचे स्वाधीन केलें व त्याचें चांगल्या रीतीनें संरक्षण करण्याविषयीं पतीला व प्रजावतीला तिनें विनंति केली. नंतर लवकरच मायावतीला झोंप लागली आणि त्या अवस्थेंत तिनें नश्वर शरीराचा त्याग करून स्वर्गारोहण केलें. मायावतीच्या मृत्यूमुळें सर्वांना साहजिकच वाईट वाटलें; परंतु पुत्रप्राप्तीच्या आनंदोत्सवामुळें त्या दुःखाचा सर्वांना लवकरच विसर पडला. तो पुत्रोत्सव अनेक दिवस चालला होता. उत्सवाच्या शेवटच्या दिवशीं शुद्धोदनानें पुरोहितांचा सल्ला घेऊन पुत्राचें नांव सिद्धार्थ असें ठेवलें; तथापि

ऋषीचे ते शब्द ऐकून राजाच्या अंतःकरणांत ऋषीविषयीं अधिक श्रद्धा उत्पन्न झाली. तो ह्मणाला,

" महाराज, फार उपकार झाले. माझ्या मुलाला आपणांसारख्यांचे आशीर्वाद मिळावेत, हीच माझी इच्छा आहे. आपण माझ्याबरोबर अंतः-पुरांत चला ह्मणजे मी आपल्या चरणांवर माझ्या पुत्रास ठेवतों."

असें ह्मणून राजा शुद्धोदन कालदेवल ऋषीला प्रसूतिगृहांत घेऊन गेला. तेथें त्या ऋषीला पाहून राणी मायावतीच्या अंतःकरणांत विल-क्षण पूज्यबुद्धि उत्पन्न झाली. तिनें ऋषिचरणावर मस्तक ठेवून त्याचा आशीर्वाद घेतला व नंतर ती नवशिशूसहि ऋषीच्या पायांवर ठेवूं ला-गली; परंतु कालदेवलानें राणीला तसें करूं दिलें नाहीं. तो किंचित् मागें सरून साश्चर्य पण गंभीर स्वरानें ह्मणाला,

" मायावती, हें तूं काय करतेस! तूं कोणाला प्रसवली आहेस? ज्याच्या पदप्रांतावर विनत होऊन आह्मी आपणास पावन करून घ्यावें, त्याला माझ्या चरणावर कसें ठेवतेस?"

असें ह्मणून कालदेवल त्या नवार्भकाकडे एकाग्रदृष्टीनें पाहूं लागला. नंतर आपलें मस्तक भूमीला लावून ह्मणाला,

" शिशुस्वरूप भगवन्, दयानिधे, माझें वंदन ग्रहण कर. तूं दुसरा कोणी नाहींस. माझी उपास्यदेवता ती तूंच होय. अरुणपद्मप्रमाणें तुझ्या पदतलांवर ध्वजवज्रांकुशादि चिन्हें पाहून तुझ्या अवताराबद्दल मला मुळींच शंका राहिली नाहीं. प्रभु, बुद्ध तो तूंच. सर्व जगाच्या कानांवर मुक्तिमंत्र घालून जनतेला निर्वाणपथ दाखविण्यासाठींच तुझा अवतार. तुझ्या दर्शनामुळें मी आज धन्य झालों."

असें ह्मणून कालदेवल प्रसूतिगृहाच्या बाहेर पडला. राजा शुद्धोदन त्याला पोहोंचविण्यासाठीं त्याच्याच बरोबर चालला होता. कालदेवलाचे

ते शब्द ऐकून पुत्राचा सविस्तर वृत्तांत ऐकण्याची राजाला साहजिक इच्छा झाली व त्याप्रमाणें त्यानें ऋषीला प्रश्नहि केला; परंतु कालदेवलानें ती सर्व हकीकत राजाला सांगितली नाहीं. तो ह्मणाला,

" राजा, केवळ तुझ्या सदाचरणवृत्तीमुळेंच या पुत्रानें तुझ्या घरीं जन्म घेतला आहे. पार्थिव वृक्षाला असें सुंदर व सोज्वल पुष्प या सहस्र वर्षांत देखील आलें नव्हतें. या पुष्पाच्या सुमनोहर सुवासानें सर्व जग प्रसन्न होईल. या आनंददायक प्रसंगीं तुह्मां संसारी जनांच्या दृष्टीनें एक गोष्ट मात्र अनुचित होणार आहे. राणी मायावती लवकरच कालवश होणार आहे; पण तिला स्वर्गप्राप्ति होईल. स्वर्गांत देवता तिचा मोठा सत्कार करतील."

राजाला याप्रमाणें सांगून कालदेवल क्षणार्धांत राजवाड्याच्यां बाहेर पडून कोणीकडे निघून गेला. राजानें ऋषिवाक्यांचा पुष्कळ विचार केला; पण त्याला त्या गूढ बोलण्याचा कांहीं अर्थबोध झाला नाहीं. ऋषीचें शेवटचें वाक्य दुसऱ्याच दिवशीं खरें झालें. त्या दिवशीं सूर्योदय झाला नाहीं, तोंच मायावतीला एक प्रकारची सौख्यनिद्रा येऊं लागली. त्या निद्रेच्या स्वरूपावरून ती अक्षयची आहे, असें मायावतीच्या तेव्हांच लक्षांत आलें. तिनें पुत्राचें शेवटचें चुंबन घेऊन त्यास प्रजावतीचे स्वाधीन केलें व त्याचें चांगल्या रीतीनें संरक्षण करण्याविषयीं पतीला व प्रजावतीला तिनें विनंति केली. नंतर लवकरच मायावतीला झोप लागली आणि त्या अवस्थेंत तिनें नश्वर शरीराचा त्याग करून स्वर्गारोहण केलें. मायावतीच्या मृत्यूमुळें सर्वांना साहजिकच वाईट वाटलें; परंतु पुत्रप्राप्तीच्या आनंदोत्सवामुळें त्या दुःखाचा सर्वांना लवकरच विसर पडला. तो पुत्रोत्सव अनेक दिवस चालला होता. उत्सवाच्या शेवटच्या दिवशीं शुद्धोदनानें पुरोहितांचा सल्ला घेऊन पुत्राचें नांव सिद्धार्थ असें ठेवलें; तथापि

त्याचें संगोपन प्रजावति अथवा गौतमी करीत असल्यामुळें कित्येक त्या मुलाला गौतम असें ह्मणूं लागले व पुढें तो गौतम याच नांवानें प्रसिद्धीस आला.

वरील हकीकतीवरून चंचल मनाच्या बंधनासाठीं गौतमानें लहानपणापासूनच आरंभ केला होता कीं काय ! असे आश्चर्योद्गार अंत:करणांत उद्भवल्यास त्यांत कांहीं मोठेंसें नवल नाहीं. जन्म धारण करण्यास ज्याला तरुतलभूमि पसंत पडली, त्यानें मातृस्तन्य दुधाची अपेक्षा न बाळगणेंहि साहजिक होय. गौतमास जन्मदात्या आईनें जरी सोडलें, तरी त्याचें लालनपालन प्रजावती अत्यंत दक्षतेनें व प्रेमानें करीत होती. गौतमाच्या संगोपनासाठीं ह्मणून राजानें अनेक परिचारिका प्रजावतीच्या स्वाधीन केल्या होत्या. वृद्धपणीं झालेल्या एकुलत्या एक पुत्रावर राजाचें किती प्रेम असेल व तो पुत्राच्या संरक्षणाची किती काळजी घेत असेल, याविषयींचें अनुमान कोणासहि सहज करितां येण्यासारखें आहे. ते पुत्रसहवासाचे दिवस राजाला मोठ्या आनंदाचे वाटत होते. त्या आनंदाच्या भरांत हां हां म्हणतां गौतमाच्या वयाचीं आठ वर्षें निघून गेलीं आणि त्याच्या शिक्षणाचा प्रश्न राजापुढें उभा राहिला. त्यावेळची शिक्षणपद्धति हल्लींपेक्षां पुष्कळ निराळी असल्यामुळें गौतमाच्या शिक्षणाची राजाला मोठी काळजीच वाटूं लागली. त्यावेळची शिक्षणपद्धति अशी होती कीं, दरिद्री ब्राह्मणपुत्र असो अथवा चक्रवर्ती राजाचा राजपुत्र असो, ज्याला विद्या प्राप्त करून घ्यावयाची असेल, त्यानें गुरुगृहीं बाराबारा वर्षें विद्यार्जन करीत राहिलें पाहिजे; आणि हे विद्यादान करणारे गुरु बहुतकरून जनसंपर्कापासून दूर अशा अरण्यांत वगैरे आश्रम बांधून रहात असत. अशी विद्यार्जनाची स्थिति असल्यामुळें गौतमाला आपणापासून दूर कसें करावें, या विचारांत शुद्धोदन पडला होता.

तथापि गौतमाला स्वतःपासून दूर करणें जरी असह्य होतें, तरी त्याला विद्यालंकृत करणें तितकेंच अवश्य असल्यामुळें राजानें आपले मायापाश थोडे शिथिल केले व तो पुत्राच्या शिक्षणाची व्यवस्था करूं लागला. त्यावेळीं विश्वामित्र या नांवाचे ऋषि फार विद्वान् व उत्कृष्ट गुरु म्हणून प्रसिद्ध असल्यामुळें राजाच्या मंत्र्यांनींहि त्या ऋषीकडेच राजपुत्राला शिक्षणासाठीं ठेवावें, असें शुद्धोदनास सुचविलें. राजा शुद्धोदनास मंत्रिमंडळाचा तो विचार पसंत पडला आणि त्यानें शुभ दिवस पाहून त्या दिवशीं राजपुत्र गौतमास विश्वामित्र ऋषीचे आश्रमांत विद्यार्जनासाठीं नेऊन ठेवलें. पुत्रस्नेहवश शुद्धोदनाला गुरुगृहीं गौतम कसा राहील, अशी मोठी काळजी वाटत होती; परंतु त्यास आश्रमांत नेऊन ठेवल्याबरोबर तो राजवाड्यांतल्यापेक्षां अधिक उत्साही दिसूं लागला व थोडक्याच वेळांत त्यानें आश्रमांतील सर्व सहाध्यायी आपले मित्र करून घेतले. राजा शुद्धोदन व राणी प्रजावती हीं आश्रमांतील कार्यक्रम पाहण्यासाठीं चार दिवस आश्रमांतच राहिलीं होतीं. त्या चार दिवसांत गौतमास आपली आठवणहि होत नसून तो इतर विद्यार्थ्यांबरोबर रमून गेलेला पाहून त्या दोघांची पुष्कळ काळजी दूर झाली व तीं दोघें ऋषींचा आशीर्वाद घेऊन कपिलवस्तु नगरास निघून आलीं.

गौतम अथवा सिद्धार्थ याचें आगमन आश्रमांत झाल्यामुळें विश्वामित्र ऋषींना मोठा आनंद झाला होता. सिद्धार्थासारख्या गंभीर, तेजःपुंज व बुद्धिमान विद्यार्थ्याचा लाभ विश्वामित्रांना मोठा अमूल्य वाटला. सिद्धार्थाचें मस्तक, डोळे वगैरे अवयवांवरून तो पुढें दिग्विजयी पुरुष होणार, असें विश्वामित्रांना वाटलें. सिद्धार्थास जें शिकवावें तें तो तेव्हांच ग्रहण करीत आहे, ही त्याची दांडगी बुद्धिमत्ता पाहून विश्वामित्र थक्क होऊन गेले होते. असलें बुद्धिसामर्थ्य पूर्वजन्मींच्या सुकृतसंचयावांचून

[illegible] विश्वामित्रांचें गौतमावर फार प्रेम बसलें व तें त्याला अनेक गूढ विषयहि शिकवूं लागले. गुरूचें गौतमावर जितकें प्रेम होतें, त्यापेक्षांहि गौतमाचें गुरूवर अधिक प्रेम होतें. गुरु हाच देव, तोच पिता आणि तोच ज्ञानदाता होय, अशी गौतमाची—आश्रमांत गेल्यावर पक्की भावना झाली व त्या पूज्यभावनेप्रमाणें तो गुरूशीं वर्तन करीत असे. तो जरी इतका बुद्धिसंपन्न होता, तरी त्याबद्दल त्याला तिळभरहि अभिमान नव्हता. तो गुरूबरोबरच काय, पण आपल्या सहाध्यायांबरोबर देखील अत्यंत विनयानें वागत असे. त्याची ती विलक्षण शालीनता पाहून विश्वामित्रांना गौतम हा विनयाच्या प्रत्यक्ष मूर्तीप्रमाणें वाटत असे. आपण राजकुमार आहोंत, हें तो विसरूनच गेला आहे कीं काय, इतक्या साधेपणानें त्या आश्रमांत तो रहात होता. गौतमाच्या अंगचा मुख्य गुण ह्मटला ह्मणजे दयाशीलता हा होय. दुसऱ्याला होणारें क्षुल्लक दुःख पाहून देखील त्याच्या अंतःकरणांत एकदम करुणा उत्पन्न होई व त्याच्या डोळ्यांतून अश्रु वाहूं लागत. हा त्याचा दयाळू स्वभाव अगदीं लहानपणापासून होता व दैववशात् अशाच अनेक गोष्टी घडून येत कीं, त्यामुळें गौतमाच्या दयाळू स्वभावाचा परिपोषच होत असे. एखादा विद्यार्थी गुरुगृहीं पाणी आणतांना थकला, तर गौतम चटकन् त्याच्या हातांतली पाण्याची घागर घेऊन आश्रमांत येई. याप्रमाणेंच लांकडें आणणें वगैरे अनेक कामें इतर विद्यार्थ्यांना त्रास पडूं नये ह्मणून गौतम करीत असे. अभ्यास वगैरे होऊन राहिलेला वेळ गौतम विद्यार्थ्यांबरोबर खेळण्यांत न घालवितां एका बाजूला बसून मनन करण्यांत घालवीत असे. तो जितका कोमल प्रकृतीचा होता, तितकाच पराक्रमी होता; परंतु त्याच्या दयाशीलतेमुळें त्याचा पराक्रम लोपून गेला होता. घोड्यावर बसण्यांत तो अगदीं पटाईत होता. तो आपला घोडा इतका भर-

पांच फेंकी कीं, आतां सर्व विद्यार्थ्यांच्या पुढें त्याचा घोडा जाणार असें आहे; पण इतक्यांत तो घोडा उभा करी व त्याच्यावरून उतरून ह्मणे, 'छे! या मुक्या प्राण्यास असा त्रास देणें आह्मां मनुष्यांस बरें नव्हे.' असें ह्मणून तो घोड्यावर न बसतां त्यास आश्रमांत घेऊन येई. मृगयेंतहि तो फार कुशल होता; परंतु ईर्षेच्या भरांत मृगया केल्यावर त्याला इतकें वाईट वाटे कीं, मेलेल्या सावजासाठीं त्याचें अंतःकरण कळवळून येऊन त्याच्या डोळ्यांतून अश्रु वाहूं लागत. या त्याच्या मनोवृत्तीमुळें त्याची सदयता एकसारखी वाढत चालली होती. शिकारींत मेलेल्या एक दोन सावजांची हाल अपेष्टा पाहून त्याचें मन इतकें द्रवलें कीं, त्यानें पुढें साऱ्या आयुष्यांत केव्हांच शिकार केली नाहीं. क्षत्रिय राजकुमारास योग्य असें शिक्षण गौतमानें विश्वामित्र ऋषीकडून थोडक्याच वर्षांत संपादन केलें. तेथील शिक्षणक्रम संपल्याचें जेव्हां शुद्धोदनास समजलें, तेव्हां तो स्वतः आश्रमांत गेला व विश्वामित्रांचा मोठा सत्कार करून गौतमास कपिलवस्तु नगरास घेऊन आला.

राजपुत्र सिद्धार्थ आपला शिक्षणक्रम संपवून कपिलवस्तु नगरास परत आल्यावर शुद्धोदनानें त्याच्या अंगावर राज्यभार टाकण्याच्या उद्देशानें त्यास राज्यकारभारांतल्या घडामोडी शिकविण्यास आरंभ केला; परंतु तिकडे गौतमाचें असावें तसें लक्ष नव्हतें. केवळ बापाच्या संतोषासाठीं ह्मणून तो अनेच्छापूर्वक थोडा वेळ राज्यकारभार पहात असे. बाकी सर्व वेळ तो एकांतांत बसून मनन करण्यांत घालवीत असे. त्या चिंतनाचें तात्पर्य कोणासच पुष्कळ दिवस कळलें नाहीं. बहुतेकांस गौतम कांहीं विशेष काळजींत आहे, असें वाटे; आणि तशा समजुतीनें ते राजपुत्रास त्या काळजीचें कारणहि विचारीत; पण त्या वेळीं चिंतनाचा गूढार्थ गौतमासच पुरता उमगला नसल्यामुळें त्याच्याकडून कोणासच कांहीं उत्तर

मिळत नसे. तो आपण कोणत्याहि काळजींत नाहीं, असें सांगून विचारणाराचें समाधान करीत असे. शुद्धोदनाच्या प्रासादाच्या मागच्या बाजूला एक मोठा विस्तीर्ण बाग होता. त्या बागेंत निवांतस्थलीं बसणें गौतमास फार आवडत असे. त्याप्रमाणें वसंतऋतूंत एके दिवशीं सायंकाळच्यावेळीं तो त्या उपवनांत एका प्रस्तरनिर्मित आसनावर बसून चिंतन करीत असतां त्याच्या मस्तकावर एक सुंदर राजहंस पक्षी करुणाव्यंजक स्वरानें ओरडला व त्याच्या समोर तितक्यांत तो वरून येऊन पडला. तो प्रकार पाहून सिद्धार्थाचें अंतःकरण एकदम गहिंवरून आलें व त्या हंसाजवळ जाऊन त्यानें त्याला आपल्याजवळ उचलून घेतलें. पाहतो तों हंसाचें मस्तक बाणविद्ध झाल्यामुळें तो दुःखानें धडपड करीत असून त्याचें हिमफेनाप्रमाणें शुभ्रशरीर रक्तानें लाल होऊन गेलें आहे. ती बाणाची जखम, तेथून वाहणारें तें रक्त आणि त्या यातनेमुळें हंसाची होणारी तळमळ हीं पाहून गौतमाचें अंतःकरण द्रवून जाऊन त्याच्या डोळ्यांतून अश्रु पडूं लागले. हंसाच्या मस्तकांतून बाण उपटून काढून तो त्यानें दूर फेंकून दिला. जखमेवर औषध लावून ती त्यानें बांधली आणि हंसाच्या अंगाला लागलेलें रक्त धुवून काढून त्याला अगदीं स्वच्छ केलें. इतकें केलें तरी हंसाची सारखी तळमळ होत होती. गौतम आपल्या हृदयाशीं त्या हंसाला कुरवाळून ह्मणाला,

"बा गरीब प्राण्या, कोणी तुझी ही अशी दुर्दशा केली! कोणा निर्दयानें तो बाण प्रथम आपणास टोंचून पाहिल्यावांचून तो तुझ्या अंगावर फेंकला! खरोखर हें दुःख जर त्यानें स्वतः अनुभविलें असतें, तर तो तुझा वध करण्यास खचित प्रवृत्त झाला नसता!"

असें ह्मणून गौतम त्या हंसाची शुश्रूषा करूं लागला. थोडा वेळ गेल्यावर त्या हंसाची तळमळ पुष्कळ कमी झाली व तो बहुतेक मरणार

नाहीं, अशी गौतमाला आशा उत्पन्न झाली. त्या आशेमुळें गौतमाच्या मनाला थोडी स्वस्थता प्राप्त झाली व तो हंसाला होणाऱ्या दुःखाचा विचार करूं लागला; परंतु आघातामुळें होणाऱ्या दुःखाची कल्पना होण्यास जो अनुभव असावा लागतो, तो गौतमास अद्याप मिळालेला नसल्यामुळें त्याला त्या दुःखाची कल्पना बरोबर करितां येईना. ह्मणून त्यानें हंसाच्या मस्तकांतून उपटून दूर फेंकून दिलेला बाण हातांत घेतला आणि त्याचें टोंक आपल्या हाताच्या एका बोटावर जोरानें मारून घेतलें. त्याबरोबर गौतमाचा प्राण कासावीस होऊन बोटांतून भळभळ रक्त वाहूं लागलें. अशारीतीनें गौतमानें त्या दुःखाचा अनुभव घेतल्यावर स्वतःच्या बोटाची जखम बांधली व त्यानें त्या हंसाला फिरून उचलून आपल्या हृदयाशीं कुरवाळिलें. त्याच्या अंतःकरणांत हंसाविषयीं अधिक करुणा उत्पन्न झाली. त्याच्या डोळ्यांतून पुन्हां अश्रु वाहूं लागले, आणि तो हंसाला होणाऱ्या यातनांचा सूक्ष्म विचार करूं लागला. गौतम त्या हंसाला हृदयाशीं धरून उपवनांत इतस्ततः फिरत असतां एक मनुष्य त्याच्यापुढें येऊन उभा राहिला व तो गौतमास अभिवंदन करून नम्रपणें ह्मणाला,

" महाराज, मी राजकुमार देवदत्त यांचा सेवक आहे. माझे धनी शिकार करीत असतां त्यांनीं या हंसाला बाण मारून त्याला जमिनीवर पाडलें. तेव्हां या हंसावर देवदत्तांची सत्ता असून तो त्यांनीं परत मागितला आहे. "

देवदत्त हा शुद्धोदनाच्या एका नातेवाईक राजाचा पुत्र होता. त्यानें आपली शिकारीची हौस भागविण्यासाठीं त्या हंसाला बाणविद्ध केल्याचें ऐकून गौतमाला फार वाईट वाटलें. तो ह्मणाला,

" या प्राण्याचा वध करण्याचा तरी देवदत्ताला काय अधिकार आहे? त्यास बाणविद्ध करण्याचा अपराध करून, त्या प्राण्यावर आपली सत्ता सांगावयाची हा न्याय कोठला? इतकेंहि असून तो प्राणि मेला असता, तर तो मी देवदत्ताला दिला असता; परंतु हंस जिवंत असल्यामुळें देवदत्ताला तो मागण्याचा अधिकार नाहीं. कारण कोणत्याहि जिवंत प्राण्यावर ईश्वराशिवाय कोणाचीहि सत्ता नाहीं."

सिद्धार्थाचें हें भाषण ऐकून देवदत्ताचा सेवक देवदत्ताकडे गेला व त्यानें सिद्धार्थाचें ह्मणणें त्याला कळविलें. सिद्धार्थाचा तो निरोप ऐकून देवदत्ताला फार संताप आला. तो तसाच सिद्धार्थाकडे गेला व ह्मणाला,

" सिद्धार्था, माझी शिकार मला परत दे."

सिद्धार्थ शांत व गंभीरपणें ह्मणाला,

" हंस अद्याप जिवंत आहे आणि मला वाटतें तो आतां बहुतेक मरणार नाहीं; तेव्हां तो परत मागण्याचा तुला अधिकार काय?"

देवदत्त ह्मणाला,

" मीं त्याला भूमीवर पाडलें ह्मणून! जोंपर्यंत हंस आकाशांत उडत होता, तोंपर्यंत त्याच्यावर कोणाचीच सत्ता नव्हती; परंतु मी त्याला बाणविद्ध करून जमिनीवर पाडल्यामुळें त्याच्यावर माझा अधिकार झाला आहे. मग तो हंस जिवंत असो वा मृत असो, तो तूं मला परत दिलाच पाहिजे."

देवदत्ताचें तें उद्दामपणाचें भाषण ऐकून सिद्धार्थाचें कोमल अंतःकरण दुभंग झालें. तो कातर स्वरानें ह्मणाला,

" देवदत्ता, या गरीब प्राण्याच्या जीवाची यातना स्वतःच्या जीवाशीं ताडून पाहिल्यावांचून तूं हें बोलत आहेस. त्याला होणाऱ्या यातना यावेळीं जर तूं भोगीत असतास, तर असे निष्ठुर उद्गार तूं केव्हांहि काढले

नसतेस. सगळ्यांत प्रेम व दया यांचा अधिकार अधिक आहे. या हंसाची ही हालअपेष्टा पाहून प्रेमानें व दयेनें सगळ्या जगावर मी माझा अधिकार चालविण्याचा संकल्प केला आहे. त्याप्रमाणें या हंसाला आज मी प्राणदान देऊन विकत घेतलें आहे. कोणत्याहि प्राण्यावर त्याचा प्राण घेणाऱ्यापेक्षां प्राण वांचविणाऱ्याची अधिक सत्ता असते; तेव्हां आतां तूंच सांग कीं, या हंसावर तुझी सत्ता आहे, का माझी आहे? तूं याचा प्राण घेणार होतास, आणि मी त्याचा प्राण वांचविला आहे!"

हें युक्तिसंगत व करुणरसपूर्ण भाषण ऐकून देवदत्ताच्या मनावर कांहींच परिणाम झाला नाहीं. त्या काळीं अशी रीत होती कीं, सावजावर ज्याचा बाण आधीं जाऊन पडेल, त्याची त्या सावजावर सत्ता मानली जात असे. त्या दृष्टीनें देवदत्ताला सिद्धार्थाचें ह्मणणें पसंत पडलें नाहीं. तो ह्मणाला,

"ज्या अर्थी माझ्या बाणानें तो हंस विद्ध झाला आहे, त्या अर्थी माझीच त्याच्यावर सत्ता आहे. प्राणदान देणाऱ्याची सत्ता अधिक खरी, पण त्या हंसाला प्राणदान देण्याचा प्रयत्न करण्यास तुला सांगितलें होतें कोणी?"

सिद्धार्थ आपल्या गांभिर्यपूर्ण वाणीनें ह्मणाला,

"माझ्या मनोदेवतेनें. त्या हंसाची एवढी हालअपेष्टा बघूनहि मी जर त्याचा प्राण वांचविण्याचा प्रयत्न केला नसता, तर देवाच्या घरीं मी गुन्हेगार ठरलों असतों; इतकेंच नव्हे, तर मनुष्य ह्मणवून घ्यायला माझी मलाच लाज वाटली असती. समज तुझ्यावर कोणी बाण सोडून तुला या हंसाप्रमाणेंच घायाळ केलें असतें आणि त्यावेळीं मी तुझ्या जवळ असूनहि जर तुला कांहीं साह्य केलें नसतें, तर तुला किती वाईट वाटलें असतें? याप्रमाणेंच त्या हंसाला वाईट वाटूं नये, देवाजवळ

माझ्या विरुद्ध गाऱ्हाणें सांगण्यास त्यास सवड मिळूं नये, ह्मणून मला त्याचा प्राण वांचवावा लागला; आणि या माझ्या समजुतीप्रमाणें जर सर्व प्राणिमात्र वागूं लागतील, तर या जगांतून हिंसा हा शब्दच नाहींसा होईल."

देवदत्ताला सिद्धार्थाचें तें ह्मणणें पसंत पडलें नाहीं. तो हंस परत मागण्याचा आपला हेका सोडण्यास मुळींच कबूल होईना. शेवटीं चार दोन निःपक्षपाती विद्वान पुरोहितांकडे जाऊन निर्णय करण्याचें त्या दोघांनीं ठरविलें व त्याप्रमाणें देवदत्तानें आपल्या बाजूचा न्याय देतील, या भरंशानें निवडलेल्या पुरोहितांना दोघांनीं आपआपली हकीकत सांगून न्याय करण्यास सांगितलें. तेव्हां सर्व पुरोहितांनीं हंसाचा प्राण घेणाऱ्याची हंसावर कांहीं एक सत्ता नसून प्राण वांचविणाराची सत्ता आहे, असें स्पष्टपणें सांगितलें. तो पुरोहितांचा न्याय ऐकल्यावर देवदत्ताचा निरुपाय झाला व तो आपल्या घरीं निघून गेला. इकडे सिद्धार्थानें आपणास न्याय मिळालेला पाहून त्या आनंदभरांत त्यानें स्नेहपूर्वक हंसाला कुरवाळिलें व त्यास मोकळें सोडून दिलें. हंसाचें दुःख यावेळीं बरेंच कमी झालेलें असल्यामुळें तो सिद्धार्थाच्या हातांतून सुटतांच आनंदानें किलरव करीत आकाशांत उंच उडून गेला. हंस स्वजनसमूहांत गेलेला पाहून सिद्धार्थाच्या अंतःकरणांत एक प्रकारचें समाधान उत्पन्न झालें. इतके दिवस त्याची वृत्ति असमाधानी होती. जगाचें एकसारखें निरीक्षण व मनन करून तो शांतिसुखाचा मार्ग शोधीत होता; परंतु खऱ्या मार्गाचा शोध त्याला आजवर न लागल्यामुळें तो नेहमीं चिंताक्रांत दिसत असे. त्या चिंतावस्थेचें कारण शुद्धोदन व प्रजावती सिद्धार्थाला वारंवार विचारीत; पण तें कारण सिद्धार्थालाच समजलें नसल्यामुळें आपण चिंताक्रांत नाहीं, असें तो आईबापास भासवीत असे. त्या स्थितींत आज एकदम पालट पडला.

त्याला आपल्या असमाधानावस्थेचें कारण कळून आलें व समाधानाच्या प्राप्तीसाठीं प्राणीमात्रावर दया करण्यावांचून दुसरें कांहीं साधन नाहीं, अशी त्याच्या मनाची पक्की खात्री झाली.

सिद्धार्थ राजपुत्र होता; परंतु आपण राजपुत्र आहोंत ही कल्पना देखील त्याच्या मनाला शिवत नसे. सर्व प्रकारचें राजैश्वर्य त्यास अनुकूल होतें; पण त्याचा उपभोग घेण्याचें त्याच्या मनांत देखील कधीं येत नसे; मग त्या ऐश्वर्याचा त्याला अभिमान तो कोठला असणार ! तो आपणास ब्रम्हांडनायकानें निर्माण केलेल्या अनंत प्राणिमात्रांपैकीं एक यःकश्चित् प्राणी समजत असे; परंतु ईश्वरानें या विश्वाविषयीं विचार करण्याचें जें बुद्धिसामर्थ्य आम्हा मनुष्यांस इतर प्राण्यांपेक्षां अधिक दिलें आहे, त्या दृष्टीनें ईश्वरानें आम्हा मनुष्यांवर कांहीं तरी जबाबदारी टाकलेली आहे, असें तो समजत असे. ती जबाबदारी कोणती, हें त्याला अद्याप उमगलें नव्हतें. केव्हां केव्हां त्याला असें वाटे कीं, जे ज्ञाते आहेत, त्यांना त्याविषयीं विचारावें; परन्तु तो ज्याला ज्ञाता म्हणून समजे, त्याच्याविषयीं थोडक्याच वेळांत त्याच्या मनांत तिरस्कार उत्पन्न होई. अमुक मनुष्य ज्ञाता आहे, असें त्याला वाटलें, म्हणजे तो त्याची भेट घेण्याचा प्रयत्न करी; परन्तु तेवढ्या थोड्या वेळांत ज्ञात्याचें वर्तन पाहून इतर प्राणिमात्राची, विश्वाची आणि विश्वनाथाची त्या ज्ञात्याला ओळखच नसावी, अशी सिद्धार्थाच्या मनांत कल्पना उत्पन्न होई व तो निराश होऊन माघारा फिरत असे. ईश्वरानें आम्हा मनुष्यप्राण्यांस—निदान मला तरी—कशासाठीं निर्माण केलें आहे, ही सिद्धार्थाला एक मोठी चिंताच लागली होती. तो त्याविषयीं अहर्निश विचार करीत असे. खावें, प्यावें, आणि प्रजोत्पादन करावें, हें पशुदेखील करितात. आम्ही माणसेंहि तेवढ्याचसाठीं आहोंत असें

म्हणावें, तर आम्हांत आणि पशूंत फरक तो कोणता ? असें तो आपल्या मनाला विचारून त्याविषयीं वारंवार विचार करीत असे. गौतमाला नेहमीं त्या अवस्थेंत पाहून शुद्धोदनास मोठी काळजी वाटूं लागली. एकुलता एक पुत्र असून तो सुखोपभोगाविषयीं अगदीं उदासीन आहे, हें पाहून राजाला पूर्वीच्या भविष्यवाणीचें वारंवार स्मरण होत असे. गौतम सार्वभौम राजा तरी होईल किंवा सर्वसंगपरित्याग करून अरण्यांत निघून जाईल; या भविष्यवाणीची आठवण झाली म्हणजे शुद्धोदनास सर्वत्र अंधार दिसूं लागे. ज्या पुत्राच्या भरंवशावर आपण एवढी साम्राज्यनौका वल्हवीत आहों, तो पुत्र आपणास सोडून गेल्यास ही नौका भयंकर ओघांत सांपडून भलतीचकडे वहात जाईल, अशी त्याला भीति वाटे. शुद्धोदनानें त्याविषयीं पुष्कळ विचार करून असें ठरविलें कीं, युक्तिप्रयुक्तीनें गौतमाला वैभवसुखाची गोडी लावून त्याचें मन त्या सुखांत गुंतविलें पाहिजे; म्हणजे त्याच्या मनांत ज्या कांहीं विरक्त होण्याच्या कल्पना उत्पन्न होत असतील, त्या हळुहळू नाहींशा होतील; आणि तो कांहीं दिवसांनीं पूर्ण विलासी बनेल. हा उद्योग पायरीपायरीनें केला पाहिजे, असा विचार करून राजानें सिद्धार्थाला रोज आपणाबरोबर सायंकाळच्या वेळीं घोड्यावरून सहल करण्यास नेण्याचें ठरविलें व त्याप्रमाणें तो त्याच दिवसापासून गौतमाला बरोबर घेऊन घोड्यावरून सहलीसाठीं जाऊं लागला.

शुद्धोदनानें या उद्योगाला आरंभ केल्यावर लवकरच वसंतसमय आला. त्यावेळीं सृष्टिसौंदर्य साहजिक वृद्धिंगत झाल्यावर शुद्धोदन गौतमाला मुद्दाम सुंदर सुंदर उपवनांत नेऊन त्याचें मन रिझविण्याचा प्रयत्न करीत असे. एके दिवशीं ते दोघे घोड्यावर बसून सृष्टिसौंदर्य पहात पहात सहल करीत असतां, शुद्धोदन सिद्धार्थाला म्हणाला,

" सिद्धार्थ, पाहिलास हा विशाल रमणीय भूप्रदेश ? असंख्य वृक्षांनीं शोभणारीं हीं अरण्यें, ह्या प्रचंड सर्पाप्रमाणें धांवणाऱ्या नद्या, योग्याप्रमाणें स्थीर समाधि लावून बसलेले हे पर्वत आणि ही विपूल धान्य प्रसवणारी भूमि; या सर्वांवर माझ्या पश्चात् तुझीच सत्ता आहे. आजहि या सर्वांचा तूंच मालक आहेस ! "

बापानें मुलाला वर लिहिल्याप्रमाणें वैभवाचें प्रलोभन दाखविलें, परंतु सिद्धार्थाच्या मनावर वरील शब्दाचा निराळाच अर्थ उमटला. ताडमाडादि उंच वाढलेल्या वृक्षांवरून जोरानें वारा वहात असल्यामुळें जो एक प्रकारचा आवाज निघत होता, तो सृष्टिसौंदर्याच्या दृष्टीनें जरी मनोहर होता, तरी त्या आवाजांत अनेक गूढतत्वें आहेत, असें सिद्धार्थाला वाटूं लागलें. त्या आवाजांत मंत्राप्रमाणें दिव्य शब्द असून ते आपणास सचेतन करीत आहेत, असें सिद्धार्थाला वाटूं लागलें. शुकसारिकादि पक्षांचा कलरव मधुर तर खराच, पण त्या मधुर स्वरांतहि मनुष्याला जागृत करणारी कांहीं शक्ति आहे, असें सिद्धार्थाला वाटूं लागलें. इतक्यांत सिद्धार्थ व शुद्धोदन यांना एक नदी आडवी लागली. नदी उंचसखल पर्वतश्रेणीवरून वहात असल्यामुळें तिचा एकसारखा खळखळ असा अवाज होत होता. त्या जलौघाची मौज पहात सिद्धार्थ घटकाभर तेथेंच उभा राहिला. त्या ओघाला व त्या आवाजाला क्षणभरहि विसावा नाहीं, हें पाहून तो मनांत ह्मणाला, ' हे प्रकृतिशून्य जलौघा, तुला जरी अंतःकरण नाहीं, तरी तुला वाचा आहे. तुझे हे शब्द आह्मा मनुष्यांच्या अंतःकरणावर केवढा तरी परिणाम करितात. तुला क्षणभर विसावा नाहीं, तुला यत्किंचित् आळस नाहीं, जगाच्या कल्याणासाठीं तूं आपला देह अर्पण केला आहेस; आणि आह्मी बुद्धिसंपन्न मनुष्यें स्वार्थाशिवाय, स्वतःच्या सुखाशिवाय, स्वतःच्या ऐश्वर्योपभोगाशिवाय कांहींहि जाणत

नाहीं! धिःकार असो अशा मनुष्यांना !!' असें मनांत ह्मणत सिद्धार्थानें बापाच्या मागें आपलाहि घोडा नदींत घातला व ते दोघे नदी उतरून पलीकडे गेले. नदीच्या पलीकडचें सृष्टिसौंदर्य फारच अवर्णनीय होतें. फलपुष्पवृक्षांच्या राईच्या राई होत्या. तेथें थोडा वेळ विश्रांति घेण्याच्या उद्देशानें दोघांनींहि घोड्यांना मोकळे सोडले व ते दोघे पायींच सरोवरासभोंवतीं हिंडून सरोवराची शोभा पाहूं लागले. मधून मधून शुद्धोदन त्या सर्व भूमिभागाकडे बोट करून 'सिद्धार्था, हें सर्व तुझ्याच मालकीचें आहे,' ह्मणून सांगत होता; परंतु ती वैभवलालसा सिद्धार्थाच्या अंतःकरणाला शिवली नाहीं. तो सृष्टिसुंदरीचें तें प्राकृतिक सौंदर्य पाहून मनांत ह्मणाला, 'मी एक क्षुद्र प्राणी! माझी या भूमीवर सत्ता काय ह्मणून? परमेश्वरानें जी एवढी सृष्टि निर्माण केली आहे, ती तो अमुक एकासाठीं निर्माण करील हें संभवतच नाहीं. जें सर्वांचें आहे, ज्यावर सर्वांचा अधिकार आहे, तें माझें आहे, असें मी ह्मणूं तरी कसें?' असें ह्मणून गौतम सरोवराजवळ असलेल्या एका वृक्षछायेखालीं बसला व स्वतःच्या जीवनोद्देशाचा विचार करूं लागला. विचार करीत असतां एक विलक्षण चमत्कार त्याच्या दृष्टीस पडला. सरोवराच्या कांठाशीं एक बारीक कीटक आपलें भक्ष शोधीत असतां, दुसरा एक मोठा किडा आला, व त्यानें त्या बारीक किड्याला खाऊन टाकलें. इतक्यांत एक लहानसा पक्षी आला व त्या किड्याला चोचींत धरून उंच उडाला; पण तितक्यांत बहिरीससाणा नांवाचा पक्षी त्या लहान पक्षाला धरून खाण्यासाठीं त्याच्या मागें लागला. त्या गर्दीत पक्षाच्या तोंडांतला किडा खालीं सरोवरांत पडला; पण तितक्यांत एका माशानें पाण्यावर उसळी मारून त्या किड्याला खाऊन टाकलें. इकडे त्या ससाण्यानेंहि पक्षाला मारून खाण्यास आरंभ केला. तो प्रकार पाहून सिद्धार्थाच्या मनांत विलक्षण उद्विग्नता उत्पन्न झाली. जमिनीवर,

आकाशांत आणि पाण्यांत जिकडे पहावें तिकडे हत्येवांचून कांहींहि नाहीं, हें पाहून त्याचें अंतःकरण शतशः विदीर्ण होऊन गेलें. ' लहान प्राण्यांना मारून मोठ्या प्राण्यांनीं आपला उदरनिर्वाह करावा हाच जर या सृष्टीचा क्रम असेल, तर देवा, या सृष्टींत तूं मला निष्कारण जन्मास घातलेंस,' असें म्हणून तो डोळ्यांतून अश्रु गाळूं लागला. डोळ्यांतून अश्रु पडत असतां तो तें सृष्टिसौंदर्य पाहून ह्मणाला, ' माते वसुंधरे, तूं हें हत्त्या-दृश्य दाखविण्यासाठींच मला आपल्या अंकावर धारण केलें आहेस का ? तसें असेल, तर तूं दुभंग हो आणि मला पोटांत घेऊन पुन्हां पूर्वींच्या जागीं नेऊन ठेव, अथवा यावत् प्राणिमात्रांच्या अंतःकरणांतून ही निर्दयता दूर कर.' असें ह्मणून सिद्धार्थानें वृक्षाजवळच असलेल्या एका दगडावर मस्तक ठेवलें व त्या गोष्टीचा विचार करण्यांत तो इतका गढून गेला कीं, थोडा वेळ तो त्या दगडाप्रमाणेंच स्थिर दिसूं लागला. त्यावेळीं शुद्धोदन सरोवराच्या कांठा कांठानें बराच दूर गेला होता. त्यानें सहज मागें वळून पाहिलें तों सिद्धार्थ दगडावर मस्तक टेंकून बसला आहे, असें त्याला दिसलें. कडक उन्हांतून सहल केल्यामुळें सिद्धार्थ फार थकला असावा आणि ह्मणून तो विश्रांति घेत असावा असें शुद्धोदनाला वाटून तो परत फिरला व सिद्धार्थाजवळ आला; पण जवळ आल्यावर त्यास निराळाच प्रकार दिसून आला. सिद्धार्थाचें मुख गंभीर पण चिंताक्रांत दिसत असून त्याच्या डोळ्यांतून अश्रु पडत आहेत आणि ते अश्रु दगडावर पडत असल्यामुळें दगड बराच भिजला आहे ! हा प्रकार पाहून शुद्धोदनाचा चेहराहि काळजीनें काळवंडून गेला; पण शुद्धोदनाची काळजी सिद्धार्थाच्या काळजीपेक्षां निराळी होती. सृष्टींतील संपूर्ण निर्दयता कशी घालवितां येईल, या काळजीनें एक वेडा झाला होता, तर दुसरा सिद्धार्थाचें हें वेड कशानें घालवितां येईल, या काळजीनें वेडा

झाला होता. सिद्धार्थाला त्या अवस्थेंत पाहून शुद्धोदनाचे डोळे अश्रूंनीं भरून आले व त्यांतून अश्रुबिंदु भूमीवर पडूं लागले. एकजण संपूर्ण प्राणिमात्रांच्या कल्याणासाठीं अश्रु गाळीत होता, तर दुसरा केवळ स्वार्थ-वशतेमुळें अश्रु गाळीत होता. शुद्धोदन मस्तकाला हात लावून ह्मणाला, 'हा साम्राज्यविस्तार ज्या सिद्धार्थासाठीं मी करून ठेवला, तो सिद्धार्थ या साम्राज्यावर तिलांजली सोडून पर्णकुटिकेलाच आपला प्रासाद समजणार असें दिसतें.' थोडा वेळ त्यासंबंधानें विचार करून शुद्धोदन मोठ्यानें ह्मणाला,

"सिद्धार्था, ऊठ. आतां या सरोवराच्या पलीकडच्या बाजूनें आपण नगरांत जाऊं."

बापाचे ते शब्द ऐकून सिद्धार्थ झोंपेंतून जागें व्हावें, त्याप्रमाणें खडबडून उठला व घोड्यावर बसून त्यानें आपला घोडा बापाच्या मागें चालविला. मार्गानें जात असतां शुद्धोदन निरनिराळ्या गोष्टी काढून साम्राज्यसुखाची महति सिद्धार्थाला सांगत होता. सिद्धार्थ त्या गोष्टी लक्षपूर्वक ऐकत होता; परंतु त्या गोष्टींचें तात्पर्य त्याच्या मनावर अगदीं निराळें असें बिंबत होतें. तो त्याविषयीं विचार करून आपल्या बापाला म्हणाला,

"बाबा, आपण ज्या साम्राज्यसुखाची महति गातां, तें सुख या सुंदर वनप्रदेशापासून मिळतें काय? तुमचें सुख ज्यांत सामावलेलें आहे, असा—पैसा, वस्त्रें, वगैरे तर येथें कांहींच दिसत नाहीं. येथें तर सर्वत्र मोठाले वृक्ष, नद्या, सरोवरें आणि पर्वत दृष्टीस पडतात! तेव्हां तुमचा जो एवढा राज्यकारभार चालला आहे, त्यांत द्रव्यप्राप्तीचें मुख्य साधन कोणतें तें आपण मला दाखवाल का?"

सिद्धार्थाच्या या शब्दांत किती तरी गंभीर अर्थ भरलेला होता; पण तो शुद्धोदनाच्या लक्षांत आला नाहीं. सिद्धार्थ राज्याचा चालणारा प्रचंड खर्च कोठून येतो, हें विचारीत आहे, असें वाटून तो ह्मणाला,

"सिद्धार्था, हें साम्राज्याचें रहाटगाडगें चालविण्यासाठीं जें द्रव्य लागतें तें प्रजेवर निरनिराळे कर बसवून उत्पन्न करावें लागतें. विशेषतः पुष्कळसा पैसा शेतकरी लोकांकडून मिळतो."

"हा पैसा ते कोठून आणून देतात?"

"ते आपल्या जमिनींत धान्य पेरतात. नंतर पेरलेल्या धान्यापासून जें विपूल धान्य उत्पन्न होतें, तें बाजारांत विकून, त्यांतला कांहीं पैसा राजाला कर ह्मणून देतात आणि बाकीचा पैसा ते आपल्या उदर-निर्वाहासाठीं ठेवतात."

"तर बाबा, शेतकरी आपल्या शेतांत काय उद्योग करीत असतात, हें पाहण्यासाठीं मला शेतांत घेऊन चला."

शुद्धोदनानें मुलाची ती गोष्ट कबूल केली व त्यानें लागलीच अरण्याचा मार्ग सोडून शेतजमिनीकडे जाणाऱ्या मार्गानें आपला घोडा वळविला. सिद्धार्थहि बापाच्या मागून चालला होता. थोडक्याच वेळांत शेतकरी आपल्या शेतांतून काम करीत आहेत, अशा शेतांत ते आले व त्यांचा व्यवसाय ते पाहूं लागले. यावेळीं वसंतऋतूचे अखेरचे दिवस असल्यामुळें शेतकऱ्यांची काम करण्याची मोठी गर्दी उडाली होती. ऊन कडक पडलें होतें, तरी तसेच जिवाच्या पलीकडे ते श्रम करीत होते. एक शेतकरी जमीन नांगरीत होता, त्याच्याकडे बोट करून शुद्धोदन ह्मणाला,

"सिद्धार्था, तो शेतकरी पहा किती श्रम करीत आहे. त्या शेतकऱ्याची आणि तुझी ओळख नाहीं; तथापि तो शेतकरी हें जाणून

आहे कीं, आपण हे श्रम राजासाठीं करीत आहों. यावरून तूं आपल्या भाग्याचा विचार कर. याप्रमाणें दहा पांचच नव्हे, तर लक्षावधी शेतकरी केवळ तुझ्या सुखासाठीं एवढे श्रम करीत आहेत. राजाची सत्ता ह्मणतात ती हीच. माझ्या पश्चात् या सर्व लोकांवर तुझाच अधिकार आहे."

'लक्षावधी शेतकरी माझ्या सुखासाठीं राबत आहेत!' अशी सिद्धार्थाची भावना उत्पन्न करून त्याला साम्राज्यवैभवाबद्दल अभिमानी बनविण्याचा शुद्धोदनाचा हेतु होता; परंतु सिद्धार्थाच्या अंतःकरणावर दुसरेच विचार उमटले. ज्या शेतकऱ्याच्या जवळ तो उभा होता, तो शेतकरी अंगांत फाटकीं तुटकीं वस्त्रें घालून आणि कडक ऊन सहन करून नांगरण्याचें काम करीत होता. त्याच्या सगळ्या अंगांतून घामाच्या धारा वहात होत्या. त्यानें नांगराला जोडलेले बैल रोडके असून ते मोठ्या कष्टानें नांगर ओढीत होते. बिचारे थकल्यामुळें जेव्हां उभे रहात, तेव्हां तो शेतकरी आपल्या हांतातला चाबूक त्यांच्या अंगावर खाडकन् मारी. तो प्रकार पाहून सिद्धार्थाचें अंतःकरण कळवळून आलें. तो आपल्या मनांत ह्मणाला, 'हा शेतकरी एवढा उन्हाचा ताप सहन करून जे हे विलक्षण कष्ट सोशीत आहे, ते कशासाठीं, तर राजाच्या सुखासाठीं! ज्यांना वाचा नाहीं, आपलें खाणेंपिणें मिळविण्यासहि जे स्वतंत्र नाहींत, ते बैल चाबकांचा मार कशासाठीं खात आहेत, तर राजाच्या सुखासाठीं! हाय! ज्या राजाच्या सुखांत एवढी निर्दयता समावलेली आहे, त्या सुखाला धिःकार असो! असलें राज्यवैभव भोगणाऱ्या राजालाहि धिःकार असो! देवा, मला तूं केव्हांहि राजा करूं नकोस. स्वप्नांतदेखील मला राजाच्या सिंहासनावर बसवूं नकोस. त्यापेक्षां मला शेतकरी कर, ह्मणजे राज्यकर भरण्यासाठीं किती अमानुषी श्रम करावे लागतात, तें मला समजून येईल; अथवा मला बैल कर, ह्मणजे राजाच्या सुखाचा

चाबुक माझ्या पाठीवर पडून मला चाबकाचें सुख तरी कळेल! दयानिधे, तुझ्या राज्यांत एवढा पक्षभेद? सुखदुःखाची एवढी विलक्षण वांटणी! परंतु यांत तुझा तरी काय दोष? हा तर सर्व आह्मा सुखोपभोगासक्त मानवांचा खेळ! निर्दय मानवा, धिःकार असो तुला.' सिद्धार्थ याप्रमाणें विचार करीत बापाबरोबर लवकरच कपिलवस्तु नगरांत आला.

## प्रकरण दुसरें.

# विलासभवन कीं कारागृह ?

संपत्सु महतां चित्तं भवत्युत्पलकोमलम् ।
आपत्सु च महाशैलशिलासंघातकर्कशम् ॥

मागील प्रकरणांत सांगितल्याप्रमाणें शुद्धोदन सिद्धार्थाला राज्यसुखोपभोगाची गोडी लागावी ह्मणून अरण्यांतील सृष्टिसौंदर्य दाखविण्यासाठीं घेऊन गेला होता; परंतु जो जो प्रकार सिद्धार्थाच्या दृष्टीस पडला, तो तो प्रकार पाहून त्याच्या मनांत विलासलोलुपता उत्पन्न होण्या ऐवजीं त्या सुखाविषयीं तिरस्कार मात्र उत्पन्न झाला. भूमीवर, आकाशांत आणि पाण्यांत जिकडे पहावें तिकडे 'जीवोजीवस्य जीवनम्' या न्यायानें सृष्टिकार्य चाललेलें पाहून त्याच्या मनांत विलक्षण उद्विग्नता उत्पन्न झाली. ती उद्विग्नता तशीच कायम आहे, तोंच त्यांत शेतकऱ्यांच्या जीवनकलहाच्या दृष्याची भर येऊन पडली. 'आपलें राज्यभांडार केवढें प्रचंड आहे,' असें शुद्धोदन मोठ्या अभिमानानें ह्मणत असे, तर 'त्या भांडारांतील प्रत्येक कपर्दिका शेतकऱ्यासारख्या निढळाच्या घामानें कमावणाऱ्या दीन प्रजेच्या करभारांतील आहे,' असें विषण्ण मनानें सिद्धार्थ ह्मणे. ज्या दिवशीं सिद्धार्थानें तो प्रकार पाहिला होता, त्या दिवशीं सिद्धार्थाला चांगली झोंप देखील लागली नाहीं. अंमळ कोठें डोळा लागला तर स्वप्नांत घामानें न्हाऊन निघालेले शेतकरी आणि चाबकाचा मार खाणारे बैल त्याच्या दृष्टीस पडत. दुसऱ्या दिवशीं त्यानें आपल्या कोशाध्यक्षाची मुद्दाम मुलाखत घेतली आणि राज्यकोशांत जो पैसा येतो तो कोठून व कसा येतो, याची माहिती

मिळविली. खजिनदाराला वाटलें, राजपुत्र सिद्धार्थ यांचें वेड नाहींसें होऊन ते आतां राज्यकारभाराची माहिती मिळवूं इच्छीत आहेत. या कल्पनेनें त्या बिचाऱ्यानें राज्यकोशांत कोठून कशारीतीनें पैसा येतो तें सविस्तरपणें सिद्धार्थाला सांगितलें व ही एक मोठी आनंदाचीच बातमी असें जाणून त्यानें ती सर्व हकीकत राजा शुद्धोदन यासहि सांगितली. राजा शुद्धोदनास खजिनदाराच्या त्या कृतीनें आनंदाच्या ऐवजीं उद्वेग मात्र वाटला. सिद्धार्थाच्या स्वभावाची मीमांसा त्यानें त्यापूर्वींच करून ठेवलेली असल्यामुळें त्याला तो प्रकार कांहींसा अनिष्टच वाटला. तो कोशाध्यक्षाला ह्मणाला,

"खजिनदार, आपण हें केव्हांहि लक्षांत ठेवा कीं, सिद्धार्थाला फक्त वैभवमोहानें विलासी बनवावयाचें आहे. हें वैभव कसें संपादन केलें आहे, हें त्यास सांगतां कामा नये. कारण त्याची प्रकृति इतकी कोमल आहे, कीं, प्रत्येक वस्तूच्या मुळाशीं निर्दयता आहे कीं काय, असा त्याला संशय येतो. एखादा सत्पात्र ब्राह्मण आपणाकडे दान मागण्यासाठीं आला असतां, आपण जर एखाद्याचा खून करून त्याची संपत्ति त्या ब्राह्मणाला देऊं लागलों, तर तो जसा त्या संपत्तीचा स्वीकार न करितां उलट आपला धि:कार करील, त्याच प्रमाणें राज्यसुखैश्वर्याच्या मुळाशीं निर्दयतेचा झरा आहे, असें जर सिद्धार्थाच्या लक्षांत येईल, तर तो या वैभवाला चिकटण्या ऐवजीं वैभवापासून पळण्याचा मात्र प्रयत्न करील. ही गोष्ट तुह्मी सर्व मंत्रिमंडळास सांगा, ह्मणजे त्यांनांहि सिद्धार्थाला सल्ला मसलत देण्यास बरें पडेल."

शुद्धोदनानें असें सांगितल्यावर खजिनदार आपल्या कामासाठीं दुसरीकडे गेला. शुद्धोदन तसाच विचार करीत बसला होता. त्याची सिद्धार्थाविषयींची चिंता प्रत्येकक्षणीं वाढत चालली होती. राजपुत्र वैराग्य धारण

## प्रकरण दुसरें.

# विलासभवन कीं कारागृह ?

संपत्सु महतां चित्तं भवत्युत्पलकोमलम् ।
आपत्सु च महाशैलशिलासंघातकर्कशम् ॥

मागील प्रकरणांत सांगितल्याप्रमाणें शुद्धोदन सिद्धार्थाला राज्य-सुखोपभोगाची गोडी लागावी ह्मणून अरण्यांतील सृष्टिसौंदर्य दाखविण्यासाठीं घेऊन गेला होता; परंतु जो जो प्रकार सिद्धार्थाच्या दृष्टीस पडला, तो तो प्रकार पाहून त्याच्या मनांत विलासलोलुपता उत्पन्न होण्या ऐवजीं त्या सुखाविषयीं तिरस्कार मात्र उत्पन्न झाला. भूमीवर, आकाशांत आणि पाण्यांत जिकडे पहावें तिकडे 'जीवोजीवस्य जीवनम्' या न्यायानें सृष्टिकार्य चाललेलें पाहून त्याच्या मनांत विलक्षण उद्विग्नता उत्पन्न झाली. ती उद्विग्नता तशीच कायम आहे, तोंच त्यांत शेत-कऱ्यांच्या जीवनकलहाच्या दृष्याची भर येऊन पडली. 'आपलें राज्य-भांडार केवढें प्रचंड आहे,' असें शुद्धोदन मोठ्या अभिमानानें ह्मणत असे, तर 'त्या भांडारांतील प्रत्येक कपर्दिका शेतकऱ्यासारख्या निढळाच्या घामानें कमावणाऱ्या दीन प्रजेच्या करभारांतील आहे,' असें विषण्ण मनानें सिद्धार्थ ह्मणे. ज्या दिवशीं सिद्धार्थानें तो प्रकार पाहिला होता, त्या दिवशीं सिद्धार्थाला चांगली झोंप देखील लागली नाहीं. अंमळ कोठें डोळा लागला तर स्वप्नांत घामानें न्हाऊन निघालेले शेतकरी आणि चाबकाचा मार खाणारे बैल त्याच्या दृष्टीस पडत. दुसऱ्या दिवशीं त्यानें आपल्या कोशाध्यक्षाची मुद्दाम मुलाखत घेतली आणि राज्यकोशांत जो पैसा येतो तो कोठून व कसा येतो, याची माहिती

मिळविली. खजिनदाराला वाटलें, राजपुत्र सिद्धार्थ यांचें वेड नाहींसें होऊन ते आतां राज्यकारभाराची माहिती मिळवूं इच्छीत आहेत. या कल्पनेनें त्या बिचाऱ्यानें राज्यकोशांत कोठून कशारीतीनें पैसा येतो तें सविस्तरपणें सिद्धार्थाला सांगितलें व ही एक मोठी आनंदाचीच बातमी असें जाणून त्यानें ती सर्व हकीकत राजा शुद्धोदन यासहि सांगितली. राजा शुद्धोदनास खजिनदाराच्या त्या कृतीनें आनंदाच्या ऐवजीं उद्वेग मात्र वाटला. सिद्धार्थाच्या स्वभावाची मीमांसा त्यानें त्यापूर्वीच करून ठेवलेली असल्यामुळें त्याला तो प्रकार कांहींसा अनिष्टच वाटला. तो कोशाध्यक्षाला ह्मणाला,

"खजिनदार, आपण हें केव्हांहि लक्षांत ठेवा कीं, सिद्धार्थाला फक्त वैभवमोहानें विलासी बनवावयाचें आहे. हें वैभव कसें संपादन केलें आहे, हें त्यास सांगतां कामा नये. कारण त्याची प्रकृति इतकी कोमल आहे, कीं, प्रत्येक वस्तूच्या मुळाशीं निर्दयता आहे कीं काय, असा त्याला संशय येतो. एखादा सत्पात्र ब्राह्मण आपणाकडे दान मागण्यासाठीं आला असतां, आपण जर एखाद्याचा खून करून त्याची संपत्ति त्या ब्राह्मणाला देऊं लागलों, तर तो जसा त्या संपत्तीचा स्वीकार न करितां उलट आपला धिःकार करील, त्याच प्रमाणें राज्यसुखैश्वर्याच्या मुळाशीं निर्दयतेचा झरा आहे, असें जर सिद्धार्थाच्या लक्षांत येईल, तर तो या वैभवाला चिकटण्या ऐवजीं वैभवापासून पळण्याचा मात्र प्रयत्न करील. ही गोष्ट तुह्मी सर्व मंत्रिमंडळास सांगा, ह्मणजे त्यांनांहि सिद्धार्थाला सल्ला मसलत देण्यास बरें पडेल."

शुद्धोदनानें असें सांगितल्यावर खजिनदार आपल्या कामासाठीं दुसरीकडे गेला. शुद्धोदन तसाच विचार करीत बसला होता. त्याची सिद्धार्थाविषयींची चिंता प्रत्येकक्षणीं वाढत चालली होती. राजपुत्र वैराग्य धारण

करून राज्यसुखावर लाथ मारणार कीं, मोहवश होऊन चक्रवर्ती राजा होणार ? हे दोन प्रश्न त्याचें मन त्याच्या विवेकशक्तीला वारंवार विचारीत असे. सिद्धार्थाची उदासीनता, त्याची एकांतवासाची आवड, सृष्टींतील सुख अथवा दुःख यांच्या मुळापर्यंत पोंहोंचणारी त्याची सूक्ष्मदृष्टि वगैरे गोष्टी शुद्धोदनाच्या मनांत उभ्या राहिल्या ह्मणजे 'सिद्धार्थ माझ्या महत्वाकांक्षेला पानें पुसून सर्वसंगपरित्यागी होणार,' असें त्याला वाटे व तो हताश व निरुत्साह होई; तथापि सिद्धार्थाला राज्यसुखांत गुंतविण्याचा त्याचा प्रयत्न एकसारखा चाललाच होता. सिद्धार्थ सतरा अठरा वर्षांचा झाल्यावर राजानें सिद्धार्थाविषयीं फारच दक्षता ठेवली होती. त्या वयावस्थेंत मनुष्याच्या मनोवृत्ती साहजिक प्रबळ होत असल्यामुळें राजाला सिद्धार्थाची फार काळजी वाटूं लागली. जनतेंतील अनेक सुखदुःखाचे प्रकार पाहून सिद्धार्थाच्या मनावर त्याचा तेव्हांच परिणाम होतो, हें जाणून शुद्धोदनानें सिद्धार्थाला जनतेपासून दूर ठेवण्याचा निश्चय केला व त्यासाठीं त्यानें एका चांगल्या जागेवर तीन सुंदर महाल बांधण्याची सेवकांना आज्ञा केली. राजाची आज्ञा होण्याबरोबर शहरापासून जवळच असलेल्या एका भूमीवर देशोदेशींचे कारागीर आणवून महाल बांधण्यास सुरवात झाली. त्यांतील एक महाल थंडीच्या दिवसांत सुखकर वाटावा ह्मणून लांकडांचा, दुसरा उन्हाळ्याच्या दिवसांत उपयोगी पडावा ह्मणून संगमरवरी दगडांचा आणि तिसरा पर्जन्यकाळीं राहण्यास योग्य व्हावा ह्मणून भाजलेल्या विटांचा, बांधण्याचें काम चाललें होतें. काम करण्यास लक्षावधी कारागीर असल्यामुळें राक्षस आपल्या मायेनें जसें एका दिवसांत नगर तयार करीत असत, त्याप्रमाणें ते तिन्हीं महाल महिन्या दोन महिन्याच्या आंत तयार झाले. प्रत्येक महाला सभोंवतीं त्या त्या ऋतूला शोभणारीं उद्यानें व क्रीडास्थळें तयार केलीं होतीं. लहान लहान

सरोवरें, झुळ झुळ वाहणारे पाट वगैरे कारणांमुळें ते तिन्ही महाल ह्मणजे शुद्धोदनाच्या राज्यांतील प्रेक्षणीय स्थळें झालीं होतीं. लांकडाच्या महालाचें नांव शुभ, दगडाच्या महालाचें नांव सुरम्य आणि विटांच्या महालाचें नांव रम्य अशीं ठेविलीं होतीं. महालांचें सर्व काम संपल्यावर शुद्धोदनानें त्या तिन्ही महालांत अनेक विलाससामग्री नेऊन ठेवली आणि शुभ दिवस पाहून ते तिन्ही महाल त्यानें सिद्धार्थाच्या स्वाधीन केले. त्यावेळीं शुद्धोदनानें मोठा समारंभ केला होता. ते महाल सिद्धार्थाच्या स्वाधीन करतेवेळीं तो सिद्धार्थाला ह्मणाला,

"सिद्धार्था, तारुण्यावस्थेंत स्वतंत्रपणें राहण्याची मनुष्यास साहजिक इच्छा होते. तूंहि आतां तरुण झालेला असल्यामुळें तुझ्या मनाप्रमाणें तुला वागतां यावें ह्मणून हे महाल मुद्दाम तयार केले आहेत. तुझ्या सुखाचीं सर्व साधनें या महालांत आहेत. त्या सुखाचा उपभोग घेऊन आनंदानें रहा आणि या महालांत जे गुरुजन आहेत त्यांच्याजवळ हा राज्यकारभार कसा चालवावयाचा तें शीक."

सिद्धार्थानें बापाची ती आज्ञा शिरसावंद्य केली आणि त्या दिवसापासून तो त्या महालांत राहूं लागला. सिद्धार्थाची करमणूक करण्यासाठीं, त्याला शिकविण्यासाठीं व त्याच्या सेवेसाठीं जितके लोक त्या महालांत होते, त्या सर्वांना राजानें बजावलें होतें कीं, 'सिद्धार्थाच्या अंतःकरणांत उदासीनता, उद्वेग किंवा दुःख उत्पन्न होईल, अशी एखादी देखील गोष्ट घडूं देऊं नका.' सेवक शुद्धोदनाच्या या आज्ञेप्रमाणें वागण्याचा अहर्निश प्रयत्न करीत असत. सिद्धार्थाचें मन एकसारखें विलासांत गुंतलेलें रहावें ह्मणून त्या सर्वांचा प्रयत्न चालला होता. नानाप्रकारचे खेळ, नानाप्रकारचीं वाद्यें, नानाप्रकारच्या मनोहर गोष्टी यांत सिद्धार्थाचा सर्व वेळ जावा अशी ते नोकर लोक काळजी घेत असत. एखादा साधारण

मनुष्य असता, तर तो वरील विलास व्यसनानें केव्हांच वेडा होऊन या जगास विसरून गेला असता; परंतु सिद्धार्थाच्या अंतःकरणांत जी एक जागृति उत्पन्न झाली होती, ती वरील चित्तरंजनाच्या विंझण्यानें झोंपी गेली नाहीं. त्याच्या अंतःकरणांत प्रज्वलित झालेला ज्ञानदीप विलास-सामग्रीच्या फुंकरानें विझला नाहीं आणि जगांतील निर्दयता नाहींशी करण्याचा त्याचा संकल्प वरील मोहपाशानें तुटला नाहीं. उलट त्या महालांतहि असे कांहीं प्रकार प्रत्यहीं घडून येत होते, कीं सिद्धार्थाचें मन अधिकाधिक सावध होत होतें. एके दिवशीं तो उद्यानांतील सरोवराच्या कांठीं बसून समानवयी मित्रांबरोबर बोलत असतां आकाशांत एक कृष्णमेघ उत्पन्न झाला व तो सूर्यमंडळावर आल्यामुळें सरोवरांतील सूर्यबिंब नाहींसे होऊन तें स्वच्छ जलपूर्ण सरोवर मेघाप्रमाणेंच कृष्ण-वर्णाचें दिसूं लागलें. सिद्धार्थाच्या मित्रांच्या मनावर या गोष्टीचा कांहींच परिणाम झाला नाहीं; परंतु सिद्धार्थाचा सस्मित चेहरा उद्विग्न झाला. तो आपल्या मित्राला ह्मणाला,

"मित्रा, या सरोवरांतलें सूर्यबिंब कोठें गेलें?"

मित्र ह्मणाला,

"महाराज, सूर्यावर ढग आल्यामुळें तें नाहींसें झालें!"

सिद्धार्थ दीर्घ श्वास सोडून ह्मणाला,

"आमच्या मानससरोवरावर देखील असेच कृष्णमेघ येतात आणि सद्गुणादि सूर्याचीं जीं प्रतिबिंबें त्यांत पडलेलीं असतात, तीं नाहींशीं करितात. माझ्या मानससरोवरांत असलेलीं प्रतिबिंबें घालविण्यासाठीं तुह्मी त्या मेघाचें कार्य करीत नाहींना?"

सिद्धार्थाच्या मित्रांनीं या प्रश्नाचें कांहींच उत्तर दिलें नाहीं. सिद्धार्थाच्या मनांत आलेले विचार घालविण्यासाठीं त्यांनीं तो विषय सोडला

व ते दुसऱ्या गोष्टीविषयीं बोलूं लागले. वर सांगितल्याप्रमाणें चार दोन दिवसांनीं तरी एखादी गोष्ट घडत असे व ती शुद्धोदनाच्या कानावर गेली ह्मणजे त्याचे पंचप्राण कासाविस होत असत. ज्या दिवशीं सिद्धार्थानें 'आपलें मन विषाक्त करण्यासाठीं हा तुमचा प्रयत्न नाहींना ?' असा प्रश्न केला होता, त्यादिवशीं तर शुद्धोदनास फारच काळजी वाटूं लागली. त्यानें आपल्या हितचिंतक मंत्र्यांना बोलावलें व या संकटांतून पार पडण्याचा मार्ग कोणता तें विचारलें. राजा शुद्धोदन यावेळीं कातर स्वरानें व याचकवृत्तीनें मुख्य प्रधानास ह्मणाला,

"प्रधान, यावेळीं मी किती बिकट स्थितींत सांपडलों आहें, हें तुह्मी जाणत आहांच. राजकुमार सिद्धार्थानें या राज्याचा स्वीकार करावा अशी माझी एकमात्र इच्छा असून तो राजा होण्याला सर्वथा योग्य आहे ! त्याची मुखश्री, वीरश्री वगैरे राजैश्वर्यास युक्त अशीं आहेत; आणि खरेंच, तो जर राजा होईल, तर निश्चयानें सगळ्या पृथ्वीचा सार्वभौम भूपति होईल; परंतु त्याच्या मनाचा ओढा ऐश्वर्यापेक्षां वैराग्याकडेच अधिक दिसतो. कालदेवल ऋषीनें काढलेले उद्गार तुमच्या लक्षांत असतीलच. 'या पार्थिव पुष्पाच्या सुमनोहर सुवासानें सगळें जग प्रसन्न होईल' असें ते ऋषि ह्मणाले होते, त्याचा अर्थ तरी काय ? सिद्धार्थ सार्वभौम भूपति होऊन सर्व जगाला महशूर होणार, कीं वैराग्य धारण करून सर्व जगाला आपल्या पायांवर लोळविणार ? प्रधान, सिद्धार्थ जर सर्वसंगपरित्याग करून कोणीकडे निघून गेला, तर माझी व प्रजावतीची काय स्थिति होईल, याचा आपण विचार करा. मोठ्या कष्टानें संपादन केलेलें हें विशाल राज्य; या राज्याची काय स्थिति होईल, याचा विचार करा. माझा सर्व भरंवसा आपणावर आहे. या संकटांत मला आपणच एक मार्गदर्शक आहांत. माझी काळजी दूर होईल, अशी मला एखादी युक्ति सांगा."

राजाचे हे शब्द ऐकून प्रधानास मोठा विचार पडला. तो थोडा वेळ विचार करून ह्मणाला,

"महाराज, हा प्रश्न कांहीं इतका काळजी करण्यासारखा नाहीं. पुराणांतरीं अशा कथा आहेत कीं, जे ऋषि वैराग्यादि तपोबलानें फार प्रबल झाले होते, त्यांना सुंदर स्त्रियांनीं तपापासून भ्रष्ट केलें, व त्या त्या वेळीं उत्पन्न झालेल्या संकटापासून जनतेचें संरक्षण केलें. तोच प्रयोग सिद्धार्थावरहि करावा. एखाद्या सुंदर स्त्रीच्या मोहपाशांत सिद्धार्थ सांपडला ह्मणजे वैराग्य वगैरे सर्व नाहींसें होईल व सुखोपभोगासाठीं हें विशाळ राज्यहि त्यास अगदींच अपुरें वाटेल."

प्रधानानें सांगितलेली सल्ला सर्वतोपरी योग्य अशी असल्यामुळें ती शुद्धोदनास पूर्णपणें पसंत पडली. तो ह्मणाला,

"प्रधान, तुह्मी सिद्धार्थाची भेट घेऊन तो विवाह करण्यास कबूल होईल अशी व्यवस्था करा आणि विवाहास कबूल झाल्यावर त्याच्या योग्य अशी सुंदर राजकुमारी शोधून काढा. एवढें काम जर तुह्मी कराल, तर हें राज्यसंरक्षण केल्याचें श्रेय तुह्माला मिळणार आहे. माझ्यावर जसे तुमचे महत् उपकार होतील, तसे ते या सर्व प्रजाजनावरहि होणार आहेत. यावेळीं ही गोष्ट घडवून आणणें जरी तुमचें कर्तव्य असलें, तरी ती करण्याबद्दल मी तुह्माला विनंति करतों."

पुत्रप्रेम व राज्यैश्वर्य या दोहोंमुळें मोहवश झालेल्या शुद्धोदनाची ती कळकळीची विनंति प्रधानानें मान्य केली. प्रधान स्वामीकार्यदक्ष असून राज्यपरिचालनांत तो हातखंडा होता. तो चांगला बुद्धिवान् असून फार धोरणी होता. तो आपला कार्यभाग साधण्यासाठीं नवीन तयार केलेल्या महालांत दररोज जाऊं लागला व युक्तिप्रयुक्तीनें राजकु-

माराचें मन वळवूं लागला. एके दिवशीं त्यानें तशी संधि साधून सिद्धार्थास विचारिलें,

"राजकुमार, आपण आतां विवाहास योग्य असे झालां आहांत. महाराजांचे मनांतून याच वेळीं आपला विवाह करावा असें आहे. आपणांस योग्य अशा राजकन्येचा शोध करण्याचें काम त्यांनीं मला सांगितलें आहे. तेव्हां आपण माझ्याबरोबर बाहेर देशीं याल, तर आपणास अनेक राजकन्या पाहण्यास मिळतील. त्यांतून जिच्याबरोबर आपण विवाह करण्याचें ठरवाल, तिच्याबरोबर आपला विवाह करण्याची व्यवस्था महाराज करतील."

सिद्धार्थ थोडा वेळ विचार करून ह्मणाला,

"मला पितृ-आज्ञा मान्य आहे. आपण गुरुजन आहांत, तेव्हां मला योग्य अशीच स्त्री आपण शोधाल, अशी माझी खात्री आहे. मग मी उगीच कशाला आपणाबरोबर येऊं?"

राजकुमाराचे ते शब्द ऐकून प्रधानाला अर्थातच फार आनंद झाला. त्यानें सिद्धार्थाची विवाहास मान्यता असल्याचें आनंददायक वर्तमान राजाला त्याचक्षणीं जाऊन कळविलें. राजालाहि ती गोष्ट ऐकून फार आनंद झाला; परंतु राजकन्या शोधण्याचा भार सिद्धार्थानें आपणावर टाकल्यामुळें त्याला खरोखर वश करील, अशी स्त्री आपणांस कशी मिळवितां येईल, याचा दोघांनाहि मोठा विचार पडला. त्यासंबंधानें पुष्कळ विचार करून प्रधानानें एक निराळीच युक्ति काढली. तो ह्मणाला,

"महाराज, आपल्या देशांत राजकन्यांचीं स्वयंवरें करण्याची चाल आहे; परंतु राजकुमाराचें स्वयंवर करण्याची चाल नाहीं. त्या चालीचें अनुकरण निदान आपण तरी केलें पाहिजे; पण त्यास स्वयंवर असें नांव

देतां उपयोगाचें नाहीं. नाहीं तर सर्व राजे आपल्यावर टीका करतील आणि कोणीहि स्वयंवरास राजकन्या पाठविणार नाहीं. यासाठीं सुंदर कुमारिकांना सुवर्णालंकाराचें पारितोषक देण्याचा मोठा समारंभ करावा आणि जेवढ्या राजकन्या वगैरे त्या समारंभाला येतील त्या सर्वांना सुवर्णालंकार देण्याचें काम राजकुमार सिद्धार्थ यांना सांगावें; ह्मणजे हा कार्यभाग सहज साधेल. ज्या कुमारिकेवर सिद्धार्थांचें मन विशेष गेलेलें दिसेल, तिच्यावरोबर त्यांचा विवाह करण्याची खटपट करावी. कुमार हल्लीं तारुण्यावस्थेंत असल्यामुळें जी राजकन्या विशेष सुंदर असेल, ती त्यांचें मन सहज आकर्षण करील."

प्रधानाची ही सल्ला युक्तिसंगत असल्यामुळें ती शुद्धोदनास पसंत पडली, हें निराळें सांगावयाला नको. तो लागलीच त्या उद्योगाला लागला. शहरांत एक चांगली जागा पाहून तेथें फार विशाल व अत्यंत सुंदर मंडप तयार करण्यास राजानें आज्ञा केली. मंडपाच्या कामास आरंभ होण्याबरोबर राजानें आपल्या सर्व राज्यांत व देशोदेशींच्या राजांना आपला तो उद्देश जाहीर करून सर्वांनीं आपापल्या तरुण मुलींना घेऊन त्या समारंभाला यावें ह्मणून विनंति केली. या समारंभाच्या मुळाशीं असलेलें रहस्य राजानें जरी कोणास सांगितलें नव्हतें, तरी पुष्कळ राजांच्या लक्षांत तो प्रकार आला; तथापि त्यामुळें त्या समारंभास जावयाचें नाहीं, असें कोणाच्याहि मनांत आलें नाहीं. कारण त्या वेळीं शुद्धोदन हा अत्यंत ऐश्वर्यसंपन्न ह्मणून प्रसिद्ध असून त्याचा मुलगा सिद्धार्थ रूपगुणसंपन्न आहे, हें सर्वांना माहित होतें. तेव्हां अशा वराचा लाभ आपल्या कन्येला व्हावा, असें प्रत्येकास वाटणें साहजिक होय. त्या समारंभाला चार पांच दिवसांचा अवकाश आहे, तोंच सर्व कपिलवस्तु शहर देशोदेशींच्या राजेरजवाड्यांनीं भरून गेलें.

या समारंभास लोक कसे येतील, याची शुद्धोदनास मोठी काळजी होती; पण सर्व शहरांत आकाशपटावर लकाकणाऱ्या तारकांप्रमाणें जेव्हां सुंदर राजकन्या चमकूं लागल्या, तेव्हां राजाची ती काळजी दूर झाली व तो भावी सुखाच्या कल्पनेनें पुष्कळ उत्साहि दिसूं लागला.

समारंभासाठीं तयार केलेल्या मंडपाचें काम अगोदरच अत्यंत प्रेक्षणीय असें झालें होतें; त्यांत आणखी समारंभाचे दिवशीं तो लतापल्लवांनीं सुंदर श्रृंगारून काढल्यावर त्यास जी शोभा आली, ती अवर्णनीय होय. भगवान् दिनमणीचीं अरुण किरणें क्षितिजावर येऊन पूर्वाकाशास आरक्तता येत आहे, तोंच मंडपाच्या सिंहद्वारावर मंजुल वाद्यें वाजूं लागलीं. त्या वाद्यध्वनीमुळें शहरांतील लोक व राजकन्या वगैरे, यांचीं अंतःकरणें उत्साहित होऊन जो तो मंडपांत जाण्याच्या तयारीस लागला. राजकन्या मंगलस्नानें करून आपल्या देहलतिका सुंदर वस्त्रांनीं व बहुमूल्य अलंकारांनीं नटवूं लागल्या. इकडे सूर्योदय झाला नाहीं, तोंच विशाल मंडप प्रेक्षकांनीं गच्च भरून गेला. नंतर सुंदर सुंदर कुमारिका निरनिराळ्या रंगांचीं वस्त्रें परिधान करून मंडपांत येऊं लागल्या. या कुमारिकांना बसण्यासाठीं एक विशेष सुंदर जागा तयार केलेली असून मृदु मखमलीनें मढविलेले हजारों कोंच त्या जागेवर ठेवलेले होते. पुढील कोचावर अविवाहित व मागील कोचावर केवळ मौज पहाण्यासाठीं आलेल्या विवाहित स्त्रियांची बसण्याची व्यवस्था केली होती. थोडक्याच वेळांत ते सर्व कोच नानारंगाच्या वस्त्राभरणांनीं नटलेल्या स्त्रियांनीं भरून गेले व त्यामुळें तो मंडप इंद्रभुवनापेक्षांहि सुंदर व मोहक दिसूं लागला. कुमारिकांच्या समोर एक उंच सुवर्ण सिंहासन ठेवलेलें असून त्याच्याजवळच रत्नजडित सुवर्णाचे अनेक अलंकार ठेवलेले होते. तो अपूर्व समारंभ पाहून प्रेक्षक समूह थक्क होऊन गेला.

ठरलेली वेळ होतांच राजकुमार सिद्धार्थ चार घोडे जोडलेल्या सुवर्ण रथांतून आला व सिंहासनावर जाऊन बसला. त्याच्यासमोर एकापेक्षां एक सुंदर अशा शेंकडों तरुण कुमारिका बसलेल्या होत्या; परंतु त्यानें त्यांच्याकडे आपली दृष्टि मुळींच वळविली नाहीं. मंडपांतील सर्व प्रेक्षकसमूहावर समान दृष्टि ठेवून तो सिंहासनावर बसला होता. सिद्धार्थ सिंहासनावर बसून सर्व तयारी झाल्यावर एकेक राजकन्या उठून मोठ्या विनयानें त्याच्याजवळ जाई व तो जे कांहीं अलंकार देई, ते घेऊन मंडपाच्या बाहेर पडे. सिद्धार्थ अत्यंत सुंदर होता. तो या वेळीं ऐन तारुण्यांत असल्यामुळें विशेष मोहक दिसत होता. प्रत्येक तरुणीस असें वाटे कीं, सिद्धार्थ हा आपणांस योग्य पति असून त्याचें मन मी निश्चयानें आकर्षण करीन; पण हा अभिमान जागेवरून उठेपर्यंतच कायम असे. कुमारिका उठून सिद्धार्थाकडे जाऊं लागली ह्मणजे तिला सिद्धार्थाच्या मुखावर एक प्रकारचें पवित्रतेचें तेज दिसून येई व त्यामुळें तिच्या अंतःकरणांत साशंकता उत्पन्न होऊन ती भीत भीत कुमारा-जवळ जाई. राजकुमार सिद्धार्थानें तिच्या हातांत अलंकार उचलून दिला, ह्मणजे ती तेथून निघून जाई; पण कुमाराची प्रसन्नता दिसून आली नाहीं, ह्मणून ती निराश होऊन जाई. एक दोन करतां करतां शेंकडों राजकन्या पुरस्कार घेऊन गेल्या; पण सिद्धार्थ आपणावर प्रसन्न झाला आहे, असें एकीसहि दिसून आलें नाहीं. हा सर्व प्रकार मुख्य प्रधान व राजा शुद्धोदन लक्षपूर्वक पहात होते. पुष्कळशा राजकन्या निराश होऊन गेलेल्या पाहून तेहि निराश झाले होते. होतां होतां सर्व राजकन्या पुरस्कार घेऊन गेल्या. भांडारांतील सर्व अलंकारहि संपून गेले. समारंभ संपला असें जाणून प्रेक्षक हळूहळू प्रस्थानोद्यम होऊं लागले. राजा शुद्धोदन व प्रधान एवढा प्रयत्न फुकट गेला, ह्मणून निराश



"राजकुमार, मला कांहींच पुरस्कार नाहीं ?"

झाले होते, तथापि तें नैराश्य लोकांना न दाखवितां ते समारंभासाठीं आलेल्या पाहुण्यांना निरोप देण्याच्या तयारीस लागले; पण इतक्यांत एक अगदींच निराळा प्रकार घडून आला. मंडपाच्या दाराशीं मोठ्या वेगानें एक रथ येऊन उभा राहिला व त्या रथांतून एक लक्ष्मीप्रमाणें सर्वांगसुंदर दिव्यांगना उतरली. रथांतून उतरतांच ती एकदम मंडपांत गेली. यावेळीं मंडपांत बाहेर जाण्याच्या उद्देशानें उठलेल्या मंडळीची एकच गडबड उडाली होती; परंतु नवागत तरुणीचें मंडपांत आगमन होतांच मांत्रिकाच्या जादूप्रमाणें जिकडे तिकडे एकदम शांत झालें व सर्वांचे डोळे आलेल्या स्त्रीकडे लागले. समारंभ आटोपल्याचें व अलंकारभांडार संपल्याचें आलेल्या स्त्रीच्या लक्षांत तेव्हांच आलें; पण ती निराश न होतां प्रसन्न वदनानें कुमाराजवळ गेली व घरीं जाण्याच्या तयारीनें उठलेल्या सिद्धार्थाला सस्मित स्वरानें ह्मणाली,

" राजकुमार, मला कांहींच पुरस्कार नाहीं ? "

त्या मधुरस्वरानें राजपुत्राच्या अंतःकरणावर निराळाच परिणाम झाला. त्यानें त्या तरुणीकडे निरखून पाहिलें. पाहिल्यावर त्याची अशी खात्री झाली, कीं ही स्त्री सामान्य नव्हे. त्याचें लक्ष तिच्या अप्रतिम सौंदर्याकडे गेलें नाहीं, तर तें तिच्या मुखावर दिसणाऱ्या सतेज व प्रशांत पवित्रतेकडे गेलें. त्या सद्गुणी राजकन्येचा सत्कार कसा करावा याचा सिद्धार्थाला विचार करावा लागला नाहीं. त्या राजकन्येला देण्यासाठीं कांहीं अलंकार नाहींत, असें पाहून शुद्धोदनानें ते आणण्याची तजवीज केली होती; पण ते येऊन पोहोंचण्याच्या आधींच सिद्धार्थानें तिला अलंकार दिले. 'मला कांहींच पुरस्कार नाहीं का ?' असें ती राजकन्या ह्मणाल्याबरोबर सिद्धार्थ हंसत हंसत गोडस्वरानें ह्मणाला,

"नाहीं असें कसें होईल. ही मी माझ्या गळ्यांतली रत्नमाळ तुझ्या गळ्यांत घालतों आणि माझ्या हातांतली हिऱ्याची आंगठी मी तुला

देतों. कपिलवस्तु नगरांत येऊन तूं जो या शहराचा गौरव केलास त्याच्या मोबदल्याला हीं अगदींच अल्प आहेत; तथापि तीं बहुमूल्य मानून तूं त्यांचा स्वीकार कर."

असें ह्मणून सिद्धार्थानें आपल्या गळ्यांतली रत्नमाळ तिच्या गळ्यांत घातली व आपल्या बोटांतील आंगठी तिच्या बोटांत घातली. राजकुमारी या सत्कारानें प्रसन्न होऊन आपल्या रथांत जाऊन बसली व ती आपल्या नगरास निघून गेली. सिद्धार्थहि मंडपाच्या बाहेर पडून आपल्या महालांत गेला. हळु हळु सर्व लोक मंडपाच्या बाहेर पडून तो विस्तृत मंडप जनशून्य झाला. राजा शुद्धोदन जो अगदींच निराश झाला होता, तो वरील प्रकारानें एकदम उत्साहित झाला. तो प्रधानाला ह्मणाला,

"प्रधान, ही राजकन्या कोण ?"

प्रधान ह्मणाला,

"ती शाक्यकुलवंशीय सुप्रबुद्ध राजाची मुलगी. तिचें नांव यशोधरा."

"तर प्रधान, तुह्मी सुप्रबुद्ध राजाकडे जा आणि सिद्धार्थासाठीं त्याच्याकडे यशोधरेची मागणी करा."

राजाच्या या आज्ञेप्रमाणें प्रधान सुप्रबुद्ध राजाच्या नगराला गेला व त्यानें राजाची भेट घेऊन आपला मनोदय कळविला. यशोधरेला सिद्धार्थासारखा वर मिळत आहे, हें पाहून सुप्रबुद्ध राजाला मोठा आनंद झाला. तो प्रधानाला ह्मणाला,

"शुद्धोदन राजाची ही विनंति मी मोठ्या अनुग्रहाप्रमाणें समजतों; परंतु आमच्या वंशांत आजपर्यंत सर्व राजकन्यांचे विवाह स्वयंवर पद्ध-

तीनें झालेले असल्यामुळें सिद्धार्थानें पण जिंकून यशोधरेचें पाणि-ग्रहण करावें."

स्वयंवराचें नांव निघतांच प्रधानाच्या पोटांत धस्स झालें. तो राजाला ह्मणाला,

" स्वयंवराचे वेळीं कोणता पण लावतां ?"

" क्षत्रिय राजपुत्राच्या कीर्तीत ज्यामुळें भर पडेल, असेच पण असतात. धनुर्धारित्व, असिक्रीडा व अश्वारोहण या तिन्हीमध्यें जो राजकुमार विशेष नैपुण्य दाखवील, त्याला मी आपली यशोधरा अर्पण करीन."

सुप्रबुद्धाचे ते शब्द ऐकून प्रधानास निश्चित असें कांहीं सांगतां येईना. कारण कोमल प्रकृतीचा सिद्धार्थ जरी वरील सर्व विद्येंत निपुण होता, तरी, तो हा पण जिंकण्याच्या खटपटींत पडेल कीं नाहीं, याची त्याला शंका वाटूं लागली. शेवटीं प्रधानानें आपण यासंबंधानें लव-करच काय तें कळवितों असें सांगून तो कपिलवस्तु नगरास आला व त्यानें घडलेली सर्व हकीकत शुद्धोदनास कळविली. ती हकीकत ऐकून शुद्धोदन सर्वस्वी निराश झाला होता; पण तितक्यांत सिद्धार्थाच्या एका मित्रानें राजकुमार पण जिंकण्यास तयार आहेत, असें सांगितलें व तें ऐकून राजानें स्वयंवरास जाण्याची तयारी केली. शुद्धोदनाकडून निरोप येण्याबरोबर सुप्रबुद्ध राजानें आपलें नगर शृंगारून व भव्य मंडप वगैरे घालून स्वयंवराची सर्व तयारी केली व देशोदेशींच्या राजकुमारांना स्वयंवरासाठीं निमंत्रणें पाठविलीं. स्वयंवराचे दिवशीं सर्व शहर निरनिराळ्या देशांच्या राजकुमारांच्या लव्याजम्यांनीं गजबजून जाऊन सर्वांचे स्वयंवराकडे डोळे लागून राहिले. स्वयंवरप्रसंगीं सर्व

राजकुमार वगैरे जमल्यावर सुप्रबुद्ध राजाचा प्रधान मंडपाच्या मध्य-भागीं आला व सर्व राजकुमारांना उद्देशून ह्मणाला,

" राजकुमारहो, यशोधरेची प्राप्ति व्हावी असें ज्यांना वाटत असेल त्यांनीं धनुर्विद्या, खड्गपरिचालन व अश्वारोहण यांत आपलें नैपुण्य दाखविलें पाहिजे. येथें हें धनुष्य ठेवलें असून मंडपाच्या वर अति उंच एक घंटा बांधलेली आहे, त्यावर बरोबर बाण मारून सर्व प्रेक्ष-कांना घंटानाद ऐकविला पाहिजे. पहिल्या राजकुमारानें घंटानाद केल्यास दुसऱ्या राजकुमाराच्या वेळीं ती घंटा आणखी थोडी वर केली जाईल व याप्रमाणें प्रत्येक राजकुमाराच्या वेळीं ती थोडी थोडी वर सरकावली जाईल. तसेंच येथें हा एक वृक्ष आहे. या वृक्षावर आपली तरवार मारून ती सर्वांपेक्षां अधिक आंत जो घालील, तो तरवार मारण्यांत कुशल आहे, असें समजलें जाईल, आणि हा जो येथें एक काळ्या रंगाचा मस्त घोडा आहे, त्यावर बसून मंडपासभोंवतीं पांच प्रदक्षिणा घातल्या पाहिजेत. जो या तिन्ही गोष्टींत यशस्वी होईल, त्याला सुप्र-बुद्ध महाराज आपली यशोधरा अर्पण करतील. हा पण जिंकण्याची ज्या राजकुमारांना इच्छा असेल, त्यांनीं पुढें येऊन बसावें."

प्रधानानें असें सांगितल्यावर प्रेक्षकसमूहांतून चार राजकुमार उठले व ते पुढें येऊन बसले. त्या चौघांचीं नांवें देवदत्त, अर्जुन, नंद, व सिद्धार्थ अशीं होतीं. यशोधरा ही फुलांची माळ घेऊन जवळच एका आसनावर आपल्या सख्यांसह बसली होती. आपणास सिद्धार्थ पति मिळावा अशी तिची मनापासून इच्छा होती; पण आपल्या प्राप्तीसाठीं चार राजपुत्र प्रयत्न करीत आहेत, असें पाहून तिला आपली इच्छा पूर्ण होणार कीं नाहीं, याची जबरदस्त शंका वाटूं टाकली. त्यावेळीं ती ईश्वरानें सिद्धार्थासच यश द्यावें ह्मणून त्याची मनोमय करुणा भाकूं

लागलीं. इकडे प्रथम नंद उठला व त्यानें धनुष्यबाण घेऊन घंटानाद केला. मग ती घंटा थोडी उंच केल्यावर देवदत्तानें बाण सोडून वाजविली. याप्रमाणें शेवटीं जेव्हां सिद्धार्थावर पाळी आली तेव्हां ती घंटा फारच वर गेली व तिचा नाद सिद्धार्थाकडून निघणें सर्वांना दुरापास्त वाटूं लागलें; परंतु सिद्धार्थ सहज लीलेनें जागेवरून उठला व त्यानें धनुष्यबाण हातीं घेऊन त्याची दोरी ओढून बघितली, तोंच तें धनुष्य मोडून गेलें. तेव्हां सिद्धार्थ प्रधानास ह्मणाला,

" एखादें चांगलें मजबूत धनुष्य आणून द्याल तर बरें होईल. "

सिद्धार्थाचे ते शब्द ऐकतांच देवदत्तानें त्याची चेष्टा करण्याच्या उद्देशानें सहज उचलण्यासहि कठिण जाईल, असें एक प्रचंड धनुष्य सिद्धार्थापुढें आणून ठेवलें. जें धनुष्य उचलण्यांतच सिद्धार्थाची शक्ति खर्च होणार, तें उचलून तो त्याला बाण कसा लावणार, अशी सर्व प्रेक्षकांच्या मनांत शंका उत्पन्न झाली; परंतु सिद्धार्थानें तें धनुष्य सहज उचललें व अशा जोरानें बाण सोडला कीं, आकाशांतील ताऱ्याप्रमाणें लांब दिसणारी ती घंटा वाजल्याबरोबर शतखंड होऊन जमीनिवर गळून पडली. तो प्रकार पाहतांच प्रेक्षकांनीं सिद्धार्थाचा जयध्वनि करून टाळ्यांचा कडकडाट केला. यशोधरेला या वेळीं जो आनंद झाला तो कल्पनातीत होय. नंतर नंदानें तलवार घेऊन ती त्या वृक्षावर मारली. ती अवघी चार अंगळें आंत गेली होती. देवदत्तानें सहा अंगळें आंत घातली, अर्जुनानें सात अंगळें आंत घातली; पण सिद्धार्थानें तो सर्व वृक्षच कापून काढला. सिद्धार्थाचा तो विलक्षण पराक्रम पाहून पुन्हां मंडपांत हर्षध्वनि झाला. दोन्ही गोष्टींत सिद्धार्थानें यश मिळविल्यामुळें बाकीचे राजकुमार निरुत्साह झाले होते; तथापि आपण घोड्यावर बसण्यांत जें कौशल्य दाखवूं तें सिद्धार्थ निःसंशय दाख-

विणार नाहीं, अशा भरंवशानें एकेक राजकुमार त्या काळ्या घोड्याजवळ जाऊं लागला; पण तो घोडा मोठ्यानें खिंकाळून जवळ येणाऱ्या राजकुमारावर असा कांहीं उसळे, कीं राजकुमारास तेथून पळाल्यावांचून इलाजच उरत नसे. सर्वांच्या शेवटीं सिद्धार्थ जेव्हां त्या घोड्याजवळ जाऊं लागला, तेव्हां सिद्धार्थावरहि तो मोठ्यानें उसळला; पण सिद्धार्थ न भितां घोड्याची उसळी चुकवून चटकन् त्याच्यावर बसला व घोड्याचा लगाम हातांत घेऊन त्या घोड्याला त्यानें वायुवेगानें मंडपाच्या बाहेर नेलें. तो मस्त घोडा अगदीं थकून जाईपर्यंत सिद्धार्थानें त्याला मंडपाच्या सभोंवतीं फिरविलें व नंतर तो त्या घोड्याला आंत घेऊन आला. अशा रीतीनें विजयी सिद्धार्थाचें मंडपांत आगमन होतांच प्रेक्षकांनीं सिद्धार्थाचा जयजयकार करून सर्व मंडप दणाणून टाकला. सुप्रबुद्ध राजाच्या अंतःकरणांत हा विलक्षण प्रकार पाहून आनंद उत्पन्न झाला व तो सिद्धार्थाला सामोरा जाऊन त्याला मोठ्या सत्कारानें मुद्दाम विवाहासाठीं शृंगारलेल्या जागेवर घेऊन आला. सिद्धार्थ त्या जागेवर जाऊन बसतांच मंजुल मंगल वाद्यें वाजूं लागलीं, पुरोहित उंच स्वरानें मंगलाष्टकें ह्मणूं लागले, आणि सुसज्जित यशोधरा गजगामिनीप्रमाणें लाजत मुरडत सिद्धार्थाजवळ जाऊन तिनें त्याच्या गळ्यांत पुष्पमाळ घातली. त्याबरोबर तो सर्व मंडप हर्षध्वनीनें भरून गेला. सिद्धार्थावर सगळीकडून पुष्पवृष्टि होऊं लागली, आणि 'वधूवर सुखी असोत' असा प्रत्येकाच्या मुखांतून आशीर्वाद निघूं लागला. त्यावेळीं सुप्रबुद्ध व शुद्धोदन या दोघांनीं तो विवाहसमारंभ अपूर्व असा साजरा केला. राज्यांतील यावत् प्रजाजनांना संतुष्ट करण्याचा दोघांनींहि विलक्षण प्रयत्न केला. प्रजेनेंहि वधूवराचा गौरव अप्रतिम असाच केला.

विवाहसमारंभ संपूर्ण होऊन शुद्धोदन राजा जेव्हां सपरिवार कपिलवस्तु नगरांत परत आला, तेव्हां त्यानें यशोधरा व सिद्धार्थ

यांना अगदीं स्वतंत्रपणें राहण्यासाठीं एक सर्वांगसुंदर विलासभुवन तयार करण्याचा हुकूम केला. राजाची आज्ञा होण्याबरोबर हजारों कारागीर गोळा झाले व राजानें सांगितल्याप्रमाणें विलासभवन बांधण्यास सुरवात झाली. कपिलवस्तु नगरापासून थोड्या अंतरावर एक सुंदर पर्वतमाला असून पर्वताच्या कांठा काठानें रोहिणी नदी धांवमान झालेली आहे. त्या पर्वताच्या जवळच हें विलासभवन बांधण्याचें काम चाललें होतें. एका बाजूनें पर्वतशृंगमाला तर एका बाजूनें रोहिणी नदी इतक्या विस्तृत जागेवर हें विलासभवन तयार होत होतें. विलासभवनाच्या दक्षिण दिशेला अत्यंत उंच वाढलेल्या वृक्षांचें फार मोठें अरण्य होतें. उत्तरेच्या बाजूला हिमालयाचीं हिमाच्छादित उंच उंच गिरिशिखरें नीलाकाशास जाऊन भिडलीं होतीं, पश्चिमेस रोहिणीचा हिमफेनाप्रमाणें शुभ्र प्रवाह वाहात होता, पूर्वेस लहान लहान पर्वत असून त्यांतून कपिलवस्तु नगराला मार्ग गेला होता. हें स्थान अत्यंत रमणीय असून जनसंपर्क बिलकुल नसल्यामुळें राजानें ती जागा पसंत केली व त्या जागेवर विलासभवन तयार करविलें. हजारों कारागीर तें काम करण्यास लागल्यावर तयार होण्यास वेळ तो किती लागणार ! चारदोन महिने झाले नाहींत तोंच तें अत्यंत प्रेक्षणीय असें विलासभवन तयार झालें. निरानिराळ्या रंगांच्या संगमरवरी दगडांनीं अत्यंत कुशलतेनें तें विलासभवन तयार केलें होतें. त्या विलासभवनांत अनेक प्रकारचे स्तंभ, अनेक प्रकारचे सोपानपथ, अनेक प्रकारचीं प्रांगणें व अनेक प्रकारचे महाल होते. तें सर्व विलासभवन पुराणांतल्या अत्यंत मनोहर अशा प्रसंगांनीं व सुंदर फुलपत्तींनीं चित्रित केल्यामुळें इतकें अपूर्व झालें होतें, कीं, कितीहि भयंकर चिंतावस्थेंतील मनुष्य तें विलक्षण दृष्य पाहून आपलें सर्व दुःख विसरून जात असे. जिकडे तिकडे

सुंदर उपवनें असून त्यांत अनेक कृत्रिम सरोवरें व कारंजीं होतीं. या सर्वांसभोंवतीं अत्यंत भक्कम व उंच असे दगडाचे तीन कोट बांधलेले होते. प्रत्येक कोटाला फक्त एकेकच दरवाजा असून तोहि फार मजबूत व कळसूत्री होता. हे तीन दरवाजे पार करून विलासभवनांत पाय टाकण्याबरोबर आपण एखाद्या नवीन सृष्टींत आलों आहें, असें पाहणारास वाटत असे. जन्म, मृत्यु, जरा इत्यादि व्याधींनीं ग्रासलेल्या जनतेशीं आपला कोणताहि संबंध आलेला नसून आपणास ही एक अक्षय्य सुखदायक सृष्टि लाभली आहे, अशी त्या विलासभवनांत गेल्याबरोबर कल्पना होत असे. तें स्थान अगदीं निवांत होतें. दगडी कोटाच्या आंत बाहेरून मनुष्य तर काय, पण मनुष्याचा शब्द देखील प्रवेश करण्यास असमर्थ होता. बाहेरून कांहीं पक्षी येऊन मात्र कलरव करीत; पण तेवढ्यानें विलासभवनांत जी एक गंभीर शांतता नांदत असे, तिच्यांत केव्हांहि व्यत्यय उत्पन्न होत नसे. त्या विलासभवनांत सर्व प्रकारची विलाससामग्री ठेवलेली होती. यशोधरा व सिद्धार्थ यांच्या शुश्रूषेसाठीं ज्या दासी ठेवलेल्या होत्या, त्या सर्व तरुण व सुंदर होत्या. त्यांतील एखादी आजारी वगैरे झाल्यास तिला तेथून ताबडतोब नगरांत आणण्याची व्यवस्था केली होती; इतकेंच नव्हे, तर एखाद्या दासीच्या डोक्यावर जर वार्धक्यसूचक एखादा सफेत केस दिसेल, तर तिला विलासभवनांतून काढून टाकून तिच्या ऐवजीं दुसरी तरुण दासी आणून ठेवण्याबद्दल शुद्धोदनाचा हुकूम होता. तें विलासभवन संपूर्ण झाल्यावर राजानें मोठा समारंभ करून तें विलासभवन यशोधरा व सिद्धार्थ यांच्या स्वाधीन केलें होतें. तें दुर्गम मंदिर तयार करण्याचा उद्देश राजवधू यशोधरा हिला अगोदरच शुद्धोदनानें सांगितला होता; तथापि विलासभवनांतून परतण्याच्या वेळीं त्यानें यशोधरेची एकांतीं पुन्हां भेट घेतली आणि तो तिला करुणाजनक स्वरानें ह्मणाला,

" यशोधरे, माझा भरंवसा केवळ तुझ्यावरच आहे. माझा राज्य-गौरव वृद्धिंगत करण्याचें तुझ्या स्वाधीन आहे. 'सिद्धार्थ सर्वसंग-परित्याग करून धर्मसंस्थापक होईल किंवा सर्व पृथ्वि पादाक्रांत करून चक्रवर्ति राजा होईल,' अशी भविष्यवाणि आहे. तूं जर त्याचें तें पार-मार्थिक वेड घालविशील तर तूंहि सार्वभौमिनी होशील. नाहीं तर सहधर्मिणीच्या धर्माप्रमाणें तुलाहि भिक्षावृत्ति पत्करावी लागेल! ह्मणून तूं अगदीं दक्षतेनें वागून सिद्धार्थाला ऐहिक सुखाची गोडी लावण्याचा प्रयत्न कर, एवढेंच तुला माझें सांगणें आहे."

असें ह्मणून शुद्धोदन त्या विलासभवनांतून निघून गेला. जातेवेळीं तो कोटाच्या बाहेर दरवाजाच्या संरक्षणासाठीं असलेल्या शिपायांना ह्मणाला, "तुह्मी माझ्या हुकमावांचून कोणालाहि आंत सोडूं नका आणि कोणालाहि बाहेर जाऊं देऊं नका. राजकुमाराला देखील बाहेर जाऊं देऊं नका. माझा हुकूम अमान्य केल्यास मृत्यूची शिक्षा होईल, हें लक्षांत ठेवा."

राजाज्ञेप्रमाणें विलासभवनाच्या सभोंवतीं पहारेकरी अत्यंत दक्षतेनें पहारा करूं लागले. लोक विलासभवन पाहण्यासाठीं ह्मणून तेथें येत; पण तो बंदोबस्त पाहून ते दुरूनच परतून जात. वैभवानें दिपून जाणारे लोक त्या गृहाला विलासभवन ह्मणत, पण शहाणे तो बंदोबस्त पाहून विलासभवनाला कारागृह ह्मणत! मात्र हे शब्द राजाच्या भीतीमुळें लोकांच्या हृदयमंदिराच्या बाहेर निघत नसत.

## प्रकरण तिसरें.

# लोकनिरीक्षण.

**जानन् विनाशं कथमार्ति काले ।**
**सचेतनः स्यादिह हि प्रमत्तः ॥**

ऐहिक सुखासच आपलें सर्वस्व समजणारांच्या दृष्टीनें तें विलासभवन ह्मणजे सौख्यनिधान होय. संसारास तुच्छ समजणारे देखील तें विलासभवन पाहून थोडा वेळ मुग्ध होत; मग संसारास लुब्ध झालेल्यांची स्थिति त्या विलासभवनांत वेड्याप्रमाणें व्हावी यांत मोठेंसें आश्चर्य तें काय. राजकुमार सिद्धार्थ याची स्थिति देखील कांहीं दिवस अशीच झाली होती. विलासभवनांतील विलाससामग्रीमुळें व यशोधरेच्या निर्मल, सात्विक व पवित्र प्रेमामुळें तो जगालाच काय, पण स्वतःला देखील विसरून गेला होता. त्या आनंदांत सिद्धार्थ दिवस घालवीत असल्यामुळें यशोधरा व शुद्धोदन यांना महदानंद वाटत होता. कांहीं दिवस गेल्यावर यशोधरेला एक सुंदर पुत्र झाला व तें वर्तमान ऐकून राज्यांत सर्वत्र आनंदोत्सव सुरू झाले. आपली मोठी काळजी दूर झाली असें शुद्धोदनाला वाटलें. स्त्रीपुत्राचे मोहपाश तोडून टाकण्यास सिद्धार्थ असमर्थ असून तो आतां लवकरच राज्योपभोग घेऊं लागेल असें प्रजेला वाटूं लागलें; परंतु लोकांना वाटत होती इतकी कांहीं सिद्धार्थाची स्थिति पालटली नव्हती. सिद्धार्थाच्या अंतःकरणांतले वैराग्यविचार समूळ नाहींसे झाले नाहींत, हें यशोधरा जाणून होती. पिंजऱ्यांत सांपडलेल्या पक्ष्याप्रमाणें सिद्धार्थ आनंदानें पण व्याकुल चित्तानें आपणाशीं वागत आहे, हें ती जाणत होती. पिंजऱ्याचें दार उघडें राहिल्यास

पक्षी जसा बाहेर पळून जातो, तशी वैराग्याची भावना सिद्धार्थाच्या अंत:करणांत उत्पन्न झाल्यास तो आपणास सोडून गेल्यावांचून राहणार नाहीं, हें तिला माहित होतें. ती सिद्धार्थाला रिझविण्याचा विलक्षण प्रयत्न करीत असे. आपल्या या प्रयत्नाचें रहस्य सिद्धार्थाला समजलें तर नाहीं ना ? असा तिला वारंवार संशय येई व तो तिचा संशय खराहि होता; तथापि ती निरालसपणें पतिरंजन करीत असे. एके दिवशीं सिद्धार्थ रथांत बसून त्या विलासभवनांत फिरत असतां समोर प्रचंड तट आल्यामुळें सारथ्यानें घोडे वळवून रथ दुसऱ्या बाजूला हांकला. त्याबरोबर सिद्धार्थाच्या मनांत अनेक विचार उत्पन्न झाले. तो आपल्या छन्दक नांवाच्या सारथ्याला ह्मणाला,

"छंदक, या तटाच्या पलीकडे काय आहे ?"

सिद्धार्थाचा तो प्रश्न ऐकून छंदक मोठ्या घोंटाळ्यांत पडला. तो ह्मणाला,

"महाराज, तटाच्या पलीकडे या विलासभवनाप्रमाणें जमीन, पाणी, पर्वत, अरण्यें वगैरे आहेत,"

"विलासभवनांतल्याप्रमाणेंच तटाच्या पलीकडेहि माणसें असतील नाहीं ?"

"होय. तीं सगळीकडे असणारच."

"आणि विलासभवनांतलीं माणसें जशीं सुखी आहेत, तशींच तींहि असतील ?"

"होय. हें उघडच आहे."

"तर मग दु:खी माणसें कोणत्या जगांत असतात ?"

छंदकानें या प्रश्नाचें उत्तर दिलें नाहीं. बराच वेळ छंदकाकडून कांहीं उत्तर नाहीं, असें पाहून सिद्धार्थ ह्मणाला,

" छंदक, पुष्कळ दिवस या विलासभवनांत राहिल्यामुळें बाहेरील भूभाग पाहण्याची मला फार इच्छा झाली आहे. यासाठीं सिंहद्वारांतून रथ बाहेर घेऊन चल."

सिद्धार्थाचे ते शब्द ऐकून छंदक घाबरून गेला. तो ह्मणाला, " राजकुमार, महराजांची आज्ञा झाल्यावांचून आपण येथून बाहेर जाण्यास असमर्थ आहोंत. दरवाजावरील पाहारेकरी महाराजांच्या हुकमावांचून आपणास बाहेर सोडणार नाहींत."

छंदकाचे हे शब्द ऐकून सिद्धार्थाच्या मनांत एकदम खिन्नता उत्पन्न झाली. तो ह्मणाला,

" छंदक, रथ मंदिराकडे घेऊन चल."

राजकुमाराच्या आज्ञेप्रमाणें छंदकानें रथ विलासमंदिराजवळ नेल्यावर सिद्धार्थ आपल्या महालांत जाऊन बसला. घडलेल्या गोष्टींमुळें तो अगदीं अप्रसन्न होऊन विलासभवनाच्या बाहेरील जगाचा विचार करीत होता. सिद्धार्थाची ती अप्रसन्नता पाहून यशोधरेला फार चिंता वाटूं लागली. त्या दिवशीं बरीच रात्र झाली तरी, त्यास झोंप न लागतां तो अंथरुणावरच तळमळत पडला होता. त्यावेळीं यशोधरा त्याच्याजवळ बसून त्याला पंख्यानें वारा घालूं लागली व झोंप लागावी ह्मणून कांहीं चांगल्या गोष्टी सांगूं लागली. यशोधरेच्या या प्रयत्नानें सिद्धार्थाची खिन्नता बरीच दूर झाली व त्याला थोडा वेळ चांगली झोंपहि लागली; परंतु पहांटेच्या सुमाराला तो झोंपेंतून एकदम जागृत होऊन मोठ्यानें ह्मणाला, " दुःखी वसुंधरे, मी तुला विसरलों नाहीं, मी लवकरच येतों." या प्रकारानें यशोधराहि जागी झाली व ती सिद्धार्थाजवळ बसून भीतिविव्हल स्वरानें ह्मणाली, " नाथ, आपण असे घाबरल्यासारखे कां दिसतां ?"

सिद्धार्थ किंचित् स्मित करून ह्मणाला,

"मी घाबरलों नाहीं. तूं मात्र घाबरल्यासारखी दिसतेस."

"होय नाथ. मी खरोखरच घाबरलें आहें. 'मी लवकरच येतों' असें आपण कोणाला सांगितलेंत?"

"या वसुंधरेला. प्रिये, 'ती अनेक आपदा विपदांनीं अगदीं त्रस्त झाली आहे. तिचीं मुलें अनेक दुःखांनीं व्याकुळ झाल्यामुळें ती मला बोलावीत आहे,' अशा प्रकारचें मला एक स्वप्न पडलें. तें स्वप्न पाहून मला आतां असें वाटूं लागलें आहे, कीं, या विलासभवनाच्या बाहेर पडून संपूर्ण पृथ्वीचें अवलोकन करावें आणि जे दुःखी असतील त्यांचें दुःख दूर करण्याचा प्रयत्न करावा. सायंकाळच्या वेळीं सूर्य जेव्हां अस्ताचलीं जाऊं लागतो, तेव्हां मला असें वाटतें कीं, आपणहि त्याच्याबरोबर पश्चिम दिशेला जाऊन तेथील लोकस्थिति अवलोकन करावी. पक्षी जेव्हां उंच भराऱ्या मारून हिमालयाच्या श्रृंगाशिखरावर जाऊन बसतात, तेव्हां मला असें वाटतें कीं, आपणहि पर्वतश्रृंगावर जाऊन संपूर्ण धरातल अवलोकन करावें; पण असें करावयाला मी कोठें समर्थ आहें?"

"नाथ, यांत एवढें अशक्य असें काय आहे? सार्वभौम शुद्धोदन महाराजांचे आपण प्रियकुमार! आपण महाराजांना हा आपला मनोदय कळविण्याचाच काय तो अवकाश,—महाराज मोठ्या आनंदानें आपली ही इच्छा पूर्ण करतील."

यशोधरेच्या सांगण्याप्रमाणें बापाला आपला मनोदय कळविण्याचें ठरवून सिद्धार्थ प्रातर्विधीसाठीं दुसऱ्या महालांत निघून गेला. सूर्योदय होऊन सर्व विलासभवन प्रकाशमान झाल्यावर बाह्यजगताविषयीं सिद्धार्थाच्या अंतःकरणांत पुन्हां निरनिराळे विचार उत्पन्न होऊं लागले.

त्यानें छंदकाला बोलावून आणून कपिलवस्तु नगर पाहण्यास परवानगी मिळावी ह्मणून शुद्धोदन महाराजांकडे निरोप पाठविण्यास सांगितलें. छंदकानें त्याप्रमाणें शुद्धोदनाला ती हकीकत लागलीच कळविली व राजाकडून तशी आज्ञा घेऊन तो विलासभवनांत परत आला.

सिद्धार्थाची ती इच्छा पाहून शुद्धोदन पुन्हां काळजीनें त्रस्त झाला. सिद्धार्थ विलासभवनांत विलासलोलुप होऊन बाह्यजगाला सर्वस्वी विसरून गेला आहे, असें त्याला वाटत होतें, व त्या विचारानें त्याला मोठी धन्यता वाटत होती; पण इतक्यांत छंदकानें सांगितलेली ती हकीकत ऐकून शुद्धोदनाच्या अंतःकरणांत एकदम भीति उत्पन्न झाली. आनंदशिखरावर चढून गेलेला मनुष्य झंझावातानें एकदम गिरिशिखरावरून खोल दुःखार्णवांत पडावा, त्याप्रमाणें शुद्धोदन शोकग्रस्त होऊन छंदकाच्या त्या ह्मणण्याचा विचार करूं लागला. सिद्धार्थाला विलासभवनांतून बाहेर निघण्याची परवानगी द्यावी, तर तो शोकार्त जनतेला पाहून तेव्हांच वैराग्य धारण करील, आणि देऊं नये, तर विलासभनांत ठेवण्याचा हेतु त्याच्या लक्षांत येऊन भलतेंच कांहीं तरी तो करील, अशा दुहेरी पेंचांत शुद्धोदन सांपडल्यावर त्याची स्थिति वेड्यासारखी व्हावी, यांत कांहीं मोठेंसें नवल नाहीं. शेवटीं शुद्धोदनानें सिद्धार्थाला कपिलवस्तु नगर पाहण्याची परवानगी देणें हेंच श्रेयस्कर होय असा विचार करून परवानगी दिली व जिकडे तिकडे राजदूत पाठवून सर्व नगर व ज्या ज्या मार्गानें राजपुत्राचा रथ जाणार ते ते रस्ते वगैरे सर्वोत्कृष्ट श्रृंगारून ठेवण्याची तयारी चालविली. राजाची तशा प्रकारची आज्ञा होतांच कांहीं प्रजाजन संतोषानें तर कांहीं असंतोषानें आपापलें गृह श्रृंगारूं लागले. अंतःकरणांत औदासिन्य उत्पन्न होईल अशाप्रकारचें कोणतेंहि अशुभ दृष्य सिद्धार्थाच्या दृष्टीस पडूं नये

अशी त्या दिवशीं शुद्धोदनानें सर्वत्र व्यवस्था ठेविली होती. जराग्रस्त, व्याधिग्रस्त, वगैरे कोणीहि दुःखी मनुष्यानें रस्त्यावरून हिंडूं नये अशी शुद्धोदनाची कडक आज्ञा होती. राजाच्या आज्ञेप्रमाणें सर्व तयारी झाल्यावर विलासभवनाच्या कोटाचे तिन्ही दरवाजे उघडे झाले व राजकुमार सिद्धार्थाचा रथ हळूहळू कपिलवस्तु नगराकडे चालूं लागला. सिद्धार्थ त्या मर्यादित विलासभवनांतून निघून जेव्हां विश्वेश्वराच्या अमर्याद क्रीडाकाननांत आला, तेव्हां त्यास मोठें समाधान वाटूं लागलें. सायंकाळच्या वेळचा वाहणारा मंद वायु; अस्ताचलीं चाललेल्या सूर्याचा उज्वल पण शांत प्रकाश; यामुळें पुष्कळ दिवसांनीं एकदम दृष्टीस पडलेली ती सृष्टिसुंदरी पाहून सिद्धार्थाला मोठा आनंद वाटला. शहराकडे जाणारा अरण्यांतला मार्ग स्वच्छ व सुंदर आहे, हें पाहून त्यास आपल्या विलासभवनापेक्षांहि तें बाह्यदृष्य अधिक सुंदर व मनोहर दिसूं लागलें. नगरांत आल्यावर तर त्याला फारच आनंद झाला. ध्वजा, पताका, तोरणें, यांनीं सर्व शहर इंद्रभुवनाप्रमाणें श्रृंगारलेलें पाहून त्याला फार आल्हाद झाला. 'पृथ्वी दुःखानें व्याप्त झाली असून ती आपणास बोलावीत आहे' असें जें आपणास स्वप्न पडलें, ती केवळ आपल्या मनाची भ्रांति होय, असें त्याला वाटूं लागलें. सडासंमार्जन केलेले रस्ते, ध्वजा तोरणांनीं अलंकृत केलेलीं घरें, आणि सुंदर पोषाख केलेली जनता, वगैरे प्रकार पाहून या जगाला दुःखाचा संपर्क देखील नसावा असें सिद्धार्थाला वाटूं लागलें; परंतु 'आपण पहात आहों ही स्थिति खरीच आहेना?' असा सिद्धार्थाच्या मनांत त्याबरोबरच संशय येऊं लागला. आंखून ठेवलेल्या मार्गानें राजकुमाराचा रथ चालला असतां जिकडे तिकडे वैभवसंपन्नता पाहून त्याचा तो संशय बराच दृढ झाला. ठरलेल्या मार्गानें सर्व शहर पाहून झाल्यावर रथ अन्य एका मार्गानें जेव्हां परत फिरला, तेव्हां सिद्धार्थ छंदकाला ह्मणाला,

" छंदक, ही जी लोकस्थिति मी पाहिली ही कांहीं खरी लोकस्थिति नसावी. जनता इतकी सुखी असणें शक्य नाहीं. हा जो आपणास जिकडे तिकडे आनंदी आनंद दिसून आला हा कृत्रिम आनंद होय. एवढ्यासाठीं महाराजांनीं ठरविलेल्या मार्गानें रथ न हांकतां दुसऱ्याच एखाद्या मार्गानें रथ ने, ह्मणजे प्रजेची खरोखर स्थिति काय आहे, तें मला कळून येईल."

सिद्धार्थाची तशी आज्ञा होण्याबरोबर छंदकानें ध्वजापताका लावलेला व ठिकठिकाणीं राजदूत उभे केलेला मार्ग सोडून दिला व दुसऱ्याच मार्गानें रथ चालविला. रथ त्या मार्गाला लागून थोडा वेळ झाला नाहीं तोंच एका शेतांत एका गरीब शेतकऱ्याची झोंपडी दृष्टीस पडली. झोंपडी जवळ एक फाटके तुटके कपडे घातलेला शेतकरी शेतांत काम करतांना पाहून सिद्धार्थ आपल्या सारथ्याला ह्मणाला,

" छंदक, हा कोण आहे ?"

छंदक ह्मणाला,

" महाराज, हा एक गरीब शेतकरी आहे. हे लोक असेच श्रम करून धान्य पिकवितात आणि त्या धान्यावर सगळ्या जगाचा निर्वाह होतो."

" तर हे राज्याचे मोठे घटकावयव असून बिचारे किती तरी दरिद्रावस्थेंत असतात. शहाण्या राजानें लोकस्थितीचें अवलोकन करण्यासाठीं मोठाल्या शहरांतून न हिंडतां या गरीबाच्या झोंपडींतला पाहुणचार घेतला पाहिजे, तरच त्याला खरी लोकस्थिति कळून येईल."

सिद्धार्थाचें हें भाषण संपतें न संपतें तोंच वेगानें चाललेला रथ अंगावर येऊं नये ह्मणून घाई घाईनें रस्त्याच्या बाजूला झालेल्या एका

वृद्धावर सिद्धार्थाची दृष्टि गेली. त्या दीन हीन वृद्ध गृहस्थाला पाहून सिद्धार्थ ह्मणाला,

" छंदक, हा काठीवर भार टाकून मोठ्या कष्टानें एकेक पाऊल टाकीत कोण चालला आहे ? बिचारा अगदींच बलहीन दिसतो. त्याचें सगळें शरीर शुष्क झालें असून शिरानशिरा स्पष्ट दिसतात. केंस पांढरे शुभ्र झाले असून मुखानें दुःखव्यंजक स्वरानें ' देवा देवा ' ह्मणत चालला आहे, हा कोण ?"

" राजकुमार, हा एक जराग्रस्त मनुष्य असून त्याला कोणी आप्त स्वकीय नसावेत, किंवा आप्तस्वकीयांनीं त्याला सोडून दिलें असावें. त्याचीं इंद्रियें अत्यंत क्षीण झालीं असून तो आतां या जगाचा फारच थोड्या दिवसांचा सोबती आहे."

" पण तो असा जराग्रस्त कां ? जरेनें फक्त त्यालाच ग्रासलें आहे, कीं, ती यावत् प्राणिमात्रांना ग्रासणारी आहे ? छंदक, मला या प्रश्नाचें खरें खरें उत्तर दे."

" महाराज, जरा हा यावत् प्राणिमात्रांचा एक धर्म आहे. बाल्य, तारुण्य, आणि तारुण्यावस्थेच्या मागून प्रौढावस्था व प्रौढावस्थेमागून वार्धक्य ह्या सर्व प्राण्यांच्या चार स्थिती आहेत. त्या सर्वांना भोगाव्या लागतात."

" तर हें वार्धक्य मला देखील कांहीं दिवसांनीं ग्रासणारच ? "

"होय महाराज. तें कोणालाहि चुकवितां येत नाहीं. श्रीमान् असो कीं दरिद्री असो, वार्धक्य हें सर्वांना भोगावें लागतें."

" छंदक, आमचें हें केवढें अज्ञान कीं, आह्मीं यौवनमदानें धुंद होउन पुढें येणाऱ्या वार्धक्याचा थोडा देखील विचार करीत नाहीं. क्षणभर टिकणारी ही यौवनावस्था, पण त्याचा आह्माला केवढा

अभिमान ! तारुण्यावस्थेंत आह्मी सर्व जगाला तुच्छ मानून किती तरी बेफिकीरीनें वागतों !! छंदक, थांब. अम्मळ माझा रथ येथेंच उभा कर. मला त्या वृद्ध मनुष्याला नीट पाहूं दे."

छंदकानें रथ उभा केल्यावर सिद्धार्थ रथाच्या खालीं उतरला व त्यानें त्या वृद्धास चांगल्या रीतीनें अवलोकन केलें. त्या वृद्धाला पाहून सिद्धार्थाच्या मनांत फारच उद्विग्नता उत्पन्न झाली. तो परत रथांत येऊन बसला व पुन्हां त्याचा रथ चालूं लागला. रथ थोडा पुढें गेला नाहीं, तोंच सिद्धार्थाच्या दृष्टीस दुसरें एक दृष्य दिसलें. एक व्याधिग्रस्त मनुष्य आपल्या दुःखानें विव्हळत रस्त्यानें चालला होता. त्याच्या शरीरांतलें सर्व रक्त नाहींसें होऊन तो पिंगट व शक्तिहीन झाला होता. त्याचा श्वास मोठ्यानें होत असून प्रत्येक पाऊल टाकतांना त्याला फार कष्ट होत होते. त्या मनुष्याला पाहतांच सिद्धार्थाचें अंःतकरण कळवळून आलें. तो छंदकाला ह्मणाला,

" छंदक, हा मनुष्य तर कांहीं वृद्ध दिसत नाहीं, मग याची ही अशी शोचनीय स्थिति कां ?"

छंदक त्या रोगग्रस्त मनुष्याकडे पाहून ह्मणाला,

" महाराज, हा मनुष्य कोणत्या तरी रोगानें पीडल्यामुळें याची अशी स्थिति झाली आहे. तो त्या रोगानें इतका क्षीण झाला आहे कीं, आपण जगूं अशी त्याला मुळींच आशा राहिलेली नाहीं. बिचारा निराश होऊन मृत्यूची वाट पहात राहिला आहे."

" छंदक, रोगानें त्याला कां ग्रासलें ?"

" महाराज, हें सांगतां येणें कठिण आहे. आरोग्य हें स्वप्नाप्रमाणेंच क्षणभंगुर होय. कोणत्या वेळीं कोणत्या रोगानें मनुष्य ग्रस्त होईल याचा कांहीं नियम नाहीं."

" छंदक, या गोष्टी पाहून कोणीहि बुद्धिवान मनुष्य आपल्या कर्तव्याला लागल्यावांचून राहणार नाहीं; पण मी आपला तसाच अझून या ऐहिक सुखालाच चिकटून राहिलों आहें. असो. रथ पुढें हांक. "

सिद्धार्थाच्या आज्ञेप्रमाणें रथ पुढें चालूं लागला. रथ आणखी थोडा पुढें गेल्यावर पुन्हां एक विलक्षण दृष्य सिद्धार्थाच्या दृष्टीस पडलें. एका मृत मनुष्याचें प्रेत ताटीवर ठेवलेलें असून त्याच्याजवळ त्याचे आप्तस्वकीय मोठ्यानें आक्रोश करीत बसले होते. तो प्रकार पाहून सिद्धार्थाच्या अंतःकरणांत एकाच वेळीं भीति व करुणा उत्पन्न झाली. तो सारथ्याला ह्मणाला,

" छंदक, त्या मनुष्याला ताटीवर बांधून तीं माणसें कां रडत बसलीं आहेत ! "

" महाराज, तो मनुष्य मेल्यामुळें त्याला स्मशानांत नेण्यासाठीं ताटीवर बांधलें आहे. त्याचे आप्तस्वकीय तो नाहींसा झाल्यामुळें रडत आहेत. "

सिद्धार्थ निराशेनें ह्मणाला,

"छंदक, जर कांहीं कर्तव्य करावयाचें असेल, तर तें या यौवनावस्थेंतच केलें पाहिजे. मी तर या तारुण्याला अक्षयचें समजून साऱ्या जगाला विसरून गेलों आहें; पण हें तारुण्य केव्हां नाहींसें होईल, याचा तर कांहींच नियम नाहीं. तारुण्याचा नाश करण्यासाठीं व्याधी, जरा आणि मृत्यु हीं अगदीं टपून बसलीं आहेत. धिःकार असो, अशा या तारुण्याला ! या दुःखभोगापासून सर्व प्राणिमात्रांना सोडविण्याचा कांहीं तरी प्रयत्न हा केलाच पाहिजे."

सिद्धार्थाचा रथ मोठ्या वेगानें पुढें चालला होता. सायंकाळ होण्यास आतां अगदीं थोडा अवकाश राहिला असून तेथून विलास-भवनाचा प्रचंड तटहि दिसत होता. इतक्यांत आणखी एक नवीन अशा मनुष्याचें सिद्धार्थाला दर्शन झालें. त्या मनुष्याला तटाच्या जवळून जातांना पाहून सिद्धार्थ छंदकाला ह्मणाला,

"छंदक, तो काषायवस्त्रें परिधान केलेला मनुष्य इकडे येत आहे, तो कोण? त्याचा चेहरा गंभीर व प्रशांत असून तो स्थीर व निर्विकार चित्तानें चालला आहे, असें त्याच्याकडे पाहिलें ह्मणजे वाटतें. त्याच्या हातांत कसलें एक चमत्कारिक पात्रहि आहे. तो कोण आहे, हें तुला माहित आहे?"

सारथी ह्मणाला,

"राजकुमार, तो भगवीं वस्त्रें परिधान केलेला मनुष्य सर्वसंग-परित्याग करून संन्यासी झाला आहे. त्यानें वैराग्य धारण केलेलें असून त्याच्या हातांत जें पात्र आहे, तें भिक्षापात्र होय. तो आपला उदर-निर्वाह भिक्षेवर करतो. ही वृत्ति त्यानें आत्म्याला पूर्ण शांति मिळावी एवढ्यासाठीं स्वीकारलेली आहे."

छंदकाचे ते शब्द ऐकून सिद्धार्थाच्या अंतःकरणावर निराळाच परिणाम झाला. तो ह्मणाला,

"छंदक, आज रस्त्यानें जे जे कांहीं प्रकार पाहण्यांत आले, त्याव-रून आजचा दिवस मी मोठ्या महत्वाचा समजेन. त्या विलासभवनांत मी विलासलोलुप होऊन आपल्या कर्तव्याला विसरून गेलों होतों; पण आज ज्या कांहीं गोष्टी पाहिल्या त्यांमुळें पुन्हां कर्तव्यजागृति झाली. प्राणिमात्रांच्या दुःखनिवारणासाठीं कोणत्या मार्गाचें अवलंबन करावें तें माझ्या त्या भिक्षूला पाहून चांगलें लक्षांत आलें. स्वतःच्या आणि

इतरांच्या आत्मोद्धाराचा प्रयत्न करण्यास हाच मार्ग चांगला आहे, असें मला वाटतें. सर्वसंगपरित्याग करून भिक्षू व्हावें असें मला वाटतें."

राजकुमाराचें हें भाषण ऐकून छंदकाला जितकें वाईट वाटलें, तितकाच विस्मयहि वाटला. त्यावर कांहीं न बोलतां, त्यानें रथ विलास-भवनांत आणला व कुमारास त्याच्या महालांत आणून पोंहोंचविलें. यशोधरा त्याची वाट पहातच बसली होती. कुमाराचें आगमन होतांच ती मोठ्या आनंदानें पतीला सामोरी गेली व त्यास अंतःपुरांत घेऊन आली; पण पति आल्याचें ऐकून तिला जो आनंद झाला होता, तो पतीला पाहिल्यावर नाहींसा झाला. कारण पतीचा चेहरा निरानंद, चिंतायुक्त व म्लान दिसत होता. सिद्धार्थाला मंचकावर नेऊन बसवून यशोधरा त्याला पंख्यानें वारा घालीत असतां ह्मणाली,

" नाथ, आज आपण असे चिंताक्रांत कां दिसतां? आजचें आपलें नगरावलोकन सुखानें पार पडलें ना?"

सिद्धार्थ किंचित् स्मित करून, पण करुणाजनक स्वरानें ह्मणाला,

" प्रिये, सुख या शब्दाचा अर्थ काय तोच आज मला कळेनासा झाला आहे. तें शृंगारलेलें नगर, स्वच्छ केलेले रस्ते, आणि एकंदर पोषाकाचा लोकसमूह पाहून प्रथम मला फार आनंद झाला; पण तें सर्व कृत्रिम आहे, असें समजल्यावर तो तेव्हांच नाहींसा झाला. बाबांच्या त्या व्यवस्थेमुळें पुष्कळ लोकांना त्यांची इच्छा नसतां त्या समारंभांत सामील व्हावें लागलें असेल, याबद्दल मला फार वाईट वाटतें. बाबांनीं आंखून ठेवलेल्या मार्गानें गेल्यास खरी लोकस्थिति आपणास मुळींच कळणार नाहीं, असें जाणून मी आपला रथ दुसऱ्याच मार्गानें चालविला. त्यावेळीं मला मात्र खरी लोकस्थिति दृष्टीस पडली व त्यामुळें माझ्या अंतःकरणांत कर्तव्यजागृति उत्पन्न

झाली. सखे, तुझी ही तारुण्यानें विशेष सुंदर दिसणारी देहलतिका पाहून मला किती तरी आनंद वाटत असे; पण हें तारुण्य अगदींच क्षणस्थायी होय. आमच्या या तारुण्याचा नाश करण्यासाठीं व्याधी, जरा आणि मृत्यु हीं कशीं टपून बसलीं आहेत ?"

"पण नाथ, हीं सर्व यावत्प्राणीमात्रांना आहेतच. त्याबद्दल एवढा विचार तो कसला करावयाचा ?"

यशोधरेच्या या प्रश्नाचें उत्तर सिद्धार्थानें दिलें नाहीं. अंतःकरणांतले विचार तसेच दाबून ठेवून तो तिच्या बरोबर अन्य विषयासंबंधानें बोलूं लागला. रात्रीचें जेवण झाल्यावर त्याचे सर्व रात्रभर त्या भिक्षूसंबंधानें स्वतःशीं विचार चालले होते. बिचाऱ्या यशोधरेला सिद्धार्थाच्या चिंतावस्थेचें कांहींच कारण उमगलें नाहीं. इकडे शुद्धोदनाची त्या रात्रीं मोठी चमत्कारिक स्थिति झाली होती. आपण ठरविलेल्या मार्गानें सिद्धार्थ न जातां भलत्याच मार्गानें तो विलासभवनांत गेला हें ऐकल्यापासून तो काळजीनें अगदीं त्रस्त झाला होता. त्या रात्रीं त्याला स्वस्थ अशी झोंप लागली नाहीं. अमळ कोठें डोळा लागला कीं, चमत्कारिक स्वप्नें पडून त्याचा निद्राभंग होत असे. पहांटेच्या सुमाराला त्याला झोंप लागली असतां असेंच एक विलक्षण स्वप्न त्याच्या दृष्टीस पडलें. 'एका भव्य पटांगणावर एका उंच काठीला पांढऱ्या शुभ्र रंगाचें प्रचंड निशाण वाऱ्यानें फडफड करीत असून त्याच्या मध्यभागावर तप्त सुवर्णाप्रमाणें झगझगीत लाल रंगाचा फार मोठा वर्तुळाकार डाग आहे, तें निशाण चांगल्या स्थितींत असून त्याचा नाश होईल, अशी कल्पनाहि नसतां एकाएकीं त्या निशाणाचे तुकडे तुकडे होऊन ते जमिनीवर पडले. तो ध्वजस्तंभहि मोडून जमिनीवर पडला. इतक्यांत तेथें छायेप्रमाणें कांहीं प्रतिमा येऊन त्यांनीं ते निशाणाचे तुकडे गोळा केले, व त्या प्रतिमा पूर्व दिशेला निघून गेल्या. नंतर दाक्षिणे-

कडून दहा प्रचंड हत्ती आले. त्या हत्तींचे दांत रुप्याप्रमाणें पांढरे व शुभ्र असून सर्वांत पुढें असलेल्या हत्तीवर सिद्धार्थ बसला होता. त्याच्या मागच्या हत्तीवर त्याचे अनुचर असून त्या हत्तीमागून हजारों लोक चालले होते. ते हत्ती निघून गेल्यावर एक अत्यंत उज्वल रंगाचा रथ तेथें आला. त्या रथाला पांढरे शुभ्र चार घोडे जोडलेले असून रथांत सिद्धार्थ बसलेला होता. डोळे दिपून जावे इतका देदीप्यमान् तो रथ असून त्या रथाचे घोडे फारच वेगवान् होते. तो रथ तेथून निघून जातांच त्या जागेवर एक फार मोठें सुवर्णाचें चक्र निर्माण झालें व तें अत्यंत वेगानें गरगर फिरूं लागलें. त्या चक्रावर कांहीं अक्षरें लिहिलेलीं होतीं; पण चक्र वेगानें फिरत असल्यामुळें तीं अक्षरें वाचतां येत नव्हतीं. चक्र फिरत असतां त्या चक्रापासून झगझगीत ज्योती निघून त्या हवेंत नाहींशा होत होत्या व एक प्रकारचा गंभीर ध्वनि निघून तोही सर्वत्र पसरत होता. पहातां पहातां तें चक्र नाहींसें झालें व त्या जागेवर एक मोठी नौबत दिसूं लागली. ती नौबत सिद्धार्थ मोठ्यानें वाजवित असून त्याच्या प्रचंड ध्वनीनें दशदिशा व्यापून गेल्या होत्या. नंतर ती नौबत नाहींशी होऊन तेथें एक देऊळ उत्पन्न झालें. त्या मंदिराचा शिरोभाग उंच होतां होतां तो आकाशमंडपास जाऊन पोहोंचला. तितका उंच सिद्धार्थ चढून बसला, व आपल्या दोन्हीं हातांनीं मोत्यें व रत्नें मंदिरासभोंवतीं उभ्या असलेल्या जनतेला वांटूं लागला. इतक्यांत तें मंदिर नाहींसें होऊन तेथें सहा पुरुष आक्रोश करीत आले. त्यांचे चेहरे क्रुद्ध व उद्विग्न झाले असून ते मोठ्यानें विलाप करीत होते.'

हें स्वप्न पाहून राजा शुद्धोदन अत्यंत भयभीत झाला. शेवटच्या विलापरवांनीं तर तो मोठ्यानें ओरडून झोपेंतून उठला व व्याकुल अंतः-

करणानें त्या स्वप्नाचा विचार करूं लागला. त्यानें लागलीच जिकडे तिकडे दूत पाठवून स्वप्न, जोतीष वगैरे जाणणाऱ्या दैवज्ञांना बोलावून आणून तें स्वप्न सविस्तर सांगितलें व त्याचें शुभाशुभ फल विचारलें; पण त्या स्वप्नाचें फल सांगण्यासाठीं जे दैवज्ञ आले होते, त्यांपैकीं, कोणा एकाला देखील स्वप्नाचें फळ सांगतां आलें नाहीं. दैवज्ञांचें तें शास्त्रज्ञान पाहून राजाला फार राग आला व अत्यंत वाईटहि वाटलें. 'माझ्या पदरीं इतके पंडित असून यांपैकीं एकाला देखील स्वप्नफल सांगतां येत नाहीं' या विचारानें राजाची ती चिंता द्विगुणित झाली व तो अगदीं उद्विग्न होऊन आपल्या प्राक्तनाचा विचार करूं लागला. इतक्यांत मृगचर्म परिधान केलेला एक शुभ्रजटाधारी ऋषि तेथें आला व किंचित् स्मित करून राजाला ह्मणाला,

"राजा, तुला तुझ्या स्वप्नाचें शुभाशुभ फल सांगण्याच्या उद्देशानें मी आलों आहें. तुला पडलेलें स्वप्न निःसंशय शुभ असून त्यासंबंधानें तुला काळजी करण्याचें कांहीं कारण नाहीं." असें ह्मणून आलेल्या ऋषीनें राजाजवळून स्वप्नवृत्तांत ऐकून घेतला व नंतर तो ह्मणाला, "शुद्धोदना, तूं जें स्वप्न पाहिलें आहेस, तें खरोखरच आनंददायक आहे. छिन्नभिन्न झालेली जी ध्वजा तूं पाहिलीस त्याचा अर्थ जुन्या धर्माचा लोप होऊन लवकरच पृथ्वीवर एक नवीन धर्म स्थापन होईल असा आहे. तूं जे दहा हत्ती पाहिलेस त्याचा अर्थ नवीन प्रस्थापित होणाऱ्या धर्माच्या दहा सत्यशक्ति असा आहे. या शक्तीमुळें युवराज संसाराचा त्याग करून नवीन धर्मज्ञानानें सर्व जगाला मोहून टाकील. सिद्धार्थाचा रथ ओढीत असलेले जे चार अश्व तूं पाहिलेस ते चार अश्व ह्मणजे चार धर्म होत. ते सिद्धार्थाला संशयांधारांतून आलोकमय ज्ञानद्वीपांत घेऊन जातील. तूं जें विशाल चक्र फिरतांना पाहि-

लेंस, तें चक्र प्रेमसूचक असून सिद्धार्थाला ज्ञान प्राप्त झाल्यावर तो सर्व जगांत एकमेकांविषयीं प्रेमभाव उत्पन्न करील. जो दुंदुभिध्वनि तूं ऐकलास तो सिद्धार्थाचा धर्मप्रचार ध्वनि होय. तो ध्वनि ऐकून सर्व जगांतले लोक मुग्ध होतील, व त्या नवीन धर्माचा स्वीकार करतील. तूं जें अति उंच मंदिर पाहिलेंस, तें मंदिर सिद्धार्थाचा प्रचलित धर्मस्वरूप असून त्यानें जीं मोत्यें व रत्नें लोकांना दिलीं, तीं त्याच्या धर्मांतील उपदेशरत्नें होत; आणि ज्या सहा पुरुषांना तूं आक्रोश करितांना पाहिलेंस ते षड्दर्शनशास्त्राचे ज्ञाते व अध्यापक असून त्यांना सिद्धार्थाच्या नवीन धर्ममताचें खंडन करितां न आल्यामुळें ते आक्रोश करीत आहेत. राजा शुद्धोदना, असा या स्वप्नाचा अर्थ असून त्याबद्दल तूं उद्वेग करण्याचें कांहींच कारण नाहीं. उलट सिद्धार्थाच्या वैराग्यभावनेबद्दल तूं आनंदच मानला पाहिजेस. सिद्धार्थ लवकरच रत्नखचित वस्त्राभरणाचा त्याग करून त्यापेक्षांहि अमूल्य अशा भगव्या वस्त्रांचा स्वीकार करील आणि क्षुद्र कपिलवस्तुपेक्षां सहस्राधिक श्रेष्ठ अशा जगावर आपली धर्मसत्ता गाजवील."

इतकें सांगून तो ऋषि चटकन् राजवाड्याच्या बाहेर पडला व कोणीकडे निघून गेला. त्याच्या मागून स्वप्नफल सांगण्यासाठीं आलेले दैवज्ञहि राजाला प्रणाम करून आपआपल्या घरीं निघून गेले. ऋषीनें सांगितलेलें स्वप्नफल ऐकून राजाची स्थिति मोठी चमत्कारिक झाली होती. कांहीं वेळ तर तो पाषाणाप्रमाणें निश्चेष्ट बसला होता. थोड्या वेळानें त्याची ती वृत्ति नाहींशी झाली व तो ऋषीनें सांगितलेल्या गोष्टींचा विचार करूं लागला. पुत्र व राज्य या दोहोंमुळें मोहवश झालेला राजा सिद्धार्थाच्या वैराग्यसंपन्नतेची भावी हकीकत ऐकून प्रसन्न न होतां अत्यंत खिन्न मात्र झाला. दैवीशक्ति अधिक, कीं आपली

राज्यसत्ता अधिक याचा आजवर शुद्धोदनानें विशेष विचार असा केला नव्हता; परंतु ऋषीनें तें स्वप्नफल सांगितल्यावर दैवापेक्षां आपल्या राज्यसत्तेंत अधिक शक्ति आहे, अशी त्याच्या मनांत ईर्षा उत्पन्न झाली व वाटेल त्या प्रयत्नानें राजपुत्रास राज्याभिषेक करून राजा बनवावयाचें असा त्यानें निश्चय केला. विलासभवनासभोंवतीं अत्यंत दक्ष असे अनेक पहारेकरी ठेवले. आणखी अनेक प्रकारची विलाससामग्री भवनांत पाठवून दिली, आणि सिद्धार्थाचें मन रिझविण्यासाठीं गायन व नर्तन जाणणाऱ्या स्त्रियांची नेमणूक केली. राजानें इतकी सर्व व्यवस्था केली असूनहि शिवाय यशोधरेचा राजकुमारास आपल्या प्रेमपाशानें बद्ध करण्याचा प्रयत्न चालला होताच; तथापि सिद्धार्थाच्या मनांत जी वैराग्याची भावना उत्पन्न झाली होती, ती कोणाच्याहि प्रयत्नानें नाहींशी झाली नाहीं. तो आपले ते विचार चारून न ठेवतां आपली सहधर्मिणी या दृष्टीनें यशोधरेला सांगत असे व तिची तो सल्ला विचारीत असे. अशावेळीं सिद्धार्थाला काय सांगावें याचा यशोधरेला मोठा विचार पडत असे. खरें बोलावें, तर पतीच्या वैराग्यवृत्तीस संमति दर्शविल्यासारखें होणार, आणि खोटें बोलावें तर सहधर्मिणीचा धर्म बुडविल्यासारखें होणार. अशा दुहेरी पेंचांत सांपडल्यावर यशोधरेला मुग्धावस्था स्वीकारण्यावांचून दुसरा इलाज उरत नसे. राजा शुद्धोदनानें विलासभवनांत तो विशेष बंदोबस्त केलेला पाहून सिद्धार्थाला राजाच्या स्नेहवशतेबद्दल जितकें आश्चर्य वाटलें तितकेंच त्याच्या अज्ञानाबद्दल त्याला वाईट वाटलें. नवीन बंदोबस्त करून कांहीं दिवस गेल्यावर राजा स्वतः सिद्धार्थ कशा रीतीनें रहात आहे हें पाहण्यासाठीं विलासभवनांत गेला. सिद्धार्थाला त्याचें क्षेम विचारल्यावर सिद्धार्थ ह्मणाला,

"बाबा, आपण त्या दिवशीं मला कपिलवस्तु नगर पाहण्याची परवानगी दिली होती; पण नगर मुद्दाम शृंगारलेलें असल्यामुळें खरी लोकस्थिति मला मुळींच समजली नाहीं. कांहीं अमंगल किंवा उद्वेगजनक माझ्या दृष्टीस पडूं नये ह्मणून आपण विशेष बंदोबस्त ठेवला होता; पण यामुळें खऱ्या लोकस्थितीचें मला दिग्दर्शन न होतां चोहोंकडे कृत्रिम आनंद मात्र दिसला. वास्तविक ज्याला पुढें राजा व्हावयाचें आहे, त्याला असले खोटे समारंभ पाहून राज्यशकट चालविण्यास कितीशी मदत होणार? उलट मदती ऐवजीं असला राजा आपल्या दीन, दुःखी व दरिद्री प्रजेला सर्वप्रकारें सुखी समजून बेफिकीरपणें मात्र वागेल. राज्यांतल्या हजारों प्रजाजनांचें प्रात्याहिक जीवनचरित्र इतकें सुखमय असणें कधींच शक्य नाहीं, असें मला वाटतें. यासाठीं प्रजेची खरोखर काय स्थिति आहे, हें पाहण्याची आपण मला परवानगी द्याल, तरच मी योग्य प्रकारें राज्य कसें चालवावयाचें तें समजून घेईन. नाहीं तर माझ्या हातून मला न समजतां प्रजेवर निष्कारण जुल्महि होईल. मला या विलासभवनांत नृत्यगीतादिकांत गुंतवून राज्यभार माझ्यावर सोंपविणें हें अत्यंत अनुचित होय. मी राजा व्हावें अशी जर आपली इच्छा असेल, तर खऱ्या लोकस्थितीचें ज्ञान मला करून देणें हें आपलें कर्तव्य होय. आपण जर अशी परवानगी द्याल तर मी व छंदक रोज गुप्तवेशानें शहरांत व अन्यत्र जाऊन प्रजेच्या स्थितीचें निरीक्षण करीत जाऊं."

सिद्धार्थाचें तें भाषण ऐकून शुद्धोदन राजा मोठ्या घोंटाळ्यांत पडला. सिद्धार्थाचें ह्मणणें पुष्कळ अंशीं खरें असल्यामुळें त्याला त्याचें ह्मणणें कबूल करावें लागलें. राजाची परवानगी मिळतांच विलासभवनाचे दरवाजे खुले झाले व सिद्धार्थ आणि छंदक रोज गुप्तवेशानें लोकस्थितीचें

खरें निरीक्षण करण्यासाठीं विलासभवनाच्या बाहेर जाऊं लागले. एके दिवशीं बाजार, एके दिवशीं न्यायकचेऱ्या, एके दिवशीं निरनिराळे कारखाने, तर एके दिवशीं गारुड्याचे तमाशे; एके दिवशीं कृषिकर्म-दर्शन, तर एके दिवशीं निरनिराळीं देवमंदिरें; याप्रमाणें जें मनांत येईल तें पाहण्याचा त्या दोघांचा क्रम बरेच दिवस चालला होता. या अशा स्वतंत्र वृत्तीनें सिद्धार्थाची उद्विग्नता दूर होईल व त्याला कदाचित् ऐहिक सुखांतच खरें सुख आहे, असें वाटेल अशी शुद्धोदनाची समजूत होती; परंतु सिद्धार्थ दररोज स्वतंत्रपणें इकडे तिकडे हिंडून जें कांहीं पहात होता, त्या पाहण्यामुळें त्याच्या मनांत उत्पन्न झालेली वैराग्यभावना निर्मूल न होतां तिला अधिकाधिक शाखाप्रशाखा उत्पन्न होऊन त्या वैराग्यभावनेचा एक प्रचंड वृक्षच होत चालला होता. एके दिवशीं सिद्धार्थ आपल्या छंदक सारथ्यासह शहरांतून फिरून येऊन रोहिणी-नदीच्या कांठीं बसलेला असतां, नदीच्या एकसारख्या वाहणाऱ्या निर्झराकडे पाहून त्याच्या मनांत अनेक विचारतरंग उत्पन्न होऊं लागले. तो छंदकाला ह्मणाला,

"छंदक, हा नदीचा प्रवाह पहा एकसारखा वहात असून समुद्र-गर्भांत शिरण्याचें आपलें कार्य निरालसपणें करीत आहे. जगांतील लोकांचा दुःखमय जीवनस्रोतहि याच प्रवाहाप्रमाणें एकसारखा वहात आहे; पण या दोहों प्रवाहांत किती तरी मोठें अंतर आहे; एक केवळ परोपकाररत होऊन लोकांच्या स्तुतीची किंवा निंदेची पर्वा न करितां लक्षावधी प्राणिमात्रांना जलपान करवून निरभिमानानें समुद्राला शरण जात आहे, आणि दुसरा जीवनकलहानें संसारमग्न होऊन रौरवनरकाला जाऊन मिळत आहे! धिःकार असो आह्मा लोभवश मानवांना! निर्लोभ चित्तानें परस्परांवर प्रेम व परोकार करणें हेंच आह्मा मानवांचें खरें

कर्तव्य ! पण आह्मी कर्तव्यशून्य होऊन आत्मशांतीचा काडीभर देखील प्रयत्न करीत नाहीं. छंदक, मला त्या भिक्षूची वैराग्यवृत्तीच आत्मशांतिदायक वाटते. मी राज्याचा स्वीकार करून राजा होण्यापेक्षां भिक्षापात्राचा स्वीकार करून सर्व प्राणिमात्रांत प्रेमवृद्धि करणेंच अधिक योग्य समजतों. मी भिक्षू होऊन निर्वाणपथच शोधणार !"

## प्रकरण चवथें.

# कर्तव्यजागृति.

For now the hour is come when I should quit
This golden prison, where my heart lives caged,
To find the Truth; which henceforth I will seek.
For all men's sake until the Truth be found.

वसंतऋतूचे दिवस असल्यामुळें सृष्टिदेवता तारुण्यभरांत आलेल्या सुंदर तरुणीप्रमाणें विशेष मनोहर दिसत होती. त्यांतून पौर्णिमेचा पूर्ण शशिकर आकाशमंडपाच्या मध्यभागीं येऊन जेव्हां सृष्टीवर शीतल व उज्वल किरणांचा अमृतवर्षाव करूं लागला, तेव्हां तर ती अधिकच सुंदर दिसूं लागली. ऐन मध्यरात्र झाली होती, तरी यावेळीं रामनवमीच्या उत्सवामुळें सारें कपिलवस्तु नगर गजबजलेलें दिसत होतें. नानातऱ्हेचीं वाद्यें वाजत असून लोक उत्सवांत अगदीं मग्न झाले होते. विलासभवन मात्र समाधिस्त योग्याप्रमाणें शांत दिसत होतें. अनेक रंगाच्या सतेज व गुळगुळीत संगमरवरी प्रस्थरांवर शुभ्र चंद्रकिरणें पडून सर्व विलासभवन रत्नराजींनीं बांधलेलें आहे कीं काय असा भास होत होता. उद्यानांतील फुलझाडें यावेळीं विशेष खुलून दिसत असून शीतल मंद वायूनें त्यांचा सुवास सर्वत्र पसरत होता. रोहिणीचा खळखळ वाहणारा प्रवाह रजततंतूंनीं गुंफलेल्या वस्त्राप्रमाणें शुभ्र व सतेज दिसत होता. खडकावर आपटण्याच्या प्रवाहाचे जे जलतुषार उत्पन्न होत ते सतेज मौक्तिकाप्रमाणें चमकत होते. शांत व निस्तब्ध विलासभवन व रोहिणीचा तो खळखळ वाहणारा प्रवाह या दोहोंकडे एकाचवेळीं नजर फेकली ह्मणजे असें वाटे कीं, या निद्रिस्त विलासभवनाला रोहिणी ‘ जागा हो, जागा हो ’ ह्मणून सांगत आहे, पण रोहिणीचा तो भाव आज दिसत नव्हता. आज तिच्या खळखळाटांत निराळीच

मंजुळता उत्पन्न झाली होती. आई मंजुळ गाणीं ह्मणून जशी आपल्या लहान मुलांना निजविण्याचा प्रयत्न करीत असते, त्याप्रमाणें ती सलील सरिता आपल्या लीलारवानें विलासभवनास निद्रिस्त करण्याचा प्रयत्न करीत आहे कीं काय, असें वाटत होतें. पौर्णिमेचा पूर्ण चंद्र क्षितिजावर येऊन तो जेव्हां आपल्या सुधाकलशांतून सुधेचा वर्षाव रोहिणी नदीवर करूं लागला, तेव्हां ती अगदीं तन्मय होऊन आपल्या गीतध्वनीनें तें विलासभवन मुग्ध करूं लागली. विलासभवनांतील दासदासी, राजकुमार व यशोधरा यांना आज तो खळखळ वाहणारा आवाज विशेष मनोरम वाटूं लागला. निरनिराळीं वाद्यें वाजविणाऱ्या दासींनीं आज आपलीं वाद्यें रोहिणीच्या खळखळ वाहणाऱ्या आवाजानुरोधानें लावून तीं वाजविण्यास आरंभ केला. गायिका त्याच सुमधुर सुरावर गाऊं लागल्या. नर्तकींच्या पायांतल्या नूपुरांचे झुमझुम स्वरहि रोहिणीच्या निर्झर ध्वनीची स्पर्धा करूं लागले. अशा रीतीनें रात्रींचीं विलासभवनांत जेव्हां जिकडे तिकडे वाद्यें वाजूं लागलीं, तेव्हां मूर्तिमंत उत्साह व आनंद विलासभवनांत वावरत आहेत असें वाटूं लागलें. त्या उत्साहभरांत प्रत्येकजण राजकुमार सिद्धार्थास प्रसन्न करण्याचा प्रयत्न करूं लागला. कित्येक पुष्पहार गुंफूं लागल्या. कित्येक वाळ्याच्या पंख्यानें नवदांपत्यास वारा घालूं लागल्या. कित्येक निरनिराळ्या परिमल द्रव्यानें विलासभवन सुगंधमय करूं लागल्या. सारांश विलासभवनानें आज आपल्या नांवाप्रमाणें अन्वर्थक स्वरूप धारण केलें आहे, असें विलासभवनांतील प्रत्येकास वाटूं लागलें. त्या प्रकारानें प्रत्येकजण इतका मुग्ध होऊन गेला कीं, त्या मुग्धावस्थेंतच त्यांना नकळत ते निद्रावश झाले. राजकुमार सिद्धार्थ मात्र त्या नृत्यगीतांनीं प्रसन्न झाला नाहीं. अप्रतिहत वाहणाऱ्या रोहिणीच्या निर्झर

ध्वनीपेक्षां त्यास ते वाद्यांचे मधुर स्वर व गाण्याचे सुस्वर आलाप निरस व कर्कश वाटूं लागले. त्याचें लक्ष त्या रोहिणीच्या प्राकृतिक निर्झर ध्वनीकडे होतें. त्या ध्वनींतलें चैतन्य, प्रसन्नता, हृदयोत्साहक सुस्वरता, गंभीरपणा वगैरे स्वर्गीय सद्गुण पाहून देवतारूपी ही रोहिणी पर्वतश्रेणीवरून नृत्य करून आपल्या गंभीर अक्षयस्वरानें यावत् प्राणिमात्रांना बोधामृत पाजीत आहे, असें सिद्धार्थाला वाटलें. त्याचें सर्व लक्ष त्या निर्झर ध्वनीकडे होतें. यशोधरेचें लक्ष संगीताकडे असून तें ऐकतां ऐकतांच तिला झोंप लागून गेली होती. सिद्धार्थालाहि त्यानंतर लवकरच झोंप लागली; परंतु ती गीतध्वनीनें न लागतां रोहिणीच्या खळखळ वाहणाऱ्या आवाजांत मग्न झाल्यामुळें तो हळू हळू झोंपी गेला होता!

राजपुत्र सिद्धार्थ व यशोधरा हीं सुवर्णमंचकावर निद्रित झाल्या-वर जाग्या असलेल्या दासी आपापल्या जागेवर जाऊन निजल्या. विलासभवनांतले मोठमोठाले दिवे मालवून टाकण्यांत येऊन कांहीं महालांतले दिवे बारीक करण्यांत आले. विलासभवनांतील बहुतेक नौकरचाकर झोंपी जाऊन त्या विलासभवनानें यावेळीं विलक्षण शांत स्वरूप धारण केलें. जणूं काय स्तब्धतेचें साम्राज्य सुरू होऊन तिनें शांतताभंग होऊं नये ह्मणून कडक बंदोबस्त ठेवला आहे, असें वाटत होतें. वृक्षलतांचीं पानें आवाज होऊं नये ह्मणून अगदीं स्थिर झालीं होतीं. रात्रीं विहार करणारीं दिवाभितेंहि गप्प बसलीं होतीं. सिंह व्याघ्रादि पशूंच्या गर्जनाहि बंद झाल्या होत्या; पण रोहिणीचा निर्झर ध्वनि स्तब्धतेची भीति न बाळगितां आपल्या बोधामृतवाणीनें त्या शांततेस गंभीर करून सोडीत होता. दिवस नाहीं, विश्रांतीची पर्वा नाहीं, कशाचीहि अपेक्षा न बाळगतां रोहिणीचा अप्रतिहत वाहणारा

प्रवाह 'जगाच्या कल्याणा संतांच्या विभूति' या न्यायानें आपलें कार्य एकसारखें बजावीत होता. यावेळीं सिद्धार्थ अगदीं गाढ झोंपेंत मग्न झाला होता. यशोधराहि पूर्ण निद्रेंत होती; पण इतक्यांत ती झोंपेंतून दचकून उठली व सिद्धार्थाला जागृत करण्याच्या उद्देशानें भीतिविव्हल स्वरानें ह्मणाली,

"नाथ, जागे व्हा, जागे व्हा. मला फार भीति वाटते."

यशोधरेच्या या चमत्कारिक बोलण्यामुळें सिद्धार्थ घाबरून जाऊन एकदम जागा झाला व यशोधरेला अगदीं आपल्याजवळ घेऊन म्हणाला,

"यशोधरे, अशी भ्यालीस काय ह्मणून? भीति वाटण्यासारखें काय झालें?"

या वेळीं यशोधरेचा चेहरा मलीन, विषण्ण व भयाकुल दिसत होता. भीतीनें तिचें हृदय धडधड उडत असून ती घामानें डबडबून गेली होती. तिचा श्वास मोठयानें होत असून आपल्या भीतीचें कारण पतीला सांगावें कीं नाहीं, या विचारानें ती एकदां पतीच्या मुखाकडे तर एकदां शून्यदृष्टीनें कोणीकडे तरी पहात होती. सिद्धार्थाची उत्सुकता वाढत आहे, असें पाहून ती म्हणाली,

"नाथ, निद्रेंत असतां मी एक विलक्षण स्वप्न पाहिलें!"

यशोधरेच्या भीतियुक्त मुखांतून स्वप्नाची गोष्ट निघतांच सिद्धार्थाच्या अंतःकरणांत भीति, जिज्ञासा व आश्चर्य हे मनोविकार एकाच वेळीं उत्पन्न झाले. तो कांहींसा अधीर होऊन ह्मणाला,

"यशोधरे, असें भीति वाटण्यासारखें स्वप्नांत तूं काय पाहिलेंस?"

यशोधरा थोडा वेळ स्तब्ध राहून कांपऱ्या आवाजानें ह्मणाली,

"नाथ, तें स्वप्न मोठें चमत्कारिक होतें. तें सांगतांना देखील मला मोठी भीति वाटते. सायंकाळची वेळ झाली असून चंद्रमा नुकताच

क्षितिजावर आला होता. अशावेळीं मी विलासभवनाच्या एका उंच मनोऱ्यावर जाऊन सभोंवतालीं दिसणाऱ्या भूभागाची शोभा पहात होतें. यावेळीं विलासभवनाच्या कोटाचे सर्व दरवाजे उघडे असून त्यांतून मी कापिलवस्तु नगराकडे पहात होतें. तिकडे पहात असतां नगराकडून येणाऱ्या मार्गावर मला एक मोठा पांढरा बैल भवनाकडे पळत येतांना दिसला. त्या बैलाचा रंग विशेष प्रकारचा पांढरा शुभ्र असून तो आकारानें इतर बैलांपेक्षां पुष्कळच मोठा होता. तो अत्यंत सतेज व पाणीदार असून त्याचीं शिंगेंहि फार मोठीं व अणकुचीदार होतीं. त्याच्या भालप्रदेशाच्या मध्यभागीं एक मणि चमकत होता. तो मणि फार मोठा असून त्याचें तेज इतकें विलक्षण होतें कीं, आकाशमंडपांतलें एखादें देदीप्यमान् नक्षत्रच त्याच्या मस्तकावर येऊन चिकटलें आहे, असा पाहणारास भास होत होता. अथवा त्या बैलानें स्वपराक्रमानें कदाचित् तो मणि वासुकीजवळून मिळवून आपल्या कपाळावर बांधला असावा, असेंहि त्या वेळीं माझ्या मनांत आलें. त्या बैलाची पळण्याची गति विलक्षण असून तो एकसारखा विलासभवनाकडेच पळत होता. भवनाचे दरवाजे उघडे असून तो इकडेच पळत येत आहे, हें पाहून माझ्या अंतःकरणांत फार भीति उत्पन्न झाली व तो बैल आंत आल्यास अनर्थ करील अशी मला शंका वाटूं लागली. मी तत्क्षणीं मनोऱ्यावरून खालीं उतरलें व ‘दरवाजे बंद करा, दरवाजे बंद करा’ असें मोठ्यानें ओरडत ओरडत दरवाजापर्यंत धांवत गेलें; पण माझी ती आज्ञा कोणीहि मान्य केली नाहीं. बैल तर एकसारखा दरवाजाच्या रोंखानेंच धांवत येत होता. मी त्या वेळीं फारच भयभीत झालें व कसें करूं काय करूं याचा विचार करीत दरवाजांतच स्तब्ध उभी राहिलें. इतक्यांत दरवाजाच्या तटावर अस-

लेल्या इंद्रमंदिरांतून 'त्या बैलाला कोणी धरून ठेवा, नाहीं तर कपिलवस्तु नगराचा सर्व गौरवमहिमा नष्ट होईल.' असा मोठ्यानें ध्वनि निघाला. ते शब्द ऐकून तर माझे प्राण अत्यंत व्याकुल झाले व त्यावेळीं जरी मी अगदीं हतबुद्ध झालें होतें, तरी आपले दोन्ही हात पसरून उभी राहिलें आणि मोठ्यानें ओरडून सेवकांची दरवाजा बंद करण्याविषयीं सहाय्य-याचना करूं लागलें; पण कोणीहि सेवक धांवून आले नाहींत. इकडे तो बैल तर हां हां ह्मणतां दरवाजाजवळ आला आणि त्यानें मला आपल्या शिंगानें दूर झुगारून देऊन तो आंत शिरला. त्यावेळीं दर-वाजावरील पहारेकऱ्यांनीं घाबरून जाऊन दार बंद करण्याचा प्रयत्न केला, पण बैलानें दरवजा छिन्नभिन्न करून टाकला व त्या पहारेकऱ्यांना त्यानें आपल्या पायानें तुडवून तो विलासभवनांत मोठ्या वेगानें शिरून अदृश्य झाला.

मी दरवाजाजवळ उभी राहूनच हा सर्व प्रकार पहात होतें. बैल विलासभवनाच्या उपवनांत नाहींसा झाल्यावर दरवाजावरील ज्या इंद्रमंदिरांतून 'त्या बैलाला आंवरून धरा' ह्मणून ध्वनि निघाला होता, त्या मंदिरांत कोण आहे, हें पाहण्यासाठीं मी वर पाहिलें; पण माझी दृष्टि वर जातांच एक निराळाच प्रकार माझ्या दृष्टीस पडला. आकाशमार्गानें चार दिव्य पुरुष खालीं पृथ्वीकडे हळूहळू येतांना मी पाहिले. ते चौघेहि पुरुष विलक्षण श्रीसंपन्न असून त्यांच्या अंगावरील वस्त्रें अत्यंत सतेज व शुभ्र वर्णाचीं होतीं. त्या दिव्यपुरुषांच्या मागें असंख्य स्वर्गवासी लोक असून ते सर्व कपिलवस्तु नगरांत येऊं लागले. त्यांच्या आगमनानें शहरांत जिकडे तिकडे हर्षध्वनि उसळून सर्वत्र आनंदी आनंद दिसूं लागला. इतक्यांत तटाच्या सिंहद्वाराच्या वर जी इंद्रध्वजा फडकत होती, ती एकाएकीं छिन्नभिन्न होऊन भूमीवर पडली, आणि त्याच

द्वाराच्या वर हळूहळू दुसरी एक ध्वजा उंचउंच होऊं लागली. थोड- क्याच वेळांत ती ध्वजा आकाशाला जाऊन भिडली व ध्वजस्तंभाचें वस्त्र वाऱ्याच्या योमानें साऱ्या आकाशांत फडफड करूं लागलें. तें वस्त्र अरुणरागाप्रमाणें सतेज तांबडया रंगाचें असून त्यावर कांहीं तरी दिव्य अक्षरें लिहिलेलीं होतीं. आकाशमार्गानें आलेले असंख्य लोक हां हां ह्मणतां त्या निशाणा सभोंवतीं गोळा झाले व निशाणावर लिहि- लेलीं तीं अक्षरें वाचून मोठा आनंद दर्शवूं लागले. त्यांच्या हर्षकल्हो- ळानें सर्व पृथ्वी आनंदानें दोलायमान झाली आहे कीं काय असें वाटूं लागलें. हळू हळू पूर्वाकाश आरक्त होऊन सहस्ररश्मी सूर्यनारायण क्षितिजावर आला. त्याबरोबर अष्टदिशांकडून स्त्रीपुरुषांचे थवेच्या थवे निशाणाजवळ येऊन मोठया भक्तिभावानें निशाणावर लिहिलेलीं अक्षरें वाचूं लागले. जरी त्यावेळीं सूर्योदय झाला हाता, तरी त्या निशाणाचें तेज तसेंच कायम होतें. त्यावरील अक्षरें पूर्वीप्रमाणेंच रत्नासारखीं चमकत होतीं. लोकांची विलक्षण गर्दी झाल्यावर आकाशमंडपांतून एकाएकीं पुष्पवृष्टि होऊं लागली. तीं पुष्पें फारच अपूर्व होतीं. त्या फुलांचा रंग, वास व आकार हीं सर्व मनोहर असून प्रत्येकजण तीं फुलें वेंचून घेऊं लागला. नाथ, मला वाटतें मीं तीं स्वप्नांतलीं फुलें जणूं काय प्रत्यक्षच पहात आहें. तशीं सुंदर फुलें मीं पृथ्वीवर आजवर देखील पाहिलीं नाहींत."

यशोधरा आपला स्वप्नवृत्तांत सांगत असतां सिद्धार्थ मध्येंच म्हणाला,

"प्रिये यशोधरे, तूं सांगितलेली ही हकीतक मोठी मनोहर आहे. त्यांत अशुभपणाचा तर मला एक लेशदेखील दिसत नाहीं. अशा स्वप्नाला तूं इतकी भ्यालीस ?"

यशोधरा पतीकडे भीतिविव्हल पण किंचित् तीक्ष्ण दृष्टीनें पाहून म्हणाली,

“नाथ, मी या स्वप्नाला भ्यालें नाहीं. स्वप्नांत पुढें जो विलक्षण प्रकार पाहिला त्यामुळें मी अगदीं घाबरून गेलें आहें. मी सिंहदरवाज्यांत या लोकसमूहांत उभी असतां एकाएकीं मोठ्यानें ‘सावधान्’ ‘सावधान्’ असा शब्द झाला. तो शब्द ऐकून माझ्या पोटांत एकदम धस्स झालें, व मनांत कुशंका उत्पन्न झाल्यामुळें मी घाईघाईनें या महालांत आपल्या पलंगाजवळ येऊन आपणास पाहूं लागलें; पण नाथ, आपण पलंगावर नसून पलंगावर हें लहान मूल आणि आपलीं वस्त्रें मात्र होतीं. त्यावेळीं आपण मला सोडून कोणीकडे निघून गेलांत असें वाटून मी मोठ्यानें आक्रोश करूं लागलें. आपणास शोधावें म्हणून मी विलासभुवनांतील अनेक महालांतून हिंडलें; पण हृदयेश्वर, आपण मला कोठेंच दिसलां नाहीं. शेवटीं मी निराश होऊन आपल्या महालांत आलें, आणि पलंगावर अश्रु गाळीत पडलें. त्यावेळीं आणखी कांहीं अशुभ प्रकार माझ्या दृष्टीस पडले. माझ्या गळ्यांतली मोत्यांची माळ एकाएकीं तुटली आणि तिनें सर्पाचें रूप धारण करून मला दंश केला. पायांतलीं नूपुरें तुटून खालीं पडलीं. हातांतलीं स्वर्णवलयें गळून गेलीं. कंठांतील रत्नहार तुटला आणि त्याचे कांहीं पदर मातींत लोळूं लागले. या पुष्पशय्येचें मनोहर स्वरूप पालटून ती क्षणार्धांत मृत्तिकेप्रमाणें दिसूं लागली. हा सर्व प्रकार पाहून भयानें माझी अवस्था वेड्यापेक्षां देखील चमत्कारिक झाली. माझी स्थिति इतकी बिकट झाली होती, तरी माझा आपणास शोधण्याचा प्रयत्न एकसारखा चाललाच होता. सगळीकडे शोधून निराश झाल्यावर मी विलासभवनाच्या एका उंच मनोऱ्यावर गेलें व सभोंवतालच्या प्रदेशांत आपणास पाहूं लागलें; पण सिंहद्वाराकडे पाहातें तों तो विशाल पांढरा बैल पुन्हां

दिसला. ती विशाल ध्वजा पुन्हां आकाशप्रांगणांत पिंगा घालूं लागली. त्या जनसमूहाचा पुन्हां आनंदघोष होऊं लागला. 'सावधान्, सावधान्', असें पुन्हा कोणीं मोठ्यानें ओरडला. तो भयंकर 'सावधान्' शब्द ऐकून मी अधिक भयाकूल झालें व जागी होऊन पलंगावर उठून बसलें. हृदयेश्वर, हेंच तें अत्यंत चमत्कारिक व भीतिप्रद स्वप्न. हें स्वप्न पाहिल्यापासून माझें मन शंकाकुशंकानीं कसें अगदीं गोंधळून गेलें आहे. नाथ, या स्वप्नाचा अर्थ काय? आपण मला सोडून जाणार हाच ना याचा अर्थ? मी अभागी या आपल्या चरणसेवेला मुकणार, हेंच ना या स्वप्नावरून समजावयाचें? आर्यपुत्र, सांगा या स्वप्नाचा काय अर्थ तो!"

यशोधरा भीतीनें व दुःखानें अगदीं त्रस्त झाली होती. तिच्या डोळ्यांतून सारखे अश्रु गळत होते. ती अगदीं पतिसन्निध बसून त्याच्या मुखाकडे साशंक पण आशापूर्ण दृष्टीनें पहात होती. पतीकडून काय उत्तर मिळतें, याची ती मोठ्या उत्कंठेनें वाट पहात होती; पण इकडे सिद्धार्थाची स्थिति मोठी चमत्कारिक झाली होती. यशोधरेला समर्पक असें काय उत्तर द्यावें, हें त्याला त्यावेळीं सुचेना. तो चिंतामग्न होऊन त्यासंबंधाचा विचार करीत असतां यशोधरेची काळजी द्विगुणित झाली. ती केविलवाण्या स्वरानें ह्मणाली,

"नाथ, यांत एवढा विचार तो कसला करावयाचा? माझ्यावर आणि माझ्या लहानग्या राहुलावर जर आपलें खरें प्रेम असेल, तर आपला मनोदय जो खरोखर असेल तोच मला सांगा. आपण खरोखर या दासीला आणि या आपल्या पुत्राला सोडून जाणार नाहीं ना?"

सायंकाळच्या वेळीं अस्तगामी सूर्य आपल्या कोमल आरक्त किरणानें पृथ्वीकडे जशा करुणदृष्टीनें पाहतो त्याप्रमाणें सिद्धार्थाच्या

मुखाकडे पाहून यशोधरा आपल्या प्रश्नाच्या उत्तराची वाट पाहूं लागली. सिद्धार्थहि तितक्याच करुण दृष्टीनें यशोधरेकडे पाहून ह्मणाला,

" प्रिये, तुझ्यासारख्या सूज्ञ स्त्रीनें स्वप्नाला इतकें महत्व द्यावें हें कांहीं बरें नव्हे. मनांत जे विचार घोळत असतात, त्याच विचारांचीं साधारणतः स्वप्नें पडतात, असा नियम आहे. तूं आज यासंबंधानें पुष्कळ विचार केला असशील, ह्मणून तुला हें स्वप्न पडलें असावें. तूं अशा भलत्याच विचारानें निष्कारण आपलें मन व्यग्र करून घेतेस. मी तुला सोडून जाईन असें तूं मनांत देखील आणूं नकोस. आतां तूं स्वस्थ अंतःकरणानें नीज. मी तुला झोंप लागेपर्यंत तुझ्याजवळच बसून राहतों. तुला प्रसूत होऊन अद्याप सात दिवस देखील झाले नाहींत, तेव्हां अशा स्थितींत तूं भलतीच भीति मनांत बाळगिल्यास प्रकृति बिघडण्याचा संभव आहे. माझ्याबद्दल तूं मुळींच काळजी करूं नकोस."

भीतिविव्हल यशोधरेला सिद्धार्थानें असें सांगितल्यावर तिची भीति पुष्कळ कमी झाली, व ती आपल्या नूतन अर्भकाला जवळ घेऊन निजली. थोड्या वेळानें तिला झोंप लागल्यावर सिद्धार्थाचें मन निश्चित झालें; पण यशोधरेनें सांगितलेल्या स्वप्नविचारानें त्याच्या अंतःकरणांत एकच खळबळ उडाली होती. यशोधरेला पडलेलीं स्वप्नें तिच्या दृष्टीनें जरी तीं भीतिप्रद असलीं, तरी त्यांत मला स्वतःला जागृत करण्याचा अर्थ आहे, असें सिद्धार्थाला वाटूं लागलें. त्या दृष्टीनें तो स्वप्नाचा विचार करीत असतां त्याच्या अंतःकरणांत त्यागाचे विचार पुन्हां प्रबळ झाले. दुःखानें गांजलेल्या पृथ्वीनें आपणास या स्वप्नानें आमंत्रणच केलें आहे, असें त्याला वाटूं लागलें. एका खिडकीजवळ उभा राहून तो जेव्हां आकाशमंडपाकडे पाहूं लागला, तेव्हां त्याला ती रात्र मोठी शुभ वाटूं लागली. नक्षत्रें आपणाकडे तीक्ष्ण दृष्टीनें पहात

असून तीं आपणास कर्तव्यरत होण्याचा उपदेश करीत आहेत, असें त्याला वाटलें. पश्चिमाकाशांत विलीन होणाऱ्या चंद्राकडे त्याची दृष्टि जातांच तो आपणास "युवराज, ऊठ; माझ्या शीतल प्रकाशानें पृथ्वि पहा कशी शांत व उज्ज्वल झालेली आहे. महत्वाची रात्र ती हीच. अशा सुंदर प्रकाशांत तूं जर आपला मार्ग ओळखून घेणार नाहींस, तर तुझा सर्व जन्म फुकट गेला असें समज. सिंहासनावर बसून एक राज्याचा उपभोग तरी घे, अथवा सर्वसंगपरित्याग करून निर्वाणपथ शोधण्यासाठीं बाहेर नीघ. युवराज, त्या तुच्छ राजमुकुटाचा लोभ धरण्यापेक्षां दुःखानें गांजलेल्या या जगाचा उद्धार करणें हेंच तुला योग्य होय. खऱ्या शांतीचा लाभ तुला याच उपायानें होणार आहे. ऊठ, आयुष्याचा दुरुपयोग करूं नकोस." असें सांगत आहे, असें सिद्धार्थाला वाटूं लागलें. पूर्ण शशिकरानें त्याचें मन अशा रीतीनें आकर्षण करतांच त्याची त्यागेच्छा फारच प्रबल झाली. मंचकावर आपणावर विश्वास टाकून निजलेल्या यशोधरेकडे आणि सात दिवसांच्या लहान अर्भकाकडे जेव्हां त्याची दृष्टि गेली, तेव्हां त्याचें मन पुनः पालट खाऊं लागलें. तो यशोधरेच्या पलंगावर येऊन बसला व निर्बोध बालकाकडे आणि यशोधरेच्या सुंदर मुखाकडे थोडा वेळ पाहून ह्मणाला,

"यशोधरे, तूं निद्रित आहेस, तरी तुझे प्रेमपाश मला अगदीं जखडून धरीत आहेत. ते शिथिल करण्याचा प्रयत्न करतों, तोंच या अर्भकाचें कोमल मुख मला ओढूं लागतें. हाय ! मनुष्या, तूं स्वतंत्र स्वतंत्र ह्मणून ओरडतोस मात्र; पण या मायेनें तुला कसें बांधून टाकलें आहे, याची तुला कल्पनादेखील नाहीं. छे ! आतां तर या मायापाशानें मी अधिकच बद्ध होऊं लागलों. माझ्या हृदयांत प्रेमलहरी उत्पन्न होऊन माझ्या ओठांना या बालकाच्या आरक्त मृदु गालांच्या चुंबनाची तृषा उत्पन्न झाली आहे."

असें ह्मणून प्रेममय व एकाग्र दृष्टीनें सिद्धार्थ यशोधरेच्या व अर्भकाच्या मुखाकडे पाहूं लागला. त्याचें हृदय अशा रीतीनें यशोधरेनें व अर्भकानें आकर्षण केलें असतां, निसर्गानें त्याला पुन्हां जागृत करण्याचा प्रयत्न केला. पृथ्वि नितांत शांत असल्यामुळें रोहिणीचा निर्झरध्वनि त्याच्या कानावर स्पष्टपणें येऊन आदळूं लागला. त्याचें लक्ष त्या खडकावरून खळखळ वाहणाऱ्या ध्वनीकडे गेलें. तो रोहिणीच्या प्रवाहाचा जेव्हां विचार करूं लागला, तेव्हां त्या प्रवाहांतून अनेक चैतन्योत्पादक ध्वनि निघत आहेत असें त्याला वाटूं लागलें.

"ऊठ, मोहवश होऊं नकोस. मायापाशांत सांपडून कर्तव्यपराङ्मुख होऊं नकोस. या क्षणिक सुखाच्या आशेनें चिरकालिक सुखाला आंचवूं नकोस."

रोहिणीच्या प्रवाहांतून असे ध्वनि निघत होते कीं, नाहीं, कोण जाणे; पण त्यावेळीं ती आपल्या कानाशीं तसा टाहो फोडित आहे, असें सिद्धार्थाला वाटून त्यानें विलक्षण मानसिक आकलन करून ते मायापाश तोडले, आणि तो यशोधरेच्या पलंगावरून उठून दरवाजाकडे वळला. दरवाजाजवळ गेल्यावर त्यानें एकवार आपली दृष्टि यशोधरेकडे वळविली. किंचित् काळ अनिमिष नेत्रांनीं तिच्याकडे पाहून तो ह्मणाला,

"प्रियतमे, हाच तो शुभ दिवस! तूं जागृत झाल्यावर पाहिजे तर या दिवसाला अशुभ ह्मण; पण जो दिवस मला या संकीर्ण विलासभवनांतून काढून विशाल विश्वांत नेऊन सोडीत आहे, त्या दिवसाला मी शुभच ह्मणणार. माझ्यावर पाहिजे तर तूं रागव; पण 'माझा पति या नश्वर व क्षणभंगुर राज्यैश्वर्याला सोडून अनंत जीवांच्या कल्याणार्थ बाहेर गेला आहे,' हें तुझ्या लक्षांत आल्यावर तुला समाधानच वाटेल. ज्याच्यासाठीं मी जन्म धारण केला आहे, तेंच मला केलें पाहिजे. इतके

दिवस ज्याचा मी नुसता विचार करीत होतों, तें आज कृतींत उतरविण्याचा मी निश्चय केला आहे. मला राज्य नको, राज्यमुकुटहि नको. हजारों मनुष्यांच्या वधानें उत्पन्न होणाऱ्या रक्तमांसकर्दमांतून रथपरिचालन करण्याची आसुरी इच्छा, ज्या राज्यतृष्णेमुळें उत्पन्न होते, त्या राज्यतृष्णेला आणि त्या राज्याला धिःकार असो. अशा राज्याला सोडल्याबद्दल सिद्धार्थाची पत्नी खचित विषाद मानणार नाहीं. मनुष्याच्या मनांत उन्मत्तपणा उत्पन्न करून दीन व हीन यांविषयीं ज्यामुळें जुलुमाचे विचार अंतःकरणांत खेळूं लागतात, तें राज्य सोडून जगाचें सर्व दुःख आपल्या शिरावर घेणें हेंच मला कर्तव्याप्रमाणें वाटतें. यशोधरे, हें कर्तव्य बजावण्यास मी तयार झालों ह्मणून तुला आनंदच वाटेल. आजपासून मी राजपुत्र नसून भिकारी ह्मणून रस्तोरस्तीं भटकणार, भूमीवर शयन करणार आणि कदान्न खाऊन उदरनिर्वाह करणार! हजारों प्राणिमात्रांना हें सुखदेखील नसेल, तेव्हां त्यांच्या दुःखाचा देखील मला अनुभव घ्यावा लागेल. अनंत प्राणिमात्रांच्या ज्या दुःखवेदना माझ्या अंतःकरणांत क्षतारोपण करीत आहेत, तें क्षतचिन्ह बुजविण्यास त्याग हाच एक उपाय असून त्याचाच मी स्वीकार करीत आहें. आजपासून मी आपल्या सर्व सुखावर पाणी सोडलें आहे."

असें ह्मणून, सिद्धार्थ थोडावेळ सचिंत उभा राहिला. तो नूतन अर्भकाकडे पाहून ह्मणाला,

"जातेवेळीं या पोराच्या गालाचें चुंबन घ्यावें असें वाटतें; पण नको, न जाणो त्या चुंबनांत देखील अशी विलक्षण शक्ति असेल कीं, माझे सर्व विचार पालटून मी पुन्हां या मोहपाशांत सांपडेन!"

सिद्धार्थ मग तेथें थांबला नाहीं. त्यानें यशोधरा निजलेल्या पलंगासभोंवतीं तीन प्रदक्षिणा घातल्या व तो महालांतून बाहेर पडून मोकळ्या



अशा राज्याला सोडल्याबद्दल सिद्धार्थांची पत्नी खचित विषाद मानणार नाहीं!

प्रांगणावर येऊन उभा राहिला. तेथून दिसणारें विशाल आकाश, त्यांतल्या तारका, तो शीतल तेजोगोलक चंद्र, या सर्वांकडे पाहून, त्याचे विचार अधिक कायम झाले. तो आपल्या मनाशीं ह्मणाला,

"या विस्तीर्ण वितानमंडपाच्या खालीं एवढे जनप्राणी आहेत, पण रोग, जरा, आणि मृत्यु हीं चुकविण्याचें सामर्थ्य कोणांत आहे? मला वाटतें असा एकदेखील प्राणी नसेल. प्राणीच काय, पण देवता देखील या त्रयींतून सुटत असतील कीं नाहीं, कोण जाणे! देवता देखील मायिक बंधनानें बद्ध झाल्या आहेत असें दिसतें. त्यांना त्यागाची महती माहित नसावी असें दिसतें. तेव्हां मला हा निर्वाण-पथ दाखवून देणारा कोणीच मिळणार नाहीं काय? कोणीच मिळणार नाहीं असें दिसतें! पण तेवढ्यासाठीं मी निराश होत नाहीं. सत्याचा शोध माझा मीच करून घेईन. एवढ्या विशाल राज्याच्या त्यागाची किंमत देऊन मुक्तिसुधा मिळणार नाहीं, असें होणार नाहीं. हे दुःखत्रस्त वसुंधरे, तुझ्यासाठीं—तुझ्या अनंत लेंकरांसाठीं—मी माझें जीवन, माझें राज्यैश्वर्य, माझा आनंद, माझें दिवसाचें कार्य, रात्रीची विश्रांति, हें प्रासादभवन, आणि हृदयेश्वरी यशोधरा, या सर्वांचा त्याग करतों. आई, बाबा, यशोधरे, अहो प्रजागण, माझा विरह सहन करा. मी महामुक्तीचा प्रदीप शोधण्यासाठीं जात आहें, तो प्रदीप मिळेपर्यंत माझें दर्शन तुह्मांला होणार नाहीं!"

असें आपल्या मनाशीं ह्मणत सिद्धार्थ दोन पावलें पुढें जातो न जातो तोंच त्याचा सारथी छंदक त्याला भेटला. तो ह्मणाला,

"युवराज, इतक्या रात्रीं आपण कोठें चाललां?"

सिद्धार्थ त्याचा हात दाबून ह्मणाला,

"छंदक, हळू बोल. आपलें बोलणें कोणी ऐकतां कामा नये. जा, अश्वशाळेंत जा, आणि माझा आवडता कन्टक घोडा घेऊन ये."

"पण प्रभु, आपण इतक्या रात्रीं कोठें जाणार ?"

"ज्याचा शोध करण्यासाठीं मी जगांत आलों आहें, त्याच्या शोधासाठीं जात आहें. मी सर्वांचा त्याग करून अमृताच्या शोधासाठीं बाहेर पडलों आहें. या महत्कार्यांत मला सहाय्य कर. जा, उशीर न करतां लवकर घोडा घेऊन ये."

सिद्धार्थाचे ते शब्द ऐकतांच छंदकाचे डोळे अश्रूंनीं भरून आले. तो जितका स्वामीभक्त सेवक होता, तितका सिद्धार्थाचा प्रियकर मित्र होता. सिद्धार्थ आपणास सोडून जात आहे, हें पाहून त्यास पराकाष्टेचें वाईट वाटलें. तो ह्मणाला,

"युवराज,आपण आह्मां सर्वांना सोडून जातां काय ? आपल्या जाण्यानें इकडे केवढा अनर्थ होईल याचा आपण कांहीं विचार केला आहे काय ?"

"छंदक, यावेळीं असें कांहीं बोलून माझ्या पुण्य कृत्यांत व्यत्यय आणूं नकोस. तूं काय या स्थितीस सुखाचें निधान समजतोस ? नाहीं, हा एक पिंजरा आहे, आणि त्यांत मी एक बद्ध झालेला पक्षी आहें. फरक इतकाच कीं, हा पिंजरा सुवर्णाचा आहे; पण पिंजरा सुवर्णाचा असो कीं कशाचाहि असो, त्यांतून मुक्त होण्याचा प्रयत्न करणें हें प्रत्येकाचें कर्तव्य आहे. मी हा प्रयत्न माझ्या स्वतःच्या कल्याणासाठीं करीत नसून सर्वांच्या कल्याणासाठीं करीत आहें. तूं माझा मित्र आहेस; या वेळीं मला सहाय्य कर."

"तर काय आपण हातांत भिक्षापात्र धारण करून या राज्याचा त्याग करणार ?"

"होय; तेवढ्यासाठीं तर मुळीं मी जन्म घेतला आहे. आणि छंदक, मी ज्या राज्याच्या शोधासाठीं जात आहें, त्या राज्याची किंमत असल्या कोटी राज्यांपेक्षां देखील अधिक आहे."

"पण महाराज, वृद्ध शुद्धोदन महाराजांची आपण गेल्यावर काय स्थिति होईल, आपली आई गौतमी किती शोक करील, यशोधरेला किती दुःख होईल, याचा कांहीं विचार करा. जी यशोधरा आपणास आपला प्राण समजते, ती, आपण गेल्यावर किती दिवस जीव धरून राहील?"

"छंदक, असें बोलून मला मोहवश करूं नकोस. तूं माझा मित्र आहेस. मला यावेळीं सहाय्य करणें तुझें कर्तव्य आहे; आणि ज्यांच्या प्रेमाविषयीं तूं ह्मणतोस, तें प्रेम काय चिरकालिक आहे? कितीहि झालें तरी तें पार्थिव प्रेम. कारण संपतांच नाहींसें व्हावयाचें. मी अक्षयचें प्रेम संपादन करण्यासाठीं जात आहें, तिकडे मला जाऊं दे. तूं माझा वाटाड्या हो. उजाडलें नाहीं तों दूरदेशीं मला नेऊन सोड, ह्मणजे पुढें मी आपल्या मार्गानें अमृताच्या शोधार्थ जाईन."

सिद्धार्थाच्या बोलण्याचा छंदकाच्या मनावर परिणाम झाला. एवढें राज्यवैभव सोडून जो संन्यास ग्रहण करून अरण्यांत जात आहे, त्याच्या जाण्यांत कांहीं तरी विशेष असून त्या बाबतींत सहाय्य करणें आपलें कर्तव्य आहे असें त्याला वाटलें. तो गडबड न करितां हळूच अश्वशाळेंत गेला व दोघांसाठीं दोन घोडे घेऊन आला. सिद्धार्थ आपल्या कन्टक नांवाच्या घोड्यावरून हात फिरवून ह्मणाला,

"कन्टका, आजवर मी तुला विशेष असे केव्हांच श्रम दिले नाहींत; पण आज त्या सर्वांचा मोबदला तूं मला देऊन या कपिलवस्तु नगरापासून शक्य तितक्या दूर नेऊन मला टाक. हे श्रम विशेष तर खरेच

पण ते फक्त आजच आहेत. यापुढें माझ्यापासून तुला थोडादेखील त्रास व्हावयाचा नाहीं."

असें ह्मणून सिद्धार्थ घोड्यावर बसला, आणि छंदकासह विलासभवनाच्या बाहेर पडला. जातांना तो कपिलवस्तु नगराकडे पाहून ह्मणाला,

"हे जन्मभूमि, तुला शेवटचा प्रणाम करतों. तें दिव्य व सत्य तत्व सांपडल्यास पुन्हां तुझ्या दर्शनास येईन; नाहीं तर तें सांपडेपर्यंत सर्व आयुष्य खर्च करीन."

सिद्धार्थ मार्गाला लागतांच त्यानें विलक्षण वेगानें घोड्याला पळविलें. त्याच्या मागून छंदकहि तितक्याच वेगानें आपला घोडा पळवीत होता. सूर्योदय होईपर्यंत ते दोघेहि कोठें विश्रांति न घेतां एकसारखा मार्ग काढीत होते. अनेक गांवें, पर्वत, अरण्यें टाकून सूर्योदयाच्यावेळीं ते कपिलवस्तु नगरापासून सुमारें पंचेचाळीस मैल लांब असलेल्या अनमा नदीच्या कांठीं आले. तेथें सिद्धार्थ घोड्यावरून उतरून त्यानें कंटकाच्या मुखाचें चुंबन घेऊन त्यास छंदकाच्या स्वाधीन केलें. जवळच एक व्याध मोठ्या कौतुकानें या दोघांकडे पहात होता. सिद्धार्थानें त्या व्याधाला जवळ बोलावून तो त्याची करुणा भाकून ह्मणाला,

"बा व्याधा, माझी एक विनंति मान्य करशील, तर माझ्यावर मोठे उपकार होतील. माझा हा पोषाख घे, आणि त्याऐवजीं तुझीं हीं फाटकींतुटकीं वस्त्रें मला दे."

असें ह्मणून सिद्धार्थानें राजमुकुट व अंगावरील बहुमूल्य अंगरखा हीं शिवाय करून बाकी सर्व वस्त्रें व्याधाला दिलीं. व्याधाला या चमत्कारिक मोबदल्याबद्दल आश्चर्य हें साहजिक वाटलेंच; पण त्यानें बिनतक्रार तीं वस्त्रें घेऊन आपलीं फाटकीं वस्त्रें सिद्धार्थाला दिलीं; व मोठ्या संतोषानें तो आपल्या घरीं निघून गेला. नंतर सिद्धार्थानें आपल्या

हातांतल्या तलवारीनें आपल्या मस्तकावरील केंस कापून, ते केंस, तो राजमुकूट व अंगरखा छंदकाजवळ देऊन तो ह्मणाला,

"छंदक, माझ्या विषयींचें स्मृतिचिन्ह ह्मणून ह्या वस्तु महाराज शुद्धोदन यांना नेऊन दे. त्यांनां माझे अनंत प्रणाम सांग, आणि मजबद्दल कांहीं एक काळजी करण्याचें कारण नाहीं, असें त्यांना सांग. छंदक, तुझे तर माझ्यावर अनंत उपकार झाले आहेत. त्याचा मोबदला देण्यास माझ्याजवळ आतां कांहींदेखील नाहीं. माझ्यावर आहे असेंच प्रेम कायम ठेव. मी ज्या महत्कार्यासाठीं तुला सोडून जात आहें, त्यांत यश आल्यास, त्या यशाला तूं थोड्या बहुत अंशानें कारण असल्यामुळें लोक तुझी निःसंशय प्रशंसा करतील. जा, आतां आपल्या मार्गानें कपिलवस्तु नगरास परत जा, आणि सगळ्यांना समाधान सांगून आनंदानें रहा."

असें ह्मणून सिद्धार्थानें एक भिक्षापात्र हातांत घेतलें; आणि छंदकाच्या गलदश्रु नेत्राकडे लक्ष न देतां तो पायांतलें पादत्राणहि काढून टाकून पुढें निघून गेला. छंदक व कंटक असे दोघेहि आपल्या दृष्टि-सीमेपर्यंत सिद्धार्थाला पहात होते. त्यांच्या दृष्टीच्या पलीकडे तो निघून गेल्यावर छंदकानें दुःखानें एक दीर्घश्वास सोडला, आणि तो कन्टकाला घेऊन मागें फिरूं लागला; पण कंटक जागेवरून हालेना. तो तेथेंच खालीं बसला आणि क्षणार्धांत त्या स्वामिभक्त मुक्या प्राण्यानें आपला प्राण सोडला. कंटकाची ती अवस्था पाहून छंदकाचें हृदय विदीर्ण होऊन गेलें. तो कातर कंठानें ह्मणाला,

"हे प्रभुभक्त प्राण्या, धन्याच्या विरहामुळें तुझी अशी अवस्था व्हावी, हें तुझ्या स्वामिभक्तीचें अनुपमेय उदाहरण होय. पशूंतली

स्वामिनिष्ठा मनुष्यांत जर एकशतांश उतरेल, तर जनतेंतला निमकहरामपणा खरोखर नाहींसा होईल."

छंदक मग तेथें थांबला नाहीं. तो तेथून निघाला व कापिलवस्तु नगरास लवकरच येऊन पोहोंचला. इकडे तो येण्यापूर्वींच सर्व कपिलवस्तु नगरांत हाहाःकार उडाला होता. त्या दिवशीं सूर्यानें क्षितिजावर डोकें काढलें नाहीं, तोंच सिद्धार्थ नाहींसा झाल्याचें दुःखदायक वर्तमान सर्वत्र पसरलें. राजा शुद्धोदनानें कुमाराच्या शोधार्थ जिकडे तिकडे दूत पाठवून दिले; परंतु कोणासहि सिद्धार्थाचा शोध लागला नाहीं. त्यामुळें राजा शुद्धोदन, राणी प्रजावती, व यशोधरा या सर्वांचीं हृदयें काळजीनें विव्हल होऊन गेलीं होतीं. यशोधरेची स्थिति तर जवळजवळ वेड्यासारखी झाली होती. इतक्यांत छंदक कापिलवस्तु नगरांत आला व त्यानें घडलेली सर्व हकीकत शुद्धोदनाला सांगितली. ती हकीकत ऐकून मस्तकावर वज्रपात व्हावा त्याप्रमाणें त्याला दुःख झालें; पण यशोधरेच्या मुखावर एक प्रकारचें समाधान दिसूं लागलें. तिनेंहि पतीप्रमाणेंच संन्यास ग्रहण करून सर्व राज्यादि सुखावर पाणी सोडलें आणि ती अहर्निश पतीला त्याच्या कार्यांत सिद्धि प्राप्त व्हावी ह्मणून परमेश्वराची करुणा भाकूं लागली.

अनमा नदीच्या कांठीं जेथें सिद्धार्थानें छंदकाला निरोप दिला, तेथें असलेल्या एका लहान गांवाला तेव्हांपासून छंदवाडी असें नांव मिळालें असून तें अद्यापहि चालू आहे. त्या नंतरच्या बौद्धधर्मी राजांनीं तेथें एक प्रचंड स्तूप बांधलेला असून तोहि अद्याप जीर्णावस्थेंत दृष्टीस पडतो.

## प्रकरण पांचवें.

## पर्यटण.

त्वहं जरामृत्युभयं विदित्वा
मुमुक्षया धर्ममिमं प्रपन्नः

सिद्धार्थानें असें ऐकिलें होतें कीं, मानव-समूहसंपर्कापासून अत्यंत दूर अशा पर्वतश्रेणींतील गुहांत महान् महान् ऋषि तपश्चर्या करीत बसलेले असून, त्यांना शरण गेलें असतां आत्ममुक्तीचा–निर्वाणाचा मार्ग सांपडण्याचा संभव आहे. या त्याच्या समजुतीप्रमाणें तो छंदकाला सोडल्यापासून विशाल पर्वतश्रेणींच्या अनुरोधानें मार्ग काटीत चालला होता. थोड्याच दिवसांत तो बिंबिसार राजाची राजधानी जी राजगृह त्या शहराजवळ येऊन पोहोंचला. हें शहर मगध देशांत असून त्यावेळीं विशेष प्रसिद्ध होतें. एखाद्या शहरासभोंवतीं त्या शहराच्या सुरक्षिततेसाठीं मुद्दाम विशाल कोट बांधावा त्याप्रमाणें राजगृह शहर, पर्वतानें वेष्टीत असून शहरासभोंवतीं पांच विशाल पर्वतशृंगें आकाशाशीं स्पर्धा करीत होतीं. वैभार, विपुल्ल, तपोवन, शैलगिरी व रत्नगिरी हीं त्या पांच शैलशृंगांचीं नांवें असून पर्वतावरील दाट अरण्यांतून पलीकडे जाण्यास एक लहानसा नागमोडी रस्ता गेलेला होता. या रस्त्यानें पलीकडे गेल्यावर अत्यंत मनोहर अशा वनप्रदेशाचें दर्शन होई. हा वनप्रदेश अत्यंत पवित्र ह्मणून प्रसिद्ध असून सुंदर फल–पुष्पांचे तेथें अनेक वृक्ष होते. पर्वतावरून वाहणाऱ्या निर्मल उदकाचे अनेक निर्झर त्या प्रदेशांत वाहत असून एका बाजूला तटाच्या भिंतीप्रमाणें निश्चल असलेला पर्वत ध्यानस्थ योग्याप्रमाणें शांत, स्थिर व गंभीर दिसत होता. याच पर्वतांत एक विशाल गुहा असून तिचें मुख औदुंबराच्या

घनदाट वृक्षांनीं आवृत झालेलें होतें. सिद्धार्थ हळूहळू मार्ग क्रमित याच रमणीय वनप्रदेशांत आला व ती अगदीं एकांतांत असलेली गुहा पाहून त्यानें तेथेंच तपश्चर्येसाठीं राहण्याचें ठरविलें. त्या प्रदेशांत अशी कांहीं पवित्र शक्ति होती कीं, तेथें आल्याबरोबर अंतःकरणांत पवित्र भावना उत्पन्न होत असे. अशा ठिकाणीं सिद्धार्थानें तपश्चर्येस ह्मणजे जगांतलें दुःख कोणत्या उपायानें घालवितां येईल, याचा विचार करण्यास आरंभ केला. त्या चिंतावस्थेंत तो गुहेबाहेरील एका प्रस्थरावर प्रस्थर मूर्तीप्रमाणें निश्चल बसत असे. एकदां त्या विचारांत तो मग्न झाला ह्मणजे ऊन, वारा, पाऊस, थंडी यांकडे त्याचें काडी-मात्र लक्ष नसे. ग्रीष्मकाळांत दिनमणि आपल्या प्रखर नेत्रांनीं सिद्धार्थाकडे उदयापासून तों अस्तापर्यंत एकसारखा पहात असे; त्या विलक्षण तप्ततेमुळें पशुपक्षी देखील भयाकुल होत; परंतु सिद्धार्थ निमिषभर देखील आपल्या आसनावरून उठत नसे. आणि असें एक दिवस नाहीं, दोन दिवस नाहीं, तर कित्येक वर्षे त्यानें सूर्याचा प्रखर ताप सहन केला; वर्षाकाळांत त्याच्यावर जलधारांनीं अविरत वर्षाव करून त्याला आसनावरून हालविण्याचा प्रयत्न केला; परंतु सिद्धार्थानें आपला क्रम सोडला नाहीं. थंडीच्या दिवसांत भयंकर थंडी पडे, केव्हां केव्हां तर हिम-तुषारहि त्याच्या शरीरावर पडत; परंतु कांहीं झालें तरी आपल्या आसनावरून हालावयाचें नाहीं, असा सिद्धार्थाचा निर्धार होता व त्याप्रमाणें जोंपर्यंत त्याची त्या गोष्टीवर भावना होती, तोंपर्यंत तो नियम त्यानें कायम ठेवला होता.

तो निश्चल बसून ध्यानमग्न झाला ह्मणजे इतका स्थिर होत असे कीं, त्याला कांहीं चैतन्य आहे, असा पक्ष्यांना संशयदेखील उरत नसे. निरनिराळे पक्षी त्याच्याजवळ येऊन भिक्षापात्रांतील तांदुळ खात,

पाणी पीत आणि त्याच्या शरीरावर बसून निर्धास्तपणें कलकलाट करीत. त्याच्याजवळून जाणाऱ्या लोकांना मात्र तो चैतन्यरहित असा वाटत नसे. तो त्यांना निर्वात जागेंतील निष्कंप ज्योतीप्रमाणें प्रभावशील वाटत असे. माध्यान्ह समयींचा सूर्य आपल्या तीक्ष्ण नेत्रांतून जेव्हां त्याचेकडे दृष्टि फेंकी, तेव्हां असें वाटे कीं, तो त्याच्या तपश्चर्येची परीक्षाच पहात आहे. वर्षाकाळांत जेव्हां मुसळधार वृष्टि त्याच्या शरीरावर होई, तेव्हां ती त्याला आपल्या आसनावरून उठवून त्याच्या तपाचा भंग करूं पहात आहे, असें वाटे आणि थंडीच्या दिवसांत त्याच्या अंगावर पडणारे हिम-कण त्याच्या तपश्चर्येंत विघ्न आणीत आहेत असें वाटे; परंतु सिद्धार्थाचें निश्चयाचें बळ इतकें दांडगें होतें कीं, त्यानें निसर्गाकडून होणाऱ्या विघ्नांना दाद दिली नाहीं. आपल्या या तपश्चर्येनें सत्याचा शोध लागेल, अशी जोंपर्यंत त्याची समजूत होती, तोंपर्यंत त्यानें आपला तो क्रम अव्याहत चालविला होता. तो एकदां आपल्या आसनावर बसून आपल्या ध्येयाच्या विचारांत मग्न झाला ह्मणजे बाह्यजगाच्या निसर्गसिद्ध घडामोडीचें त्याला मुळींच ज्ञान होत नसे. माध्यान्हींचा सूर्य हळूहळू पश्चिमाकाशांत विलीन होऊन विश्रांति घेण्यासाठीं निघून जाई; एकेक तारका आकाशमंडपाला रत्नगोलकाप्रमाणें चिकटून सर्व आकाश रत्नखचित शेल्याप्रमाणें दिसूं लागे, तरी सिद्धार्थ आपल्या आसनावरच ध्यानावस्थेंत बसलेला असे. क्रमानें मध्यरात्र होऊन हिंस्रपशु पर्वतगुहांतून भयंकर आरोळ्या फोडीत त्या अरण्यांत फिरूं लागत. त्या वेळीं मध्यरात्र होऊन गेली असें समजून सिद्धार्थ आपल्या आसनावरून उठे व गुहेंत जाऊन थोडी झोंप घेई. अरुणोदय होण्यापूर्वींच तो आपल्या निद्रासनावरून उठे व पुन्हां नित्योद्योगास लागे. गुहेंतून बाहेर पडल्याबरोबर तो सृष्टीकडे करुण

घनदाट वृक्षांनीं आवृत झालेलें होतें. सिद्धार्थ हळूहळू मार्ग क्रमित याच रमणीय वनप्रदेशांत आला व ती अगदीं एकांतांत असलेली गुहा पाहून त्यानें तेथेंच तपश्चर्येसाठीं राहण्याचें ठरविलें. त्या प्रदेशांत अशी कांहीं पवित्र शक्ति होती कीं, तेथें आल्याबरोबर अंत:करणांत पवित्र भावना उत्पन्न होत असे. अशा ठिकाणीं सिद्धार्थानें तपश्चर्येस ह्मणजे जगांतलें दु:ख कोणत्या उपायानें घालवितां येईल, याचा विचार करण्यास आरंभ केला. त्या चिंतावस्थेंत तो गुहेबाहेरील एका प्रस्थरावर प्रस्थर मूर्तीप्रमाणें निश्चल बसत असे. एकदां त्या विचारांत तो मग्न झाला ह्मणजे ऊन, वारा, पाऊस, थंडी यांकडे त्याचें काडीमात्र लक्ष नसे. ग्रीष्मकाळांत दिनमणि आपल्या प्रखर नेत्रांनीं सिद्धार्थाकडे उदयापासून तों अस्तापर्यंत एकसारखा पहात असे; त्या विलक्षण तप्ततेमुळें पशुपक्षी देखील भयाकुल होत; परंतु सिद्धार्थ निमिषभर देखील आपल्या आसनावरून उठत नसे. आणि असें एक दिवस नाहीं, दोन दिवस नाहीं, तर कित्येक वर्षे त्यानें सूर्याचा प्रखर ताप सहन केला; वर्षाकाळांत त्याच्यावर जलधारांनीं अविरत वर्षाव करून त्याला आसनावरून हालविण्याचा प्रयत्न केला; परंतु सिद्धार्थानें आपला क्रम सोडला नाहीं. थंडीच्या दिवसांत भयंकर थंडी पडे, केव्हां केव्हां तर हिम-तुषारहि त्याच्या शरीरावर पडत; परंतु कांहीं झालें तरी आपल्या आसनावरून हालावयाचें नाहीं, असा सिद्धार्थाचा निर्धार होता व त्याप्रमाणें जोंपर्यंत त्याची त्या गोष्टीवर भावना होती, तोंपर्यंत तो नियम त्यानें कायम ठेवला होता.

तो निश्चल बसून ध्यानमग्न झाला ह्मणजे इतका स्थिर होत असे कीं, त्याला कांहीं चैतन्य आहे, असा पक्ष्यांना संशयदेखील उरत नसे. निरनिराळे पक्षी त्याच्याजवळ येऊन भिक्षापात्रांतील तांदुळ खात,

पाणी पीत आणि त्याच्या शरीरावर बसून निर्धास्तपणें कलकलाट करीत. त्याच्याजवळून जाणाऱ्या लोकांना मात्र तो चैतन्यरहित असा वाटत नसे. तो त्यांना निर्वात जागेंतील निष्कंप ज्योतीप्रमाणें प्रभावशील वाटत असे. माध्यान्ह समयींचा सूर्य आपल्या तीक्ष्ण नेत्रांतून जेव्हां त्याचेकडे दृष्टि फेंकी, तेव्हां असें वाटे कीं, तो त्याच्या तपश्चर्येची परीक्षाच पहात आहे. वर्षाकाळांत जेव्हां मुसळधार वृष्टि त्याच्या शरीरावर होई, तेव्हां ती त्याला आपल्या आसनावरून उठवून त्याच्या तपाचा भंग करूं पहात आहे, असें वाटे आणि थंडीच्या दिवसांत त्याच्या अंगावर पडणारे हिम-कण त्याच्या तपश्चर्येंत विघ्न आणीत आहेत असें वाटे; परंतु सिद्धार्थाचें निश्चयाचें बळ इतकें दांडगें होतें कीं, त्यानें निसर्गाकडून होणाऱ्या विघ्नांना दाद दिली नाहीं. आपल्या या तपश्चर्येनें सत्याचा शोध लागेल, अशी जोंपर्यंत त्याची समजूत होती, तोंपर्यंत त्यानें आपला तो क्रम अव्याहत चालविला होता. तो एकदां आपल्या आसनावर बसून आपल्या ध्येयाच्या विचारांत मग्न झाला ह्मणजे बाह्य-जगाच्या निसर्गसिद्ध घडामोडीचें त्याला मुळींच ज्ञान होत नसे. माध्यान्हींचा सूर्य हळूहळू पश्चिमाकाशांत विलीन होऊन विश्रांति घेण्यासाठीं निघून जाई; एकेक तारका आकाशमंडपाला रत्नगोलकाप्रमाणें चिकटून सर्व आकाश रत्नखचित शेल्याप्रमाणें दिसूं लागे, तरी सिद्धार्थ आपल्या आसनावरच ध्यानावस्थेंत बसलेला असे. क्रमानें मध्यरात्र होऊन हिंस्रपशु पर्वतगुहांतून भयंकर आरोळ्या फोडीत त्या अरण्यांत फिरूं लागत. त्या वेळीं मध्यरात्र होऊन गेली असें समजून सिद्धार्थ आपल्या आसनावरून उठे व गुहेंत जाऊन थोडी झोंप घेई. अरुणोदय होण्यापूर्वींच तो आपल्या निद्रासनावरून उठे व पुन्हां नित्योद्योगास लागे. गुहेंतून बाहेर पडल्याबरोबर तो सृष्टीकडे करुण

दृष्टीनें पाहून ह्मणे, 'हे वसुंधरे, तुझें आणि तुझ्या संतानांचें दुःख दूर करण्यासाठीं शक्य तो प्रयत्न करण्याचा माझा निश्चय कायम आहे. मी निराश झालों नाहीं. तें सत्य—तें अमृत—तें दिव्यतत्व--शोधून काढण्यासाठीं मी आपलें सर्व आयुष्य तुला अर्पण केलें आहें.' असें ह्मणून तो आपला कमंडलु घेऊन प्रातर्विधिसाठीं बाहेर पडे. नंतर पर्वतमालेंतील उंच सखल कड्यांवरून उड्या मारून आपल्या खळखळाटानें सर्व वनभूमि गजबजून टाकणाऱ्या एका नदीवरून जाऊन तो स्नान वगैरे करी आणि आपलें भिक्षापात्र घेऊन राजगृह शहरांत भिक्षेसाठीं जाई. तो शहरांत शिरतांच प्रत्येकाचें मन पवित्रभावनेनें त्याच्याकडे आकर्षण होई. त्याचा प्रशांत व कारुण्यपूर्ण चेहरा आणि त्याची दिव्यकांति हीं पाहून तो प्रत्येकास महापुरुषाप्रमाणें वाटे. त्याच्या पायांवर मस्तक ठेवण्यास मिळावें, त्याची पदधूली वंदन करण्यास मिळावी, त्याच्या अंगावरील वस्त्राचा स्पर्श व्हावा, असें प्रत्येकास वाटे; आणि त्याप्रमाणें तो शहरांत गेल्याबरोबर श्रद्धावान् लोकांची त्याच्याभोंवतीं गर्दी होई. लहान मुलें तांदुळाच्या मुठी भरून त्याच्यामागें धांवत सुटत, आणि त्याचें भिक्षापात्र तेव्हांच भरून टाकीत. भिक्षापात्र भरल्यावर सिद्धार्थ भिक्षा घेत नसल्यामुळें पुष्कळ मुलें निराश होत. त्या मुलांची ती निराशा पाहून सिद्धार्थाची परदुःखकातर करुण मूर्ति अधिक करुण होई. 'बाळ, तुझी भिक्षा आतां उद्यां घेईन' असें स्नेहपूर्वक सांगून तो त्या मुलांचें समाधान करी आणि आल्यामार्गानें परत फिरे. राजगृह शहरांतील सिद्धार्थाचा तो भिक्षेचा वेळ लोकांना पुण्यपर्वणीप्रमाणें वाटत असे. सिद्धार्थ रस्त्यानें जाऊं लागला ह्मणजे स्त्रिया गृहकृत्यें टाकून बाहेर येत व त्याला वंदन करून कडेवर असलेल्या लहान पोरांना ह्मणत, 'तो पहा देवबाप्पा, त्याला नमस्कार कर.'

मातृमुखांतले ते शब्द ऐकून तीं अर्भकें आपले चिमुकले हात कपाळावर ठेवीत. भिक्षा घेऊन परत आल्यावर सिद्धार्थ जवळ असलेल्या ऋषीच्या आश्रमांत जाऊन त्यांचे धार्मिक विचार थोडा वेळ ऐकत बसे. नंतर थोडा उपाहार करून पुन्हां आपल्या तपश्चर्येला बसत असे.

ज्या रत्नगिरी पर्वताच्या गुहेजवळ सिद्धार्थ तपश्चर्येला बसत असे, त्या अरण्यांत सर्वत्र निरनिराळे तपस्वी आपापल्या समजुतीप्रमाणें तपश्चर्या करीत होते. कित्येक आत्मा व शरीर यांत भेद मानून केवळ आत्मोन्नतीकडे आपली सर्व शक्ति खर्च करीत होते, तर कित्येक केवळ शरीराला निरनिराळे कष्ट देण्यांतच विशेष मानीत होते. एके दिवशीं सिद्धार्थ नगरांतून भिक्षा मागून परत येत असतां त्यानें आपला नेहमींचा मार्ग सोडून दिला व जिकडे मुद्दाम शारीरिक भोग भोगणारे तपस्वी बसले होते, त्या मार्गानें तो आपल्या गुहेकडे जाऊं लागला. त्यांत अनेक पंथांचे व मतांचे लोक होते. कांहीं ब्रह्मचारी होते, कांहीं योगी होते, कांहीं उदासी होते. कित्येक आपला सर्व वेळ निरनिराळ्या देवतांच्या पूजाअर्चांत घालवीत होते, तर कित्येक एकांतांत बसून मानसपूजेंत तल्लीन झाले होते. कित्येकांनीं आपलें सर्व लक्ष शरीरांतील एकेका अवयवावर पुरवून त्यास विशेषत्व आणलें होतें. त्यांत कोणीं आपला एक हात वर करून बसले होते. कित्येक वर्षें हात एकसारखे वर असल्यामुळें ते एखाद्या सुकलेल्या लांकडाप्रमाणें रुक्ष दिसत होते. कित्येक एका पायावरच उभे राहिले होते. कित्येकांनीं आपल्या जटा व नखें विलक्षण वाढविलीं होतीं. कित्येक पद्मासनें वगैरे निरनिराळीं आसनें घालून बसले होते. कित्येक लोखंडाच्या तीक्ष्ण कांट्यांच्या आसनावर बसले होते. कित्येक अंगाला चिताभस्म लावून बसले होते, कित्येक गळ्यासभोंवती जिवंत सर्प गुंडाळून बसले होते, तर कित्येक

स्मशानांत चितावन्हि जवळच आसन घालून बसले होते. अशा प्रकारच्या अनेक तपस्व्यांना पाहून सिद्धार्थाचें अंत:करण करुणेनें स्निग्ध होऊन गेलें. त्या प्रकारानें त्याच्या अंगावर जितके शहारे आले, तितकेच त्याच्या हृदयाला करुणेचे पाझर फुटले; व तो एका आसनस्थ तपस्व्या-जवळ गेला व त्याला प्रणाम करून ह्मणाला,

" महाराज, मी आपणांस कांहीं प्रश्न विचारितों, त्याचीं उत्तरें आपण दिल्यास, आपले फार उपकार होतील. मी आज कित्येक महिने या पर्वतावरील एका गुहेंत रहात असून आपण आणि आपणा सारखे महात्मे जे शारीरिक कष्ट सोशीत आहेत ते नित्य पहात आहें. सत्याचा शोध करण्यासाठीं मी सर्वांचा त्याग करून येथें येऊन राहिलों आहें; पण तें सत्य असल्या शारीरिक कष्टानें सांपडेल, असें इतक्या दिवसांच्या अनुभवावरून मला वाटत नाहीं. मनुष्य किंवा कोणताहि प्राणी जन्माला आला ह्मणजे नैसर्गिक आधिव्याधींच्या जाळ्यांत तो साहजिक सांपडला जातो व ते कष्ट त्यास मृत्यूपर्यंत सोसावे लागतात; तेव्हां आधींच जें आयुष्य कष्टकारक आहे, तें याहून अधिक कष्टकारक करण्यांत पुरुषार्थ व फायदा तो कोणता? मन जें दु:ख भोगण्याची इच्छा केव्हांहि करीत नाहीं, तें दु:ख मुद्दाम भोगण्यांत आपला हेतू तरी कोणता?"

सिद्धार्थानें ज्या महात्म्याला वरील प्रश्न केला, तो महात्मा ह्मणाला,

" शास्त्रांत जसें सांगितलें आहे, तसें आह्मी करतों. शरीराला कष्टसहिष्णु करून जे सर्व आयुष्य निरनिराळ्या आपत्ति भोगण्यांत घालवितात, ते आपल्या पापाचा क्षय करीत असतात, असें शास्त्रांत सांगितलें आहे. सोनें जसें अग्नींत शुद्ध होतें, त्याप्रमाणें अनेक दु:ख-भोगामुळें आत्म्याची शुद्धि होते. आत्मा जितका शुद्ध—जितका पवित्र—

तितका त्यास उच्च लोकांत भ्रमण करण्याचा अधिकार अधिक पोहोंचतो. अर्थात् मी जी ही तपश्चर्या करीत आहें, ती केवळ आत्मा पवित्र व्हावा एवढ्यासाठीं करीत आहें."

या भाषणाचा थोडा वेळ विचार करून सिद्धार्थ ह्मणाला,

"महाराज, आपलें ह्मणणें असेंच कीं नाहीं, कीं, अशा शुद्ध आत्म्यास पुढें स्वर्गलोकीं, किंवा तशाच दुसऱ्या लोकीं, कांहीं काळ वास करण्याचें सामर्थ्य प्राप्त होतें; पण तेवढ्यासाठीं अशा विपत्ति आपण होऊन भोगण्यास तयार होणें हें चांगल्या वस्तूच्या मोबदल्यानें वाईट वस्तू खरेदी करण्यासारखें हास्यास्पद आहे, असें मला वाटतें. अगोदर तुह्मी ह्मणतां तो स्वर्ग आहे कीं नाहीं, कोणाला माहीत; पण आहे असें गृहीत धरलें, तरी तो मिळविण्यांत खरा फायदा असा कांहींच नाहीं. आकाशमंडपांत इंद्राच्या सिंहासनासभोंवतीं हे जे सुवर्णमेघ इतस्ततः संचार करीत आहेत, हे मूळ समुद्रापासून झालेले ते आपल्या पुण्यबळानें इंद्राच्या सिंहासनाजवळ जाऊन पोहोंचले आहेत; परंतु तेथें तरी त्यांचें वास्तव्य कोठें अक्षयचें आहे? बिचारे वायूचा एक तडाखा मिळाल्याबरोबर वृष्टिरूपानें एखाद्या पर्वतावर अथवा अरण्यांत पडतील, तेथून अधोगामि होऊन नदींत, आणि नदींतून पुन्हां पूर्वीच्या समुद्रांत येऊन राहतील! ही या मेघांची जी स्थिति तीच तुह्मां स्वर्गेच्छूंची. जे आपल्या तपोबलानें स्वर्गवास मिळवितात त्यांना तो अक्षयचा तर लाभत नाहीं; मग अशा अशाश्वत स्वर्गासाठीं ही दुःख भोगण्याची परंपरा जाणूनबुजून मागें लावून घेणें, हें मला तर अगदीं वेडेपणाचें वाटतें. अक्षयच्या सुखासाठीं शरीरकष्टाचा थोडा दंड सोसणें देणें हें सयुक्तिक आहे, पण क्षणिक सुखासाठीं सर्व आयुष्य विपत्तीशीं बांधून टाकण्यांत अर्थ तो काय?"

स्मशानांत चितावन्हि जवळच आसन घालून बसले होते. अशा प्रकारच्या अनेक तपस्व्यांना पाहून सिद्धार्थाचें अंतःकरण करुणेनें स्निग्ध होऊन गेलें. त्या प्रकारानें त्याच्या अंगावर जितके शहारे आले, तितकेच त्याच्या हृदयाला करुणेचे पाझर फुटले; व तो एका आसनस्थ तपस्व्याजवळ गेला व त्याला प्रणाम करून ह्मणाला,

" महाराज, मी आपणांस कांहीं प्रश्न विचारितों, त्याचीं उत्तरें आपण दिल्यास, आपले फार उपकार होतील. मी आज कित्येक महिने या पर्वतावरील एका गुहेंत रहात असून आपण आणि आपणा सारखे महात्मे जे शारीरिक कष्ट सोशीत आहेत ते नित्य पहात आहें. सत्याचा शोध करण्यासाठीं मी सर्वांचा त्याग करून येथें येऊन राहिलों आहें; पण तें सत्य असल्या शारीरिक कष्टानें सांपडेल, असें इतक्या दिवसांच्या अनुभवावरून मला वाटत नाहीं. मनुष्य किंवा कोणताहि प्राणी जन्माला आला ह्मणजे नैसर्गिक आधिव्याधींच्या जाळ्यांत तो साहजिक सांपडला जातो व ते कष्ट त्यास मृत्यूपर्यंत सोसावे लागतात; तेव्हां आधींच जें आयुष्य कष्टकारक आहे, तें याहून अधिक कष्टकारक करण्यांत पुरुषार्थ व फायदा तो कोणता ? मन जें दुःख भोगण्याची इच्छा केव्हांहि करीत नाहीं, तें दुःख मुद्दाम भोगण्यांत आपला हेतू तरी कोणता ? "

सिद्धार्थानें ज्या महात्म्याला वरील प्रश्न केला, तो महात्मा ह्मणाला,

" शास्त्रांत जसें सांगितलें आहे, तसें आह्मी करतों. शरीराला कष्टसहिष्णु करून जे सर्व आयुष्य निरनिराळ्या आपत्ति भोगण्यांत घालवितात, ते आपल्या पापाचा क्षय करीत असतात, असें शास्त्रांत सांगितलें आहे. सोनें जसें अग्नींत शुद्ध होतें, त्याप्रमाणें अनेक दुःखभोगामुळें आत्म्याची शुद्धि होते. आत्मा जितका शुद्ध—जितका पवित्र—

तितका त्यास उच्च लोकांत भ्रमण करण्याचा अधिकार अधिक पोहोंचतो. अर्थात् मी जी ही तपश्चर्या करीत आहें, ती केवळ आत्मा पवित्र व्हावा एवढ्यासाठीं करीत आहें."

या भाषणाचा थोडा वेळ विचार करून सिद्धार्थ ह्मणाला,

"महाराज, आपलें ह्मणणें असेंच कीं नाहीं, कीं, अशा शुद्ध आत्म्यास पुढें स्वर्गलोकीं, किंवा तशाच दुसऱ्या लोकीं, कांहीं काळ वास करण्याचें सामर्थ्य प्राप्त होतें; पण तेवढ्यासाठीं अशा विपत्ति आपण होऊन भोगण्यास तयार होणें हें चांगल्या वस्तूच्या मोबदल्यानें वाईट वस्तू खरेदी करण्यासारखें हास्यास्पद आहे, असें मला वाटतें. अगोदर तुह्मी ह्मणतां तो स्वर्ग आहे कीं नाहीं, कोणाला माहीत; पण आहे असें गृहीत धरलें, तरी तो मिळविण्यांत खरा फायदा असा कांहींच नाहीं. आकाशमंडपांत इंद्राच्या सिंहासनासभोंवतीं हे जे सुवर्णमेघ इतस्ततः संचार करीत आहेत, हे मूळ समुद्रापासून झालेले ते आपल्या पुण्यबळानें इंद्राच्या सिंहासनाजवळ जाऊन पोहोंचले आहेत; परंतु तेथें तरी त्यांचें वास्तव्य कोठें अक्षयचें आहे? बिचारे वायूचा एक तडाखा मिळाल्याबरोबर वृष्टिरूपानें एखाद्या पर्वतावर अथवा अरण्यांत पडतील, तेथून अधोगामि होऊन नदींत, आणि नदींतून पुन्हां पूर्वीच्या समुद्रांत येऊन राहतील! ही या मेघांची जी स्थिति तीच तुह्मां स्वर्गेच्छूंची. जे आपल्या तपोबलानें स्वर्गवास मिळवितात त्यांना तो अक्षयचा तर लाभत नाहीं; मग अशा अशाश्वत स्वर्गासाठीं ही दुःख भोगण्याची परंपरा जाणूनबुजून मागें लावून घेणें, हें मला तर अगदीं वेडेपणाचें वाटतें. अक्षयच्या सुखासाठीं शरीरकष्टाचा थोडा दंड सोसणें देणें हें सयुक्तिक आहे, पण क्षणिक सुखासाठीं सर्व आयुष्य विपत्तीशीं बांधून टाकण्यांत अर्थ तो काय?"

महात्म्याला सिद्धार्थाचें हें ह्मणणें पसंत पडलें नाहीं. तो ह्मणाला,

"या ह्मणण्याला काय आधार आहे? आत्मा पुनः पुनः दुःख भोगण्यासाठींच बद्ध झालेला आहे, हा समजच मुळीं चुकीचा आहे. आत्म्याला स्वर्गवास प्राप्त झाल्यावर तो स्वर्गवासाचे दिवस संपेपर्यंत तेथें काय फक्त दिवस मोजण्याचेंच कार्य करीत नाहीं, तर पुढें त्याहून उत्तम लोकाची प्राप्ति व्हावी यासाठीं तो तेथेंहि कांहीं प्रयत्न करणारच. रात्र संपल्यावर जसें दिवसाचें दर्शन होतें, त्याप्रमाणें दुःख भोगल्यावांचून सुखाची प्राप्ति तरी कशी होणार? पंचमहाभूतांनीं तयार झालेलें हें शरीर आत्म्याच्या मुक्तीचें एक साधन आहे, आणि तेवढ्याच साठीं तें प्रत्येकास प्राप्त होतें. त्याचा तो उपयोग करून न घेतां, केवळ शरीरसुखासाठीं ह्मणून शरीरास आपत्तीपासून दूर ठेवणें हें केवळ अज्ञान होय."

सिद्धार्थाला हें ह्मणणें पटलें नाहीं. तो शांतपणें ह्मणाला,

"महाराज, आत्म्याच्या मुक्तीसाठीं पुनर्जन्माची कल्पना खरी मानली पाहिजे; पण मला तर असें वाटतें कीं, पुर्नजन्मादि सर्व मिथ्या होय. घटकाभर तुह्मी ह्मणतां त्याप्रमाणें गृहित धरूं कीं, पुनर्जन्म आहे, आणि तुमची सुटका या मनुष्ययोनींतून होऊन एखाद्या देवतेचा जन्म मिळून तुह्मास स्वर्गवास प्राप्त झाला, तरी परिवर्तनाची क्रिया कांहीं बंद पडत नाहींच! देवांना देखील परिवर्तन आहे, हें आपणास कबूल आहेना?"

तो महात्मा ह्मणाला,

"होय, देवतांना देखील परिवर्तन हें आहेच. ब्रह्म हेंच एक काय तें परिवर्तनाशिवाय आहे. देवांना देखील क्षय आणि वृद्धि हीं आहेतच; तथापि ते अमर आहेत."

सिद्धार्थ गंभीर स्वरानें ह्मणाला,

"तर मग महाराज, आपणच विचार करून पहा कीं, एक तर काल्पनिक आणि दुसरें अनिश्चित, अशा फलाच्या आशेनें हे असे भयंकर शरीरकष्ट भोगणें हा वेडेपणा नव्हे काय? आत्म्याच्या कल्याणासाठीं वाटेल तशा शारीरिक विपत्तीशीं जाणून बुजून झगडावयाचें, हा न्याय तरी कोठला? गर्भवासाचें विलक्षण दुःख भोगून संपलें नाहीं, तोंच हें शरीर पुन्हां आत्म्याच्या सुखाच्या कल्पनेनें दुःखांत लोटणें, यांत युक्तिसंगतपणा तर मुळींच दिसत नाहीं!"

महात्मा कांहींसा निरुत्तर झाला. तो किंचित् उद्वेगानें ह्मणाला,

"महात्मन्, आमचा हा मार्ग पूर्वपरागत आहे; त्यांत शंकाकुशंका घेऊन मन व्यग्र करून घेण्यापेक्षां अढळ विश्वासानें कार्य करीत रहावें, हेंच आह्मी कर्तव्य समजतों. या मार्गापेक्षां आपणास जर एखादा श्रेष्ठतर मार्ग अवगत असेल, तर तो आपण मला सांगा, आणि अवगत नसेल, तर कृपा करून मला माझ्या कर्तव्यापासून तरी ढळवूं नका."

हे शब्द ऐकून सिद्धार्थाची अगदीं निराशा झाली व तो तेथून उठून विषण्ण चित्तानें आपल्या गुहेकडे जाऊं लागला. मार्गानें जात असतां पर्वतश्रेणीमधून वाहणारे निर्झर, नव पल्लवांनीं हिरवेगार दिसणारे लतावृक्ष, सूर्याच्या किरणांनीं अधिक सतेज दिसणारीं प्रफुल्ल फुलें, नीलाकाशांत उंचपणाच्या अभिमानानें आपलें मस्तक हालविणारे ताडमाड आणि आपल्या उल्हसित कलरवांनीं वनश्रीचें संगीत गाणारे पक्षी, या सर्वांच्या दर्शनानें त्याच्या अंतःकरणांतली विषण्णता दूर होऊं लागली. तो निराळ्या दृष्टीनें त्या सर्वांकडे पाहूं लागला. ते सर्व शांत, समाधानी व आनंदी आहेत असें त्याला वाटलें. तो आपल्या मनाशीं ह्मणाला,

" हीं फुललेलीं फुलें किती तरी मनोहर दिसत आहेत. हें मनोहारित्व यांना केवळ आपल्या समाधानवृत्तीमुळेंच लाभलें आहे. या बिचाऱ्यांचें आयुष्य किती तरी थोडें. एक दोन दिवसांत कोमेजून हीं झाडावरून गळून पडतील; पण तेवढ्या अल्पायुष्यांत देखील हीं आत्मनाशाचा किंवा शरीरकष्टाचा प्रयत्न करीत नाहींत. अखेरपर्यंत निसर्गाबरोबर आनंदानें काळ कंठीत असतात. तसेच हे ताडमाडादि वृक्ष, आपल्या पल्लवांनीं अविरत आणि तेहि या आनंदानें सृष्टीच्या श्रमपरिहारार्थ तिला व्यजन घालीत आहेत. बिचाऱ्यांना परोपकारावांचून दुसरें कांहीं कार्यच माहित नाहीं. त्यावर राहणारे हे पक्षी देखील, किती आनंदानें आपला काळ व्यतीत करीत आहेत; आणि आह्मी पक्षीनिधनपटु मनुष्यें, नानाप्रकारचीं शास्त्रें वाचून आणि पुष्कळ ज्ञान मिळवून काय करीत आहों, तर स्वतःचा व दुसऱ्यांचा नाश करण्याचा प्रयत्न करीत आहों. मनुष्यहृदयाचें हें परिवर्तन होणें शक्य आहे काय ?"

सिद्धार्थ असें ह्मणून थोडा वेळ निश्चल दृष्टीनें उभा राहिला आणि विश्वस्त स्वरानें ह्मणाला,

" होय—शक्य आहे. हें भ्रममूलक समजुतींचें मन्वंतर प्रयत्न केल्यास सहज दूर होण्यासारखें आहे. आजपासून—नव्हे या घटकेपासून—याच उद्योगाला लागलें पाहिजे."

इतके शब्द प्रतिज्ञेप्रमाणें उच्चारून तो आपल्या गुहेकडे चालूं लागला. यावेळीं तो आपाल्या हृदयांतील सर्व परोपकारिता एकत्र करून तिचा उपयोग कोठें करावा, या विचारानें चालला होता. इतक्यांत दूर अंतरावर कांहीं गुराखी मेंढ्यांचा एक मोठा कळप हांकून नेतांना पाहून, सिद्धार्थ तो कळप त्याच्या मार्गावर येईपर्यंत तेथेंच उभा राहिला. थोड्या वेळानें त्या मेंढ्या त्याच्या मार्गावर आल्यावर

सिद्धार्थाची नजर एका लहान कोंकराकडे गेली. त्या कोंकराच्या पायाला लागल्यामुळें त्यांतून रक्त गळत होतें व तें लंगडत लंगडत चाललें होतें. त्या कोंकराची आई वारंवार मागें परतून पाहून आर्तस्वरानें ओरडत होती. तो प्रकार पाहून सिद्धार्थाचें हृदय गहिंवरून आलें. त्याच्या डोळ्यांत अश्रु चमकूं लागले. तो त्या कोंकराला आपल्या हृदयाशीं उचलून घेऊन ह्मणाला,

"वात्सल्यप्रेमानें विव्हल झालेल्या जननी, मी तुझ्या दुःखाचा वांटेकरी होऊन, तुझें दुःख अंशतः तरी कमी करतों. या पर्वतावरील शरीरभोग भोगणाऱ्या तपस्व्यांचें दुःख दूर करण्याचा प्रयत्न करण्यापेक्षां या क्षुद्रपशूला सुखी करणें त्याहून शतपट श्रेयस्कर होय."

नंतर सिद्धार्थ त्या गुराख्यांना ह्मणाला,

"बाबांनो, हे बकरे आणि या मेंढ्या या सर्वांना तुह्मी कोठें नेत आहां?"

त्या गुराख्यांपैकीं एक गुराखी ह्मणाला,

"महाराज, या सर्व पशूंना आह्मी यज्ञांत बळी देण्यासाठीं घेऊन जात आहों. राजगृह येथील राजा बिंबिसार यानें एक यज्ञ आरंभिला असून उद्यां रात्रीं बारा वाजतां या पशूंना बळी देणार आहे. राजाची आज्ञा झाल्यावरून आह्मी या पशूंना घेऊन जात आहों."

गुराख्याचे ते शब्द ऐकून सिद्धार्थाचें कोमल हृदय अधिक विदीर्ण होऊन गेलें. इतक्या पशूंचा आजरात्रीं संहार होणार, हें ऐकून त्याला फार वाईट वाटलें व कोणत्या युक्तीनें त्यांचा प्राण वांचवावा याचा तो विचार करूं लागला. त्यासंबंधानें गुराख्यांना विचारणें फायदेशीर होणार नाहीं, हें जाणून असल्यामुळें तो एका गुराख्याला ह्मणाला,

" अरे, हें कोंकरूं पायाला लागल्यामुळें चालण्यास अगदीं असमर्थ झालें आहे, ह्मणून याला घेऊन मीं राजगृह येथील यज्ञमंडपापर्यंत आलों, तर तुमची कांहीं हरकत आहे काय ?"

सिद्धार्थाचें तें तेज, त्याची ती परोपकारिता व निरभिमानता पाहून गुराख्यांना त्याच्याविषयीं मोठा आदर वाटला आणि त्यांनीं त्याला त्याच्या ह्मणण्याप्रमाणें कोंकरूं घेऊन येण्यास परवानगी दिली. लागलाच सिद्धार्थ त्या कोंकराच्या आई जवळून चालूं लागला. सूर्य माध्यान्हीं आल्यामुळें मस्तकावर प्रखर तप्ततेचा वर्षाव होत असून मार्ग देखील विलक्षण तप्त झाला होता; तरी सिद्धार्थ मोठया समधानवृत्तीनें त्या गुराख्याबरोबर चालला होता. दुसऱ्यावर परोपकार करण्यांत, दुसऱ्यावर दया करण्यांत जें एक प्रकारचें दैवी समाधान असतें, तें या वेळीं सिद्धार्थाच्या मुखावर उमटल्यामुळें तो पूर्वी पेक्षां अधिक तेजस्वी पण नम्र दिसत होता. नम्रता आणि तेजास्विता योग्य प्रमाणानें एकत्र झाल्यामुळें त्याच्या मुखावर जें गांभीर्य उमटलें होतें, तें अवर्णनीय होय. एक दिव्यकांतीचा संन्यासी एका लहान कोंकराला आपल्या हृदयाशीं धरून यज्ञपशूंच्या मागाहून चालला आहे, हा प्रकार ज्यांच्या ज्यांच्या दृष्टीस पडे त्यांना त्यांना विलक्षण आश्चर्य वाटून त्यांच्या मनांत 'हा मनुष्य कीं देव' असा प्रश्न उत्पन्न होई. अशा प्रकारचा प्रभावपूर्ण भाव सिद्धार्थाच्या मुखावर केवळ एका लहान कोंकरावर उपकार केल्यामुळें उमटला होता, ही जाणीव सिद्धार्थाला झाल्यामुळें दयेचा परिणाम कांहीं विलक्षण आहे, असें त्यास वाटूं लागलें. तपश्चर्येत सहस्त्र वर्षे घालविण्यापेक्षां परोपकार करण्यांत घालविलेला एक दिवस अधिक किंमतीचा आहे, अशी त्याची समजूत झाली. पुढील आयुष्यक्रमाच्या दिशेची त्याला ती एक किल्लीच सांपडल्यासारखें वाटूं लागलें. आपण

या एका कोंकराचें दुःख हलकें केलें यांत कांहीं विशेष नसून या सर्व पशूंचे प्राण वांचविण्यांत कायतें विशेष आहे, हें त्याच्या मनांत एकसारखें घोळत होतें व त्याची सर्व विचारशक्ति त्याच एका विषयावर एकवटली होती. गुराख्यांच्या बरोबर हळूहळू मार्ग चालतां चालतां सिद्धार्थ राजगृह नगराजवळून वहात गेलेल्या नदीच्या कांठीं दुसऱ्या दिवशीं सूर्योदयाच्या सुमारास येऊन पोहोंचला. या वेळीं सूर्याचीं कोवळीं किरणें नदीच्या लाटांवर पडल्यामुळें नदीवरून दिव्यरत्नें वहात चाललीं आहेत कीं काय, असें वाटत होतें. नगराच्या प्रवेशद्वाराजवळील पहारेकऱ्यांची छाया नदीपर्यंत येऊन पसरली होती. जणूं काय ती छाया पहारेकऱ्यांच्या अधिकाराच विशालत्व दर्शवीत होती. त्या छायानुरोधानें सिद्धार्थ नदी उतरून पलीकडे गेला नाहीं, तोंच हातांत मृतशिशु असलेली एक शोकमग्न स्त्री सिद्धार्थापुढें येऊन उभी राहिली. पुत्रशोकामुळें ती अगदीं वेडी झाली असून ती मोठ्यानें आक्रोश करीत होती. ती सिद्धार्थापुढें आपल्या मृत पुत्राला ठेवून ह्मणाली,

"भगवन्, या माझ्या मुलाला सर्पदंश झाल्यामुळें हा मरण पावला आहे. या एका लहान मुलावांचून मला कोणीदेखील नाहीं; आतां थोड्या वेळापूर्वी या नदीकांठीं हा खेळत असतां कोणीकडून एक विषारी सर्प आला, आणि तो या मुलाला दंश करून गेला. मुलगा खेळतां खेळतां मूर्च्छित झाला आणि कांहीं वेळानें त्याची प्राणज्योत मावळून गेली. महाराज, आपण इकडे येत असतां मला कांहीं लोक असें ह्मणाले, कीं, 'हे जे सत्पुरुष येत आहेत, त्यांच्या पायावर मुलाला ठेव, ह्मणजे ते त्याला प्राणदान देतील.' महाराज, त्याप्रमाणें या मुलाला मी आपल्या चरणावर ठेविलें आहे. याला प्राणदान देणें आपल्या स्वाधीन आहे."

त्या बाईचे ते आर्त शब्द ऐकून सिद्धार्थाला फार वाईट वाटलें; त्याला त्या स्त्रीची फार करुणा आली; परंतु तिच्या मुलाला प्राणदान देणें अशक्य असल्यामुळें कोणत्या शब्दांनीं तिची समजूत करावी हें त्याला सुचेनासें झालें. कोणत्यातरी युक्तीनें त्या बाईची समजूत घातली पाहिजे, असा विचार करून तो तिला ह्मणाला,

"बाई, तुझ्या मुलाला जिवंत करणें मोठेंसें कठीण आहे, असें नाहीं; पण त्याला एक औषधी मिळाली पाहिजे. ती औषधी काळे तीळ ही होय. ही औषधी मिळणें दुरापास्त नाहीं, असें तुला वाटेल, पण तसें समजूं नकोस; ज्या घरांतील कोणीहि मृत झालेलें नाहीं, अशा घरीं जाऊन एक मूठभर तीळ मागून घेऊन ये, ह्मणजे मी तुझ्या मुलाला जिवंत करण्याचा प्रयत्न करीन."

सिद्धार्थाचे ते शब्द ऐकून ती बाई मोठया त्वरेनें मृत मुलाला घेऊन काळे तीळ आणण्यासाठीं नगरांत गेली. इकडे सिद्धार्थहि गुराख्या-बरोबर यज्ञमंडपाजवळ येऊन उभा राहिला. ही वेळ सकाळची असून शहरवासी आपापल्या व्यवसायांत गर्क झालेले होते; इतक्यांत शहरांत सिद्धार्थाचें आगमन होतांच सर्व शहरांत 'यज्ञ पशु घेऊन येणारा देव' ह्मणून जो तो सिद्धार्थाकडे बोट करूं लागला, आणि प्रत्येकजण आपापला उद्योग सोडून अनिमिष नेत्रांनीं सिद्धार्थाला पाहूं लागला. स्त्रिया, मुलें वगैरेंची एकच गर्दी उडाली. रस्त्यानें जाणारीं गाड्या घोडीं घाईघाईनें बाजूला होऊन सिद्धार्थाला रस्ता देऊं लागलीं. रस्त्यानें जाणारीं माणसेंहि बाजूला होऊन त्याला वंदन करीत, व भक्तिपूर्ण दृष्टीनें त्याच्याकडे पहात. बाजारांतील गलबला व देवघेव तेवढ्या वेळेपुरती बंद पडून सर्वांचे डोळे सिद्धार्थाकडे वळले. कर्मकार हातांतलें काम तसेंच टाकून सिद्धार्थाला पाहण्यासाठीं बाहेर येऊन उभे राहूं लागले. सिद्धा-

र्थाच्या आगमनानें सर्व शहराला शांत व गंभीर स्वरूप प्राप्त झालें व हा काय प्रकार आहे, इकडे सर्वांचे डोळे लागले. पशु घेऊन जाणारा तो कोण असावा, याविषयीं निरनिराळे प्रश्न जनतेंत उत्पन्न होत होते; पण सिद्धार्थ राजगृह शहरांत दररोज भिक्षेसाठीं येत असल्यामुळें त्या प्रश्नाचें उत्तरहि लवकरच मिळत होतें. सिद्धार्थ ज्या वेळीं यज्ञमंडपाजवळ गेला, त्यावेळीं मंडपाच्या दारावर पहारेकरी असून यज्ञमंडपांत कोणासहि येऊं देऊं नये अशी त्यांना राजाज्ञा होती; परंतु हृदयाशीं कोकरूं घेतलेल्या सिद्धार्थाची शांत, गंभीर व तेजपूर्ण मूर्ति पाहून ते पहारेकरी राजाज्ञा विसरून गेले व बाजूला होऊन त्यांनीं सिद्धार्थाला आंत जाऊं दिलें.

त्यावेळीं भरतवर्षांत यज्ञाचें स्तोम विलक्षण माजलेलें असून राजे लोक आपल्या कीर्तीच्या वृद्धीचें तें एक साधन म्हणून वारंवार यज्ञ करीत. यज्ञासाठीं मोठाले सुंदर मंडप उभारीत. हजारों ब्राह्मण बोलावीत आणि पशुहनन करून आपण कीर्तीबरोबरच पुण्यहि संपादन केलें असें समजत. त्याप्रमाणें बिंबिसार राजानेंहि विस्तीर्ण व सुंदर मंडप उभारलेला असून मध्यभागीं यज्ञकुंडांतून प्रखर प्रज्वलित ज्वाला निघत होत्या. यज्ञकुंडाच्या सभोंवतीं ब्राह्मण मंत्रघोश करीत असून ते घृतादि पदार्थांच्या आहुति मधून मधून देत होते. यज्ञकुंडाच्या जवळच पशुहननाची जागा असून मेलेल्या पशूंच्या रक्ताचा प्रवाह यज्ञकुंडांत जाऊन पडत होता. सिद्धार्थ यज्ञमंडपांत जाऊन पोहोंचला, त्याचवेळीं पशुहननाची वेळ झाल्यामुळें एक ब्राह्मण हातांत तरवार घेऊन खांबाला बांधून ठेवलेल्या बकऱ्याजवळ गेला, आणि तरवार वर करून मोठ्यानें म्हणाला,

"देवगणहो, बिंबिसार राजाच्या या सर्वश्रेष्ट यज्ञांत हा बली आपल्या संतोषार्थ अर्पण करीत आहोंत, त्याचा स्वीकार करा."

असें ह्मणून तो ब्राह्मण आपली तीक्ष्ण तलवार त्या बकऱ्याच्या मानेवर ठेवणारच होता; पण इतक्यांत सिद्धार्थ त्याचा हात तसाच वरच्यावर धरून ह्मणाला, "राजा बिंबिसार, हें पशुहनन करूं नकोस. या पशूला सोडून देण्याची आज्ञा कर." नंतर तो त्या ब्राह्मणाला ह्मणाला,

"महाराज, आपल्या पुण्यकृत्त्याच्या आड आल्याबद्दल मला क्षमा करा; पण महाराज, मला हें प्रथम सांगा कीं, ज्या पशूला प्राणदान देण्याचें आपल्याला सामर्थ्य नाहीं, त्या पशूला मारण्याचा तरी आपल्याला अधिकार काय?"

सिद्धार्थाचा तो प्रश्न ऐकून ब्राह्मण मुकाव्यानें उभा राहिला. राजानेंहि कांहीं प्रत्युत्तर दिलें नाहीं. अनेक यज्ञमंत्रविद ब्राह्मण तेथें होते, पण कोणीं एकानेंहि सिद्धर्थास त्या प्रश्नाचें उत्तर दिलें नाहीं आणि कोणीं त्यास त्याच्या कृत्यांत प्रतिरोधहि केला नाहीं. सिद्धार्थानें खुशाल त्या पशूच्या गळ्याभोंवतालचा दोर सोडला आणि त्याला मोकळें सोडून दिलें. तो नंतर करुणार्द्र कंठानें सर्वांना उद्देशून ह्मणाला,

"या मृत्युलोकची प्राण ही अमूल्य वस्तु होय. तिच्यावर फक्त ज्याचा त्याचाच अधिकार आहे. असें असतां एकानें दुसऱ्याचा प्राण हरण करणे हें निःसंशय महत्पाप होय. अर्थात् यज्ञ हें पुण्याच्या ऐवजीं पाप जोडून घेण्याचें मात्र एक साधन होय. आपणास पशूंच्या प्राणाची किंमत वाटत नसेल; पण तुमच्या स्वतःच्या प्राणापेक्षां यःकश्चित कीटकाच्या प्राणाची देखील किंमत कमी नाहीं, हें केव्हांहि विसरूं नका. सृष्टीच्या रचनेंत एकाकी फरक होऊन जर बकऱ्यांना मनुष्ययज्ञ करण्याचें सामर्थ्य प्राप्त झालें, तर ब्राह्मणहो, आपले प्राण यज्ञांसाठीं जातांना तुह्माला काय वाटेल बरें ? मला वाटतें, तुह्मी निश्चयानें त्यावेळीं महत्पाप महत्पाप ह्मणून ओरडाल ! आणि या यज्ञासाठीं

तुह्माला शेळ्यामेंढ्यासारखे निरुपद्रवी पशु लागतात, हें तरी आश्चर्य नव्हे काय? यज्ञांत बकऱ्याऐवजीं वाघ किंवा सिंह यांचा बळी देण्यास काय प्रत्यवाय आहे, हें तुह्मास समर्पकपणें सांगतां येईल का? त्या क्रूर पशूंना बळीसाठीं आणतांना प्रथम स्वतःचाच बळी द्यावा लागेल, याची तुह्माला भीति वाटत असेल; पण पुण्य कृत्त्यांत भीति काय उपयोगाची? ब्राह्मण हो, या गरीब बकऱ्यापेक्षां वाघाची किंमत खचित अधिक आहे. त्याच्या बळीनें तुह्माला अधिक पुण्य नाहीं का मिळावयाचें? मग तें पुण्य तुह्मी कां जोडून घेत नाहीं? महाराज बिंबिसार आणि ब्राह्मणहो, तुमच्या पुण्यकृत्त्यांत मीं विघ्न आणलें असें तुह्माला जर वाटत असेल, तर मला क्षमा करा आणि सर्व बलींत श्रेष्ठ जो नरबली तो देऊन पुष्कळ पुण्याचा एकदमच संचय करा. मी माझा देह यज्ञबळीसाठीं देण्यास कबूल आहें."

हें सिद्धार्थाचें भाषण ऐकून यज्ञमंडप अगदीं शांत झाला. राजा, ब्राह्मण व यज्ञसमारंभासाठीं आलेले हजारों लोक चित्रासारखे तटस्थ बसून राहिले. यज्ञावर बराच वेळ आहुति न पडल्यामुळें त्याच्या ज्वाळा खालीं बसल्या. सिद्धार्थाच्या आत्मबळीच्या भाषणानें तर राजा बिंबिसारावर विलक्षण परिणाम झाला. सिद्धार्थाची ती दिव्यकांति व तो करुणस्वर यांमुळें त्याला सिद्धार्थ देवपुरुषाप्रमाणें पूजनीय वाटला व तो आपल्या आसनावरून उठून त्याला वंदन करण्यासाठीं त्याच्या जवळ जाऊन उभा राहिला; परंतु राजाला तसें करूं न देतां सिद्धार्थ ह्मणाला,

" महाराज, मी एक यःकश्चित मनुष्य. मला वंदन करण्याचें कारण नाहीं. माझ्या ह्मणण्यांत जर कांहीं खरेपणा असेल, तर आजपासून आपल्या राज्यांत पशुवध होणार नाहीं, अशी व्यवस्था करा. मनुष्याला आपले प्राण जितके प्रिय वाटतात, तितकेच आपले प्राण यावत्

प्राणिमात्रांना प्रिय वाटतात; आणि जर कोणत्याहि मृत प्राण्याला प्राणदान देण्याची शक्ति मनुष्याला नाहीं, तर दुसऱ्यांचे प्राण हरण करण्याचा तरी त्याला काय अधिकार ? आपापल्या प्राणाच्या संरक्षणार्थ प्रत्येक प्राणिमात्राचा प्रयत्न चाललेला असतो. भूतदया हा मनुष्याचा मुख्य सद्गुण होय. मनुष्याला जर कांहीं पुण्यसंचय करतां येणें शक्य असेल, तर तो या सद्गुणामुळेंच करितां येईल. जगांत जेवढें ह्मणून चांगलें आहे, तेवढें सर्व भूतदयेनें उत्पन्न झालेलें आहे. हिंसेचें प्रत्येक कार्य पापमय असतें. मग तें कार्य एखादा महायज्ञ असो कीं, केवळ मांसभोजनप्रियता असो. सृष्टिकर्त्याच्या कृपेनें सर्व जीव निर्माण झालेले असून सृष्टिनिर्मित वस्तूवर निर्वाह करणें प्रत्येकास शक्य आहे. ही सृष्टियोजना असून याविरुद्ध आचरण करणें, हेंच महत्पात होय. यज्ञदेवतांना तृप्त करण्यासाठीं आणलेल्या या पशूंना वाचा नाहीं हें खरें; पण यांच्या मूकवृत्तींतच केवढी करुणा भरलेली आहे, याचा कोणी विचार केला आहे का ? या पशूंच्या ओंठांवर मनुष्याच्या निर्दयतेचें अक्षरान् अक्षर लिहिलेलें आहे. दयाशून्य मानवहो, तीं वाचून पाहण्याचा तुह्मी कधीं प्रयत्न तरी केला आहे का ? आपल्या मुलांना पाजण्याचें दूध आणि स्वतःच्या अंगावरची लोकर तुह्माला देऊन ज्या पशूंनीं तुमच्यावर उपकार केले आहेत, त्याचा मोबदला ह्मणून त्यांच्या मानेवर सुरी फिरविणाऱ्या मानवांनों, तुमच्या कृतघ्नपणाला कांहीं मर्यादा आहे का ? महाराज, रक्त हें कांहीं देवपूजेचें साधन नाहीं. रक्तानें देवता प्रसन्नहि होत नाहीं. केवळ हत्येचें पाप मात्र पदरांत पडतें; आणि त्या पापाचें प्रतिफळ या किंवा पुढच्या जन्मांत भोगावें लागतें."

सिद्धार्थाचें हें तेजस्वी व हृदयग्राही भाषण ऐकून बिंबिसार राजाला स्वतःच्या यज्ञकृत्यांबद्दल मोठी शरम वाटूं लागली. तो लज्जायुक्त स्वरानें हात जोडून सिद्धार्थाला ह्मणाला,

"भगवन्, आपण जें काय सांगितलें, तें सर्व सत्य आहे, असें मला वाटतें. मला यज्ञमंत्रांचा अर्थ कळत नाहीं, पण हें मंत्रविद ब्राह्मणहि ज्या अर्थी आपले रक्तानें भरलेले हात तुमच्या भाषणानें वस्त्रांत लपवून घेत आहेत, त्याअर्थी आपलें ह्मणणें सत्य असावें, अशी मला खात्री वाटते. मी हें पाप न समजून केलें आहे, इकडे लक्ष देऊन मला क्षमा करा आणि ज्यायोगें पुण्य जोडलें जाईल, असा आपला मार्ग मला सांगा."

सिद्धार्थ गंभीर स्वरानें ह्मणाला,

"महाराज बिंबिसार, हें सांगावयाला मी आज असमर्थ आहें; पण कांहीं दिवसांनीं त्या सत्याचा शोध मला लागेल, आणि मग मी माझा मार्ग आपणास सांगेन. तोंपर्यंत आपण इतकें करा कीं, आपल्या राज्यांत कोणत्याहि प्रकारचा पशुवध होऊं देऊं नका. या पृथ्वीवर रक्तपात न करतां जर प्रत्येकजण सृष्टिनिर्मित वस्तूवर आपला उदर-निर्वाह करील, तर हीच नरकपुरीप्रमाणें भासणारी पृथ्वी शांतिसौ-ख्याचें आगर होऊन जाईल. जर परस्पर प्राणिमात्रांत बंधुभाव वाढत राहील, तर पृथ्वीवरील सुखाचा हेवा प्रत्यक्ष देव देखील करतील!"

सिद्धार्थाच्या या भाषणानें बिंबिसार राजाच्या मनांत त्याच्या-विषयीं अधिक पूज्यबुद्धि उत्पन्न झाली. तो ह्मणाला,

"भगवन्, आपण कोण आहांत, आणि सत्याचा शोध करण्या-साठीं आपण कोठें जाणार आहांत, तें मला सांगाल, तर माझ्यावर मोठे उपकार होतील."

सिद्धार्थ ह्मणाला,

"महाराज, शाक्यवंशीय कपिलवस्तु नगरीचे राजे जे शुद्धोदन त्यांचा मी पुत्र असून माझें नांव सिद्धार्थ. सत्याचा शोध लावण्यासाठीं मी सर्वांना सोडून बाहेर पडलों आहें. तुमच्या राजधानीजवळील

पर्वतावर अनेक महात्मे तपश्चर्या करीत बसले आहेत, असें समजल्यावरून त्यांच्याकडे सत्यानुसंधानार्थ गेलों; पण तेथें माझी निराशा झाल्यामुळें मी आतां गयेजवळील अरण्यांत जात आहें."

ही हकीगत ऐकून राजा बिंबिसार आश्चर्यानें थक्क झाला. तो ह्मणाला,

"राजपुत्र सिद्धार्थ, आपलें अंगीकृत कार्य महनीय तर खरेंच; पण सुखलालित आपणास हे वनवासाचे गुरुतर कष्ट कसे सहन होतील, याची मला मोठी काळजी वाटते; आणि आपले हे प्रफुल्ल पद्मसदृश हात धर्मध्वज धारण करण्यापेक्षां राजदंड धारण करण्यास अधिक योग्य आहेत असें मला वाटतें. आपण आतां माझ्या राज्यांतच रहा आणि आपल्या इच्छेप्रमाणें हिंसेचा प्रतिबंध करा. मीहि अपुत्रकच आहें. आपण माझे धर्मपुत्र व्हा. मी आपणास योग्य अशा स्त्रीबरोबर आपला विवाह करून देतों आणि आपण खुशाल या राज्याचा उपभोग घ्या."

"महाराज, हें सर्व वैभव मला होतें. मी त्याचा स्वेच्छेनें त्याग करून सत्याचा शोध लावण्यासाठीं बाहेर पडलों आहे. तें सत्यतत्व मिळविण्यासाठीं मी आमरण प्रयत्न करणार आहें. मी जो संकल्प केला आहे, त्यांत व्यत्यय आणण्यासाठीं महेंद्रानें आपल्या इंद्रलोकचें राज्य मला देऊं केलें, तरी तें न स्वीकारतां आपला संकल्प मी केव्हांहि सोडणार नाहीं. अहिंसा, भ्रातृभाव आणि नीतिधर्म हीं माझ्या संकल्पाचीं मुख्य अंगें असून आपणास मी पुन्हां येऊन भेटेपर्यंत आपल्या राज्यांत हे तिन्ही सद्गुण प्रजाजनांत वाढत राहतील अशी व्यवस्था करा. ब्राह्मण हो, तुम्हींहि या तिन्ही मार्गांचा अवलंब करून आपल्या आचरणाची दिशा ठरवाल, तर हें रक्तधारांनीं क्षीण झालेलें भारतवर्ष कितीतरी प्रभावमय होईल!"

असें ह्मणून सिद्धार्थानें सर्वांना विनम्रभावानें वंदन केलें, व तो गयेकडे जाणाऱ्या मार्गाला लागला. बिंबिसार राजाचा यज्ञ तसाच राहिला. राजानें आपल्या दूतांना आज्ञा करून यज्ञमंडप ताबडतोब मोडून काढला. आलेले ब्राह्मण यापुढें पशुयज्ञाला जावयाचें नाहीं, असा निश्चय करून घरोघर निघून गेले. यज्ञपशु स्वैरपणें पर्वतावर चढून कोमल दुर्वांकुर खाऊं लागले; आणि मगधदेशांत जिकडे तिकडे पशुयज्ञाचा वार्तावह पसरून पशुहनन बंद पडलें.

इकडे सिद्धार्थ राजगृहशहरच्या बाहेर पडतो न पडतो तोंच ती काळे तीळ आणण्यासाठीं गेलेली स्त्री सिद्धार्थाला आडवी होऊन ह्मणाली,

"महाराज, आपण माझ्या मृतपुत्राला जिवंत करण्यासाठीं काळे तीळ आणावयाला सांगितले होते; पण तीळ कोठेंहि मिळत नाहींत. शैंकडों लोकांच्या घरीं जाऊन विचारिलें; पण जो तो आपल्या घरीं कोणीतरी मेल्याचें सांगूं लागला. ह्मणून मी आपल्या मुलाला एका झाडाखालीं ठेवून हें आपणास सांगण्यास आलें. भगवन्, ते तीळ आतां आपणच कोठून तरी आणा, आणि माझ्या मुलाला जिवंत करा."

असें ह्मणून ती पुत्रशोकाविव्हला मोठ्यानें आक्रोश करूं लागली. तिचें सांत्वन करून सिद्धार्थ ह्मणाला.

"बाई, ज्याअर्थी तुला कोठेंहि तीळ मिळाले नाहींत, त्याअर्थी तूं आतां निश्चयानें समज कीं, तुझा पुत्र जिवंत होणें शक्य नाहीं. तूं जेथें जेथें गेलीस तेथें तेथें कोणीतरी मरून गेल्याचें तुला समजलें, मग त्या मृत्यूनें तुझें तरी घर कां सोडावें बरें? बाई, मृत्यूची गति अप्रतिहत आहे. तो केव्हां कोठें शिरेल, याचा कांहीं नियम नाहीं. त्याचा तडाखा निमूटपणें व धैर्यानें सोसला पाहिजे. तुझ्याबद्दल मला

पुष्कळ वाईट वाटतें. मला जर कोणीं असें सांगेल कीं, त्या मुलाला मनुष्याच्या काळजाचें रक्त काढून पाजल्यास तें जिवंत होईल, तर त्याच क्षणीं मी आपलें स्वतःचें हृदय चिरून माझें रक्त तुझ्या मुलासाठीं देईन; पण मीं आपलें रक्त दिलें किंवा काय वाटेल तें केलें, तरी तुझा मुलगा जिवंत होणें शक्य नाहीं. जा, आपलें दुःख आवरून घर आणि त्या मृत कलेवराचा सत्कार कर."

बाईच्या हृदयांत या भाषणानें प्रकाश पडला, ती लागलीच मृतपुत्राचा अंत्यविधी करण्यासाठीं निघून गेली. सिद्धार्थहि मार्गस्थ झाला.

## प्रकरण सहावें.

# सिद्धि.

भो भो भवंतुः शृण्वन्तु बोधिप्राप्तस्यमेव च ।

"More things are wrought by Prayers, than the world dreams of."

सिद्धार्थ सत्याचा शोध करण्यासाठीं घराच्या बाहेर पडला होता. त्यासाठीं त्यानें आपल्या सर्व वैभवावर व सुखावर पाणी सोडलें होतें. परमप्रिय पिता, सद्गुणी यशोधरा आणि प्रेमाचें सुंदर पुष्प अशा नव-शिशूवरील मायाममता दूर करून तो त्यांच्यापासून शेंकडों कोस दूर गेला होता; आणि त्या सत्यानुसंधानाकरितां आणखी हजारों कोस दूर जाण्याची त्याची तयारी होती. तें सत्यतत्व शोधून काढ-ण्यासाठीं वाटेल तें करण्याची त्याची तयारी होती. मगध देशांतील उच्च पर्वतश्रेणींतील गुहांमधून राहाणाऱ्या ऋषींच्या सानिध्यानें तें सांपडेल अशी त्याला फार आशा होती. पण त्यांत त्याची अगदींच निराशा झाल्यामुळें त्यानें आपल्या गुहेकडे जाणारा मार्ग सोडून दिला, आणि तो गयेच्या मार्गानें आपल्या ध्येयाचा विचार करीत जाऊं लागला. त्यानें असें ऐकलें होतें कीं, गयेजवळ एक मोठें विशाल अरण्य असून त्यांत तपश्चर्या करण्यासारखीं अनेक रम्य स्थळें आहेत. त्यांपैकीं, एखाद्या रम्य स्थळीं बसून सत्यतत्व शोधून काढण्यासाठीं अत्यंत कठिण अशी नपश्चर्या करावयाची असा त्यानें कृतसंकल्प केला होता. मार्गानें त्याच्याबरोबर पांच ब्राह्मण असून तेहि केवळ

तें सत्यतत्व शोधून काढण्याच्या उद्देशानेंच त्याच्याबरोबर चालले होते. हे ब्राह्मण बिंबिसार राजाच्या यज्ञमंडपांतील असून सिद्धार्थाचें नवीन सत्यतत्व समजावून घेण्याची त्यांना विलक्षण जिज्ञासा उत्पन्न झाल्यामुळें ते सिद्धार्थाबरोबर चालले होते. सिद्धार्थानेंहि त्यांना बरोबर येण्याविषयीं मोठ्या आनंदानें परवानगी दिली होती. त्या ब्राह्मणांत कौंडिल्य नांवाचा ब्राह्मण प्रमुख असून सिद्धार्थाचें नवीन तत्व समजावून घेण्याच्या उद्देशानें तो सिद्धार्थाला रस्त्यानें चालत असतां ह्मणाला,

" महाराज, भरतवर्षांत हल्लीं जो प्रचलित धर्म आहे, आणि त्या धर्ममार्गांनीं ज्या ध्येयाकडे जाण्याचा लोक प्रयत्न करीत आहेत, त्यापेक्षां आपला धम आणि ध्येय हीं निराळीं आहेत कीं काय?"

सिद्धार्थ थोडा वेळ विचार करून ह्मणाला,

"धर्म आणि ध्येय हीं निराळीं आहेत किंवा कसें, हें मला इतक्यांतच सांगतां यावयाचें नाहीं. पण माझे मार्ग मात्र निराळे आहेत. त्या मार्गांनीं जर मी इच्छितों तें प्राप्तव्य प्राप्त झालें, तर लोकसमाजांत पुष्कळ पालट होऊन माझे मार्ग सोपे असल्यामुळें जो तो त्या प्राप्तव्याकडे जाण्याचा प्रयत्न करील."

एवढ्यानें कौंडिल्याचें साहजिकच समाधान झालें नाहीं. तो ह्मणाला, " जर आपण आपल्या प्राप्तव्याविषयीं इतका विचार केलेला आहे, तर त्याचे सूक्ष्म किंवा स्थूल स्वरूपाविषयीं सांगण्यास काय हरकत आहे? बरोबर चाललेल्या ब्राह्मणांचें समाधान करितां येईल इतकी तयारी अद्याप सिद्धार्थाची झालेली नसल्यामुळें त्याला ब्राह्मणांना काय सांगावें याचा मोठा विचार पडला; परंतु खरी स्थिति लपवून ठेवण्याची त्याची तयारी नसल्यामुळें तो ह्मणाला,

"माझें ध्येय जोंपर्यंत मला सांपडलें नाहीं, तोंपर्यंत त्याचें सूक्ष्म अथवा स्थूल स्वरूप तरी मला कसें सांगतां येईल ?"

"पण आपण ज्याला आपलें प्राप्तव्य ह्मणतां, तें प्राप्तव्य ह्मणजे काय, हें तरी आपणास सांगतां येईल कीं नाहीं ?"

"त्याबद्दल देखील मला आतांच खात्रीनें कांहीं सांगतां यावयाचें नाहीं; पण त्याची थोडी फार कल्पना मात्र मला तुह्माला करून देतां येईल. मानवजातीच्या एकंदर परिस्थितीचें सूक्ष्म निरीक्षण केलें ह्मणजे असें दिसून येतें कीं, मनुष्यास खरी शांति व समाधान प्राप्त करून घेण्याचें सत्यतत्व अझून सांपडलेलें नाहीं. तें तत्व कालाच्या घटनेंत गुप्त असून तें शोधून काढणें कांहींसें दुरापास्त असलें तरी प्रयत्नांतीं शक्य आहे, असें वाटतें. हें जें सत्यतत्व त्यालाच मी प्राप्तव्य असें ह्मणतों."

"असें तत्व सांपडेल किंवा नाहीं, याची मला जबरदस्त शंका वाटते. बरें, हें तत्व शोधून काढण्यासाठीं आपण प्रयत्न तरी कोणता करणार ?"

"एकांतांत बसून त्या तत्वाचा अहर्निश विचार करणार आणि तें तत्व सांपडेपर्यंत मी तसेंच करीत राहणार !"

कौंडिल्यास सिद्धार्थाचें हें ह्मणणें पुष्कळच चमत्कारिक वाटलें. तो आश्चर्यानें ह्मणाला,

"महाराज, आपला हा सारा प्रयत्न अप्राप्य प्राप्तव्यासाठीं आहे, असें मला वाटतें. कल्पनेनें एखादें काल्पनिक प्राप्तव्य ठरवावयाचें आणि मृगजलाप्रमाणें त्याचा शोध करीत सर्व आयुष्याचा दुरुपयोग करावयाचा हें मला मुळींच पसंत नाहीं. तेव्हां आपलें प्राप्तव्य आपणास सांपडेपर्यंत आपला निरोप घेतलेला बरा."

वर सांगितल्याप्रमाणें सिद्धार्थाचा व त्या ब्राह्मणांचा मतभेद झाल्यामुळें ते ब्राह्मण अर्ध्या रस्त्यांतच सिद्धार्थाला सोडून गेले. ब्राह्मण जरी सोडून गेले, तरी सिद्धार्थाचा कृतनिश्चय झालेला असल्या कारणानें तो हताश किंवा निरुत्साह न होतां हळूहळू मार्गक्रमण करून गयेच्या जवळ असलेल्या विशाल पण सुंदर अरण्यांत तो लवकरच येऊन पोहोंचला.

हल्लीं फल्गु या नांवानें प्रसिद्ध असलेल्या नदीला सिद्धार्थाचे वेळीं निरंजना असें नांव होतें. गयेजवळील विशाल अरण्यांतून ही नदी मत्तभुजंगिनीप्रमाणें धावमान झालेली असून हिच्या कांठाला वाळूच्या मोठमोठ्या टेंकड्या आहेत. ह्या टेंकड्या पाण्याच्या कमी अधिक ओघशक्तीप्रमाणें मोडतात व नवीनहि उत्पन्न होतात. वालुकामय टेंकड्यांच्या घडामोडीनें त्या भागाला अपूर्व सौंदर्य आलें असून त्यावेळीं त्या नदीकांठच्या सेनानी नांवाच्या खेड्याजवळील जंगल तर फारच बहारीचें होतें. सिद्धार्थ जेव्हां या जंगलांतून मार्ग चालूं लागला, तेव्हां तेथील तें अपूर्व सृष्टिसौंदर्य पाहून सिद्धार्थानें त्याच अरण्यांत राहण्याचा निश्चय केला व दाट ताड वृक्षांच्या कुंजांत एक चांगलीशी जागा पाहून त्यानें त्याच क्षणीं तेथें बसून तपश्चर्येस आरंभ केला. त्याची तपश्चर्या ह्मणजे सर्व प्राणिमात्र ज्या अपार दुःखानें गुरफटून गेले आहेत, त्या दुःखाच्या जाळ्यांतून सुटण्यासाठीं मार्ग शोधणें ही होय. या तपाचें कर्म केवळ मनन हें होय. त्या दुःखाचा विचार करून करून आपणास आपलें ध्येय प्राप्त होईल, असा सिद्धार्थाचा विश्वास होता. त्या विलक्षण चिंतनासाठीं तो जो एकदां आसन घालून बसला तो पुष्कळ दिवसपर्यंत तसाच बसून राहिला. आपलें प्राप्तव्य आपणांस प्राप्त झाल्यावांचून उठावयाचें नाहीं, असा त्याचा निश्चय अस-

त्यामुळें त्याला अनेक शरीरकष्ट होऊं लागले; तरी पुष्कळ दिवस-पर्यंत तो आपल्या आसनावरून उठला नाहीं. कितीहि कंटकवृत्तीचा मनुष्य असला तरी त्यास आहार आणि निद्रा हीं अवश्य होत. तीं एकदोन दिवस नसलीं तरी तेवढ्यानें देखील त्याचे पंचप्राण व्याकुल होतील, मग सिद्धार्थासारख्या गाद्यागिरद्यांवरून लोळणाऱ्या व सुग्रास अन्नानें वाढलेल्या मनुष्याला एकाच आसनावर आणि तेंहि त्या अरण्यांत कित्येक दिवस एकसारखे बसल्यामुळें किती शरीरकष्ट होत असतील याची कल्पनाच केली पाहिजे. आणि असें कांहीं दिवस नव्हे, तर कांहीं महिनें त्यानें एकाच आसनावर काढले. त्यावेळीं त्याचे अन्नमय प्राण खचित व्याकुळ होत होते; परंतु सिद्धार्थाचें तिकडे लक्ष नव्हतें. आपल्या या कृतीनें आपल्या शरीराचें आणि जीवाचें काय होत आहे, इकडे त्याचें मुळींच लक्ष नव्हतें. त्यानें आपलें सर्व लक्ष प्राणिमात्रांचें दुःखावरण दूर करण्याच्या विचाराकडे लावल्यामुळें तो आपल्या शरिरास विसरूनच गेला होता; पण असें किती दिवस चालणार ! त्याला नकळत कां होईना त्याचें शरीर क्षीण होत चाललें, त्याचें तेज नाहींसें झालें, आणि एके दिवशीं तो अन्नाभावामुळें मूर्च्छित होऊन जमिनीवर पडला. ती त्याची मूर्च्छितावस्था फारच विलक्षण होती. एकवार सृष्टिदर्शन घ्यावें ह्मणून डोळ्यावरून पापण्या हालविण्याचा प्रयत्न सिद्धार्थ करीत होता; परंतु त्यास तितकीदेखील त्यावेळीं शक्ति राहिली नव्हती. अंतःकरणांत होणाऱ्या वेदना वनवृक्षांना सांगाव्यात ह्मणून त्याचे शुष्क ओंठ आतुर झालेले दिसत होते, पण त्या ओठांना शब्दोच्चार करण्याची शक्ति राहिली नव्हती. अशा प्रकारची भयंकर मूर्च्छा सिद्धार्थाला आलेली असून त्यांतहि आणखी माध्यान्हीचा प्रखर भास्कर आपल्या किरणांनीं त्याचें शरीर तप्त

करीत होता. खरोखर अशा स्थितींत जर सिद्धार्थ आणखी कांहीं वेळ राहिला असता, तर हा साऱ्या जगाला आपल्या ज्ञानतेजानें सत्यप्रकाश देणारा महात्मा नाहींसा होऊन बौद्धधर्माचें आज कोणाला नांवहि ऐकूं आलें नसतें; परंतु जगाच्या नशिबीं ही महत् हानि लिहिलेली नसल्यामुळें तितक्यांत तेथें एक दयाळू अंतःकरणाचा गुराख्याचा मुलगा आला आणि त्याच्या प्रयत्नानें सिद्धार्थाला त्याचें प्राणदान मिळालें.

सिद्धार्थ ज्या ठिकाणीं तपश्चर्या करीत बसला होता, त्या ठिकाणीं, कित्येक गुराखी दररोज आपलीं जनावरें घेऊन जात असत. सिद्धार्थाला तेथें एकसारखी तपश्चर्या करितांना पाहून त्याच्याविषयीं त्यांच्या मनांत पूज्यबुद्धि उत्पन्न झाली होती. ज्याला आपण रोज ध्यानावस्थेंत पहात होतों, तोच आज मूर्छित होऊन पडला आहे, हें पाहून त्या गुराख्यांना सिद्धार्थाची साहजिक दया आली व त्यांनीं घाई करून सिद्धार्थाला उन्हाचा ताप होऊं नये ह्मणून, त्याच्या शरिरावर त्याला स्पर्श न करितां झाडांच्या मोठाल्या शाखा तोडून सांवली केली. नंतर एकानें आपल्या एका शेळीचें दूध काढलें व त्याचा एकेक थेंब तो दुरून सिद्धार्थाच्या मुखांत सोडूं लागला. त्याला वाटलें आपणासारख्या नीच मनुष्यानें या ऋषीला स्पर्श करणें बरें नव्हे, ह्मणून तो दूर बसून सिद्धार्थाच्या तोंडांत एकेक थेंब सोडीत होता. अशा रीतीनें अंगावर सावली होऊन थोडेंसें दूध पोटांत गेल्यावर सिद्धार्थाची मूर्च्छा हळूहळू दूर झाली. त्याला चैतन्य प्राप्त झालें व तो डोळे उघडून गुराख्याकडे पाहूं लागला. भुकेनें सिद्धार्थाचे पंचप्राण व्याकुळ झालेले असल्यामुळें त्यानें गुराख्याला दुधाचें भांडें आपल्या मुखाला लावण्याविषयीं सुचविलें. गुराख्याला वाटलें सिद्धार्थाची अशी समजूत असावी कीं, हा

आपणाप्रमाणेंच उच्च वंशीय असावा आणि ह्मणून ते आपणास दूध पाज ह्मणून सांगत आहेत; परंतु खरी स्थिति त्यांना कळवावी हें चांगलें असा विचार करून गुराखी ह्मणाला,

"महाराज, आपण थोर तपस्वी आहां, आणि मी तर एक नीच वंशीय गुराखी आहे. तेव्हां मी आपणास कसा स्पर्श करूं?"

सिद्धार्थ सादरपूर्वक, पण क्षीण स्वरानें ह्मणाला,

"मुला, वंशभेदाचा नर्कमूलक अभिमान नाहींसा करून सर्व मनुष्यप्राण्यांत सहोदरतुल्य बंधुभाव उत्पन्न करण्याची जर कशांत शक्ति असेल, तर ती फक्त करुणेंतच आहे. ही करुणा तुझ्या अंतःकरणांत परिपूर्ण असल्यामुळें तूं श्रेष्ठाहून देखील श्रेष्ठ आहेस. ज्यांचें अंतःकरण मोठें तेच खरोखर उच्च आणि ज्यांचें अंतःकरण क्षुद्र तेच खरोखर शूद्र. केवळ वंशाभिमानानें मी श्रेष्ठ ह्मणून ह्मणण्याचा कोणाहि मनुष्यास कांहींच अधिकार नाहीं. कारण सृष्टिकर्त्यानें कोणाहि मनुष्याला जातिविशिष्टाची एक देखील निराळी अशी खूण दिलेली नाहीं. ब्राह्मणांना चार हात आणि शूद्रांना तीन असा कांहीं भेदाभेद दिसत नाहीं. श्रेष्ठांचें रक्त तांबडें आणि नीच वंशीयाचें रक्त काळें, असेंहि कोठें आढळून येत नाहीं. अर्थात् ज्यांच्या अंगीं दयाशीलता आहे, तेच प्राणि धन्य असून श्रेष्ठ आहेत; आणि ज्यांना दयेचा विकारच नाहीं, ते नीच व शूद्र आहेत. सर्वांच्या डोळ्यांतून पडणाऱ्या अश्रूंचा रंग सारखाच आहे. त्रिपुंड्र किंवा यज्ञोपवित यांसहित कोणी मातृगर्भांतून जगांत येत नाहीं. जगांत येतांना सर्वांची जात एकच असते; पण पुढें मात्र मनुष्य आपल्या कर्तृत्वानें ब्राह्मण अथवा शूद्र होऊं शकतो. न्यायकर्म करणारा तो ब्राह्मण, अन्यायानें वागणारा तो शूद्र. तेव्हां मुला, तूं या दयाशीलतेमुळें श्रेष्ठ आहेस. निःशंकमनानें मला दूध पाज."

सिद्धार्थानें असें सांगितल्यावर गुराख्यानें दुधाचें पात्र उचललें व तें सिद्धार्थाच्या मुखाला लावून सर्व दूध सिद्धार्थाला पाजलें. बरेंच दूध पोटांत गेल्यावर सिद्धार्थाला चांगली हुशारी वाटली व तो उठून बसून पुन्हां आपल्या ध्येयाचा विचार करूं लागला. सिद्धार्थ पूर्वावस्थेंत आहे, असें पाहून गुराखीहि तेथून निघून गेले. त्या दिवशीं सिद्धार्थाच्या विचारांत बराच पालट पडला. त्या रात्रीं त्यानें झोंप घेण्याचें ठरविलें व त्याप्रमाणें तो रात्रीं निजला असतां त्याला एक स्वप्न पडलें. एक मोठें थोरलें इंद्रमंदिर जवळच असून त्या मंदिरांत जाण्यासाठीं कांहीं स्त्रिया आपल्या समोरून जात आहेत, असें सिद्धार्थाला दिसलें. त्या स्त्रियांच्या हातांत वाद्यें असून तीं वाद्यें वाजवीत व गात गात त्या चालल्या होत्या. अगदीं सिद्धार्थासमोर जेव्हां त्या स्त्रिया आल्या तेव्हां त्यांतील एका स्त्रीनें एक तीन तारांचें वाद्य त्याच्या समोर धरून वाजविलें. त्या वाद्याची पहिली तार इतकी उंच लावलेली होती कीं, तिचा ध्वनि कांहींसा कर्कश निघे. मधली तार मध्यमांत लावलेली असून तिचा आवाज मात्र फारच मधुर निघत होता. शेवटची तार अगदीं ढिली असून तिचा आवाज जो निघे तो कळत देखील नव्हता. अशा त्या तिन्ही तारा वाजवून दाखविल्यावर त्या स्त्रिया कोणीकडे निघून गेल्या, तें मंदिर नाहींसें झालें आणि सिद्धार्थहि झोंपेंतून जागा झाला. जागा झाल्यावर स्वप्नांत जें काय दृष्टीस पडलें होतें, त्याचा तो विचार करूं लागला. त्यासंबंधानें पुष्कळ विचार केल्यावर तो आपल्या मनाशीं ह्मणाला,

"केव्हां केव्हां अगदीं यःकश्चित् मनुष्यास देखील गुरू करावें लागतें. इतकेंच नव्हे तर वेड्या मनुष्यापासून देखील शिकण्यासारखें पुष्कळ असतें. स्वप्नांत पाहिलेल्या स्त्रिया नर्तकी कां असेनात, पण

त्यांनीं मला जें तीन तारांचें वाद्य वाजवून दाखविलें, त्यामुळें मी त्यांना पूज्यच मानलें पाहिजे. कारण त्या तीन तारा ह्मणजे तपश्चर्येच्या तीन अवस्था होत. कांहीं एक न खातांपितां शरिराला दुःख देऊन जें तप करावयाचें तें त्या उंच कर्कश तारेप्रमाणें होय. शरीराच्याच सुखासाठीं सर्व कांहीं आहे, असें समजून खावें, प्यावें आणि मजा करावी हा मार्ग शेवटच्या ढिल्या बदसूर तारेप्रमाणें आहे, आणि प्राणधारणापुरतें अन्नसेवन करून सर्व लय सत्यधर्माकडे लावणें हा मधल्या मधुर तारेचा मार्ग होय. अर्थात् मी देखील हा मधलाच मार्ग अवलंबिला पाहिजे. कारण कोणतेंहि चांगलें कार्य असो वा वाईट कार्य असो तें कार्य सिद्धीस जाण्यासाठीं प्राणधारण हें अवश्य केलेंच पाहिजे. त्या गुराख्यानें जर मला दूध पाजलें नसतें, तर मी खचित काळाच्या भक्ष-स्थानीं पडलों असतों, आणि मग माझें सत्यशोधन अर्थातच तसेंच राहिलें असतें. तेव्हां आजपासून प्राणधारणापुरतें अन्नसेवन हें केलेंच पाहिजे."

सिद्धार्थानें त्या स्वप्नाचा असा अर्थ काढून त्या दिवसापासून फळें वगैरे जें त्या अरण्यांत मिळेल तें खाण्यास आरंभ केला. सिद्धार्थ ज्या जागेवर तपश्चर्येसाठीं बसलेला होता, तेथून जवळच एक लहानसें खेडे-गांव होतें. त्या गांवाचें नांव 'सेनानी.' हें गांव अजूनहि आहे, असें ह्मणतात. त्या गांवांत एक गवळी फार श्रीमान व सदाचारी असा होता. त्याच्या स्त्रीचें नांव सुजाता. ती फार दयाळू असून पतीची ती अगदीं एकनिष्ठपणें सेवा करीत असे. सर्व प्रकारचीं सुखें तिला ईश्व-राच्या कृपेनें लाभलीं होतीं, परंतु तिला संतान नसल्यामुळें आपला सर्व संसार फुकट आहे, असें वाटत असे. पुत्रप्राप्तीसाठीं ती मनोभावानें एका शिवमंदिरांत शिवलिंगाची पूजा करीत असे. तिनें एकदां

शिवमंदिरांत शंकराची करुणा भाकून असा नवस केला कीं, ‘देवा, मला जर पुत्र होईल, तर मी वनदेवतांना सुवर्णपात्रांतून पायसान्नाचें भोजन देईन.’ हा नवस केल्यावर तिची मनोकामना लवकरच पूर्ण होऊन तिला एक सुंदर पुत्र झाला. शंकरांनीं आपली इच्छा पूर्ण केली, तेव्हां आतां नवस केल्याप्रमाणें वनदेवतांना पायसान्न दिलें पाहिजे, असा विचार करून एकदोन महिन्यांच्या आपल्या मुलाला बरोबर घेऊन दासीसह ती एके दिवशीं अरण्यांत गेली. अरण्यांत एखाद्या वृक्षाखालीं सडासंमार्जन करून तेथें पायसान्न नेऊन ठेवलें ह्मणजे तें वनदेवता येऊन खाऊन जातात, अशी सुजातेची समजूत होती. त्या समजुती-प्रमाणें ती व तिची दासी चांगली स्वच्छ जागा अरण्यांत शोधीत असतां त्या दोघी जेथें सिद्धार्थ बसला होता, त्या वृक्षाजवळ गेल्या. सिद्धार्थाला पाहून सुजातेची दासी ह्मणाली,

“ सुजाते, ती पाहिलीस का देवमूर्ति ? तिची ही अपूर्व कांति पाहून मला असें वाटतें कीं, तुझ्या पायसान्नाचा नैवेद्य सेवन करण्यासाठीं देव प्रत्यक्ष येथें येऊन बसले आहेत.”

सिद्धार्थाला पाहून सुजातेच्या मनांतहि तसलेच विचार आले व तिच्या अंत:करणांत पूज्य बुद्धि उत्पन्न झाली. ही वनदेवताच आहे, असें तिला वाटलें. तिनें सर्व पूजासामग्री सिद्धार्थापुढें ठेविली आणि ती सिद्धार्थाला साष्टांग नस्मकार घालून नम्रभावानें ह्मणाली,

“ वनदेवतेश्वर, मी आपणांस प्रणाम करितें. या दासीला आज दर्शन झालें हें मी आपलें महत्‌भाग्य समजतें. प्रभो, मी आपणांस नवस केल्याप्रमाणें पूजा आणली आहे, ती ग्रहण करण्याची कृपा करावी. शंकराला नवस केल्याप्रमाणें मी आपणासाठीं दुधाची खीर सुवर्ण-पात्रांत आणली आहे, ती घेऊन माझ्या या मुलाला आशीर्वाद द्यावा.”

असें ह्मणून सुजातेनें खीर घातलेलें सोन्याचें भांडें सिद्धार्थाच्या हातांत दिलें. यावेळीं सिद्धार्थाची क्षुधा चांगली प्रदीप्त झालेली असल्यामुळें त्याला त्या पायसान्नाच्या प्राप्तीनें फार आनंद झाला व त्यानें ती सर्व खीर हळूहळू खाऊन टाकिली. तें सात्विक अन्न पोटांत गेल्यावर सिद्धार्थाचा निस्तेज झालेला चेहरा थोडा सतेज दिसूं लागला व त्याच्या अंगांत थोडी शक्तिही प्राप्त झाली. तोंपर्यंत सिद्धार्थाने हा काय प्रकार आहे, हें डोळे उघडून पाहिलें देखील नव्हतें; पण अन्न पोटांत गेल्यावर आपणांवर इतके उपकार करणाराचें दर्शन घ्यावें या उद्देशानें त्यानें डोळे उघडले. पाहतो तों एक स्वधर्मनिष्ठावान् स्त्री समोर पुजासामग्री घेऊन बसलेली असून तिच्या अंकावर एक लहान मुलहि आहे. जवळच तिची दासी बसलेली आहे. अशा अरण्यांत येऊन माझी क्षुधा शांत केली हें दर्शविण्यासाठीं तो कृतज्ञबुद्धीनें जननीस्वरूपिणी सुजातेकडे पाहूं लागला. भाविक सुजातेला त्या अवलोकनाने मोठी धन्यता वाटली. तिच्या निष्कपट अंतःकरणांतून सहज उद्गार निघाले,

"प्रभो, आपणच वनदेवता काय?"

सिद्धार्थ त्या प्रश्नाचें उत्तर न देतां ह्मणाला,

"आर्ये, माझ्यासाठीं हें तूं कां आणलेंस?"

"महाराज, मी भगवान् शंकराला असा नवस केला होता कीं, मला एक पुत्र दिल्यास मी वनदेवतांना पायसान्न अर्पण करीन. त्याप्रमाणें शंकरांनीं प्रसन्न होऊन माझी मनोवांच्छा पूर्ण केली ह्मणून मी हें पायसान्न आपणासाठीं आणिलें होतें."

सिद्धार्थ त्या लहान मुलाच्या मस्तकावर हात ठेऊन ह्मणाला,

"हा तुझा मुलगा दीर्घायुषि होऊन तुझें आयुष्य आनंदांत जावो. बाई, मी कांहीं वनदेवता नाहीं; तुझ्याच प्रमाणें एक मनुष्य आहें.

अन्नदान करून तूं माझें रक्षण केलेंस, तेव्हां तूंच मला पूज्य आहेस. मी राजपुत्र होतों, आज संन्यासी असून या तरुमूलाखालीं सत्यशोधनासाठीं बसलों आहें. मला आपलें घरसोडून सुमारें सहा वर्षें झालीं. इतकीं वर्षें मीं सत्यानुसंधानासाठीं घालविलीं आहेत; परंतु ह्या जगांतला अज्ञानांधःकार घालवितां येईल, असा ज्ञानदीप मला अद्याप सांपडला नाहीं. कित्येक दिवस मी अन्नावांचून काढल्यामुळें अगदीं मृतप्राय झालों होतों. अशास्थितींत तूं ही खीर खायाला देऊन मला वांचविलेंस यांत कांहीं शंका नाहीं. जें सत्य सांपडणार नाहीं ह्मणून, मी निराश झालों होतों, तें सत्य सांपडण्यास तूं मला आयुष्यदान दिलेंस. बाई, तुझ्या एकंदर लक्षणावरून तुझा अधिकार फार मोठा दिसतो. तुझ्या मुखावर जी शांति व समाधान दिसत आहे, तें तुला कशानें प्राप्त झालें, तें मला सांगशील, तर माझ्यावर महदुपकार होतील."

सुजाता विनम्रभावानें ह्मणाली,

" महाराज, मी एक अत्यंत क्षुद्र हृदया, तेव्हां मी आपणांस कसें सांगणार ? आकाशांतून वृष्टी होऊं लागली ह्मणजे दोनचार थेंबानेंच मल्लिकेचें पुष्प जसें जलपूर्ण होतें, त्याप्रमाणें पतीनें प्रेमभावानें माझ्याकडे पाहिलें ह्मणजे तेवढ्यानेंच मला धन्यता वाटते. या नवशिशूच्या एकाच हास्यलहरीनें मला महदानंद होतो. स्त्रियांचें पति हेंच दैवत होय. त्याच्यावर निष्ठा, प्रेम व पूज्यबुद्धि ठेवून जी स्त्री वागते, तिला शांतिसौख्य हें मिळणारच मिळणार. घरांतलें अथवा बाहेरचें कोणतेंहि कार्य करतांना हें मी पतीच्या कल्याणासाठीं करीत आहें, हें मी केव्हांही विसरत नाहीं. सकाळीं उठल्याबरोबर पतीच्या पायाचें दर्शन घेऊन मग गृहकृत्याला लागतें. रात्रीं निजते वेळीं पतीची पादसेवा केल्यावांचून मी निजत नाहीं, आणि खरोखरच महाराज, त्या-

वेळीं मला जो आनंद वाटतो, त्यापुढें ब्रह्मानंदहि तुच्छ होय. त्यावेळीं मनांत असे विचार येतात कीं, देवा, या अशा आनंदस्थितींत जर मला मृत्यूच्या स्वाधीन करशील, तर स्वर्ग हा मला अक्षयचा मिळेल. असल्या विचारांत असतां मला कसली भीति वाटत नाहीं, कसली चिंता वाटत नाहीं, सर्वत्र मला आनंदच दिसतो. माझ्या दृष्टीस जेव्हां दीनदु:खी पडतात, तेव्हां मी परमेश्वराची अंत:करणपूर्वक अशी प्रार्थना करतें कीं, देवा, या सर्वांना माझ्याप्रमाणें सुखी कर. काय व्हावयाचें असेल तें खुशाल होवो, कर्तव्यनिष्ठा ह्मणून सोडावयाची नाहीं, एवढें एकच तत्व मला माहित आहे."

सुजातेचें हें भाषण ऐकून सिद्धार्थाला आपला मार्ग स्पष्ट झाल्याप्रमाणें वाटलें. सुजातेची ती श्रद्धा पाहून सिद्धार्थाला जितकें आश्चर्य वाटलें तितकीच तिच्याबद्दल पूज्यबुद्धि उत्पन्न झाली. तो ह्मणाला,

"हे जननीस्वरूपिनी, तुझी योग्यता ज्यांना आह्मी ज्ञाते ह्मणतों त्यांच्यापेक्षां पुष्कळ अधिक आहे. तूं केवळ विश्वासानें आपलें कर्तव्य संपादन करून नीतीची ओळख करून घेतली आहेस. आणि मला वाटतें त्याचमुळें तुला ही समाधानवृत्ति प्राप्त झाली असावी. तूं माझी पूजा करण्यासाठीं आली आहेस, पण माझी तितकी योग्यता नाहीं. इतकेंच नव्हें तर मी तुझी पूजा करावी असा तुझा अधिकार आहे. तुझ्या या भाषणानें मी आज एक नवीनच गोष्ट शिकलों आणि मला आतां अशी आशा उत्पन्न झाली आहे कीं, मीहि निष्ठावान् होऊन प्रयत्न करीन तर ज्या सत्याचा शोध मी इतके दिवस करीत आहें, तें सत्य मला लवकर सांपडेल. या नवीन मार्गाची ओळख केवळ तुझ्या कृपेनें झाली ह्मणून कृतज्ञता व्यक्त करतों आणि तुझ्या पतिपुत्रासह तुझें आयुष्य सुखांत जावो असा मी तुला आशीर्वाद देतों."

सुजाता यावर अधिक कांहीं बोलली नाहीं. तिनें सिद्धार्थाला पूज्य-बुद्धीनें वंदन केलें व ती आपल्या मुलाला घेऊन दासीसह घरीं निघून गेली. सुजाता गेल्यावर सिद्धार्थानें तें स्थान सोडून अरण्यांत आणखी दूरवर जाण्याचा विचार केला व त्याप्रमाणें तो लवकरच घनदाट अरण्याच्या मध्यभागीं येऊन पोंहोंचला. तेथें एक वडाचा विशाल वृक्ष असून त्याजवळचें सृष्टिसौंदर्य फारच बहारीचें असल्यामुळें तपश्चर्येसाठीं तीच जागा सिद्धार्थानें पसंत केली व तेथें त्यानें पद्मासन घातलें. तेथें बसते वेळीं एकवार सृष्टीवर नजर टाकून तो ह्मणाला,

"त्या स्त्रीच्या चरित्राचा विचार केला ह्मणजे निष्ठा ही सर्वकांहीं करते असें दिसतें. मीं इतके दिवस प्रयत्न केला, पण त्यांत निष्ठा असावी तितकी नसल्यामुळेंच मला यशप्राप्ति झाली नाहीं; पण आतां मी अशी प्रतिज्ञा करतों कीं, हें शरीर शुष्क होऊन जावो, अस्थि, चर्म, मांस यांचा खुशाल नाश होवो, मानवी किंवा दैवी वाटतील त्या आपदा येवोत, पंचमहाभूतें मला कितीहि त्रास देवोत, काय वाटेल तें होवो, मी हें आसन मला बुद्धत्व प्राप्त झाल्यावांचून सोडणार नाहीं."

अशी प्रतिज्ञा करून सिद्धार्थ त्या वडाच्या वृक्षाखालीं बसल्यावर कांहीं दिवसांनीं सृष्टिनिर्मित आपदा त्याला आपल्या तपापासून ढळविण्याचा प्रयत्न करूं लागल्या. रात्रीच्या वेळीं सिंहव्याघ्रादि क्रूर पशु त्याच्याजवळ येऊन मोठ्यानें गर्जना करीत. थंडीच्या कडाक्यानें त्याचें शरीर कलेवराप्रमाणें गार होऊन जाई. दिवसा ऐन माध्यान्हीं सूर्य आला ह्मणजे तो भयंकर अग्निःकणाप्रमाणें किरणशलाकांचा सिद्धार्थावर वर्षाव करी; केव्हां केव्हां मुसळधार वृष्टि होऊन अरण्यांतील सर्व प्राणी भयभीत होऊन जात, पण या सर्वांनीं कांहीं केलें तरी आपल्या आसनावरून उठावयाचें नाहीं, हा सिद्धार्थाचा निश्चय कायमच होता. इतकेंच नव्हे

तर केव्हां केव्हां तो आपल्या विचारांत इतका गढून गेलेला असे कीं, कांहीं सृष्टिव्यापार आपणास आसनच्युत करण्याचा प्रयत्न करीत आहेत, हें त्याच्या लक्षांत देखील येत नसे. पण या सृष्टीच्या व्यापारापेक्षांहि मनोव्यापार हे फार प्रबल व धूर्त असतात. सृष्टींतलीं सगळीं तत्वें जिंकावयाचें जितकें कठिण आहे, त्यापेक्षांहि मनोव्यापारावर सत्ता चालविणें फार कठिण आहे. हे मनोव्यापार ह्मणजे तपोभंग करणारे भयंकर राक्षसच. अथवा यांना इंद्रलोकच्या सुंदर अप्सराहि ह्मणतां येईल. मनाची धांवमान गति इतकी विलक्षण आहे, कीं, त्याबद्दल जितका विचार करावा तितका थोडाच होय. मनाचे निरनिराळे विकार एखादे वेळीं इतके प्रबळ होतात कीं, जणूं काय ते प्रत्यक्ष समोर येऊन आपणाशीं बोलत आहेत असें वाटतें. बरेच दिवस तपश्चर्येंत घालविल्यावर सिद्धार्थाची स्थिति देखील तशी झाली. आत्मबोध या नांवाचा एक मनोविकार सिद्धार्थापुढें उभा राहून ह्मणाला,

"सिद्धार्थ, तपाचें फल तर तुला प्राप्त झालें असें दिसतें. तुला बुद्धत्व निश्चयानें प्राप्त झालें आहे. ऊठ, आतां अधिक तपश्चर्या करण्याचें कारण नाहीं. या मिळविलेल्या देवत्व स्थितीनें तूं आतां खऱ्या आनंदाचा अनुभव घे."

हे शब्द वायुलहरीवरून जरा दूर गेले नाहींत, तोंच संदेह ह्मणाला,

"बा सिद्धार्था, हें सर्व मिथ्या आहे. तूं केवळ आपल्या अज्ञानावर विश्वास ठेवून या तपश्चर्येंत आयुष्य घालवीत आहेस. तूं जो ज्ञानदीप शोधून काढण्याचा विचार केला आहेस, तो ज्ञानदीपच जर अस्तित्वांत नाहीं, तर तुला तो सांपडणार तरी कसा? अरण्यांत बसून वर्षेंच्यावर्षें घालविल्यानें तूं स्वतःचा तर कांहीं फायदा करून घेतला नाहींसच, पण जनतेच्याहि तुला कांहीं उपयोगी पडतां आलें नाहीं. बाबा, काल-

चक्राचा गतिनिरोध करण्याचा हा वेडेपणा सोडून दे, आणि आहे या धर्ममार्गानेंच साधण्यासारखें जनहित साध. "

हे संदेहाचे शब्द पुरे होतात न होतात, तोंच सिद्धार्थापुढें एक भेसूर आकृति येऊन ह्मणाली,

"वेड्या सिद्धार्था, भारतवर्षांतला प्रचलितधर्म नाहींसा करण्याचें हें तुझें साहस किती भयंकर आहे, याची कांहीं तुला कल्पना आहे ? शास्त्रांची सत्ता नाहींशी करणें तुला शक्य नाहीं. कांहीं तरी भ्रामक विचारानें आपल्या आयुष्याची खराबी करून घेऊं नकोस. जा, राज्य कर आणि आपला प्रपंच पहा."

सिद्धार्थानें पाहिलें या मनोविकारांचें प्राबल्य वाढत चाललें आहे, तेव्हां प्रथम यांच्यावरच विजय मिळविला पाहिजे, असा विचार करून त्यानें आपले सर्व मनोव्यापार थोड्याच दिवसांत आपल्या ताब्यांत आणून ते सर्व सत्य शोधण्याकडे लावले. मनाची एकाग्रता झाल्यावर त्याला आपल्या प्राप्तव्याचा मार्ग पुसट पुसट दृग्गोचर होऊं लागला. ध्यानस्थिति त्याला प्राप्त झाल्यावर कडक थंडी, प्रखर ऊन, मुसळधार वृष्टि, सिंहाच्या गर्जना, मेघांचा कडकडाट, इतकेंच नव्हे तर त्याच्या जवळ होणारा भयंकर वज्रपात देखील त्यास कळेनासा झाला. एखाद्या खोल अंधकारमय गुहेतून निघून आलोकमय मार्गाकडे आपण जात आहों असें सिद्धार्थाला वाटूं लागलें. त्याची ध्यानावस्था जशजशी वाढूं लागली, तसतसा त्याचा मार्ग त्याला स्पष्ट दिसूं लागला. अखेरीस त्या ध्यानावस्थेंत त्याला सम्यक् संबुद्धि प्राप्त होऊन त्याचें सत्यतत्व त्याला स्पष्ट दिसूं लागलें. साधारण मानवी दृष्टीनें जितक्या दूर आह्मांस पहातां येतें, ती सीमा उल्लंघून त्याच्या पलीकडच्या सत्यप्रदेशांतल्या अनेक वस्तू सिद्धार्थास दिसूं लागल्या; आणि ज्या ज्ञानदीपाच्या प्राप्तीसाठीं तो

इतका प्रयत्न करीत होता, तो प्रदीप त्याला तेथें मिळाला. तो ज्ञानदीप हातांत सांपडतांच सृष्टींतील न दिसणारीं अनेक गूढतत्वें त्याला स्पष्ट दिसूं लागलीं. त्यानें त्या प्रकाशांत असें पाहिलें कीं, प्रत्येक प्राणिमात्रास त्याच्या फलभोगाला—त्याच्या निरानिराळ्या अवस्थेला—कर्म हें कारण आहे, आणि या कर्माव्यतिरिक्त विश्वांत प्राणीच काय, पण कोणतीहि वस्तु नाहीं. आकाशांतील सूर्य चंद्रासारख्या महान् गोलकापासून तों भूमीवरील क्षुद्र अणुरेणूपर्यंत सर्व कर्मबद्ध असून आपापलें कर्म करीत आहेत. ही कर्मप्रवृत्ति त्यांस स्वयंसिद्ध नसून एका महाशक्तीच्या आज्ञेनें ते सर्व आपापलें कर्म करीत आहेत. ती महाशक्ति सिद्धार्थास स्पष्ट दिसली आणि त्यानें ओळखलें कीं, ही जी महाशक्ति, हेंच सत्यत्व! हेंच प्राप्तव्य!

तें प्राप्तव्य सिद्धार्थाला लाभल्यावर त्याला आणखीहि चमत्कार दिसून आले. कर्माचा मुख्य उद्देश त्या महातत्वांत मिळून जाणें हा होय, असें त्यानें स्पष्ट पाहिलें. त्या तत्वांत मिळून गेल्यावर मग जन्म नाहीं, मृत्यु नाहीं, नांव नाहीं, गांव नाहीं, जाति नाहीं, कांहीं नाहीं. ती तत्वमयताच प्राप्त होते. ही तत्वमयता प्राप्त करून घेणें, हें प्रत्येक प्राणिमात्राचें कर्तव्य होय. ही तत्वमयता जोंपर्यंत प्राप्त होत नाहीं, तोंपर्यंत जन्ममृत्यूचीं बंधनेंहि सुटत नाहींत. मृत्यु ह्मणजे तत्वमयतेकडे गेलेल्या सोपानावर एकेक पायरी वर ढकलणारी शक्ति आहे; आणि अशा रीतीनें ज्यांना एका जन्मांत तत्वमयता प्राप्त होत नाहीं, त्यांना ती अनेक जन्मांनीं तरी प्राप्त होते. अंतःसृष्टींतील हा चमत्कार सिद्धार्थानें आपणास सांपडलेल्या ज्ञानदीपानें पाहिल्यावर तो ज्ञानदीप घेऊन तो बाह्यसृष्टींत आला. या वेळीं पूर्वाकाश आरक्त झालेलें असून क्षितीजाखालीं असलेल्या सूर्याचीं किरणें उंच पर्वतावर व वृक्षां-

धर पडून सृष्टि मोठी अपूर्व दिसत होती. वृक्षपल्लवांवर रात्रीनें गाळलेले अश्रु या वेळीं मोत्याप्रमाणें चमकत होते, आणि कोकिला पंचमस्वरानें सुप्रभातसूचक मंजुलध्वनि काढीत होत्या. अशावेळीं आपलें ध्यान विसर्जन करून जेव्हां सृष्टीकडे सिद्धार्थ पाहूं लागला, तेव्हां ही सृष्टि आपलें दुःखावरण काढून टाकण्यासाठीं कोणाची तरी मोठ्या आतुरतेनें मार्गप्रतिक्षा करीत आहे, असें त्यास वाटलें. आपल्या विशाल दृष्टीनें सर्व सृष्टीवर नजर टाकून सिद्धार्थ ह्मणाला,

" वसुंधरे, हें जें दुःखावरण तीच माया. आह्मी या मायेनें वेष्टित असल्यामुळेंच सत्यतत्वाचें सुख आह्मास अनुभवितां येत नाहीं; पण अहो मानवहो, ही माया दूर करण्याचा ज्ञानदीप मला सांपडला आहे. तुह्मा सर्वांच्या कल्याणासाठीं मी तो आणला आहे. त्याच्या प्रकाशानें मायांधकार दूर होऊन तत्वमयतेचा मार्ग तुह्मांला स्पष्ट दिसेल. त्या मार्गानें गेल्यावर तुमचीं सर्व दुःखें दूर होतील ! इतकेंच नव्हे, तर जन्ममरणाच्या बंधनापासूनहि तुह्मी मुक्त व्हाल ! !"

असें ह्मणून सिद्धार्थानें तें अरण्य सोडलें, आणि तो आपल्या तत्वप्रचारासाठीं लोकसमूहांतून हिंडूं लागला. त्याच्या असामान्य दैवी वाणीनें यक्षिणीच्या कांडीप्रमाणें चमत्कार घडून आला. दुष्टांच्या मनोवृत्ती पालटल्या. घातक्यांनीं आपल्या सुऱ्या फेंकून दिल्या. चोरांनीं अपहरण केलेलें द्रव्य ज्याच्या त्याच्या घरांत नेऊन टाकलें. वीरांनीं आपल्या शस्त्रांना म्यान करून युद्धें बंद केलीं; यज्ञांचे धूम्रस्रोत दिसेनासे झाले आणि संपूर्ण प्राणि स्वेच्छेनें संचार करूं लागले !

## प्रकरण सातवें.

# यशोधरा.

**करुणस्य मूर्तिरिव वा शरीरिणी विरह व्यथेव**

सृष्टिदेवतेनें वार्षिक राज्यारोहण करण्याची तयारी मोठ्या जारीनें चालविली होती, यावरून ते दिवस वसंतऋतूच्या आरंभाचे आहेत, असें सहज ओळखतां येत होतें. आम्रवृक्ष मोहरांनीं फुलून गेले होते, ऐनबहारींत आलेल्या मोगऱ्यांच्या वेली आम्रवृक्षांना आलिंगन देण्यांत गढून गेल्या होत्या. फुललेल्या माधवी लतेकडे पाहून असें वाटे कीं, तिनें वृक्षाच्या गळ्यांत विवाहसूचक अशी माळच घातली आहे; आणि अशा स्थितींत त्या वधुवरांना पाहिलें ह्मणजे असें सहजच वाटे कीं, नवागता विश्वलक्ष्मीचें स्वागत करण्यासाठींच हीं दाम्पत्यें उभीं आहेत. अशा रम्य दिवसांत रोहिणी नदीच्या कांठीं एका दगडावर बसून रोहिणीचा क्षीण झालेला देह विशेष बारकाईनें ही कोण बरें पहात आहे? वसंत समयसूचक विश्वलक्ष्मी तर नसेल? छे! ती खास नव्हे. कारण ती स्त्री अगदीं साधें वस्त्र नेसलेली असून तिचा चेहरा गंभीर पण चिंताक्रांत दिसत आहे. ती इतकी स्थिर बसलेली होती कीं, रोहिणी नदीच्या पाण्यावर पडलेलें तिचें प्रतिबिंब कुशलकारागिराच्या जलचित्राप्रमाणें दिसत होतें. केव्हां केव्हां हें चित्र हललें जाई, पण ते वाऱ्याच्या दांडगाईनें नव्हे, तर त्या स्त्रीच्या अश्रूमुळें. तिचे केंस पाठीवर मोकळेच रुळत असून, पुष्कळ दिवस न गुंफल्यामुळें त्यांचा कुरळपणा मोडून गेला होता. ती आभरणविरहित असून काळजीमुळें तिची सुंदर व

सतेज देहलतिका निस्तेज व कृश झाली होती. ती दुःखाचा एक सुस्कारा सोडून ह्मणाली,

"रोहिणी, तुझे वियोगाचे दिवस संपत आले. आतां लवकरच सागराचे दूत जे मेघ ते येतील आणि मग तूं मोठ्या वेगानें पतीच्या भेटीला जाशील; पण रोहिणी, मी मात्र आजन्म वियोगिनी ती वियोगिनीच राहणार असें दिसतें!"

कोण बरें ही वियोगिनी? दुसरी कोण असणार! रोहिणी तटाकीं सिद्धार्थाच्या विलासभवनाजवळच ज्या अर्थी ही अश्रु गाळित आहे, त्या अर्थी ती त्याची अर्धांगीच असली पाहिजे. होय, यशोधरा ती तीच. तिच्याजवळच एक कमलपुष्पांबरोबर लहान सात वर्षांचा मुलगा खेळत आहे, आणि ती मधून मधून त्याच्या बाललीला कौतुकानें पहात आहे, यावरून तो तिचा पुत्र होय. सिद्धार्थ ज्या वेळीं विलासभवनांतून निघून गेला, त्या वेळीं तो अवघा सात दिवसांचा होता. यशोधरेनें त्याचें नांव राहुल असें ठेविलें होतें. ती रोहिणीकांठीं राहुलासह बसलेली असतां एक परिचारिका तिच्याजवळ घाईघाईनें आली व तिला अभिवादन करून ह्मणाली,

"बाईसाहेब, आज एक मोठें आनंदाचें वर्तमान समजलें आहे. आपल्या कपिलवस्तु नगरांत नानादेश पाहिलेले दोन श्रीमान् व्यापारी आलेले असून ते आपण सिद्धार्थांना पाहिल्याची हकीकत सांगत आहेत. ते व्यापारी फार सज्जन असल्यामुळें त्यांनीं सांगितलेली हकीकत सर्वांना खरी वाटत आहे. ते हस्तिनापुराहून कपिलवस्तु येथें आले आहेत. ते सांगतात आह्मी सिद्धार्थाला नुसतें पाहिलें एवढेंच नाहीं तर त्याची पूजा करून आणि त्याच्या चरणांवर मस्तक ठेवून आपणास पावन करून घेतलें आहे. ते असें सांगतात कीं, सिद्धार्थ या वेळीं

राजपुत्र नसून ते जगत्पूज्य बुद्ध झालेले आहेत. त्यांच्या सुधामय वाणीनें असें वाटतें कीं, त्यांनीं जणूं काय मुक्तिदानाचें सत्रच घातलें आहे!"

परिचारिकेनें सांगितलेली ही हकीकत ऐकून यशोधरेला कल्पनातीत आनंद झाला. क्षीणकाय झालेली सरिता वर्षाऋतूंत जशी प्रफुल्ल होते, तसा यशोधरेचा उद्विग्न झालेला चेहरा मधुर हास्यानें पूर्ववत् सुंदर दिसूं लागला. तिचें हृदय गहिंवरून जाऊन डोळ्यांतून अश्रु पडूं लागले. ती परिचारिकेला ह्मणाली,

"सखे, तूं सांगितलेली ही हकीकत जर खरी असेल, तर मी तुला चांगलें बक्षीस देईन. तूं आतां नगरांत जा आणि त्या दोघां व्यापाऱ्यांना विलासभवनांत घेऊन ये. मला त्यांना किती किती तरी विचारावयाचें आहे. त्यांचें शब्दामृत पिण्यासाठीं माझे तृषार्त कान अगदीं व्याकुल झाले आहेत, तर त्यांना लवकर घेऊन ये."

यशोधरेच्या आज्ञेप्रमाणें परिचारिका लागलीच नगरांत गेली व त्या दोघां व्यापाऱ्यांना विलासभवनांत घेऊन आली. यशोधरा त्यांची वाटच पहात बसली होती; तिनें त्या दोघांचा सत्कार करून त्यांना बसावयास आसनें दिलीं व नंतर ती कांहींशी व्याकुलतेनें ह्मणाली,

"हा प्रासाद आपण पावन करण्याचें श्रम घेतलेत, याबद्दल मी आपली फार उपकारी आहें. मीं असें ऐकिलें आहें कीं, आपणास माझ्या पतीचें दर्शन झालें आहे. ते आतां विश्वपूज्य बुद्ध झाले असून मुक्तिदानाचें त्यांनीं सत्र घातलें आहे, हें खरें का? आपण संकोच न बाळगतां सर्व हकीकत मला सांगितल्यास माझ्यावर मोठे उपकार होतील."

त्या व्यापाऱ्यांपैकीं, एकजण नम्रपणें ह्मणाला,

" राजराजेश्वरी, आपण जें हें ऐकलें आहे, तें सर्व खरें आहे; कारण सिद्धार्थ महाराजांना आह्मी प्रत्यक्षच पाहिलें आहे. त्यांची चरणधूली मस्तकावर घेऊन आह्मी पावन झालों आहोंत. ते राजकुमार ह्मणून या विलासभवनांतून निघून गेले, पण ते आज एक गैरिक वसन धारण करून आणि हातांत भिक्षापात्र घेऊन सर्वत्र हिंडत आहेत. पण महाराणी, हें त्यांचें वैभव फार मोठें आहे. सार्वभौम भूपतीपेक्षांहि यावेळीं त्यांचा अधिकार मोठा आहे. गयेजवळ फल्गुनदीच्या कांठीं एक फार मोठा वटवृक्ष आहे, त्या वृक्षाखालीं त्यांचें आह्माला दर्शन झालें. ते आज सर्वांचे बंधु असून सर्वांचे राजे आहेत. देवी, त्यांचा व तुमचा निकट संबंध असल्यामुळें तुह्मी आतां अर्थातच लक्षावधी संतानांच्या मातोश्री झाल्या आहांत. सिद्धार्थांचा अमृतस्यंदी उपदेश आह्मी ऐकला आहे. ते कुशल आहेत. त्यांचें अकुशल असणेंच आतां शक्य नाहीं. ते केवळ यावत् प्राणीमात्राच्या कल्याणासाठींच या मर्त्यलोकीं अवतरले आहेत. त्यांचा उपदेश ऐकून रोज हजारों शिष्य त्यांच्या धर्मछत्राखालीं येत आहेत. आह्मी देखील त्यांच्या उपदेशामृतानें त्यांना विकलों गेलों आहोंत. आह्मी त्यांच्या पायांचे दास आहोंत !"

यशोधरा गहिंवरून ह्मणाली,

" त्यांनीं हें महाज्ञान कशा रीतीनें मिळविलें, आणि ते आतां कोठें आहेत, याची कांहीं तुह्माला माहिती आहे का ?"

गौतमास प्राप्त झालेल्या सिद्धीसंबंधानें गयेच्या आसमंतात ज्या लोकवार्ता पसरल्या होत्या, त्या सर्व यशोधरेला सांगून तो व्यापारी ह्मणाला,

" मातोश्री, हल्लीं सिद्धार्थ हे ठिकठिकाणीं हिंडून आपल्या नवधर्मप्रचाराचें कार्य करीत आहेत. कौंडिन्य, भद्रक, अश्वाजित, वासव, व

महानाद या प्रसिद्ध पांच ब्राह्मणांनीं त्यांचें शिष्यत्व पत्करिलें असून यशद या नांवाचा एक राजपुत्र आपल्या चौपन अनुयायांसह त्यांचा शिष्य झाला. हे साठ शिष्यहि आतां ठिकठिकाणीं जाऊन धर्मप्रसार करीत आहेत. आह्मी इकडे आलों त्यावेळीं असें ऐकलें कीं, सिद्धार्थ हे बिंबिसार राजाच्या राज्यांतील वेणुवनांत असून त्यांची शिष्यसंख्या नऊशें झाली आहे. आह्मांला असेंहि समजलें आहे कीं, ते धर्मप्रसार करीत करीत लवकरच कपिलवस्तु नगरास येणार आहेत."

व्यापाऱ्यांनीं सांगितलेली ही हकीकत ऐकून यशोधरेचें मरुभूमी-प्रमाणें रुक्ष झालेलें अंत:करण वर्षाकालांतील उद्यानाप्रमाणें सार्द्र झालें. तिनें त्या दोघांचा यथोचित गौरव करून त्यांना निरोप दिला आणि राजगृह शहराकडून कपिलवस्तुकडे येणाऱ्या मार्गानें सिद्धार्थाचा शोध करण्यासाठीं दूत पाठवून दिले; पण ते दूत जाऊन एकदोन दिवस झाले नाहींत तोंच सिद्धार्थ हजारों शिष्यांसह कपिलवस्तु नगरांत येत असल्याची आनंददायक वार्ता सर्वत्र पसरली. त्या वार्तेनें वृद्ध शुद्धोदन आणि गौतमी या दोघांना जो आनंद झाला तो कल्पनातीत होय. हजारों शिष्यांसह सिद्धार्थ येत आहे, तेव्हां त्या सर्वांची चांगल्या रीतीनें व्यवस्था रहावी ह्मणून शुद्धोदनानें कपिलवस्तुजवळ न्याग्रोध नांवाच्या गांवीं एक विस्तृत व सुंदर मंडप उभारला होता. ज्या दिवशीं त्या मंडपांत सिद्धार्थ येऊन पोहोंचणार होता, त्या दिवशीं त्याला पाहण्यासाठीं हजारों लोक मंडपासभोंवतीं व रस्त्यावर गोळा झाले होते. पतीच्या दर्शनासाठीं आतुर झालेली यशोधरा राहुलाला घेऊन अगोदरच मंडपांत आली होती. तिला येऊन थोडा वेळ झाला नाहीं, तोंच सिद्धार्थ आपल्या हजारों शिष्यांसह त्या मंडपांत आला. सिद्धार्थाची ती दिव्य कांति आणि तो भिक्षूचा वेश पाहून कपिलवस्तुच्या लोकांच्या डोळ्यां-

" राजराजेश्वरी, आपण जें हें ऐकलें आहे, तें सर्व खरें आहे; कारण सिद्धार्थ महाराजांना आह्मी प्रत्यक्षच पाहिलें आहे. त्यांची चरणधूळी मस्तकावर घेऊन आह्मी पावन झालों आहोंत. ते राजकुमार ह्मणून या विलासभवनांतून निघून गेले, पण ते आज एक गैरिक वसन धारण करून आणि हातांत भिक्षापात्र घेऊन सर्वत्र हिंडत आहेत. पण महाराणी, हें त्यांचें वैभव फार मोठें आहे. सार्वभौम भूपतीपेक्षांहि यावेळीं त्यांचा अधिकार मोठा आहे. गयेजवळ फल्गुनदीच्या कांठीं एक फार मोठा वटवृक्ष आहे, त्या वृक्षाखालीं त्यांचें आह्माला दर्शन झालें. ते आज सर्वांचे बंधु असून सर्वांचे राजे आहेत. देवी, त्यांचा व तुमचा निकट संबंध असल्यामुळें तुह्मी आतां अर्थातच लक्षावधी संतानांच्या मातोश्री झाल्या आहांत. सिद्धार्थांचा अमृतस्यंदी उपदेश आह्मी ऐकला आहे. ते कुशल आहेत. त्यांचें अकुशल असणेंच आतां शक्य नाहीं. ते केवळ यावत् प्राणीमात्राच्या कल्याणासाठींच या मर्त्यलोकीं अवतरले आहेत. त्यांचा उपदेश ऐकून रोज हजारों शिष्य त्यांच्या धर्मछत्राखालीं येत आहेत. आह्मी देखील त्यांच्या उपदेशामृतानें त्यांना विकलों गेलें आहोंत. आह्मी त्यांच्या पायांचे दास आहोंत!"

यशोधरा गहिंवरून ह्मणाली,

" त्यांनीं हें महाज्ञान कशा रीतीनें मिळविलें, आणि ते आतां कोठें आहेत, याची कांहीं तुह्माला माहिती आहे का?"

गौतमास प्राप्त झालेल्या सिद्धीसंबंधानें गयेच्या आसमंतात ज्या लोकवार्ता पसरल्या होत्या, त्या सर्व यशोधरेला सांगून तो व्यापारी ह्मणाला,

" मातोश्री, हल्लीं सिद्धार्थ हे ठिकठिकाणीं हिंडून आपल्या नवधर्मप्रचाराचें कार्य करीत आहेत. कौंडिन्य, भद्रक, अश्वाजित, वासव, व

महानाद या प्रसिद्ध पांच ब्राह्मणांनीं त्यांचें शिष्यत्व पत्करिलें असून यशद या नांवाचा एक राजपुत्र आपल्या चौपन अनुयायांसह त्यांचा शिष्य झाला. हे साठ शिष्यहि आतां ठिकठिकाणीं जाऊन धर्मप्रसार करीत आहेत. आह्मी इकडे आलों त्यावेळीं असें ऐकलें कीं, सिद्धार्थ हे बिंबिसार राजाच्या राज्यांतील वेणुवनांत असून त्यांची शिष्यसंख्या नऊशें झाली आहे. आह्माला असेंहि समजलें आहे कीं, ते धर्मप्रसार करीत करीत लवकरच कपिलवस्तु नगरास येणार आहेत."

व्यापाऱ्यांनीं सांगितलेली ही हकीकत ऐकून यशोधरेचें मरुभूमी-प्रमाणें रुक्ष झालेलें अंतःकरण वर्षाकालांतील उद्यानाप्रमाणें सार्द्र झालें. तिनें त्या दोघांचा यथोचित गौरव करून त्यांना निरोप दिला आणि राजगृह शहराकडून कपिलवस्तुकडे येणाऱ्या मार्गानें सिद्धार्थाचा शोध करण्यासाठीं दूत पाठवून दिले; पण ते दूत जाऊन एकदोन दिवस झाले नाहींत तोंच सिद्धार्थ हजारों शिष्यांसह कपिलवस्तु नगरांत येत असल्याची आनंददायक वार्ता सर्वत्र पसरली. त्या वार्तेनें वृद्ध शुद्धो-दन आणि गौतमी या दोघांना जो आनंद झाला तो कल्पनातीत होय. हजारों शिष्यांसह सिद्धार्थ येत आहे, तेव्हां त्या सर्वांची चांगल्या रीतीनें व्यवस्था रहावी ह्मणून शुद्धोदनानें कपिलवस्तुजवळ न्याग्रोध नांवाच्या गांवीं एक विस्तृत व सुंदर मंडप उभारला होता. ज्या दिवशीं त्या मंडपांत सिद्धार्थ येऊन पोहोंचणार होता, त्या दिवशीं त्याला पाह-ण्यासाठीं हजारों लोक मंडपासभोंवतीं व रस्त्यावर गोळा झाले होते. पतीच्या दर्शनासाठीं आतुर झालेली यशोधरा राहुलाला घेऊन अगोदरच मंडपांत आली होती. तिला येऊन थोडा वेळ झाला नाहीं, तोंच सिद्धार्थ आपल्या हजारों शिष्यांसह त्या मंडपांत आला. सिद्धार्थाची ती दिव्य कांति आणि तो भिक्षूचा वेश पाहून कपिलवस्तुच्या लोकांच्या डोळ्यां-

तून प्रेमाश्रु वाहूं लागले. यशोधरेचें तर अंतःकरण गहिंवरून येऊन तिचा कंठ दाटून आला. सिद्धार्थ मंडपांत येण्याबरोबर ती त्याच्या पायांवर मस्तक ठेवून ह्मणाली,

" नाथ, मी आपली अर्धांगी असतां मला आपल्या नवधर्मोची अनुयायिनी करण्यास आपण हा किती उशीर केलात? आतां ही भिक्षेची झोळी माझ्या खांद्यांवर द्या आणि तो आपला भिक्षुदंड माझ्या राहुलाच्या हातीं द्या. आपल्या धर्माचा स्वीकार करण्यास स्त्रियांना कांहीं हरकत तर नाहींना?"

असें ह्मणून यशोधरेनें पतीच्या खांद्यावरची झोळी आपल्या हातीं घेतली आणि दंड राहुलाच्या हातीं दिला. हा प्रकार पाहून प्रेक्षकांचीं हृदयें प्रेमानें उचंबळून आलीं. सिद्धार्थालाहि धन्य धन्य असें वाटलें. तो यशोधरेला ह्मणाला,

" यशोधरे, सिद्धार्थाच्या अर्धांगीला जें शोभलें, तेंच तूं केलेंस. माझ्या धर्मच्छत्रांत स्त्रीपुरुष, उच्चनीच हा भेदभावच नाहीं आणि माझा धर्ममंत्र ह्मणजे कांहीं कानांतली गोष्ट नाहीं, **बुद्धं शरणं गच्छामि। धर्मं शरणं गच्छामि। संघं शरणं गच्छामि॥** हाच माझा दीक्षामंत्र. ( १ ) हिंसा करूं नका, ( २ ) चोरी करूं नका, ( ३ ) विषयोपभोगाला मर्यादा ठेवा, ( ४ ) असत्य बोलूं नका, आणि ( ५ ) मादक पदार्थांचें सेवन करूं नका. या माझ्या पांच धर्माज्ञा असून त्या जो पाळील, तो जीवन्मुक्त होईल. त्याला निर्वाणाची प्राप्ती होईल. या नियमांनीं प्रत्येकानें आपणास बद्ध करून घेतल्यास सर्व जग सुखाच्या शिखरावर जाईल."

सिद्धार्थाचे ते शब्द ऐकून 'आह्मीं आपल्या धर्माचा स्वीकार केला,' असा जमलेल्या सर्व लोकांनीं एकच गजर करून आकाश दुमदुमून

सोडलें. मंडपांत शुद्धोदन व गौतमी दिसत नाहींत, असें पाहून सिद्धार्थ आपल्या सर्व शिष्यांसह कपिलवस्तु नगरांत गेला. सिद्धार्थ हातांत भिक्षापात्र घेऊन सर्वांच्यापुढें चाललेला असून, त्याच्या मागें यशोधरा, यशोधरेच्या मागें राहुल आणि राहुलाच्या मागें हजारों शिष्य चालले होते. याच वेळीं शुद्धोदन सिद्धार्थाला भेटावयाला जाण्याची तयारी करीत होता. इतक्यांत राजवाड्याच्या सिंहदरवाजांत गैरिक वस्त्र परिधान केलेल्या व हातांत भिक्षापात्र घेतलेल्या सिद्धार्थाला पाहून वृद्ध रागानें व प्रेमानें वेडा झाला. तो विद्युत् वेगानें सिद्धार्थाजवळ आला व त्याला आपल्या हृदयाशीं धरून ह्मणाला,

" सिद्धार्थ, तुझ्या पायाशीं ही गजांतलक्ष्मी लोटांगण घालीत असतां हें भिक्षापात्र कशाला हातांत धारण केलेंस ? तें टाकून दे आणि राजदंड हातांत घेऊन सिंहासनावर बैस. या वृद्ध पित्याची एवढी इच्छा पूर्ण कर !"

सिद्धार्थ गंभीर स्वरानें ह्मणाला,

"बाबा, तें होणें आतां शक्य नाहीं. हा आमचा कुलधर्म आहे. तो आह्मी चालविला पाहिजे ?"

" कुलधर्म ? भीक मागण्याचा कुलधर्म शाक्यवंशांतील एकाहि नरपुंगवानें चालविला नाहीं. मग तूंच भिक्षेला कुलधर्म कसा ह्मणतोस ?"

" बाबा, तुह्मी फक्त मला जन्म दिलात; पण तेवढ्यानें कांहीं माझ्या कुलधर्माला बाध येत नाहीं. आपणास अगोचर अशाच सत्पुरुषांचा मी वंशज आहें, आणि भिक्षा मागून जगाला ज्ञानदान द्यावयाचें, हा आमचा कुलधर्म आहे. मला आपल्या राज्याची अपेक्षा नाहीं. त्याचा आपण वाटेल तो विनियोग करा."

"तूं असें स्पष्ट सांगितल्यावर मला आतां या राहुलाला राज्यावर बसविणें भाग आहे. ये, राहुला ये; तूंच या राज्याचा उपभोग घे."

असें ह्मणून शुद्धोदन राहुलास घेण्यासाठीं पुढें झाला; पण तो चटकन् यशोधरेच्या पायाला मिठी मारून ह्मणाला,

"आजोबा, मला नको तें राज्य, मी आपला बाबांबरोबर भीक मागतच फिरेन."

राहुलासारख्या लहान पोराचे ते शब्द ऐकून ह्मातान्याची स्थिति मोठी चमत्कारिक झाली. तो मोठ्यानें आक्रोश करीत ह्मणाला,

"तर या राज्याचा कोण उपभोग घेणार? अरे देवदत्त, नंद, तुह्मी तरी या, आणि या राज्याचा स्वीकार करा."

देवदत्त वगैरे शुद्धोदनाचे पुतणे होते; पण त्यांनींहि आपण भिक्षू झाल्यामुळें राज्याचा स्वीकार करीत नाहीं असें सांगितलें. इतकें झालें तरी त्या ह्मातान्याची राज्यतृष्णा कमी झाली नाहीं. त्यानें गौतमाच्या धर्माचा स्वीकार केला, पण तें राज्य दुसऱ्या कोणासहि दान न करितां मरेपर्यंत तो त्याचा उपभोग घेत होता. आईबापाचें दर्शन घेतल्यावर सिद्धार्थानें कपिलवस्तु नगर सोडलें व राहुल व यशोधरा यांसह तो देशोदेशीं धर्मप्रसार करीत फिरूं लागला. यानंतर कांहीं वर्षांनीं शुद्धोदन वार्धक्यानें फारच जर्जर झाला व आतां आपण वांचत नाहीं, असें वाटल्यावर त्यानें सिद्धार्थाला बोलावून आणलें. सिद्धार्थ कपिलवस्तु येथें आल्यावर शुद्धोदनाचा देहांत झाला. त्यावेळीं सिद्धार्थानें पुत्रधर्माप्रमाणें पित्याची अंत्येष्टि क्रिया चांगल्याप्रकारें करून तें राज्य एका दूरच्या आप्तास देऊन टाकलें. त्यानंतर सिद्धार्थ कपिलवस्तु येथें पुन्हां केव्हांहि गेला नाहीं. त्याचें धर्मप्रसाराचें कार्य एकसारखें अविरत चाललें होतें. त्याचें शिष्य दूरदेशांतरीं जाऊन त्यांनीं जिकडे तिकडे त्या धर्माचा

प्रसार केला होता. याप्रमाणें ऐंषी वर्षांचें वय होईपर्यंत सिद्धार्थानें आपलें धर्मकार्य केलें. आपला निर्वाणसमय त्यास अगोदरच कळला होता. त्याला तो समय कळल्यावर तो आपल्या मुख्य शिष्यांना ह्मणाला,

"शिष्यहो, थोडक्याच दिवसांत माझी प्राणज्योति मावळून जाणार असल्याचें मला समजलें आहे. तेव्हां तुह्माला शेवटचें ह्मणून सांगावयाचें इतकेंच कीं, एकसारखे धर्माचा प्रसार करीत रहा आणि कालत्रयींहि धर्मपराङ्मुख होऊं नका." त्या सर्व शिष्यांत काश्यप हा मुख्य होता. त्याला एकांतीं बोलावून सिद्धार्थ ह्मणाला,

"काश्यप, माझीं हीं वस्त्रें तूं घे आणि तुझीं मला दे. तूं आणि मी दोघेहि एकच आहोंत. माझें हें कार्य तूं पुढें चालव आणि हें अमृत तत्व सगळ्या जगाला सुलभ करून टाक."

काश्यपानें गुरुजीची ती आज्ञा शिरसामान्य केली; नंतर आपला देहत्याग कुशीनगराजवळ करावा, या विचारानें सिद्धार्थ वेणुवनांतून तिकडे जाण्यास निघाला. वाटेंत चंड नांवाच्या एका व्याधानें सिद्धार्थाचा सत्कार करावा या उद्देशानें डुकराचें मांसान्न तयार केलें आणि तें ग्रहण करण्याविषयीं त्याला विनंति केली. सिद्धार्थ जातिभेद मानीत नसल्यामुळें त्यानें तें अन्न मोठ्या संतोषानें भक्षण केलें; पण वृद्धावस्थेंत तें अन्न पचविण्याची शक्ति सिद्धार्थाला नसल्यामुळें त्याला आमांश झाला व तो मोठ्या कष्टानें कुशीनगर येथें येऊन पोहोंचला. तो अगदीं क्षीण झाला होता तरी आपल्या शिष्यांना तो एकसारखा धर्मोपदेश करीतच होता. रात्रीच्या वेळीं तो एका विशाल वटवृक्षाखालीं शिष्यांना जवळ बोलावून ह्मणाला,

"शिष्य हो, तुह्मी असें समजूं नका कीं, मी हें जग सोडून कायमचाच चाललों आहें. माझें जें सत्यतत्व तें अक्षय राहणारें आहे आणि

त्याच्या संवर्धनाचा सतत प्रयत्न करणें हेंच प्रत्येक भिक्षूचें कर्तव्य होय. हें कर्तव्य जोंपर्यंत तुह्मी करीत आहां, तोंपर्यंत मी तुमच्याजवळच आहें, असें समजा !"

सिद्धार्थाचे शेवटचे शब्द ते हेच. हे शब्द उच्चारून होतांच त्याची प्राणज्योति त्याचें शरीर सोडून गेली. सर्व शिष्यांत हाहाःकार उडाला. सर्वांच्या डोळ्यांतून अश्रु गळूं लागले. आनंद नावांच्या शिष्यानें तें वर्तमान रात्रींच्यारात्रीं जिकडे तिकडे शिष्य पाठवून सर्वत्र कळविलें. सिद्धार्थाचे अनेक राजे वगैरे शिष्य होते, ते सर्व निधनवृत्त कळतांच कुशिनगरास येऊन दाखल झाले. सिद्धार्थाच्या अंत्यविधीसाठीं लक्षावधी लोक गोळा झाले होते. सर्व तयारी झाल्यावर चितेला अग्नि लावला; परंतु चिता पेटेना. पुष्कळ प्रयत्न करूनहि चिता पेटत नाहीं, असें झाल्यावर कित्येकांना अशी शंका आली कीं, गौतमाचा प्रिय शिष्य काश्यप जवळ नसल्यामुळें चिता अग्नि घेत नसावी. ही शंका येतांच सर्व काश्यपाची वाट पहात बसले. इतक्यांत काश्यप आपल्या पांचशें शिष्यांसह तेथें आला व त्यानें स्मशानांत पाऊल टाकलें नाहीं, तोंच चितेनें पेट घेऊन तिच्या ज्वाळा आकाशास जाऊन भिडल्या, व थोडक्याच वेळांत त्या महापुरुषाचें शरीर भस्मीभूत होऊन गेलें. बुद्धाचा अवतार येथें संपला; पण त्याचें तें सत्यतत्व अद्याप आपल्या दिव्य तेजानें संपूर्ण जगाला प्रकाशित करीत असून, सूर्यचंद्राच्या अस्तित्वाप्रमाणें तें तत्वहि जगांत अक्षय राहणार हें उघड होय.

## प्रकरण आठवें.


# उपसंहार.

यत्किंचित् जगतो दुःखं तत् सर्वं मयि पच्यताम् ।
बोधिसत्व शुभैः सर्वैः जगत् सुखितमस्तु च ॥

शिरोभागीं दिलेला श्लोक हा बौद्धधर्मांतील विशेष होय. निर्वाण हें जसें बौद्धधर्माचें ध्येय, त्याप्रमाणें वरील श्लोकांत गौतमानें बौद्धधर्माचें कार्य सांगितलें आहे. या कार्याविषयीं थोडासा उल्लेख करून हा चरित्रात्मक लेख येथें संपवावयाचा आहे. बौद्धभिक्षु निर्वाण प्राप्त करून घेण्यासाठीं जो एक मार्ग आपल्या डोळ्यांपुढें ठेवतो, त्याला प्रतीत्यसमुत्पाद तत्व असें ह्मणतात. अविद्येपासून संस्कार, संस्कारापासून विज्ञान, विज्ञानापासून नामरूप, नामारूपापासून षडायतन, षडायतनापासून स्पर्श, स्पर्शापासून वेदना, वेदनेपासून तृष्णा, तृष्णेपासून उपादान, उपादानापासून भव, भवापासून जाति आणि जातीपासून जरामरणादि दुःख; याप्रमाणें दुःखाचें मूळ शोधण्याची बौद्धधर्मानुयायांची कल्पना आहे. दुःख व अधोगामि अवस्थेचें कारण अविद्या हें होय असें त्यांचें मत आहे. या अविद्येचा नाश करण्याचा प्रयत्न करणें हेंच बौद्धभिक्षूचें कर्तव्य होय. बौद्धदर्शनशास्त्रांत दुःख, दुःखाची उत्पत्ति, दुःखाचा नाश व दुःखनाश करण्याचा उपाय अशा क्रमानें विचार केलेला आहे. त्यांत दुःखाचा नाश करण्यासाठीं अष्टांगिक मार्ग सांगितले आहेत. सम्यक्दृष्टि, सम्यक् संकल्प, सम्यक् वाक्, सम्यक् कर्म, सम्यक् आजीव, सम्यक् व्यायाम, सम्यक् स्मृति

आणि सम्यक् समाधि, हे अष्टांगिक मार्ग होत. जगांत जेवढे प्रचलित धर्म आहेत, ते दोन प्रकारचे आहेत. कांहीं प्रवृत्तिमूलक आहेत, कांहीं निवृत्तिमूलक आहेत. बौद्धधर्म हा निवृत्तिमूलक आहे. वासनेचा निरोध करणें हा बौद्धधर्मभिक्षूचा मुख्य अभ्यास होय. कारण वासना नाहींशा झाल्यावांचून शांति प्राप्ति होत नाहीं, असें त्यांचें मत आहे. बौद्धधर्माचें दुसरें मुख्य तत्व ह्मणजे अहिंसा. क्षुल्लक कृमिकीटकांचा देखील नाश आपणाकडून होऊं नये ह्मणून बौद्धधर्मी फार काळजी घेतात; पण असें असतांहि त्या धर्मांत मांसान्नाचा निषेध कोठें दिसून येत नाहीं, याबद्दल थोडें आश्चर्य वाटतें. तिसरें मुख्य तत्व दुसऱ्यावर परोपकार करणें हें होय. प्रसंगीं स्वत: वाटेल तितके क्लेश सोसा, पण दुसऱ्यावर परोपकार करण्याची संधि गमावूं नका, अशी बुद्धाची आज्ञा आहे. वरील तिन्हीं तत्वें महत् असून तीं बौद्धधर्मियांनींच काय, पण प्रत्येक मनुष्यमात्रानें आचरणांत आणणें हें प्रत्येकाचें कर्तव्य होय.

हें बौद्धधर्माचें स्थूल स्वरूप होय. आतां बुद्धकालीन प्रसिद्ध स्थलांविषयीं थोडें विवेचन करूं. भगवान् गौतमबुद्धाचें शव दहन केल्यावर त्याचें भस्म व अस्थि गंगार्पण न करितां महापुरुषाचें स्मृतिचिन्ह हणून तीं सुरक्षित ठेवावयाचीं असें मुख्य शिष्यांनीं ठरविलें व त्याप्रमाणें कांहीं शिष्यांनीं तीं थोडीं थोडीं वाटून घेतलीं. पुढें त्यावेळच्या बौद्धधर्मी राजांनीं तें भस्म व अस्थि हीं त्या शिष्यांकडून त्यांच्या अनुमतीनें मिळवून त्यांवर ठिकठिकाणीं मोठालीं सुंदर मंदिरें बांधलीं. अशाप्रकारचा मजकूर पुष्कळ प्राचीन प्रवाशांच्या प्रवासवर्णनांत आढळून येतो; परंतु तीं मंदिरें आज कोठें उपलब्ध नसल्यामुळें जिज्ञासू व शोधक लोकांना मोठी चुटपुट लागली होती. कदाचित् तें सर्व खोटें असावें, असें देखील कांहीं ह्मणूं लागले होते; पण



बुद्धदत.
सारनाथस्तूप.

बुद्धगया मंदिर.
चिताभस्म करंड.

थोड्या दिवसांपूर्वीं पेशावर येथें हें चिताभस्म सांपडल्यामुळें त्यावेळच्या इतिहासाला पुष्कळ बळकटी आली आहे. त्यावेळीं पेशावरचें नांव पुरूषपूर असें असून तेथें कानिष्क या नांवाचा राजा राज्य करीत होता. त्या राजाला बुद्धानंतर कांहीं वर्षांनीं हें चिताभस्म एका बुद्ध-भिक्षूकडून मिळाल्यावर तें त्यानें एका सुंदर समाधींत ठेवून त्यावर फार मोठें व अत्यंत सुंदर असें मंदिर बांधलें होतें. येशु ख्रिस्ताच्या मृत्यूनंतर जे बौद्धधर्मी चिनी प्रवासी हिंदुस्थानांत आले होते, त्यांच्या प्रवासवर्णनांत या मंदिराचा उल्लेख आलेला होता; पण गिजनीच्या महंमदानें हिंदुस्थानावर स्वारी केली, त्यावेळीं त्यानेंच बहुतेक हें मंदिर पाडून टाकलें व त्यामुळें त्याचा आजवर कोणासच कांहीं पत्ता लागला नाहीं. परंतु थोड्या दिवसांपूर्वीं सरकारच्या आश्रयानें निघालेल्या पुराणवस्तुसंशोधक मंडळीनें हें मंदिर शोधून काढण्याचें काम हातीं घेतलें व प्राचीन इतिहासाच्या अनुरोधानें खणीत असतां त्यांना तें मंदिर—मंदिराचे शेषावयव—उमगून आलें. हें मंदिर एकशें नव्वद हात रुंद असून त्या मानानेंच लांब व उंच होतें. या मंदिराचे मोडून पड-लेले खांब इतके उंच व मोठे आहेत कीं, ते पाहून कोणासहि आश्चर्य वाटतें. तेथें पुष्कळ मोठमोठालीं मातीचीं भांडींहि सांपडलीं असून त्यावर पालीभाषेंत कांहीं लिहिलेलें आहे. हें मंदिर खालीं आणखी खोल खणून पाहिल्यावर समाधीसारखी बांधलेली दगडाची एक आकृति दृष्टीस पडली व ती फोडून काढल्यावर संशोधक मंडळाच्या कल्पनेप्रमाणें त्यांत एक व्यवस्थेनें ठेवलेला करंडा आढळून आला. आज कित्येक वर्षें तो करंडा त्या जागेंत असल्यामुळें त्याचा रंग बदलून जाऊन तो मातीप्रमाणें दिसत होता, पण स्वच्छ करून पाहि-ल्यावर असें दिसून आलें कीं, तो तांबें व पितळमिश्रित धातूचा

असून त्यावर उत्कृष्ट नकशीकाम केलेलें आहे. ही नकशी त्या वेळच्या ग्रीक कारागिराची असून त्यानें आपलें नांवहि त्यावर कोरलें आहे. या करंड्याच्या वरच्या बाजूला एक पुष्कळ पाकळ्यांचें कमल तयार केलेलें असून त्याच्या मध्यभागीं बुद्धमूर्ति व एका बाजूस ब्रह्मा व एका बाजूस इंद्र यांच्या मूर्ति आहेत. हा करंडा उघडल्यावर स्फटिकाचा एक वाटोळा गोळा सांपडला व तो अगदीं स्वच्छ होता. हा गोळा पोकळ असून त्याचें मुख मातीनें बंद केलेलें होतें. या मातीवर हत्तीछापाची मोहर होती, यावरून तें मंदिर कनिष्काचेंच होय असें अगदीं स्पष्ट झालें आहे. कारण कानिष्काच्या राज्याचा शिक्का हत्तीछापाचा होता. ही माती काढून छिद्र मोकळें केल्यावर आंत थोडी राख व लहान लहान हाडकांचे चार तुकडे मिळाले. सरकारनें ती राख व ते तुकडे ब्रह्मदेशांतील बुद्धमठाला दिल्याचें प्रसिद्ध झालें आहे.

या अस्तीपेक्षां बुद्धदंताचा इतिहास तर फारच गंमतीचा आहे. सिद्धार्थास दहन केल्यानंतर त्याची रक्षा व अस्ति गोळा करीत असतां त्याचा एक दांत एका शिष्याला सांपडला व त्यानें तो दांत कलिंगदेशांतील दंतपूरच्या राजाला दिला. हा राजा बौद्धधर्मी असून त्याच्या घराण्यांत तो दांत आठशें वर्षेपर्यंत होता. पुढें दक्षिणेंतील पांडु नांवाच्या राजानें कलिंग देशावर स्वारी करून दंतपूरचें सर्व द्रव्य-भांडार लुटून आणलें; त्यावेळीं तो दांत दक्षिणेंत आला. पण पुढें तो दांत अशुभ असून त्यापासून आपलें अनिष्ट होत आहे, अशी पांडुराजाची समजूत झाल्यावर त्यानें तो दांत दंतपूरच्या राजाला परत नेऊन दिला. या गोष्टीला बरींच वर्षें झाल्यावर असा एक लोकभ्रम उत्पन्न झाला कीं, ज्या बौद्धधर्मी राजाजवळ तो दांत असेल, त्याला सार्वभौमत्व प्राप्त होईल. या भ्रामक समजुतीवर पुष्कळ राजांनीं

विश्वास ठेवून दंतपुरावर वारंवार स्वाऱ्या करण्यास आरंभ केला. शेवटीं एका स्वारींत दंतपूर शत्रु जिंकून घेणार, अशी वेळ आल्यावर त्यावेळच्या राजाच्या मुलीनें तो दांत आपल्या केंसांत लपविला व ती आपल्या पतीसह जलमार्गानें लंकेंत पळून गेली. कारण त्या वेळीं लंकेंत बुद्धधर्माचा बराच प्रसार झालेला होता. अशा रीतीनें हा दांत इ. स. ३१० च्या सुमारास लंकेंत गेला. त्यावेळचा लंकेचा राजा कीर्तिश्री मेघवर्ण यानें त्या कन्येचा चांगला सत्कार केला व अनुराधापूर येथील एका मंदिरांत तो दांत ठेवला. प्रथम तेथील लोकांना या दांताविषयीं कांहीं मोठेंसें कौतुक वाटलें नाहीं; पण ज्याच्याजवळ दांत असेल, तो सार्वभौम भूपति होतो, असें लंकेंतील लोकांना समजल्यावर तो दांत चोरण्याचे व त्यासाठीं एकमेकांशीं युद्ध करण्याचे अनेक प्रयत्न लंकेंतहि सुरू झाले. या राजाजवळून त्या राजाजवळ असें होतां होतां तो दांत इ. स. १३१४ च्या सुमारास दक्षिणेंतील पांड्य नांवाच्या राजाला मिळाला. हा राजा हिंदू असून त्यानें तो दांत मदुरा येथें ठेवला होता. पुढें लंकेंतील पराक्रमबाहु नांवाच्या राजानें पांड्यराजाला विनंति करून तो दांत लंकेंत नेला व इ. स. १३१९ मध्यें तो हस्तिशेलपूर येथें ठेवला. यानंतर पोर्तुगीज लोकांचा शिरकाव लंकेंत झाला व तेहि तो दांत मिळविण्याचा प्रयत्न करूं लागले. परंतु तो दांत मिळविण्यांत त्यांचा हेतु दांताचा नाश करून टाकण्याशिवाय दुसरा कोणताच नव्हता. या वेळीं जाफना येथील हिंदू राजानें बौद्धधर्मियांविषयीं थोडी मुत्संदेगिरी करून एक खोटा दांत पोर्तुगीज लोकांच्या स्वाधीन केला व खरा दांत एका बौद्ध भिक्षूजवळ देऊन त्याला तो जपून ठेवण्याविषयीं सांगितलें. मिळालेला खोटा दांत पोर्तुगीज लोकांनीं गोवें येथें आणला व तेथें तो मोठ्या अभिमानानें जाळून टाकला. यानंतर लंकें-

तील कित्येक राजे रोमनक्याथोलिक धर्माचा स्वीकार करून राज्य करीत होते. त्यांची सत्ता असेतोंपर्यंत बुद्धदंत बाहेर आला नाहीं, पण विमलचंद्र नांवाच्या बौद्धधर्मानुयायी राजाच्या हातीं इ. स. १५८९ सालीं राज्य आल्यावर हा दांत एका बौद्ध भिक्षूनें त्या राजाजवळ आणून दिला. त्या राजानें तो दांत ठेवण्यासाठीं क्यांडी शहराजवळ मालिगांव नांवाच्या गांवीं एक फारच सुंदर मंदिर बांधलें व त्यांत तो दांत सर्वांच्या दर्शनासाठीं सूवर्णकमलांत ठेवला. हा दांत प्रथम अगदीं उघडा ठेवला होता; पण तो चार दोन वेळ चोरण्याचे प्रयत्न झाल्यामुळें एका राजानें सात सुवर्णकरंड्यांतून तो दांत मोठ्या बंदोबस्तानें ठेवण्याची व्यवस्था सुरू केली व तेंव्हांपासून तों हा वेळपर्यंत तीच व्यवस्था कायम आहे. इतकीं वर्षें जपून ठेवलेला दांत पाहण्याची इच्छा सिलोनमध्यें गेलेल्या प्रवाशांना साहजिक होते; पण ती इच्छा फारच थोड्यांची पूर्ण होते. तेथील मंदिरसंरक्षक, मुख्य धर्माधिकारी आणि मुख्य युरोपियन अंमलदार या तिघांची एकवाक्यता करून घेतल्यास तो दांत दृष्टीस पडतो. ज्या मंदिरांत दांत ठेवलेला आहे, तें मंदिर मात्र सर्वांना पाहूं देतात; आणि तें प्रत्येक प्रवाशानें अवश्य पहावें इतकें प्रेक्षणीयहि आहे. मंदिराच्या सिंहद्वारावर '**सर्वज्ञवक्त्रसरसीरुहराजहंसं । कुंदेंदुसुंदररुचिं सुरवृंदवंद्यं । सद्धर्मचक्रसहजं जनपारिजातं । श्रीदंतधातुममलं प्रणमामि भक्त्या ॥**' असा श्लोक लिहिलेला आहे. मंदिराच्या गाभाऱ्यांत चांदीचा एक भला मोठा चौरंग ठेवलेला असून, त्याच्या सभोंवार खालपासून वरपर्यंत भक्कम कठडा केलेला आहे व त्याचें दार नेहमीं बंद असतें. हा चौरंग जरी फार मोठा आहे, तरी तो फार सुंदर आहे. या चौरंगावर हातांत धरून वाजवावयाच्या घंटेच्या आकाराचा एक सुवर्णाचा

फार मोठा व तितकाच सुंदर कारागिराचा करंडा ठेवलेला आहे. या करंड्यावर अनेक हिरेमाणकें बसविलेलीं असून तीं आपल्या अंगच्या तेजानें नेहमीं चमकत असतात. याच सुंदर व विशाल करंड्यांत तो बुद्धदंत ठेवलेला आहे; पण करंडा उघडल्याबरोबर तो दांत दृष्टीस पडेल, असें मात्र कोणी समजूं नये. कारण त्यांत एकापेक्षां एक लहान असे सहा करंडे असून शेवटच्या लहान करंड्यांत तो ठेवलेला आहे. प्रत्येक करंडा सुवर्णाचा व रत्नजडित असून शेवटच्या अगदीं लहान करंड्याची उंची एक फूट व व्यास दहा इंच आहे. यावरून अगदीं वरचा करंडा केवढा असेल, व त्या सातहि करंड्यांना किती सुवर्ण लागलें असेल आणि रत्नांसह त्यांची किती किंमत असेल, याचा विचार करणारास साहजिक आश्चर्य वाटण्यासारखें आहे. अगदीं लहान करंड्यांत सुवर्णाचें कमल असून त्या कमलांत बुद्धदंत ठेवलेला आहे. या दांताला बौद्धधर्मियांप्रमाणें हिंदु व मुसलमानहि प्रिय मानतात. कारण हा दांत हिंदु मारुतीचा व मुसलमान महंमदाचा समजतात. कित्येकांच्या मतें बुद्धदंत ह्मणजे दंत नसून एक बनावट स्फटिकाचा तुकडा आहे !

बुद्धधर्मी लोक तीर्थयात्रा करणें हें मोठें पुण्य कृत्य समजतात. त्यांचीं मुख्य तीर्थें बोधिवृक्ष, बुद्धगया, कपिलवस्तु, सारनाथ, राजगृह, पाटलीपुत्र, नालंद, कुशीनगर, आणि सिंहलद्वीप हीं आहेत. या सर्वांविषयीं संक्षेपतः विचार करूं.

**बोधिवृक्ष**—सिद्धार्थाला ज्या वटवृक्षाखालीं सिद्धि प्राप्त झाली, त्या वृक्षाला बोधिवृक्ष असें ह्मणतात. हा वृक्ष बुद्धगया येथें अमरसिंहाच्या देवळाजवळ पश्चिम दिशेला आहे. हा वृक्ष त्याच वेळचा नसून त्याच्या शाखेपासून उत्पन्न झालेला आहे. ख्रिस्तिशकाच्या तीनशें वर्षांपूर्वीं लंके-

तील कित्येक राजे रोमनक्याथोलिक धर्माचा स्वीकार करून राज्य करीत होते. त्यांची सत्ता असेतोंपर्यंत बुद्धदंत बाहेर आला नाहीं, पण विमलचंद्र नांवाच्या बौद्धधर्मानुयायी राजाच्या हातीं इ. स. १५८९ सालीं राज्य आल्यावर हा दांत एका बौद्ध भिक्षूनें त्या राजाजवळ आणून दिला. त्या राजानें तो दांत ठेवण्यासाठीं क्यांडी शहराजवळ मालिगांव नांवाच्या गांवीं एक फारच सुंदर मंदिर बांधलें व त्यांत तो दांत सर्वांच्या दर्शनासाठीं सूवर्णकमलांत ठेवला. हा दांत प्रथम अगदीं उघडा ठेवला होता; पण तो चार दोन वेळ चोरण्याचे प्रयत्न झाल्यामुळें एका राजानें सात सुवर्णकरंड्यांतून तो दांत मोठ्या बंदोबस्तानें ठेवण्याची व्यवस्था सुरू केली व तेव्हांपासून तों हा वेळपर्यंत तीच व्यवस्था कायम आहे. इतकीं वर्षें जपून ठेवलेला दांत पाहण्याची इच्छा सिलोनमध्यें गेलेल्या प्रवाशांना साहजिक होते; पण ती इच्छा फारच थोड्यांची पूर्ण होते. तेथील मंदिरसंरक्षक, मुख्य धर्माधिकारी आणि मुख्य युरोपियन अंमलदार या तिघांची एकवाक्यता करून घेतल्यास तो दांत दृष्टीस पडतो. ज्या मंदिरांत दांत ठेवलेला आहे, तें मंदिर मात्र सर्वांना पाहूं देतात; आणि तें प्रत्येक प्रवाशानें अवश्य पहावें इतकें प्रेक्षणीयहि आहे. मंदिराच्या सिंहद्वारावर '**सर्वज्ञवक्रसरसीरुहराजहंसं । कुंदेंदुसुंदररुचिं सुरवृंदवंद्यं । सद्धर्मचक्रसहजं जनपारिजातं । श्रीदंतधातुममलं प्रणमामि भक्त्या ॥**' असा श्लोक लिहिलेला आहे. मंदिराच्या गाभाऱ्यांत चांदीचा एक भला मोठा चौरंग ठेवलेला असून, त्याच्या सभोंवार खालपासून वरपर्यंत भक्कम कठडा केलेला आहे व त्याचें दार नेहमीं बंद असतें. हा चौरंग जरी फार मोठा आहे, तरी तो फार सुंदर आहे. या चौरंगावर हातांत धरून वाजवावयाच्या घंटेच्या आकाराचा एक सुवर्णाचा

फार मोठा व तितकाच सुंदर कारागिराचा करंडा ठेवलेला आहे. या करंड्यावर अनेक हिरेमाणकें बसविलेलीं असून तीं आपल्या अंगच्या तेजानें नेहमीं चमकत असतात. याच सुंदर व विशाल करंड्यांत तो बुद्धदंत ठेवलेला आहे; पण करंडा उघडल्याबरोबर तो दांत दृष्टीस पडेल, असें मात्र कोणी समजूं नये. कारण त्यांत एकापेक्षां एक लहान असे सहा करंडे असून शेवटच्या लहान करंड्यांत तो ठेवलेला आहे. प्रत्येक करंडा सुवर्णाचा व रत्नजडित असून शेवटच्या अगदीं लहान करंड्याची उंची एक फूट व व्यास दहा इंच आहे. यावरून अगदीं वरचा करंडा केवढा असेल, व त्या सातहि करंड्यांना किती सुवर्ण लागलें असेल आणि रत्नांसह त्यांची किती किंमत असेल, याचा विचार करणारास साहजिक आश्चर्य वाटण्यासारखें आहे. अगदीं लहान करंड्यांत सुवर्णाचें कमल असून त्या कमलांत बुद्धदंत ठेवलेला आहे. या दांताला बौद्धधर्मियांप्रमाणें हिंदु व मुसलमानहि प्रिय मानतात. कारण हा दांत हिंदु मारुतीचा व मुसलमान महंमदाचा समजतात. कित्येकांच्या मतें बुद्धदंत ह्मणजे दंत नसून एक बनावट स्फटिकाचा तुकडा आहे !

बुद्धधर्मी लोक तीर्थयात्रा करणें हें मोठें पुण्य कृत्य समजतात. त्यांचीं मुख्य तीर्थें बोधिवृक्ष, बुद्धगया, कपिलवस्तु, सारनाथ, राजगृह, पाटलीपुत्र, नालंद, कुशीनगर, आणि सिंहलद्वीप हीं आहेत. या सर्वांविषयीं संक्षेपतः विचार करूं.

**बोधिवृक्ष**—सिद्धार्थाला ज्या वटवृक्षाखालीं सिद्धि प्राप्त झाली, त्या वृक्षाला बोधिवृक्ष असें ह्मणतात. हा वृक्ष बुद्धगया येथें अमरसिंहाच्या देवळाजवळ पश्चिम दिशेला आहे. हा वृक्ष त्याच वेळचा नसून त्याच्या शाखेपासून उत्पन्न झालेला आहे. ख्रिस्तिशकाच्या तीनशें वर्षांपूर्वी लंकें-

तील राजा महेंद्र, याची भगिनी संघामित्रा हिनें बोधिवृक्षाची एक शाखा सिंहलद्वीपांत अनुराधापूर येथें नेऊन लावली व त्यापासून पुढें अनेक शाखा प्रत्येक बौद्ध विहाराजवळ लावून ठिकठिकाणीं वटवृक्ष उत्पन्न केले. या सर्व वृक्षांना बौद्धधर्मी लोक फार पवित्र मानतात.

**बुद्धगया**—हें बौद्धधर्मियांचें प्रधान तीर्थ होय. ज्या ठिकाणीं गौतमानें पुष्कळ दिवस तपश्चर्या केली, तें ठिकाण सर्वविश्रुत करावें या उद्देशानें अशोकानें तेथें अत्यंत सुंदर मंदिर बांधलें असून तें अद्यापहि चांगल्या स्थितींत आहे. या मंदिराची रचना हिंदुमंदिराप्रमाणें असून पूजा-अर्चेचे प्रकारहि हिंदुधर्माप्रमाणेंच आहेत. याबद्दल कित्येक कट्टया बुद्ध-धर्मियांना पराकाष्टेचा उद्वेग वाटतो व ते याचा सर्व दोषहि हिंदुधर्मा-वरच लादतात ! हें ठिकाण गयेजवळ असल्यामुळें यास बुद्धगया असें ह्मणतात. बुद्धधर्म मूर्तिपूजेच्या विरुद्ध आहे, पण या देवळांत बऱ्याच मूर्ती असून त्यांची दररोज पूजा होत असते. या प्रकारामुळेंच कीं काय कोण जाणे, पुष्कळ हिंदुलोक हें आपलेंच मंदिर समजतात. या क्षेत्राजवळून फल्गु या नांवाची एक विशाल नदी वाहते; पण त्या नदीला पाणी फारच थोडें आहे.

**कपिलवस्तु**—गौतमबुद्धाचें हें जन्मस्थान असल्यामुळें या स्थळाला साहजिकच पावित्र्य आलें आहे. हें गांव हल्लीं भुईला या नांवानें प्रसिद्ध असून तें श्रीक्षेत्र काशीपासून एकशें तीस मैलांवर उत्तरेस रोहिणी-नदीच्या कांठीं आहे. हें शहर कपिलमुनींच्या इक्ष्वाकुवंशीय एका शि-ष्यानें वसवून त्यानें त्यास गुरूचें नांव दिलें होतें. गौतमबुद्ध असतां-नाच कौशलदेशचा राजा प्रसेनजित यानें आपल्या मुलाला कपिलवस्तु जिंकण्यास पाठविलें असतां त्यानें कपिलवस्तुशहराचा नाश करून टाकला. या शहराजवळ असलेल्या एका लहानशा भुईला नांवाच्या खेड्यालाच हल्लीं कपिलवस्तु असें ह्मणतात.

**सारनाथ**—हें बुद्धक्षेत्र काशीच्या अगदीं जवळ आहे. हें स्थान बौद्धधर्माचें गौरवस्थान असें मानतात. याच ठिकाणीं गौतमानें धर्मप्रचारास प्रथम आरंभ केला. भरतखंडांत एकेकाळीं सारनाथ हें ठिकाण फारच प्रसिद्ध होतें. राजा अशोक व अन्य राजांनीं या ठिकाणीं बुद्धभिक्षूंना राहण्यासाठीं अनेक स्तूप वगैरे बांधले होते; पण अनंतकालाच्या धडाक्यानें व बौद्धधर्मद्वेष्ट्यांच्या अविचारानें सर्वांचा विध्वंस होऊन आज सारनाथ एथें फक्त अशोकाचा एक स्तूप आहे, आणि तोहि मोडक्यातोडक्या स्थितींत आहे.

**राजगृह**—ही मगधदेशांतील बिंबिसार राजाची राजधानी होय. परंतु हल्लीं या नांवाचें शहर उपलब्ध नसून त्यास दुसरें कांहीं नांव असल्याचेंहि समजत नाहीं. बिहारप्रांतांतील एका डोंगराळ भागांत एक गुहा आहे. ही गुहा सप्तपर्णी गुहा या नांवानें प्रसिद्ध असून याच गुहेंत सिद्धार्थ तपश्चर्या करीत होता असें बौद्धभिक्षु ह्मणतात. जवळच असलेल्या अरण्याला वेणुवन असें ह्मणतात. हीं दोन्हीं ठिकाणें बौद्धभिक्षु फार पवित्र मानतात.

**पाटलीपुत्र**—पाटलीगांव या नांवाचें पूर्वी एक लहान खेडेगांव मगधदेशांत होतें. त्या गांवाला गौतम राजगृहाहून वारंवार जात असे. त्यानें असें भविष्य वर्तविलें होतें कीं, हा गांव कांहीं दिवसांनीं ऊर्जितावस्थेला येईल. त्याप्रमाणें बुद्धानंतर कांहीं वर्षांनीं राजगृहशहराचें वैभव नष्ट झालें व पाटलीगांव ही मगधदेशाची राजधानी झाली. त्यावेळीं या गांवाचें नांव पाटलीपुत्र असें ठेवण्यांत आलें. पुढें अशोकराजाचे वेळीं या शहराची फारच भरभराट झाली. अशोकानें एका दरवाजाचें नांव गौतमदरवाजा असें ठेवलें होतें, तें अद्याप चालतें. हल्लीं या शहराला पाटना असें ह्मणतात.

**नालंद**—बौद्धधर्म शिक्षणाचीं जीं विद्यालयें बुद्धकालीन होतीं, त्यांना विहार असें नांव होतें. सगळ्यांत नालंदचा विहार मोठा होता गौतम या विहारांत वर्षांतून तीन महिने राहून धर्मोपदेश करीत असे. राजा शिलादित्य याच्या कारकीर्दींत नालंदचें विद्यालय फारच प्रसिद्धीस आलें होतें. या विद्यालयाचा सर्व खर्च राजाकडून होत असे. नालंद येथें एकंदर सहा विहार असून तेथें दहाहजार भिक्षु अध्ययन करीत असत. दूर दूर देशांतून अनेक पंडित त्यावेळ आपली विद्वत्ता दाखविण्यासाठीं या विहारांत येत असत. येथील विद्यार्थ्यांचा मुख्य अभ्यास ह्मटला ह्मणजे 'त्रिपिटक' मुखस्थ करणें हा होता. सूत्रपिटक ( बुद्धदेवाचीं वाक्यें ), विनयपिटक, ( व्यवहार धर्म ) आणि अभिधर्मपिटक, ( बौद्धधर्माचीं दार्शनिक तत्वें ) अशीं हीं त्रिपिटकें होत. प्रसिद्ध चिनी प्रवासी हुएनत्संग या विहारांत पांच वर्षें बौद्धधर्माचा अभ्यास करीत होता. नालंद याला हल्लीं बारागांव असें ह्मणतात. हा गांव पाटना जिल्ह्यांत असून बुद्धगयेपासू चाळीस मैलांवर आहे.

**कुशीनगर**—हें गांव काशीपासून एकशें वीस मैल व कापिलवस्तु पासून ऐशीं मैल आहे. गौतमाला येथें महानिर्वाणाची प्राप्ति झाली ह्मणून हें क्षेत्र पवित्र मानतात. बौद्ध भिक्षु गौतमास दहन केलेली जागा देखील दाखवितात. याशिवाय आणखी देखील कांहीं स्थळ आहेत, पण तीं विशेष प्रसिद्ध नसल्यामुळें त्यांचा येथें उल्लेख न करितां हें बुद्धचरित्र येथेंच पूर्ण करूं.

संपूर्ण.

ग्रं. क्र. 
ग्रंथ संग्रहालय